रविवार
१
फेब्रुवारी २०२६

अकोला
पाने : ८ + ४
वर्ष : १९
अंक : ३२७
स्वागत मूल्य ३ रुपये
www.ajinkyabharat.com

बातम्यांचा गतिमान पाठलाग

# अजिंक्य भारत



पॉल स्टर्लिंगचा हिटमॅनला शोबी पछाड!
(पान ७ वर)

## थोडक्यात

### जा- मर म्हणणे म्हणजे जीवन संपविण्यासाठी प्रवृत्त करणे नव्हे : हायकोर्ट



**कोची :** दोन व्यक्तीच्या भांडणादरम्यान एकाने जा आणि मर यांसारखी अनौपचारिक विधाने करणे हे जीवन संपविण्यास प्रवृत्त करण्याच्या श्रेणीत येत नाही. जीवन संपविण्यास प्रवृत्त करणाऱ्या विधानाचा करण्यामागील हेतू महत्त्वाचा आहे, असा महत्त्वपूर्ण निकाल केरळ उच्च न्यायालयाने दिला आहे. न्यायमूर्ती सी. प्रदीप कुमार यांच्या एकलपीठाने सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा हवाला देत संशयित आरोपविरोधात सत्र न्यायालयाचा आदेश रद्द केला.

### २९ पॅलेस्टिनींचा गाझामध्ये मृत्यू



**डेर अल-बाला (गाझा पट्टी) :** गाझामधील विविध रुग्णालयांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी झालेल्या इस्रायली हवाई हल्ल्यांमध्ये किमान २९ पॅलेस्टिनी नागरिक ठार झाले आहेत. गेल्या ऑक्टोबरमध्ये युद्ध थांबवण्यासाठी झालेल्या युद्धविरामानंतरचा हा सर्वाधिक मृतांचा आकडा असल्याचे मानले जात आहे. हमासने पुन्हा एकदा युद्धविरामाच्या अटींचे उल्लंघन केल्याचा आरोप इस्रायलने शुक्रवारी केला होता. या आरोपानंतर अवघ्या एका दिवसात इस्रायलने संपूर्ण गाझा पट्टीत भीषण हल्ले चढवले. यामध्ये निर्वासितांच्या तंबूंना, एका निवासी इमारतीला आणि एका पोलिस ठाण्याला लक्ष्य करण्यात आले. विशेष म्हणजे, इजिप्तच्या सीमेला लागून असलेले राफा क्रॉसिंग रविवारी पुन्हा सुरू होणार आहे.

### पाटील असावा पण पटेल नाही - राज ठाकरे



**मुंबई :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी एक पोस्ट केली आहे. ज्यामध्ये त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षपदाबाबत भाष्य केले आहे. एक्सवर केलेल्या आपल्या पोस्टमध्ये राज ठाकरे म्हणाले आहेत की, महाराष्ट्राच्या राजकारणाचा गेल्या काही काळात पार विचका झाला आहे त्यावर खरंतर भाष्य पण करावं असं वाटत नाही. पण तरीही आज दिवसभर ज्या घडामोडी सुरू आहेत त्यावर बोलावंच लागेल. राज ठाकरे म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासारख्या अस्सल मराठमोळ्या मातीतला, आणि रांगड्या पक्षाचा अध्यक्ष हा कोणीही मराठी असावा, पाटील असावा पण पटेल नाही!

### प.बंगालमधील भ्रष्टाचाऱ्यांना तुरुंगात धाडणार - शहा

**कोलकाता :** आगामी विधानसभा निवडणुकीनंतर पश्चिम बंगालमध्ये भारतीय जनता पक्ष सत्तेत येईल. त्यानंतर येथील भ्रष्टाचाऱ्यांना एका मागोमाग तुरुंगात डांबल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी शनिवारी दिला. सत्ताधारी तृणमूल काँग्रेसवर शहा यांनी यावेळी जोरदार हल्ला चढवला. सिलीगुढी, बॅरकपूरसह काही ठिकाणी शहा यांनी भाजपच्या संघटनात्मक बैठका घेतल्या. त्यावेळी ते बोलत होते. देशात ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील सरकारइतके भ्रष्ट दुसरे कोणतेही प्रशासन नाही. राज्यात भाजपचे सरकार पूर्ण बहुमताने स्थापन होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## लोकभवनात घेतली शपथ

# सुनेत्रा पवार नव्या उपमुख्यमंत्री!

**मुंबई, दि. ३१** वृत्तसंस्था



उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीत सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची सूत्रे स्वीकारली आहेत. सुनेत्रा पवार यांच्याकडे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वाधिकार असणार आहेत. मुंबईतील राजभवन येथे सुनेत्रा पवार यांनी राज्याच्या उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. त्या राज्याच्या पहिल्या उपमुख्यमंत्री झाल्या आहेत. राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी सुनेत्रा पवार यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. आजच्या शपथविधीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार, वरिष्ठ नेते आणि मंत्रिमंडळातील मंत्री उपस्थित होते. राज्यावर ओढवलेल्या या दुःखद प्रसंगामुळे कोणताही गाजावाजा न करता, मोजक्याच नेत्यांच्या उपस्थितीत अत्यंत साधेपणाने हा शपथविधी सोहळा पार पडला. अजित दादांच्या जाण्याने निर्माण झालेली राजकीय पोकळी भरून काढण्यासाठी आणि पक्षाची विखुरलेली मोट बांधण्यासाठी सुनेत्रा पवार यांच्यावर ही मोठी जबाबदारी सोपवण्यात आली आहे. आता राज्याच्या आणि पक्षाच्या नेतृत्वाची सर्व सूत्रे सुनेत्रा वहिनींच्या हाती असतील.

आज दुपारी २ च्या सुमारास विधिमंडळात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची बैठक पार पडली. यात सुनेत्रा पवार यांची राष्ट्रवादीच्या आमदारांनी एकमताने विधिमंडळ नेतेपदी निवड केली. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा गटनेते पदासाठी सुनेत्रा पवार यांच्या नावाचा प्रस्ताव पक्षाचे नेते दिलीप वळसे पाटील यांनी मांडला आहे. तर या प्रस्तावाला पक्षाचे जेष्ठ नेते म्हणून मंत्री छगन भुजबळ यांनी अनुमोदन दिलं आहे. शपथविधीनंतर अवघ्या दोन तासांतच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खातेवाटप जाहीर केले.

**सुनेत्रा पवारांकडे तीन खात्यांची जबाबदारी :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्यावर पुढील तीन खात्यांची जबाबदारी सोपवली आहे. क्रीडा विभाग, राज्य उत्पादन शुल्क विभाग, अल्पसंख्याक विकास विभाग या तीन खात्याची जबाबदारी सुनेत्रा पवार यांच्यावर सोपवली आहे. अजित पवार यांच्याकडे असलेले वित्त (अर्थ) व नियोजन खाते सध्या सुनेत्रा पवार यांच्याकडे देण्यात आलेले नाही. (पान २ वर)


## दादांच्या स्वप्नातील महाराष्ट्र घडविणार! - सुनेत्रा पवार


आज महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेताना मन अत्यंत भावुक झाले आहे. आदरणीय अजितदादांनी आयुष्यभर शेतकरी, कष्टकरी, महिला, युवक आणि समाजातील वंचित घटकांसाठी जगण्याचा मंत्र दिला. त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा वारसा पुढे नेताना 'शिव-शाहू-फुले-आंबेडकर' यांच्या विचारांवर निष्ठा ठेवून कर्तव्यभावनेने ही जबाबदारी स्वीकारत आहे. दादांच्या अकाली जाण्याने वैयक्तिक आयुष्यातच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राच्या मनावर दुःखाचा मोठा डोंगर कोसळला आहे. मात्र त्यांनी दिलेली कर्तव्यनिष्ठा, संघर्षाची ताकद आणि जनतेप्रतीची प्रामाणिक बांधिलकी हाच माझा खरा आधार आहे. त्यांच्या स्वप्नातील न्यायप्रिय, समताधिष्ठित आणि विकसित महाराष्ट्र घडवण्यासाठी अखंड प्रामाणिकपणे, पारदर्शकतेने आणि लोकाभिमुखतेने काम करत राहीन, हा विश्वास मी आज या निमित्ताने देते. या कठीण काळात महाराष्ट्रातील जनतेने दिलेले प्रेम, विश्वास आणि पाठिंबा हेच माझे सर्वात मोठे बळ आहे. आपल्या विश्वासाच्या जोरावर, दादांच्या विचारांना उजाळा देत, नव्या आशेने आणि नव्या ऊर्जेने पुढे चालत राहीन. शेतकऱ्यांच्या हितासाठी, युवकांच्या संधींसाठी, महिलांच्या सक्षमीकरणासाठी आणि सर्वसामान्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासनाच्या प्रत्येक योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणे हे माझे सर्वोच्च प्राधान्य असेल. देशाचे पंतप्रधान आदरणीय नरेंद्र मोदी साहेबांच्या 'विकसित भारत २०४७' या संकल्पनेला बळ देण्यासाठी तसेच देशाचे गृह व सहकारमंत्री आदरणीय अमित शाह साहेबांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास साधण्यास राज्य शासन सदैव तत्पर राहील. तसेच, नव महाराष्ट्राचे शिल्पकार स्वर्गीय यशवंतराव चव्हाण साहेबांच्या विचारांचा वारसा समर्थपणे पुढे नेण्याची जबाबदारी आम्ही सर्वजण अत्यंत प्रामाणिकपणे पार पाडू. महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या नेतृत्वाखाली उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांच्या साथीने महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी, सामाजिक समता, आर्थिक प्रगती आणि सर्वसमावेशक समृद्धी साधण्यासाठी मी सदैव प्रयत्नशील राहीन. जनतेच्या अपेक्षांना न्याय देणे, शासन-प्रशासन अधिक संवेदनशील व लोकाभिमुख बनवणे आणि राज्याला विकासाच्या नव्या उंचीवर नेणे, हाच माझा संकल्प आहे. पुन्हा एकदा महाराष्ट्रातील जनतेचे, सहकाऱ्यांचे मनापासून आभार मानते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील सहकाऱ्यांनी माझ्यावर ठेवलेल्या विश्वासास पात्र ठरण्यासाठी पूर्ण क्षमतेने कार्य करीन, हा शब्द देते.

# पार्थ पवार राज्यसभेवर?

## राष्ट्रीय अध्यक्षपदासाठी प्रफुल्ल पटेल यांच्या नावाची चर्चा

**मुंबई, दि. ३१** वृत्तसंस्था





अजित पवार यांच्या आकस्मिक निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सत्ताकेंद्र, नेतृत्व आणि प्रतिनिधित्व याबाबत महत्त्वाच्या घडामोडींना वेग आला आहे. सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर रिक्त झालेल्या राज्यसभेच्या जागेवर पुत्र पार्थ पवार यांची वर्णी लागू शकते, अशी जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. याचबरोबर पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदासाठीही नव्या नावांवर मंथन सुरू झाले आहे.

सुनेत्रा पवार यांनी शनिवारी राज्यसभेच्या खासदारकीचा राजीनामा देत उपमुख्यमंत्री पदाची जबाबदारी स्वीकारली. त्यानंतर राष्ट्रवादीच्या कोट्यातील एक राज्यसभा जागा रिक्त झाली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या जागेवर अजित पवारांचे ज्येष्ठ चिरंजीव पार्थ पवार यांना पाठवण्याची तयारी सुरू आहे. दरम्यान, सुनेत्रा पवार यांची राष्ट्रवादीच्या विधिमंडळ पक्षनेतेपदी निवड करण्यात आली असून, अजित पवारांच्या निधनामुळे रिक्त झालेली बारामती विधानसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक त्या लढवणार असल्याचेही स्पष्ट झाले आहे. पार्थ पवार यांनी यापूर्वी २०१९ मध्ये मावळ लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवली होती. मात्र, त्या निवडणुकीत शिवसेनेचे उमेदवार श्रीरंग बारणे यांनी त्यांचा पराभव केला होता. आता राज्यसभेच्या माध्यमातून पार्थ पवार राजकीय कारकिर्दीची (पान २ वर)

### विलिनीकरण अनेकांना अमान्य

■ दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस गटांच्या विलिनीकरणाची शक्यता वर्तवली जात असतानाच, अजित पवार यांच्या गटातील राष्ट्रवादीचे अस्तित्व स्वतंत्रच ठेवावे, अशी भूमिका अनेक नेत्यांकडून मांडली जात असल्याची माहिती आहे. त्यामुळे एकीकरणाऐवजी स्वतंत्र वाटचालीचा पर्याय पुढे येताना दिसत आहे.

# संसदेत आज देशाचा अर्थसंकल्प सादर होणार!

## कृषी क्षेत्राकडून मोठ्या अपेक्षा

**नवी दिल्ली, दि. ३१** वृत्तसंस्था



देशाचा केंद्रीय अर्थसंकल्प उद्या, १ फेब्रुवारी रोजी संसदेत सादर केला जाणार आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्याकडून मांडल्या जाणाऱ्या या अर्थसंकल्पाकडे देशभरातील सर्व घटकांचे लक्ष लागले आहे. विशेषतः ग्रामीण भाग, शेतकरी आणि कृषी क्षेत्रासाठी यंदाचा अर्थसंकल्प महत्त्वाचा मानला जात आहे. यंदा प्रथमच अर्थसंकल्प रविवारच्या दिवशी सादर होणार असून, अर्थव्यवस्थेतील मंदी, वाढती महागाई आणि हवामान बदलाचे परिणाम या पार्श्वभूमीवर सरकार कोणते निर्णय घेणार, याकडे सर्वांचे लक्ष आहे.

कृषी क्षेत्रासाठी वाढीव तरतुदीची शक्यता: केंद्र सरकारकडून कृषी क्षेत्रासाठीच्या तरतुदींमध्ये वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मागील वर्षी सुमारे १.३७ लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. यंदा हा आकडा सुमारे १.५ लाख कोटी रुपयांपर्यंत नेण्याचा अंदाज तज्ज्ञांकडून वर्तवण्यात येत आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, उत्पादन खर्च कमी करणे आणि हवामान बदलाशी सामना करण्यासाठी विविध योजनांवर भर दिला जाण्याची शक्यता आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी, पीक विमा योजना आणि सिंचन प्रकल्पांसाठी अतिरिक्त निधी उपलब्ध होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. कृषी क्षेत्राचा देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पादनात सुमारे १८ ते २० टक्के वाटा असून, ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देणे हे सरकारपुढील मोठे आव्हान आहे. (पान २ वर)

# सोनम वांगचुक यांची प्रकृती बिघडली

## सर्वोच्च न्यायालयाने दिले महत्त्वपूर्ण आदेश

**जोधपूर, दि. ३१** वृत्तसंस्था



लेह हिंसाचार प्रकरणासंदर्भात राष्ट्रीय सुरक्षा कायद्याअंतर्गत जोधपूर मध्यवर्ती कारागृहात बंद असलेल्या प्रसिद्ध पर्यावरणवादी आणि सुधारक सोनम वांगचुक यांची तब्येत बिघडली आहे. शनिवारी सकाळी त्यांना कडक सुरक्षेत जोधपूर एम्समध्ये आणण्यात आले. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांनंतर तुरुंग प्रशासनाने त्यांची कसून आरोग्य तपासणी केली.

सोनम वांगचुक यांच्या पत्नी गीतांजली अंग्मो यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करून तुरुंगातील पतीच्या प्रकृतीबद्दल गंभीर चिंता व्यक्त केली. याचिकेत दूषित पाणी आणि तुरुंगात योग्य सुविधांचा अभाव यामुळे वांगचुक यांची प्रकृती खालावत असल्याचा आरोप करण्यात आला होता. याचिकेवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने तुरुंग प्रशासनाला वांगचुक यांची त्वरित तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करून न्यायालयाला सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. वांगचुक गेल्या काही दिवसांपासून पोटदुखी आणि पचनाच्या समस्यांबद्दल तक्रार करत होत्या. तुरुंगात दूषित पाणी पिल्यामुळे हे घडले. शनिवारी सकाळी ६:३० च्या सुमारास पोलिसांच्या पथकाने त्यांना एम्समध्ये नेले. तेथे गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट आणि इतर तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने त्यांच्या अनेक वैद्यकीय चाचण्या केल्या. सुमारे दोन तास चाललेल्या तपासणीनंतर त्यांना पुन्हा तुरुंगात नेण्यात आले.

### शून्यातून विश्व निर्माण करणाऱ्या 'किंग'चा करुण अंत!

**बेंगळुरू :** कर्नाटक आणि केरळच्या रिअल इस्टेट क्षेत्रातील एक अतिशय वजनदार नाव, 'कॉन्फिडंट ग्रुप'चे संस्थापक आणि अध्यक्ष डॉ. सीजे रॉय यांच्या मृत्यूच्या वृत्ताने संपूर्ण दक्षिण भारत हादरला आहे. आयकर विभागाच्या कारवाईदरम्यान निर्माण झालेल्या प्रचंड मानसिक दबावातून रॉय यांनी स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या केल्याचे प्राथमिक वृत्त समोर आले आहे. ज्या व्यक्तीने शून्यातून विश्व निर्माण केले आणि १५० हून अधिक मोठे प्रकल्प पूर्ण केले, त्या नेत्याचा असा दुर्दैवी अंत झाल्याने अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.



मिळालेल्या माहितीनुसार, गेल्या काही दिवसांपासून आयकर विभाग सीजे रॉय यांच्या व्यावसायिक व्यवहारांची कसून चौकशी करत होता. बेंगळुरू येथील त्यांच्या मुख्य कार्यालयात अधिकाऱ्यांची उपस्थिती असतानाच, रॉय यांनी स्वतःला एका खोलीत (पान २ वर)

# अमेरिकेने भारताला दिली मोठी ऑफर

## व्यापार कराराचा मार्ग मोकळा होण्याची शक्यता

**नवी दिल्ली, दि. ३१** वृत्तसंस्था



अमेरिकेने काही दिवसांपूर्वी मोठा हल्ला करत थेट व्हेनेझुएलाच्या अध्यक्षांचे अपहरण केले. या कारवाईनंतर अमेरिकेवर मोठ्या प्रमाणात टीका झाली. दुसरीकडे सध्या व्हेनेझुएलाच्या तेलावर आता पूर्णपणे अमेरिकेचे नियंत्रण आहे. यातच आता भारताने व्हेनेझुएलाकडून तेल खरेदी करण्याचा प्रस्ताव अमेरिकेने ठेवला आहे.

भारत हा रशियाकडून तेल खरेदी करत असल्याने डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर तब्बल ५० टक्के टॅरिफ लावला. गेल्या काही दिवसांपासून भारत आणि अमेरिकेतील व्यापार चर्चा देखील थांबली आहे. भारताने व्हेनेझुएलाकडून तेल खरेदी करावे, असा प्रस्ताव अमेरिकेने ठेवला आहे.

भारतातील ऊर्जा मागणी खूप जास्त आहे. रशियाकडून तेल खरेदी बंद केल्याने तुटवडा निर्माण होऊ शकतो. या तुटवडा भरून काढण्यासाठी भारताने व्हेनेझुएलाकडून तेल खरेदी केले पाहिजे, असे अमेरिकेने म्हटले आहे. जर भारताने व्हेनेझुएलाचे तेल खरेदी केले तर लवकरच भारत आणि अमेरिकेत व्यापार करार देखील होऊ शकतात.

रॉयटर्सच्या रिपोर्टनुसार, डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाने नुकताच भारताला मोठे संकेत दिले असून तुम्ही व्हेनेझुएलाकडून तेल खरेदी करू शकता. दरम्यान, रशिया युक्रेन युद्ध सुरू झाल्यानंतर भारताने मोठ्या प्रमाणात रशियाकडून कच्चे तेल खरेदी करण्यास सुरूवात केली. त्याचे मुख्य कारण म्हणजे रशिया भारताला अत्यंत कमी किंमतीत हे तेल देत होता. मात्र, डोनाल्ड ट्रम्प यांनी यावरून भारतावर काही गंभीर आरोप केले आणि टॅरिफमध्ये वाढ केली.

**कृतज्ञता** | **अरब राष्ट्रांच्या परराष्ट्रमंत्र्यांशी भेट**

# पश्चिम आशियातील शांततेसाठी अरब राष्ट्रांची भूमिका कौतुकास्पद

**नवी दिल्ली, दि. ३१** वृत्तसंस्था

**अरब देशांच्या परराष्ट्रमंत्र्यांनी शनिवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. यावेळी पंतप्रधानांनी पश्चिम आशियामध्ये शांतता आणि स्थैर्य प्रस्थापित करण्यासाठी अरब राष्ट्रांनी बजावलेल्या भूमिकेचे विशेष कौतुक केले. दुसऱ्या भारत-अरब परराष्ट्रमंत्री बैठकीसाठी अरब राष्ट्रांचे परराष्ट्रमंत्री सध्या नवी दिल्लीच्या दौऱ्यावर आहेत. या पार्श्वभूमीवर ही भेट झाली.**



पंतप्रधान कार्यालयाने प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, भारत आणि अरब जगतातील खोलवर रुजलेले ऐतिहासिक आणि जनसामान्यांमधील संबंधांवर पंतप्रधानांनी प्रकाश टाकला. हे संबंध वर्षानुवर्षे दोन्ही बाजूंमधील नाते अधिक दृढ करण्यासाठी प्रेरणा देत आहेत.

पंतप्रधानांनी भारत-अरब भागीदारीसाठी भविष्यातील आपला दृष्टिकोन मांडला. व्यापार, गुंतवणूक, ऊर्जा, तंत्रज्ञान आणि आरोग्य सेवा यांसारख्या प्राधान्य क्षेत्रांमध्ये दोन्ही बाजूंच्या लोकांच्या परस्पर फायद्यासाठी सहकार्य अधिक वाढवण्याबाबत त्यांनी भारताच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला. या बैठकीत मोदींनी पॅलेस्टिनी जनतेला भारताचा पाठिंबा कायम असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट केले. तसेच, गाझा शांतता आराखड्यासह (गाझा पिस प्लॅन) शांततेसाठी सुरू असलेल्या विविध प्रयत्नांचे त्यांनी स्वागत केले. प्रादेशिक शांतता आणि स्थिरतेसाठी अरब लीगने बजावलेल्या महत्त्वपूर्ण भूमिकेबद्दलही पंतप्रधानांनी कृतज्ञता व्यक्त केली.

## एलेना रायबाकिनाने पहिल्यांदाच ऑस्ट्रेलियन ओपन जेतेपदावर कोरले नाव!

**मेलबर्न, दि. ३१** वृत्तसंस्था



कझाकस्तानची २६ वर्षीय एलेना रायबाकिनाने मोठा कारनामा करून दाखवले आहे. एलेना रायबाकिना ऑस्ट्रेलियन ओपन महिला चॅम्पियन बनली आहे. पहिला सेट जिंकून रायबाकिनाने तिचा जुना पराक्रम कायम ठेवला आहे. रायबाकिनाने तीन सेटच्या संघर्षपूर्ण खेळ करत अंतिम सामन्यात जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर आणि माजी विश्वविजेत्या बेलारूसची आर्यना साबालेन्का हिला हरवून तिचे दुसरे ग्रँड स्लॅम विजेतेपद आपल्या नावे केले आहे.

पहिला सेट जिंकल्यानंतर, रायबाकिनाने तिचा २४ वा सामना आपल्या नावे केला. जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर, २०२३ आणि २०२४ ची विजेती आणि २०२५ ची अंतिम फेरी गाठणारी बेलारूसची आर्यना साबालेन्का हिला पहिल्या सेटमध्ये रायबाकिनाने ६-४ असा जबर धक्का दिला. या सेट विजयामुळे कझाकस्तानच्या रायबाकिनाला चांगलाच मानसिक फायदा झालेला दिसून येतो. दुसरे ग्रँड स्लॅम जेतेपद: जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर असलेल्या सबालेंकाने दुसरा सेट ६-४ ने जिंकलाच नाही तर तिसऱ्या सेटमध्ये सर्व्हिस ब्रेक करून ३-० अशी आघाडी देखील मिळवली. तथापि, रायबाकिनाने पुनरागमन अंतिम सामना ६-४ ने जिंकून तिच्या पहिल्या ऑस्ट्रेलियन ओपन एकेरीच्या विजेतेपदावर नाव कोरले. रायबाकिनाने यापूर्वी चार वर्षांपूर्वी विम्बल्डन जेतेपद जिंकले होते. तेव्हापासून, (पान २ वर)

## पान 1 वरून...

### सुनेत्रा पवार नव्या उपमुख्यमंत्री!...

अर्थखात्याबाबत भाजपच्या वरिष्ठ पातळीवर अद्याप हिरवा कंदील नसल्याची माहिती सूत्रांकडून मिळते.

**सुनेत्रा पवार यांचा अल्प परिचय**

महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात आज एक नवा अध्याय लिहिला गेला आहे. राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री म्हणून सुनेत्रा अजित पवार यांनी शपथ घेतली. त्यांच्या सामाजिक, संस्थात्मक आणि राजकीय प्रवासातील हा एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

कौटुंबिक व शैक्षणिक पार्श्वभूमी सुनेत्रा पवार यांचा जन्म १८ ऑक्टोबर १९६३ रोजी धाराशिव जिल्ह्यातील तेर येथे झाला. त्यांचे वडील कै. बाजीराव पाटील आणि यांच्याकडे १३ गावची पाटीलकी होती. त्यांनी वाणिज्य शाखेतून पदवी (बी.कॉम.) प्राप्त केली आहे. सुनेत्रा पवार या दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी असून त्यांना पार्थ आणि जय अशी दोन मुले आहेत.

सामाजिक व संस्थात्मक कार्य - गेल्या २३ वर्षांपासून त्या सामाजिक क्षेत्रात सक्रिय असून बारामती परिसरात विविध संस्थांच्या माध्यमातून त्यांनी विकासाचे भक्कम जाळे उभे केले आहे. - बारामती हायटेक टेक्सटाईल पार्कच्या माध्यमातून त्यांनी ६ हजारांहून अधिक महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. - 'एन्व्हायरमेंटल फोरम ऑफ इंडिया' या स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून त्यांनी एक लाखांहून अधिक वृक्षांचे रोपण केले आहे. तसेच पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी त्यांनी विशेष पुढाकार घेतला आहे. - विद्या प्रतिष्ठानच्या विश्वस्त म्हणून त्यांनी शिक्षण क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. यासोबतच मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरे तसेच महिलांसाठी कर्करोग जनजागृती मोहिमा आयोजित केल्या आहेत.

राजकीय कारकीर्द - २५ जून २०२४ पासून त्या राज्यसभेच्या सदस्य (खासदार) म्हणून कार्यरत आहेत. आज त्यांनी या पदाचा राजीनामा देत उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. - संसदेत त्यांनी शिक्षण, महिला, बालके, युवक व क्रीडा विषयक स्थायी समितीवर काम केले आहे. - मेक्सिको येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय महिला संसद सदस्य परिषदेत त्यांनी भारतीय संसदेचे प्रतिनिधित्व केले आहे.मिळालेले सन्मान सुनेत्रा पवार यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. त्यामध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा जीवनगौरव पुरस्कार (२०२३), राष्ट्रमाता जिजाऊ पुरस्कार (२०२४) आणि ग्रीन वॉरियर पुरस्कार यांचा समावेश आहे.

### पार्थ पवार राज्यसभेवर?....

नव्याने सुरुवात करू शकतात, अशी अटकळ बांधली जात आहे. पक्षातील नेतृत्वबदलाचे संकेत म्हणूनही याकडे पाहिले जात आहे.

**राष्ट्रीय अध्यक्षाबाबत मतप्रवाह :** दरम्यान, अजित पवार हे राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय नेतृत्वही प्रभावीपणे सांभाळत होते. त्यांच्या अकाली जाण्यामुळे पक्षाच्या राष्ट्रीय पातळीवरील नेतृत्वाची धुरा कोणाकडे सोपवायची, यावर चर्चा सुरू झाली आहे. राष्ट्रीय अध्यक्षपदाबाबत पक्षात दोन मतप्रवाह आहेत. सध्या कार्याध्यक्ष असलेले प्रफुल्ल पटेल यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी नियुक्ती करावी, असा सूर पक्षातील एका गटाकडून व्यक्त केला जात आहे. प्रफुल्ल पटेल हे अनुभवी नेते असून राष्ट्रीय पातळीवरील त्यांचा दीर्घ अनुभव पक्षासाठी उपयुक्त ठरेल, असा यामागचा युक्तिवाद आहे. मात्र, दुसरीकडे राष्ट्रीय अध्यक्षपद हे अजित पवारांकडे होते, त्यामुळे हे पद पवार कुटुंबातच राहावे आणि सुनेत्रा पवार यांनी पक्षाची धुराही सांभाळावी, अशी मागणीही काही नेत्यांकडून केली जात आहे.

### संसदेत आज देशाचा अर्थसंकल्प...

रेल्वे पायाभूत सुविधांवर भर: या अर्थसंकल्पात रेल्वे क्षेत्रासाठी नव्या घोषणांची शक्यता आहे. आधुनिक सुरक्षा प्रणाली, उर्वरित मार्गांचे विद्युतीकरण आणि मालवाहतुकीसाठी रेल्वेचा वापर वाढवण्यावर लक्ष केंद्रित केले जाऊ शकते. आगामी वर्षांत मालवाहतुकीतील रेल्वेचा वाटा लक्षणीयरीत्या वाढवण्याचे उद्दिष्ट सरकारने ठेवले आहे.

नवीन बियाणे कायद्याचा प्रस्ताव: कृषी क्षेत्राशी संबंधित कायद्यात सुधारणा करण्याच्या दृष्टीने नवीन बियाणे विधेयक संसदेत मांडले जाण्याची शक्यता आहे. या कायद्याअंतर्गत बनावट किंवा निकृष्ट दर्जाच्या बियाणांच्या विक्रीवर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर आर्थिक दंड आणि कारावासाची तरतूद असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

कृषी निर्यात आणि प्रक्रिया उद्योगांकडे लक्ष: कृषी व अन्नधान्य निर्यातीला चालना देण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेतले जाण्याची अपेक्षा आहे. मूल्यवर्धित उत्पादन, कोल्ड चेन सुविधा, लॉजिस्टिक साखळी सुधारणा आणि प्रक्रिया उद्योगांच्या विस्तारावर भर दिला जाऊ शकतो. यामुळे शेतकऱ्यांना थेट लाभ मिळण्याची शक्यता आहे. तज्ज्ञांच्या मते, पशुपालन, मत्स्य व्यवसाय, फलोत्पादन आणि डिजिटल शेती यासारख्या संलग्न क्षेत्रांना सरकारने अधिक निधी उपलब्ध करून दिल्यास ग्रामीण उत्पन्न वाढीस मदत होऊ शकते. उद्या सादर होणाऱ्या अर्थसंकल्पातून शेतकरी, उद्योग आणि सामान्य नागरिकांच्या अपेक्षा कितपत पूर्ण होतात, याकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.

### शून्यातून विश्व निर्माण करणाऱ्या...

कोंडून घेतले आणि परवानाधारक बंदुकीतून स्वतःवर गोळी झाडली. गोळीबाराचा आवाज ऐकताच कर्मचारी आणि अधिकारी त्या दिशेने धावले, मात्र तोपर्यंत उशीर झाला होता. या घटनेमुळे आयकर विभागाच्या चौकशी पद्धतीवर आणि रॉय यांच्यावर असलेल्या दबावावर आता चर्चा सुरू झाली आहे. सीजे रॉय हे केवळ एक बिल्डर नव्हते, तर ते एक 'बिझनेस टायकून' होते. बेंगळुरूमध्ये मुख्यालय असलेल्या कॉन्फिडंट ग्रुपचा विस्तार अनेक क्षेत्रांत होता: समूहाने दक्षिण भारतात १५० हून अधिक निवासी आणि व्यावसायिक प्रकल्प राबवले आहेत. लक्झरी व्हिला, अपार्टमेंट्स आणि भव्य टाउनशिपसाठी ही कंपनी ओळखली जाते. बेंगळुरू, कोची आणि तिरुवनंतपुरममध्ये त्यांचे मोठे वर्चस्व आहे. सीजे रॉय यांचे मल्याळम चित्रपटसृष्टीशी जवळचे संबंध होते. 'कॅसानोव्हा' आणि 'मारक्कर' यांसारख्या मोठ्या बजेटच्या चित्रपटांची निर्मिती त्यांनी केली होती. विशेष म्हणजे, 'बिग बॉस मल्याळम' या अतिशय लोकप्रिय शोचे ते मुख्य प्रायोजक होते, ज्यामुळे घराघरात त्यांचे नाव पोहोचले होते.

### एलेना रायबाकिनाने पहिल्यांदाच...

ती फक्त एकदाच ऑस्ट्रेलियन ओपनच्या अंतिम फेरीत पोहोचली आहे, २०२३ मध्ये. रायबाकिनासाठी टेनिस प्रवास कठीण: कझाकस्तानच्या २६ वर्षीय रायबाकिनासाठी टेनिस प्रवास कठीण राहिला आहे. ती १५ वर्षांची होईपर्यंत, तिच्याकडे वैयक्तिक टेनिस प्रशिक्षक देखील उपलब्ध नव्हता, ती १८ वर्षांची होईपर्यंत, तिने इतर चार खेळाडूंसह एका गटात प्रशिक्षण घेतले होते. इतकेच नाही तर तिने खेळाडूंसाठी विशेष शाळा नव्हती म्हणून नियमित हायस्कूलमध्ये शिक्षण पूर्ण केले. तिच्या कारकिर्दीतील हे १२ वे मोठे विजेतेपद आहे. पण ऑस्ट्रेलियन ओपन विजयानंतर प्रतिक्रिया देताना ती म्हणाली की, ''मी माझ्या संघाचे आभार मानू इच्छिते. त्यांच्याशिवाय हा विजय शक्य झाला नसता. हे सर्व शक्य केल्याबद्दल मी माझ्या वैद्यकीय संघाचे आणि प्रायोजकांचे आभार मानू इच्छिते.

## सत्कारमूर्ती सरपंचांच्या उपस्थितीत स्नेहसंमेलन

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**पातूर, दि. ३१ :** तालुक्यातील चान्नी येथील जय बजरंग माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात नुकतेच स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. चालू शैक्षणिक सत्रात विविध स्पर्धा व उपक्रमांमध्ये उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जय बजरंग युवक मंडळ, चान्नीचे संस्थापक गजाननभाऊ इंगळे होते. प्रमुख उपस्थिती म्हणून मंडळाचे अध्यक्ष हरिश्चंद्र राखोंडे, संचालक डॉ. विनायकराव इंगळे, मधुकरराव गाडगे व प्रकाश बंड यांची लाभली. यावेळी राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त खेट्री (ता. पातूर) येथील सरपंच जहूर खान यांचा विशेष सत्कार करण्यात आला. त्यांच्यासह उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विविध स्पर्धांतील विजेत्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच, राज्यस्तरीय धनुर्विद्या स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल कु. पूजा राजगुरे हिचाही यावेळी विशेष गौरव करण्यात आला.

# नवीन आर्थिक संकल्प २०२६ कसा असावा : विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या प्रतिक्रिया

### डिजिटल युगाशी सुसंगत आणि महागाईवर नियंत्रण ठेवणारा असावा



डिजिटल तंत्रज्ञानाचा वाढता वापर लक्षात घेता, शिक्षण, आरोग्य, प्रशासन व रोजगारनिर्मितीमध्ये डिजिटल सुविधा अधिक सुलभ व स्वस्त व्हाव्यात, अशी गरज आहे. त्याचबरोबर मोबाईल कंपन्यांकडून आकारले जाणारे वाढते दर, डेटा पॅकचे दर व सेवा शुल्क यावर काही प्रमाणात नियंत्रण व निर्बंध घालण्याची आवश्यकता भासत आहे. देशात होणाऱ्या टप्प्याटप्प्याच्या निवडणुका आणि त्याचा थेट परिणाम म्हणून वाढणारी महागाई याचा सखोल विचार या अर्थसंकल्पात होणे अत्यंत गरजेचे आहे. जीवनावश्यक वस्तू, इंधन दर, शिक्षण व आरोग्य खर्च यामध्ये दिलासा मिळेल, अपेक्षित आहे. एकूणच, नवीन आर्थिक संकल्प २०२६ हा केवळ आकड्यांचा नव्हे, तर सामान्य माणसाच्या दैनंदिन जगण्याला दिलासा देणारा.

**-प्रा. डॉ. जया वजीरे,**
डॉ बाबासाहेब आंबेडकर कॉलेज ऑफ जर्नालिझम अँड सोशल वर्क अकोला.

### स्थिर आणि पुरेसा रोजगार



वाढत्या महागाईत सर्वसामान्य माणूस अक्षरशः भरडला जात आहे. रोजच्या गरजा भागवतानाच कसरत करावी लागते, मग जीवनमान उंचावणं तर दूरची गोष्ट वाटते. खरं तर रोजगार निर्मिती हीच महागाईवरची खरी औषध आहे. स्थिर आणि पुरेसा रोजगार मिळाल्याशिवाय लोकांची आर्थिक परिस्थिती सुधारू शकत नाही. तरुण वर्ग आज नोकरीसाठी धडपडतोय, पण संधीच कमी आहेतहे गंभीर आहे. यात शिक्षण क्षेत्राकडे दुर्लक्ष होणं ही आणखी चिंतेची बाब आहे. सर्वच क्षेत्रांतील शिक्षकांच्या भरत्या तातडीने होणं आवश्यक आहे. शिक्षक नसतील तर शिक्षणाचा दर्जा कसा टिकणार? विशेषतः जिल्हा परिषदेच्या शाळा बंद पडू नयेतकारण ह्याच शाळा ग्रामीण व गरीब विद्यार्थ्यांसाठी आशेचा किरण आहेत. शाळा बंद करणे हा उपाय नसून, त्या सक्षम करणे ही काळाची गरज आहे.

**- प्रा. कोमल ब. आठवले,**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज ऑफ जर्नालिझम अँड सोशल वर्क अकोला.

### जीएसटीचा दर कमी करण्यात यावा!



अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अवलंबिलेले टॅरिफ वाढीचे धोरण, जगातील महाशक्तीमध्ये सुरु असलेली चढाओढ, तिसऱ्या जागतिक युद्धाची नांदी ठरावी अशी युद्धजन्य परिस्थिती आणि विदेशातील अस्थिर वातावरण पाहू जाता आताच्या परिस्थितीत बाहेरील देशातून भारतात होणारे गुंतवणुकीचे प्रमाण साहजिकच कमी होणार आहे, त्यामुळे भारताच्या परकीय गंगाजळीत घट होण्याची शक्यताच जास्त आहे. अशी परिस्थिती यापूर्वी सन १९९२, सन २००८-०९ आणि सन २०१२-१३ मध्ये निर्माण झाली होती. तो आणि सध्याचा अनुभव पाहू जाता उद्या सादर होत असलेल्या केंद्रीय अर्थसंकल्पात जीएसटीचा दर कमी करण्यात यावा. भारत हा इतर देशांच्या तुलनेत सध्यातरी युवकांचा देश आहे. या युवकांकडे असलेल्या क्रयशक्तीचा वापर योग्य प्रकारे व्हावा यासाठी त्यांना गुंतवणुकीचे क्षेत्र खुले करुन लघु आणि मोठ्या उद्योगांना पोषक ठरेल असे वातावरण निर्माण करण्याची गरज आहे, यावर अर्थसंकल्पात भर देणे गरजेचे आहे. सध्याच्या एआयच्या जमान्यात आपणही कुठे कमी पडू नये यासाठी या युवाशक्तीला त्यांच्या उद्योग, व्यवसाया संदर्भातील कल्पनांना मजबूत पंख मिळून ते उंच भरारी घेत देशाच्या विकासाला हातभार लावतील यासाठीही या अर्थसंकल्पात तरतूद करण्याची गरज आहे.

**- नकुल राजेश रांदड**
(बीटेक, सीएफए, एमएस एमआयटी जागतिक दर्जाचे आयआयटीअन व मॅथॅमॅटिक्स तज्ज्ञ बोस्टन, अमेरिका)

### ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेला चालना देणे



केंद्रीय अर्थसंकल्पाने समावेशक व शाश्वत विकास साधण्यासाठी मानवी भांडवल बळकट करणे, प्रादेशिक असमतोल कमी करणे आणि ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेला चालना देणे, हीच माझी अपेक्षा आहे.

**- प्रा. डॉ. एच. बी. नानवाला,**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज ऑफ जर्नालिझम अँड सोशल वर्क अकोला.

### डिजिटल शैक्षणिक साधने उपलब्ध करून देण्यात आली पाहिजे



नवीन शैक्षणिक धोरण( २०२०) ची प्रभावी अंमलबजावणी करणारे अर्थ संकल्प असावे. त्यामध्ये प्रामुख्याने अध्यापन - अध्ययन प्रक्रिया सुलभ होण्यासाठी डिजिटल शैक्षणिक साधने उपलब्ध करून देण्यात आली पाहिजे. जेणेकरून मुख्यतः ग्रामीण व शहरी भागातील गरजू विद्यार्थ्यांचा यथायोग्य विकास साधला जाईल.

**-डॉ राजेश्वर बुंदेले**
कला शिक्षक, मिलिंद विद्यालय अकोला

### शिष्यवृत्ती वाढत्या महागाईच्या तुलनेने वाढवली पाहिजे



शाळांमध्ये संगणक, इंटरनेट व डिजिटल लायब्ररीच्या सुविधासाठी आर्थिक तरतूद करावी. खाजगी शाळा-कॉलेज यांची फी रचना नियंत्रणात असायला पाहिजे. शिष्यवृत्ती वाढत्या महागाईच्या तुलनेने वाढवली पाहिजे.

**-भाग्यश्री संतोष निवाणे (पालक)**

### मूलभूत सोयी सुविधांसाठी भरीव तरतूद करावी



अर्थसंकल्पात केंद्र शासनाने सर्व शासकीय कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी. सरकारने राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या अनुषंगाने शिक्षक-विद्यार्थ्यांच्या मूलभूत सोयीसुविधांसाठी भरीव तरतूद करावी.

**-निलेश देवकर**
शिक्षक जगदंबा विद्यालय डोंगरगाव

### विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी तसेच डिजिटल साधनांसाठी भरीव निधी दिला जावा



विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी तसेच डिजिटल साधनांसाठी भरीव निधी दिला जावा. शिक्षकांकडे असलेली अशैक्षणिक कामे काढून यासाठी स्वतंत्र यंत्रणा तयार करण्यासंदर्भात तरतूद करावी. याद्वारे शिक्षण क्षेत्रात रोजगार निर्मितीला चालना मिळेल.

**- डॉ. संतोष पेठे**
प्राचार्य यशवंतराव चव्हाण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय मजलापूर ता. जि. अकोला


### शैक्षणिक बाबींवरील कर सर्वसामान्यांना परवडेल असा असावा



शिक्षण केवळ शाळा आणि महाविद्यालये चालवण्याचे साधन नाही, तर देशाचे कौशल्य आणि प्रतिभा निर्माण करण्याचा पाया आहे. त्यामुळे सरकारने धोरणात्मक योजना केवळ तयार न करता, त्यासाठी पुरेशी आर्थिक मदत आणि शाश्वत गुंतवणूक सुनिश्चित करणे गरजेचे आहे. शैक्षणिक बाबींवरील कर सर्वसामान्यांना परवडेल असा असावा.

**- लोचन निलेश कवडे (शिक्षिका)**

## आज लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघातर्फे श्रद्धांजलीसाठी सभा



**अकोला:** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजितदादा पवार यांचे नुकतेच अपघाती निधन झाले. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्याकरिता अ. भा. लोक स्वातंत्र्य पत्रकार महासंघातर्फे आज रविवार दि. १ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी ४ वाजता एका शोक सभेचे आयोजन करण्यात आले आहे. स्थानिक जठार पेठ परिसरातील जनता बँकेच्या बाजूला जैन रेष्ट्रो येथे ही सभा होईल. याप्रसंगी लोक स्वात्रंत्र्य पत्रकार महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष संजय एम. देशमुख यांचे सह राष्ट्रीय उपाध्यक्ष तथा ज्येष्ठ पत्रकार प्रदीप खाडे, प्रा. डॉ. संतोष हुशे, ज्येष्ठ साहित्यिक पुष्पराज गावंडे, प्रा. प्रकाश डवले, राष्ट्रवादीच्या मंदाताई देशमुख, कृष्णा भाऊ अंधारे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. याप्रसंगी लोक स्वातंत्र्य पत्रकार महासंघाचे सर्व पदाधिकारी,, विचार मंथन चे सभासद, स्नेही जन व इतरही पत्रकार बंधू-भगिनींनी उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.


## जाहीर नोटीस

प्रो.नं. 300/2026

दि. 31/01/2026

वि. दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि. अमरावती यांचे न्यायालय
किरकोळ अर्ज क्र. 56/2026
ने.ता. 27/02/2026

**अर्जदार :**
1. रमेश भाऊराव कराळे, वय 53 वर्ष, धंदा शेती
2. गजानन भाऊराव कराळे, वय 56 वर्ष, धंदा शेती

अ.क्र. 1 व 2 रा. हनुमान मंदिर जवळ बनोसा, ता. दर्यापूर, जि. अमरावती
3. कुमुद श्रीकृष्ण गावंडे, वय 56 वर्ष, धंदा घरकाम, रा. राजेंद्र नगर, गोपाल नगर जवळ साई नगर, अमरावती, ता. जि. अमरावती

-विरूध्द -

**गैरअर्जदार निरंक**

या जाहीर नोटीस व्दारे सर्वांना कळविण्यात येते की, भाऊराव विष्णु कराळे हे दिनांक 17/08/2024 रोजी मरण पावले आहे.अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट 1827 चे कलम 2 प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन 30 दिवसाचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यास येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. 31/01/2026 रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**आदेशानुसार**
**सहा.अधिक्षक( प्रशासन )**
**दिवाणी न्यायालय व.स्तर दर्यापूर**


## पाटील समाज वधू सूचक मंडळाच्या वतीने अजित पवार यांना श्रद्धांजली

अजिंक्य भारत । प्रतिनिधी




**अकोला, दि. ३१ :** स्थानिक वानखडे नगर करता हनुमान मंडळ येथे राज्याचे अर्थमंत्री तथा उपमुख्यमंत्री दिग्गज मराठा नेतृत्व स्वर्गीय अजित दादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाचे आयोजन कर्ता हनुमान मंडळ व पाटील समाज वधू सूचक मंडळाच्या वतीने करण्यात आले होते यावेळी जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष श्री अशोकराव अमानकर, आपला माणूस डॉ. अशोक ओळंबे, पं. स सदस्य योगेश्वर वानखडे, सामाजिक कार्यकर्ते प्रा गणेश कावरे, हभप शिवाजी महाराज अमृतकर, माजी सैनिक सुभाष पाटील म्हैसने, संतोष गोळे, माजी नगरसेवक राजु काळे, विनायक पवार, संजय सूर्यवंशी, दिनकरराव सरप, योगेश थोरात, हभप विलास महाराज म्हैसने, डॉ तेजराव नराजे रामरतन बुडूकले, विनायक धोरण, संजय इंगळे, दिनकरराव घोडेराव शरद वानखडे, नंदकिशोर गावंडे, सुनील उंबरकर, गजानन गोलाईत यांची प्रामुख्याने उपस्थिती होती यावेळी श्री अशोकराव अमानकर,आपला माणूस डॉ अशोक ओळंबे, प. स सदस्य योगेश्वर वानखडे, सामाजिक कार्यकर्ते प्रा. गणेश कावरे, हभप शिवाजी महाराज अमृतकर, माजी सैनिक सुभाष पाटील म्हैसने, अड संतोष गोळे, माजी नगरसेवक राजु काळे यांनी राज्याचे अष्टपैलू नेतृत्व निर्भीड लोकहितकारी शेतकऱ्यांचे कैवारी, मराठा समाज भूषण, लाडक्या बहिणींचा भाऊ, वेळेचे योग्य नियोजन करणारे, अधिकाऱ्यांच्या आधी प्रत्येक कार्यक्रमाला उपस्थित राहून समाजहित जोपासणारे मिस्किल तसेच खंबीर नेतृत्व यांचे अपघाती निधनाने समाजाचे तसेच राज्यातील जनतेचे न भरून येणारी हानी झाली असून असा नेता होणे नाही.

## वीर एकलव्य शोध व बचाव पथकाचा गौरव

**अकोट :** अकोट शहर पोलीस स्टेशनमध्ये पार पडलेल्या एका विशेष समारंभात, सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या पोपटखेड येथील वीर एकलव्य शोध व बचाव पथकाचा गौरव करण्यात आला. अकोटचे उपविभागीय पोलीस अधिकारी निखिल पाटील आणि अकोट शहर ठाणेदार अमोल माळवे यांच्या हस्ते पथकाचे प्रमुख पांडुरंग तायडे यांच्यासह सर्व सदस्यांचा सत्कार करण्यात आला. आपत्ती व्यवस्थापन, शोधमोहीम, पूर व अपघातग्रस्तांना वेळोवेळी केलेली मदत, तसेच सामाजिक जनजागृती या क्षेत्रांतील उल्लेखनीय कामगिरीबद्दल हा सन्मान प्रदान करण्यात आला.यावेळी पोलीस प्रशासन व उपस्थित नागरिकांनी पथकाच्या धाडसी कार्याचे कौतुक केले.

## श्री शिवाजी महाविद्यालयाच्या खेळाडूंची राज्यस्तरीय पॉवर लिफ्टिंग स्पर्धेसाठी निवड

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोट, दि. ३१ :** बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर येथे २७ व २८ जानेवारी रोजी पार पडलेल्या विभागीय पॉवर लिफ्टिंग स्पर्धेत अकोट येथील श्री शिवाजी उच्च माध्यमिक विद्यालयाच्या खेळाडूंनी निर्विवाद वर्चस्व गाजवत राज्यस्तरीय स्पर्धेत धडक मारली आहे. या स्पर्धेत विद्यालयाच्या सहा खेळाडूंनी सुवर्ण, रौप्य आणि कांस्य पदकांची कमाई करत आपल्या क्रीडा कौशल्याचा ठसा उमटवला.

विभागीय स्तरावरील या स्पर्धेत १९ वर्षांखालील ८४ किलो वजन गटात कु. निकिता ज्ञानेश्वर गावंडे हिने १४८ किलो वजन उचलून प्रथम क्रमांक पटकावला. १७ वर्षांखालील ७६ किलो वजन गटात कु. रिमझिम




राजेश कहार हिने १४२ किलो, तर ७२ किलो वजन गटात कु. दिपाली कैलास दाभाडे हिने १२९ किलो वजन उचलून सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. या तिन्ही विद्यार्थिनींची राज्यस्तरासाठी निवड झाली आहे. याशिवाय, ५७ किलो वजन गटात प्रतीक्षा हरिनारायण रेखाते हिने १३५ किलो वजन उचलून तृतीय क्रमांक, ५३ किलो वजन गटात आदित्य वानखडे याने द्वितीय क्रमांक, तर ७४ किलो वजन गटात अथर्व लोळे याने तृतीय क्रमांक पटकावून हे सर्व यशस्वी खेळाडू ३ व ४ फेब्रुवारी २०२६ रोजी सातारा येथील श्रीमंत छत्रपती शाहू जिल्हा क्रीडा संकुलात आयोजित राज्यस्तरीय पॉवर लिफ्टिंग स्पर्धेत अमरावती विभागाचे प्रतिनिधित्व करतील. या यशाबद्दल श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, उपाध्यक्ष गजानन पुंडकर, केशव मेतकर, संचालक सुरेश खोटरे, मुख्याध्यापक जयंत खवले, पर्यवेक्षिका अंजली सपकाळ यांनी खेळाडूंचे कौतुक केले. तसेच शारीरिक शिक्षण संचालक प्रफुल्ल देशमुख, शिक्षक शरद हिंगणकर, सुनील भोजने, कपिल धर्माळे, ज्येष्ठ शिक्षक प्रदीप ओळंबे, प्रशिक्षक नयन करवते, बाळासाहेब काळे, सचिन वानखडे व क्रीडा समिती सदस्यांनी या खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.


**MAHAGENCO** Maharashtra State Power Generation Co. Ltd.

**Maharashtra State Power Generation Comp. Ltd.**
**Bhusawal Thermal Power Station, Bhusawal.**

**E-AUCTION NOTICE**

**EXTENSION** TO Notice for e-Auction **Sale of ESP Dry Fly Ash (20% quota)** to SSI Units at Bhusawal TPS.
MAHAGENCO is looking for firms willing to purchase the ESP Dry Fly Ash (20% quota) at Unit 4 and 5 of 2*500 MW of Bhusawal Thermal Power Station by way of e-auction sale.

| | |
|---|---|
| Estimated quantity (MT) | **2.19 LMT** |
| Estimated Rate (Rs/MT) | Rs. 221/- |
| Earnest Money Deposit (EMD) | Rs. 10,000/- |
| Period of Registration with MSTC, Uploading of documents, EMD payment | 02.01.2026 TO 10.02.2026 |
| Scrutiny of Documents | 11.02.2026 TO 20.02.2026 |
| Deviation / Error correction in Documents | 23.02.2026 TO 27.02.2026 |
| Uploading list of qualifying agencies | As per auction catalogue |
| Date and Time of e-Auction | As per auction catalogue |
| Key Contact Personnel & Contact details: | |
| Auctioneers for MSPGCL (for queries related to registration with e-auction portal, transfer of payments) | M/s. MSTC Ltd., Mumbai<br>**REGISTRATION RELATED QUERIES:**<br>1. Mr. Manas Mallick, Chief Manager<br>Tel: 02269856818, 9831108435<br>e-mail: wroopn2@mstcindia.in<br>**AUCTION RELATED QUERIES:**<br>1. Mr. Shishupal Yadav, Mobile: 8826562675<br>e-mail: wroopn6@mstcindia.in<br>mstc.akshay@gmail.com<br>2. Mr. Ganesh Sawant, Mobile: 9193969095<br>1. 1. e-mail: wroopn14@mstcindia.in |
| Bhusawal TPS (for queries related to site visit, material, contract execution, deliveries, invoices) | Mr. S. V. Mane, Exe. Eng. (Ash Utilization), Bhusawal TPS, Deepnagar 9860338328<br>eebtpsmahagams@mahagenco.in |

Further details are available on www.mstcindia.co.in, www.mstcecommerce.com, www.mahagenco.co.in/auction/list of e-auction

## महत्त्वाचे

### भारतीय नेत्यांनी दिलेल्या भेटवस्तूंची यादी जाहीर

**न्यूयॉर्क :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह इतर भारतीय नेत्यांनी अमेरिकेचे माजी अध्यक्ष जो बायडेन यांच्यासह विविध अमेरिकी नेत्यांना दिलेल्या भेटींची यादी अमेरिकेच्या परराष्ट्र खात्याने जाहीर केली आहे. ही यादी २०२४ या वर्षातील आहे.पंतप्रधान मोदी यांनी अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन यांना लाकडी पेटी, स्कार्फ, केशर ठेवण्याचा जार आणि चहासाठीची लाकडी पेटी भेट दिली होती. याची किंमत ५६२ डॉलर इतकी होती. पंतप्रधान मोदींनी १६ जुलै २०२४ रोजी अध्यक्ष बायडन यांना दिलेल्या अन्य एका भेटवस्तूमध्ये 'स्टर्लिंग सिल्व्हर मेटल ट्रेन सेट'चा (७,७५० अमेरिकन डॉलर्स समावेश आहे.याखेरीज जिल बायडन यांना २१ ऑक्टोबर २०२४ रोजी पंतप्रधान मोदींकडून 'पश्मिना शाल' (२९६९ डॉलर) भेट दिली. तसेच, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांनी तत्कालीन अध्यक्षांचे राष्ट्रीय सुरक्षा व्यवहार सहाय्यक जेकब सुलिव्हन यांना काश्मिरी पश्मिना स्कार्फ (५९९ डॉलर) भेट दिली होती.अमेरिकेच्या माजी उपाध्यक्ष कमला हॅरिस यांना मोदी यांनी १८ ऑक्टोबर २०२४ रोजी 'भगवान श्रीकृष्ण रासलीला सिल्व्हर बॉक्स' (चांदीची पेटी) (१३३० डॉलर) भेट म्हणून दिली होती.

### क्लासला निघालेल्या तरुणाची अपहरण करून हत्या

**बिहार:** क्लासला जाण्यासाठी घराबाहेर पडलेला तरुण पुन्हा कधीच परतणार नाही, याची कल्पनाही कुटुंबीयांनी केली नव्हती. सोशल मीडियावरील किरकोळ वादातून एका निष्पाप विद्यार्थ्याचा जीव जाण्याची धक्कादायक घटना बिहारमध्ये उघडकीस आली असून, या घटनेने संपूर्ण परिसरात खळबळ उडवली आहे.मृतकाचे नाव सन्नी कुमार सिंह (१८ वर्ष) असे आहे. मृत तरुण हा इंटरमिजिएटचा विद्यार्थी होता. तो धनुपरा येथील त्याच्या घरातून एका मित्रासोबत क्लाससाठी निघाला होता. कुटुंबियांच्या म्हणण्यानुसार, सन्नीने त्याच्या चुलत भावाला फोन करून तो काही लोकांसोबत असल्याचं त्याने सांगितले होतं. यानंतर त्याने त्याच्या सख्ख्या भावाला फोन करून सांगितलं की काही तरुण त्याला बळजबरीने बाईकवर बसवून गडहनीच्या दिशेने घेऊन जात आहेत, त्याच्या हत्येचा कट रचण्यात आला आहे. त्यानंतर, त्याचा मोबाईल बंद झाला.घटनेची माहिती मिळताच कुटुंबात गोंधळ उडाला. पीडित तरुणाच्या कुटुंबियांनी नवादा पोलीस स्टेशनमध्ये मुलगा बेपत्ता असल्याची तक्रार नोंदवली. तक्रारीच्या आधारे, पोलिसांनी तपास सुरू केला आणि सीसीटीव्ही फुटेज तपासल्यानंतर, एका तरुणाला ताब्यात घेऊन त्याची चौकशी करण्यात आली.

### घटत्या जन्मदरामुळे तुर्कस्तान हा 'वृद्धांचा देश' होण्याच्या मार्गावर

**इस्तंबूल:** जगाच्या नकाशावर एक आर्थिक शक्ती म्हणून ओळख असलेल्या तुर्कस्थानात जन्मदरात इतकी मोठी घट झाली आहे की तो चीन आणि अनेक युरोपीय देशांप्रमाणेच वृद्धांचा देश होण्याच्या मार्गावर आहे. त्यामुळे तेथील लोकसंख्या वाढवण्यासाठी तुर्कस्थान सरकारने प्रयत्न सुरू केले आहेत.तुर्कस्थानचे राष्ट्राध्यक्ष एर्दोगन नागरिकांना किमान तीन मुले जन्माला घालण्याचे आवाहन सतत करतात. मात्र परिस्थिती अगदी उलट आहे. टर्कस्टॅट या सांख्यिकी संस्थेच्या आकडेवारीनुसार देशाचा एकूण प्रजनन दर घसरून १.५१ इतका झाला आहे. कोणत्याही देशाची लोकसंख्या स्थिर राखण्यासाठी प्रजनन दर किमान २.१ असणे आवश्यक असते.

# बलुचिस्तानातील १२ शहरांमध्ये युद्धसदृश परिस्थिती

## हल्ल्यात २० पाकिस्तानी सैनिक ठार

**नवी दिल्ली : दि.३१ वृत्तसंस्था**

पाकिस्तानसाठी आजचा शनिवार हा काळरात्र ठरला आहे. बलुचिस्तानमधील अत्याचार आणि पाकिस्तानी सैन्याच्या ४१ निष्पाप लोकांच्या हत्येचा बदला घेण्यासाठी बलुचिस्तान लिबरेशन आर्मीने 'ऑपरेशन हेरोफ २' ( -२) ची घोषणा केली आहे. राजधानी क्वेट्टासह बलुचिस्तानमधील १२ शहरांमध्ये सध्या युद्धसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. रस्ते, महामार्ग आणि सरकारी इमारतींवर बीएलएचे सशस्त्र सैनिक फिरताना दिसत असून पाकिस्तानी सैन्याला मोठी माघार घ्यावी लागली आहे.बीएलएच्या सैनिकांनी पहिल्यांदाच इतक्या मोठ्या ताकदीनिशी राजधानी क्वेट्टा शहरात प्रवेश केला आहे. शहरात एकापाठोपाठ एक अनेक भीषण स्फोट झाले असून, बीएलएने अनेक पोलीस स्थानकांवर कब्जा केला आहे. धक्कादायक बाब म्हणजे, बीएलएने एका मध्यवर्ती तुरुंगावर ताबा मिळवून तेथील कैद्यांना मुक्त केले आहे. नोशकी परिसरात झालेल्या समोरासमोरच्या लढाईत किमान ८ पाकिस्तानी सैनिक जागीच ठार झाले आहेत, तर एकूण मृतांचा आकडा २० च्या पार गेल्याचे समजते.बीएलएच्या गनिमी काव्यामुळे पाकिस्तानी पायदळ हतबल झाले आहे. परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे पाहून पाकिस्तान सरकारने आता 'अटॅक हेलिकॉप्टर' मैदानात उतरवले आहेत. हवेतून बीएलएच्या ठिकाणांवर बॉम्बफेक केली जात आहे. मात्र, बीएलएचे प्रवक्ते जियांद बलोच यांनी स्पष्ट केले आहे की, हा त्यांच्या मातृभूमीच्या रक्षणासाठी सुरू झालेला 'निर्णायक लढा' आहे. बीएलए प्रमुख बशीर झेब यांनी स्थानिक जनतेला आवाहन केले आहे की, त्यांनी या सैनिकांना मदत करावी जेणेकरून



बलुचिस्तानला पाकिस्तानच्या तावडीतून मुक्त करता येईल.ऑगस्ट २०२४ मध्ये बीएलएने 'ऑपरेशन हेरोफ'चा पहिला टप्पा राबवला होता, ज्यामध्ये १३० पाकिस्तानी सैनिक मारले गेले होते. आता सुरू झालेला दुसरा टप्पा हा त्याहून अधिक भीषण आणि व्यापक आहे. बीएलएने केवळ सैन्यालाच नाही, तर चीनलाही इशारा दिला आहे. ग्वादर पोर्ट आणि बलुचिस्तानमधील चिनी प्रकल्पांपासून लांब राहा, अन्यथा त्याचे परिणाम भयानक होतील, अशी धमकी त्यांनी दिली आहे.या युद्धामुळे बलुचिस्तानातील सर्व रेल्वे सेवा अनिश्चित काळासाठी स्थगित करण्यात आल्या आहेत.

क्वेट्टामधील सर्व रुग्णालयांमध्ये रेड अलर्ट जारी करण्यात आला असून, जखमी सैनिकांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. इंटरनेट सेवा खंडित करण्यात आली असून, संपूर्ण बलुचिस्तानचा जगाशी संपर्क तुटला आहे. ही परिस्थिती पाकिस्तानसाठी एका मोठ्या भूराजकीय संकटाचे संकेत देत आहे.

## इराणचा 'अणू' डाव! उद्ध्वस्त केंद्रांवर उभारली रहस्यमय छप्परे

**नवी दिल्ली : दि.३१ वृत्तसंस्था**



मध्य पूर्वेतील तणाव आता एका धोकादायक वळणावर येऊन पोहोचला आहे. इस्रायलने जून २०२५ मध्ये केलेल्या भीषण हल्ल्यानंतर इराणचा अणू कार्यक्रम पूर्णपणे उद्ध्वस्त झाल्याचा दावा केला जात होता. मात्र, ताज्या उपग्रह प्रतिमांनी संपूर्ण जगाला चकित केले आहे. इराणने आपल्या इस्फहान आणि नतान्झ या दोन प्रमुख अणू केंद्रांवरील उद्ध्वस्त भागांवर घाईघाईने नवीन छप्परं आणि आच्छादनं उभारली आहेत. या मूक हालचालींमुळे अमेरिका आणि इस्रायलच्या गुप्तचर यंत्रणा सतर्क झाल्या आहेत. प्लॅनेट लॅब्स पीबीसी ने प्रसिद्ध केलेल्या फोटोंनुसार, इराणच्या नतान्झ केंद्रावरजे एकेकाळी युरेनियम समृद्धीकरणाचे मुख्य केंद्र होतेडिसेंबरच्या अखेरीस मोठ्या प्रमाणावर बांधकाम करण्यात आले आहे. इस्रायलच्या हल्ल्यात येथील मुख्य युनिट जमीनदोस्त झाले होते, तर अमेरिकेच्या बंकर-बस्टर बॉम्बनी भूमिगत तळांना लक्ष्य केले होते. आता तिथे नवीन छप्पर बांधून इराणने उपग्रहांच्या देखरेखीवर मर्यादा आणल्या आहेत.

तज्ज्ञांच्या मते, इराण या छपरांच्या आडोशाने ढिगाऱ्याखाली शिल्लक राहिलेले सेन्ट्रिफ्यूज आणि युरेनियम पुन्हा मिळवण्याचा प्रयत्न करत असावा.केवळ अणू केंद्रेच नाही, तर इराणने आपल्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्र कार्यक्रमाशी संबंधित ठिकाणांवरही काम सुरू केले आहे. तेहरानजवळील पारचिन लष्करी संकुलातील 'तालेघन-२' (-२) या जागेचा पुनर्विकास सुरू असल्याचे समजते. ही तीच जागा आहे जिचा संबंध पूर्वी अण्वस्त्रांच्या स्फोटक चाचण्यांशी जोडला गेला होता. इराणने आंतरराष्ट्रीय अणू ऊर्जा संस्थेच्या निरीक्षकांना प्रवेश नाकारल्याने, या छपरांच्या आड नेमके काय चालले आहे, हे ओळखणे आता जगासाठी कठीण झाले आहे.

सर्वात धक्कादायक बाब म्हणजे नतान्झजवळील पिकॅक्स पर्वतावर सुरू असलेले उत्खनन. विश्लेषकांचे असे मत आहे की, इराण आता पर्वताच्या आत इतक्या खोलवर नवीन अणू सुविधा बांधत आहे, जिथे अमेरिकेचे सर्वात शक्तिशाली बॉम्बही पोहोचू शकणार नाहीत.

## देशांतर्गत साखर उत्पादनात १८.३५ टक्के वाढ

**नवी दिल्ली :**२०२५-२६ च्या साखर हंगामात, ऑक्टोबर ते जानेवारी दरम्यान, भारतातील एकूण साखर उत्पादन १८.३५ टक्क्यांनी वाढून १९.५ दशलक्ष टन झाले आहे, जे गेल्या हंगामात याच कालावधीत सुमारे १६.५ दशलक्ष टन होते.

उद्योग संघटना, इंडियन शुगर अँड बायो-एनर्जी मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन नुसार, ही वाढ प्रमुख राज्यांमध्ये गाळप सुधारल्यामुळे आणि वाढलेल्या उत्पादनामुळे झाली आहे. सध्या देशभरात ५१५ साखर कारखाने कार्यरत आहेत, गेल्या वर्षी याच काळात ५०१ साखर कारखाने चालू होते.या हंगामात महाराष्ट्रात साखर उत्पादनात सर्वात जलद वाढ नोंदवली गेली आहे. जानेवारी अखेरीस, राज्यातील उत्पादन सुमारे ४२ टक्क्यांनी वाढून ७.८७ दशलक्ष टन झाले. येथे २०६ साखर कारखाने कार्यरत असून गेल्या वर्षीपेक्षा ही वाढ आहे.

## एपस्टाईन फाईल्स संबंधित एफबीआय अहवालात ट्रम्प कुटुंबावर गंभीर आरोपांची सरबत्ती


**नवी दिल्ली : दि.३१ वृत्तसंस्था**

अमेरिकेच्या राजकारणात सध्या एका वादळाने जन्म घेतला आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या 'जेफ्री एपस्टाईन फाईल्स' अखेर सार्वजनिक करण्यात आल्या असून, त्यातील एफबीआयच्या एका गोपनीय अहवालाने खळबळ उडवून दिली आहे. या अहवालात केवळ मृत अब्जाधीश एपस्टाईनच्या गुन्ह्यांचीच चर्चा नाही, तर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प, त्यांचे जावई जेरेड कुशनर आणि इस्रायली गुप्तचर संस्था मोसाद यांच्यातील कथित संबंधांवर गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत.प्रसिद्ध झालेल्या ३.५ दशलक्ष पानांच्या या दस्तऐवजांमध्ये एका 'कॉन्फिडेंशियल ह्युमन सोर्स' म्हणजेच एका गुप्त सूत्राने एफबीआयला दिलेली माहिती समाविष्ट आहे. या सूत्रानुसार, डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर इस्रायलचा



मोठा प्रभाव असून ते त्यांच्याकडून 'कॉम्प्रमाईज' झाले असावे. अहवालात असे म्हटले आहे की, ट्रम्प प्रशासनाच्या महत्त्वाच्या धोरणांवर इस्रायलचे हितसंबंध जपण्यासाठी दबाव होता. तथापि, एफबीआयने स्पष्ट केले आहे की हे केवळ एका सूत्राचे दावे आहेत आणि ते कोणत्याही कायदेशीर चौकशीत सिद्ध झालेले नाहीत.या फाईल्समध्ये सर्वात जास्त लक्ष वेधून घेतले आहे ते जेरेड कुशनर यांच्यावरील आरोपांनी. सूत्राच्या दाव्यानुसार, कुशनर यांची भूमिका केवळ सल्लागारापुरती मर्यादित नव्हती, तर त्यांनी अध्यक्षीय निर्णयांवर आणि ट्रम्प संघटनेवर असामान्य पकड मिळवली होती. कुशनर यांच्या 'कॅडर' या रिअल इस्टेट प्लॅटफॉर्मचा उल्लेख करत, रशियन गुंतवणूकदारांनी मध्यस्थांमार्फत अमेरिकन प्रकल्पांमध्ये पैसा गुंतवला असावा, असा संशय अहवालात व्यक्त केला आहे. कुशनर कुटुंबाचे 'अल्ट्रा-झायोनिस्ट चाबाड' नेटवर्कशी असलेले संबंध आणि रशियन पैशांचे व्यवहार हा तपासाचा विषय असल्याचे अहवालात नमूद आहे.

## स्मृतिभ्रंशाची पूर्वलक्षणे आता 'एआय' ओळखणार



**न्यूयॉर्क : दि.३१ वृत्तसंस्था**

बौद्धिक क्षमतेत होणारी घट किंवा स्मृतिभ्रंशाची सुरुवातीची लक्षणे अनेकदा अधिकृत निदानापूर्वीच दिसू लागतात. मात्र, ही लक्षणे डॉक्टरांच्या साध्या टिपणांमध्ये दडलेली असतात.

आता कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर करून ही सुरुवातीची चिन्हे ओळखणे शक्य असल्याचे एका नवीन संशोधनातून समोर आले आहे.७ जानेवारी रोजी 'पक्षि डिजिटल मेडिसिन' या जर्नलमध्ये प्रसिद्ध झालेल्या अभ्यासानुसार, एआय प्रणाली डॉक्टरांच्या नोटस्मधील विशिष्ट पॅटर्न शोधून स्मरणशक्ती, विचार करण्याची प्रक्रिया किंवा वर्तनातील बदल यांसारखे धोक्याचे संकेत ओळखू शकते. संशोधनातील महत्त्वाचे मुद्दे- कुटुंबीयांच्या तक्रारींची दखल : रुग्णाला वारंवार होणारा गोंधळ किंवा त्यांच्यासोबत येणाऱ्या नातेवाईकांनी व्यक्त केलेली चिंता, अशा नोंदींमधून एआय संभाव्य आजाराचा अंदाज घेते.निदान नव्हे, तर 'स्क्रीनिंग' ही प्रणाली थेट आजाराचे निदान करत नाही, तर ज्या रुग्णांकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे, त्यांना 'फ्लॅग' किंवा चिन्हांकित करते.


मॅसॅच्युसेटस् जनरल हॉस्पिटलमधील न्यूरोलॉजीच्या सहयोगी प्राध्यापक डॉ. लिडिया मौरा यांनी सांगितले की, 'या प्रणालीचा उद्देश डॉक्टरांची जागा घेणे नसून, त्यांना एक साहायक म्हणून मदत करणे हा आहे. जिथे तज्ज्ञ डॉक्टरांची कमतरता आहे, तिथे ही यंत्रणा अत्यंत उपयुक्त ठरेल.' या संशोधनासाठी संशोधकांनी एकाच वेळी पाच एआय एजंटस्च्या संचाचा वापर केला आहे. हे पाचही प्रोग्राम्स एकमेकांच्या कामाचे पुनरावलोकन करतात आणि मानवी हस्तक्षेपाशिवाय क्लिनिकल नोटस्चा अचूक अर्थ लावतात. संशोधकांनी यासाठी मेटाच्या '३.१' या मॉडेलचा वापर केला. या प्रणालीला रुग्णालयातील तीन वर्षांच्या डॉक्टरांच्या नोटस्, प्रगती अहवाल आणि डिस्चार्ज समरी अभ्यासायला देण्यात आली होती. या माहितीच्या आधारे 'एआय' ने अत्यंत अचूकपणे मानसिक स्थितीतील बदलांचे संकेत शोधून काढले. युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्नियाच्या तज्ज्ञ जुलिया ॲडलर-मिल्स्टीन यांच्या मते, या स्क्रीनिंगचा फायदा तेव्हाच होईल जेव्हा हे संकेत अचूक असतील आणि ते योग्य वैद्यकीय पथकापर्यंत वेळेत पोहोचतील. जर या माहितीवर आधारित पुढील उपचार प्रक्रिया स्पष्ट असेल, तरच ही यंत्रणा वैद्यकीय क्षेत्रात क्रांती घडवू शकते.

## जगभर कर्जासाठी झोळी पसरताना लाज वाटते

### भीकेकंगाल पाकिस्तानच्या पंतप्रधानांचा जाहीर कबूलनामा

**नवी दिल्ली : दि.३१ वृत्तसंस्था**

''पाकिस्तानला अनेक देशांसमोर कर्जासाठी पदर पसरावा लागला असून, या आर्थिक हतबलतेमुळे देशाच्या स्वाभिमानाला ठेच पोहोचली आहे. कर्ज घेणाऱ्याची मान नेहमी झुकलेलीच असते,'' अशा शब्दांमध्ये पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी देशाच्या ढासळत्या आर्थिक स्थितीबाबत जाहीर कबुली दिली.शुक्रवारी (दि. ३०) रात्री इस्लामाबाद येथे निर्यातदारांना संबोधित करताना शाहबाज शरीफ कमालीचे भावूक झाले. ते म्हणाले, ''आम्ही कोणकोणत्या देशांकडे जाऊन कर्जासाठी विनंती केली, हे मी तुम्हाला शब्दांत सांगू शकत नाही. त्या देशांनी आम्हाला कधी निराश केले नाही, हे खरे असले तरी कर्ज घेणाऱ्याची मान नेहमी झुकलेली असते, हेच



कटू सत्य आहे.''जेव्हा एखादा देश दुसऱ्या देशाकडे कर्जाचे आवाहन करतो, तेव्हा त्याला अनेक जाचक अटी मान्य कराव्या लागतात. या अटींचे ओझे पेलणे अनेकदा अशक्य होऊन बसते. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून अब्जावधी डॉलर्सची मदत मिळावी यासाठी आपण स्वतः अनेक अधिकाऱ्यांसह विविध देशांचे दौरे केल्याचेही शरीफ यांनी यावेळी स्पष्ट केले. पाकिस्तान गेल्या अनेक वर्षांपासून कर्जावरच अवलंबून आहे. मात्र, यावेळी ने कर्ज देताना अत्यंत कडक अटी लादल्या असून, त्याचा थेट फटका सर्वसामान्य जनतेला बसत आहे. या अटींमुळे सरकारला नाईलाजाने मोठ्या प्रमाणावर कर वाढवावा लागला आहे. परिणामी, पाकिस्तानात महागाईने उच्चांक गाठला असून, जनतेला पीठ-डाळीसारख्या मूलभूत गरजांसाठीही संघर्ष करावा लागत आहे. उद्योगांना भांडवल उपलब्ध करून देण्यासाठी आणि औद्योगिक वाढीला चालना देण्यासाठी अर्थ मंत्रालय आणि मध्यवर्ती बँकेला योग्य पावले उचलण्याचे निर्देश दिल्याचेही शरीफ यांनी यावेळी नमूद केले. उपलब्ध आकडेवारीनुसार, डिसेंबर २०२५ पर्यंत पाकिस्तानवरील विदेशी कर्जाचा बोजा ५२.३६६ अब्ज अमेरिकन डॉलर्स इतका झाला आहे.

## मानवी इतिहासातील सर्वात जुन्या लाकडी हत्यारांचा शोध

**अथेन्स: दि.३१ वृत्तसंस्था**

ग्रीसमध्ये पुरातत्त्वशास्त्रज्ञांनी तब्बल ४ लाख ३० हजार वर्षांपूर्वीची हाताने वापरली जाणारी लाकडी हत्यारे शोधून काढली आहेत. जगात आतापर्यंत अस्तित्वात असलेली ही सर्वात जुनी लाकडी हत्यारे असल्याचे नवीन संशोधनातून समोर आले आहे. दक्षिण ग्रीसमधील पेलोपोनीज द्वीपकल्पावर ही दोन हत्यारे सापडली आहेत. विशेष म्हणजे, ही हत्यारे आधुनिक मानवाच्या (होमो सेपियन्स) उदयापूर्वीच्या एका अज्ञात 'होमिनिन' प्रजातीने तयार केली होती. संशोधकांच्या मते, या शोधामुळे लाकडी हत्यारांच्या वापराचा पुरावा किमान ४०,००० वर्षांनी मागे गेला आहे.'पीएनएएस' या नियतकालिकात २६ जानेवारी रोजी प्रसिद्ध झालेल्या



शोधनिबंधात या हत्यारांचे वर्णन करण्यात आले आहे. मराठुसा येथे सापडलेले पहिले लाकडी साधन सुमारे ३१.९ इंच (८१ सेंमी) लांब आहे. त्याचे एक टोक छिन्नविछिन्न झालेले असून, त्याचा वापर जमिनीतून काहीतरी उकरून काढण्यासाठी केला जात असावा, असा अंदाज आहे. दुसरे साधन केवळ २.२ इंच (५.७ सेंमी) लांब असून, त्याची साल पूर्णपणे काढलेली आहे. याचे एक टोक गोलाकार असून, त्यावर खुणा आहेत.हे साधन कदाचित दगडाची हत्यारे बनवण्यासाठी वापरले जात असावे, असा शास्त्रज्ञांचा तर्क आहे.

## निष्कर्ष | संशोधकांचा धक्कादायक खुलासा

# पूर्व आफ्रिका खंड अधिक वेगाने दुभंगतोय

**नैरोबी :दि.३१ वृत्तसंस्था**

गेल्या ५,००० वर्षांत पूर्व आफ्रिकेतील हवामान कमालीचे कोरडे झाले आहे. मात्र, आता एका नवीन संशोधनातून असा निष्कर्ष समोर आला आहे की, हवामानातील या बदलामुळे आफ्रिका खंड दुभंगण्याची प्रक्रिया अधिक वेगवान झाली असावी. नोव्हेंबरमध्ये 'सायंटिफिक रिपोर्टस्' या नियतकालिकात प्रसिद्ध झालेल्या संशोधनानुसार, पूर्व आफ्रिकेतील मोठ्या तलावांच्या पाणी पातळीत घट झाल्यामुळे तिथल्या 'फॉल्टस्' (भूगर्भातील भेगा) सरकण्याचा वेग वाढला आहे.कोलंबिया विद्यापीठातील भूगर्भशास्त्रज्ञ आणि भौतिकशास्त्रज्ञ प्रोफेसर ख्रिस्तोफर शोल्झ यांच्या नेतृत्वाखाली हे संशोधन करण्यात आले. शोल्झ यांच्या मते, 'साधारणपणे आपण असा विचार करतो की, पर्वतांच्या निर्मितीमुळे स्थानिक हवामान बदलते; पण हा प्रवास उलट दिशेनेही असू शकतो.



म्हणजेच हवामानातील बदल पृथ्वीच्या अंतर्गत हालचालींवर (प्लेट टेक्टॉनिक्स) प्रभाव टाकू शकतात.' संशोधकांनी केनियामधील 'लेक तुर्काना' येथे अभ्यास केला. सुमारे ५,००० ते ९,००० वर्षांपूर्वी आफ्रिकेत अतिवृष्टीचा काळ होता. तेव्हा या तलावाची पातळी आजच्या तुलनेत चक्क १५० मीटरने अधिक खोल होती.तलावाच्या तळाशी असलेल्या गाळाचा अभ्यास करताना संशोधकांना प्राचीन भूकंपांचे पुरावे आणि लहान भेगा आढळल्या. आफ्रिकेच्या खाली असलेला टेक्टोनिक प्लेट पूर्व आफ्रिकेतून खेचली जात आहे. यामुळे भविष्यात या खंडाचे दोन तुकडे होऊन तिथे नवीन समुद्र तयार होण्याची शक्यता आहे. ज्याप्रमाणे हिमनद्या वितळल्यामुळे जमिनीवरील वजन हलके होते आणि जमीन वर उचलली जाते, तसेच काहीसे इथे घडत आहे. तलावांमधील पाण्याचे प्रचंड वजन कमी झाल्यामुळे भूगर्भातील थरांवरील दाब कमी झाला असून, त्यामुळे भूकंपासारख्या प्रक्रिया आणि प्लेटस् सरकण्याचा वेग वाढला आहे. संशोधनात असे आढळले की, आफ्रिकेतील ओला कालखंड संपल्यानंतर लेक तुर्काना भागातील भेगा सरकण्याचा वेग वर्षाला सरासरी ०.१७ मिलिमीटरने वाढला आहे. सध्या संपूर्ण आफ्रिका खंड दरवर्षी साधारण ६.३५ मिलिमीटर वेगाने दुभंगत आहे.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.✻ **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (✻पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271



दिन विशेष
प्रा. डॉ. गणेश बोरकर
मो. ९४२३८५२०३५

# गुरू रविदास : चर्मकारांचा गौरवशाली इतिहास



संत शिरोमणी गुरू रविदास : माघ पोर्णिमा सन १३९८ दिवस रविवार रोजी वारावणसी जवळ मांडूर मध्ये सिरगोवर्धनपूर , वाराणसी , उत्तर प्रदेश येथे रघुराम व रघुराणी या चर्मकार दांम्पत्य परिवारात संत शिरोमणी गुरू रविदासांचा जन्म झाला . रविदासांवर भगवान गौतम बुध्दांच्या विचारांचा प्रभाव होता . त्यांची विचारधारा ही विज्ञानवादी ,मानवतावादी आणि समतावादी होती , अंधश्रध्दा , कर्मकांड, अनिष्ठ रूढी परंपरा, मुर्तीपुजा याला त्यांचा प्रखर विरोध होता. त्यांचे पद समताधिष्ठता प्रदान करणारे व अमृसिंचन होते . संत कबिर व संत रविदासांचे समतोल तत्व असल्यामुळे क्रांतीकारी संत म्हणुन उदयास आले . सामाजीक समते विषयी संत रविदासांचे विचार प्रभावी ठरतात .....रविदास म्हणतात -
ऐजा चाहूं राज मै, जहां मिलै सबन को अन।
छोटा - बडो सब सम बसै, रविदास रहे प्रसन ।।

रविदास म्हणतात :- बता रे पंडित ज्ञान कौन चाम से न्यारा ।चाम का ब्रहया, चाम का विष्णु , चाम का सकल पसारा ।चाम काय योगी, चाम का भोगी, चाम का गुरू तुम्हारा ।कह रैदास सुनो रे पंडित ज्ञानी, चाम का गुरू नाहिं हमारा । मन ही पूजा, मन ही धूप, मन ही सेउ, सहज सरूप - मानवाच्या आत्म्याचे पुजन करण्याचा त्यांनी संदेश दिला आहे . गुरू रविदासांनी मानव मुक्तीचा परिवर्तनवादी मार्ग दाखविला आहे. संत कबीर, संत सेना, संत नामदेव, गुरू नानक , संत मिरा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर ,मा. कांशीराम हे गुरू रविदास विचारधारेचे समर्थक आहेत. संत मिरा बाई गुरू रविदासांच्या शिष्या होत्या. शिखांचे दहावे गुरू, गुरू गोविंदसिंह यांनी धरमसिंह यांचा पंचप्यारे मध्ये समावेश केला गुरू ग्रंथ साहिब या शिख धर्मग्रंथात संत रविदसांच्या ४० पेक्षा जास्त दोहे चा समावेश आहे. घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दि अनटचेबल हा ग्रंथ संत रविदासांना सर्मपीत केला.

चर्मकार समाजाचा गौरवशाली इतिहास ऋग्वेदामध्ये - जाती व वर्णचा उल्लेख नाही , यामध्ये वंशाचा उल्लेख आहे . ५५०० पुर्व - सिंदु घाटीमध्ये सम्यता मध्ये आर्यका ठयराव झाला तेव्हा , चवँर वंश - हिन्दु ग्रंथा वाकल्मकी रामायण - अयोध्या कांड - सर्ग १०९ श्लोक १४ मध्ये महाभारात - अनुशासन श्लोक १७ व १८ मध्ये चवँर वंशाचा उल्लेख करण्यात आला आहे . चमर नावाचा पशु - जनवर - हे लदाक , नेपाल, हिमालय कैसाल पर्वत या ठिकाणी मोठया प्रमाणात आढळुन येते चमर वंश चा - चर्मकारचा काही एक सबंध नाही , चमर व चर्मकार मध्ये फरक आहे . महाभारत कालावधीत - चर्मकलेचा उल्लेख होतो, इतिहासा नुसार चर्मकार हे क्षेत्रीय आहेत . चर्मकार हे चौमार राजवंशाचे असुन सुर्यवंशी आहेत. हिन्दु पंडितांनी बौध्द धर्म भारतातुन उखडुन काढल्यानंतर , ज्यांच्या कडे धन होते ते विदेशात गेले उर्वरित बौध्द जे भारतात राहलेत.

हिन्दु धर्मातील सर्व शुद्र पुर्वीचे बौध्द आहेत. चर्मकारांचा हिन्दु धर्मातील शुद्रात समावेश करण्यात आला. इतिहासा नुसार भारतातील सर्व चर्मकार हे पुर्वीचे बौध्दधर्मीय होते. संत रविदास हे हिन्दु नव्हते, इतिहासाकारांनी त्यांना हिंदु दर्शविण्याचा प्रयत्न केला. संत रविदासांनी बेगमपुरा या आर्दश समाजरचनेच्या संकल्पनेवर आधारीत असा रोहिदासीचा पंत उभा केला जो हिंन्दु आणि मुस्लीम धर्मापासुन समानअंतर राखुन आहे. संत रविदास वाणी तथागत गौतम बौध्द यांच्या बौध्द धम्माच्या समांतर आहे.

गुंरू रहिदास दोहयामध्ये सागतात...
मकस्जद सौ कछु धिन नही, मंदिर सौ नही प्यार ,
दोउ मह अल्लाह राम नही, कह रविदास चमार..
संत रविदास म्हणतात रैदास ब्राहमण मति पूजिए , जए होवै , गुन हिन पुजिहिं चरन चंडाल के जउ होवै गुन प्रवीन.. रविदास सांगतात ज्याच्यात कौशल्य प्राविण्य आहे त्यांना सन्मान दिला पाहिजे . संत रविदास उत्तम कवि होते - रविदासांचे दयोहे - मध्ये समाजसुधारक होते , कर्मकांडाला थारा न देणरी , विज्ञान वादी आहेत. भेद भाव न करणारी , जाती व वर्ण व्यवस्थेला नाकारणारी गुलामी , वासनेवर नियंत्रण इत्यादी बाबी विज्ञानवादी स्वरूपात संत रविदासांनी मांडल्या .संत रविदास सांगतात .. जात पात के फेर में , उरझि रहे सब लोग, मनुष्यात कू खात है , रविदास जात का रोग वर्ण व जात व्यवस्थेने मनुष्याने डसले आहे , आपण केवळ उच निच मध्ये अडकुन बसतो , जाती पातीचा भेद नष्ट केला पाहिजे .

बे-गमपुरा संकल्पना संत रविदासांची आर्दश समाज रचना बेगमपुरा - एक आर्दश समाज रचनेची त्यांनी कल्पना मांडली - सर्वांना समान अधिकार व सन्मान ,सती प्रथा व इतर अनिष्ठ रूढी पंरपरेला विरोध दर्शविला . उत्तम अन सेवण , स्वच्छाता व शिाणाला महत्व , स्त्रीचा आदर , आणि गुलामी पारतंत्रला विरोध दर्शविला . स्वराज्याची स्थापना - मुख्य उद्रेश रविदासांचा बेगमपुरा संकल्पनेचा दिसुन येतो. संत रविदास बेगमपुरा आर्दश समाजव्यवस्था या बाबत दयोहेच्या माध्यमातुन सांगतात.. ऐसा चाहु राज में , जहा मीले सबन को अन , छोटो बडे सब सम बसै , रहै , रोदास प्रसन .. बे - गम पुरा अशी आर्दश समाज व्यवस्था येथे कोणालाही कशाचाही गम नसणार, दु:ख नसाव या मुळ संकल्पनेतुन संत रविदासांनी वर्ण भेद , जाती भेद विरहीत सकल्पना मांडली आहे , सर्वांना एकसमान वागणुक व अधिकार असणार , जात ,धर्म, वर्ण विरहीत समाजरचना ज्यामध्ये सर्वांना समान संधी असणार आहे . चिंता मुक्त, भय मुक्त वातावरण जिवन जगता येईल . स्त्रीचा सन्मान केला जाईल , श्रमाला प्रतिष्ठा असणार आहे. कुणीही गुलामीत जगणार नाही . कोणीही छल कपट , हेवेदावे करणार नाही. कुणालाही लाचारी पत्कारावी लागणार नाही. कोणत्याही प्रकारचा अवास्तव टॅक्स वसुल केला जाणार नाही , इच्छेप्रमाणे प्रत्येकाला व्यापार करता येईल कोणत्याही प्रकारचे दु:ख असणार नाही. प्रत्येकाच्या कतृत्वाला, प्राविण्य व कौशल्याला प्राधान्य असणारआहे.

सर्वांना समान न्याय, कायद्या समारे सर्व सारखे असणार आहे . व प्रत्येकाचे आचारण हे नियमानुसार असणार आहे. सर्वांना जगण्याकरीता योग्य परिस्थीती असणार आहे. कश्याचीही चिंता नसणार , प्रत्येकाला अभिव्यक्त होता येईल , मनासारखे जिवन जगता येईल कोणत्याही प्रकारची रोखटोक ,मनाई असणार नाही. संत रविदासाच्या बेगमपुरा या संकल्पनेचे प्रतिबींब म्हणजे बौध्दसत्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखीत राज्यघटना होय . गौतम बुध्दांच्या विचारांचा प्रभाव संत रविदांसवाणीवर दिसुन येतो व गुरू रविदासांचा प्रभाव शिखधर्मावर अधिक दिसुन येतो.

शिख धर्मग्रंथ ग्रंथ साहेबा मध्ये संत रविदासांचे दोहे समाविष्ठ आहेत विदेशात १५० पेक्षा जास्त देशात रविदासांचे मंदिरे आहेत. इंग्लंडच्या सांसदेमध्ये दरवर्षी संत रविदासांची जयंती - उत्साहाने साजरी केली जाते .उत्तर प्रदेश , बिहार, पंजाव हरियाणा राज्यात चर्मकार हे बौध्द म्हणुन गणले जातात बौध्द आणि चर्मकार मध्ये रोटी - बेटीचा व्यवहार केला जातो. देश विदेशात संत रविदासीया धर्माचा व्यापक विस्तार होत आहे , ४० कोटी पेक्षा जास्त लोकसंख्या रविदासी धर्मीयांची आहे .भारतात मोठया प्रमाणात चर्मकार समाजाचा विस्तार आहे . उत्तरप्रदेश आणि पंजाब मध्ये बुहुसंख्येने चर्मकार समाज सत्ताधारी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यानतर आंबेडकरी चळवळीचे नेतृत्व - बाबु जगजिवन यांच्या कडे आले , मा. कांशीरामजी मा. मायावती , उपराष्ट्र पती बुटांसिग, सभापती मिराकुमारी, कुशल नेतृत्व देशाला लाभले, देशात कुशल नेतृत्वाचा अभाव असल्याने समाज संघटीत नाही देश - विदेशात ४० कोटीपेाा जास्त लोकसंख्या चर्मकार समाजाची आहे.

गौतम बौध्द ...संत शिरोमणी रविदास व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारामध्ये साम्यता दिसुन येते. गुरू रंविदास हे आध्यात्मीक विज्ञानवादी, वास्तविक मानवतावादी विचारांचा केंद्र बिंदु आहेत. अंधश्रध्दा जात पात, विषमता संत रविदासांनी नाकारली , बेगमपुरा .. राज्याची संकल्पना रविदासांची सर्वांना समान न्याय , सामाजीक समता प्रस्तापीत करण्याच्या मुळ हेतु रविदासांचा होता , कोणालाही दुख नसावे असे राज्य , सर्वांना अन, सामाजीक न्याय , समसमान कायदा व वागणुक महिलांना व कर्तृत्वान व्यक्तींना सन्मान , जाती व्यवस्था नको , वर्ण व्यवस्था रविदासांनी नाकारली... आज सामाजीक स्वास्थ लक्षात घेता ....तथागतांचे विचार चर्मकार समाजाला दिशादर्शक असणार आहेत...


**गुरू रविदासांनी रविदासीया धर्माची स्थापना केली .. जातीव्यवस्था रविदासांना मान्य नसल्याकारणने हिंन्दु व मुस्लीम धर्मापासुन ते समान अंतर राखुन होते, ऐतिहासीक पुरव्यानुसार बौध्द धम्म आणि रविदासीया धर्म.. आरश्याचे प्रतिबिंब ठरले आहे. बौध्द धम्म हाच दिशादर्शक असुन या माध्यमातुन गुरू रविदासांच्या बे गमपुरा या आर्दश समाजरचनेचा पाया उभारण्याकरीता महत्वपुर्ण ठरणार आहे .**



समीक्षण
मंदा खंडारे
कवयित्री, लेखिका, नागपुर

# रूढी परंपरेच्या ओझ्याखाली दबलेल्या स्त्रियांची कहाणी

लेखिका वर्षा पतके थोटे लिखित "चूक कोणाची" ही २२८ पानाची कादंबरी, मधुश्री प्रकाशनाने नुकतीच प्रकाशीत केली आहे. ज्येष्ठ कथाकार सुरेश अकोटकर सरांची प्रस्तावना व ज्येष्ठ समीक्षक दा.गो. काळे सरांचे मार्गदर्शन लाभलेल्या कादंबरीची पाठराखण ज्येष्ठ कादंबरीकार विजया ताई ब्राह्मणकर यांनी केली आहे. सुंदर,समर्पक मुखपृष्ठ असलेली ही २२८ पानांची कादंबरी मी एका बैठकीत वाचून पूर्ण केली. या कादंबरीला हातात घेतले आणि एखाद्या स्वच्छ ,निर्मळ प्रवाहात उडी घेऊन त्यासोबत नुसते वाहत जावे तशी ह्या कादंबरीच्या कथानकात आपण आपसूकच प्रवाही होत जातो. जसे जसे वाचत जातो तसे तसे यातील भाषेच्या,पात्रांच्या, घटनांच्या प्रेमात पडत जातो. त्यात गुंतत जातो यातील पात्रे आपल्याच भोवती फिरताय याची जाणीव होत राहते. यातील वऱ्हाडी भाषेतील संवाद वाचताना अतिशय गोड वाटतात. विदर्भातील अमरावती या शहराच्या आजूबाजूच्या छोट्या छोट्या ग्रामीण भागातील ही कथा. तिथल्या बोली भाषेत होय च्या ऐवजी हाव आणि चहा च्या ऐवजी च्या म्हणणे ही मनाला खूप भावते. लेखिका वर्षा दर्यापूरची आणि मी अकोल्याची आमची बोलीभाषा जरी सारखी असली तरी या कादंबरीमध्ये येणारे अनेक शब्द मलाही माहित नव्हते. हेड्या म्हणजे लग्न जुळवणारा मध्यस्थी किंवा क्लुप्ती म्हणजे युक्ती आणि मावद, मुकामैद, हेळदिमाख ,हिंदान यासारखे अनेक नवीन वऱ्हाडी शब्द या कादंबरीमध्ये नव्याने वाचायला मिळतात. लेखिकेने याच बरोबर अनेक वऱ्हाडी म्हणींचा वापर करून, चपलख शब्द प्रयोग करून पात्रांना जिवंत केलाय. वऱ्हाडी भाषेचे वैभव टिकवून ठेवत लेखिका, कादंबरीची सुरुवात वर्तमानात सुरू करून वाचकांच्या पुढ्यात अनेक प्रश्न ठेवत जाते.त्याच प्रश्नांच्या उत्तरासाठी लेखिका वाचकाचा हात धरून वर्तमानातून भूतकाळात घेऊन जाते. प्रत्येक पात्राची नव्याने ओळख करून देते. त्यांच्या आयुष्यातील घटनांशी आपल्याला एकरूप करते. हे एकरूप करण्याचे सामर्थ्य लेखिकेच्या लेखणीत नक्कीच आहे. ही एक संवेदनशील कवयित्री, लेखिका आपल्या मनाच्या घालमेलीत प्रसवलेल्या प्रत्येक शब्दकळा आपल्यालाही वाचतांना भोगायला भाग पाडते. याच शब्दकळांचे पुढे पैंजण आपल्या पायात घालून त्या पैंजणाच्या नादात ती हळू हळू भूतकाळातून आपला हात पुन्हा वर्तमानाच्या हातात देते. या प्रवासात कुठेही, कसलीच अतिशयोक्ती आपल्याला जाणवत नाही.कुठेही पाल्हाळणे नाही. की कुठली घाई करताना दिसत नाही. अजाणतेपणातच हा प्रवास आपला त्या पात्रांबरोबर सुरू होतो. हे लेखिकेच्या लेखणीचे कसब आहे जे वाचकाला स्थिर ठेवण्यात, खिळवून ठेवण्यात यशस्वी होते. एकतर भाषेचा गोडवा आणि त्यात उत्तम प्रभावशाली लेखनशैली या दोन्ही गोष्टींनी ही कादंबरी अतिशय उत्तम आणि वाचनीय झाली आहे. ग्रामीण स्त्रियांच्या एकंदर जीवन- जाणिवांचा त्यांच्या दु:खाचा विचार मांडण्याचा लेखिकेने या मध्ये प्रयत्न केला आहे. कोवळ्या वयात मनातली प्रेमाची कळी, समाजाच्या नजरेत येऊ न देता केवळ नजरेने नजरेला दिलेल्या होकारात उमलु पाहते आहे. मग ते नजरेने केलेल्या प्रेमाच्या कबुलीचीच गोष्ट का असे ना तो लोकांच्या कानगोष्टीचा विषय बनतो. ग्रामीण भागात कुठलीच गोष्ट लपून राहत नाही. याचा प्रत्यय कादंबरी वाचताना आपल्याला सातत्याने येत राहतो. आणि म्हणूनच आपली नायिका श्यामला हिचा दहावीचा शेवटचा पेपर झाल्याबरोबर तिला मावशीकडे रवाना केली जाते.




केवळ आपली अब्रू नको जायला म्हणून तिचे बाबा हा निर्णय घेतात. आणि परस्पर तिचे लग्नही उरकून टाकतात. तिला तिच्या अबोल प्रेमाला शेवटचे बघूही देत नाहीत. खरे तर श्यामला म्हणजे आरसपाणी सौंदर्याची खाण. कुणीही बघताक्षणी नजर लावावी असं तिचं सौंदर्य आणि नवरदेव म्हणजे गावच्या भाषेत "डोमकावळा" पण केवळ सरकारी नोकरी आणि ते ही पोलीस खात्यात असल्यामुळे तिचे वडील तिचे लग्न अश्या माणसाशी लावून देतात.अगदी तिच्या होकाराची वाट न बघताच. तिच्या गावातील लोक नवरदेवाला बघून म्हणतात, "पिठाच्या पोत्यापाशी शामराव मास्तरने उडदाचे पोते आणून ठेवले" एकदम विजोड जोडपे वाटायचे ते. मुलीचे पाऊल वेडेवाकडे नको पडायला म्हणून कोवळ्या वयातच मुलींचे लग्न उरकून टाकण्याची ही प्रथाच होती. लेखिकेने ग्रामीण भागातील अशा अनेक प्रथांचे वर्णन केलेले आहे. जुन्या पद्धती रीतीरीवाजांचे अगदी तंतोतंत उल्लेख या कादंबरीमध्ये केला आहे. लेखिकेने यासाठी केलेल्या अभ्यासाचे कौतुक करावेसे वाटते.

नवऱ्याला आपल्या बायकोच्या रंग रूपावर गर्व असावा तिथे नेमका श्यामलाचा नवरा किशोर अबोल होतो. त्याला कुणी श्यामलाची स्तुती केलेली आवडत नाही. तो फार पाझेसीव होतो. तो आतल्या आत घुटमळतो. मद्याच्या आहारी जातो. श्यामलाच्या अंगावर हात घालतो. या त्रासाला कंटाळून ती माहेरी जाते. पण एकदा मुलीचे लग्न झाले की, ती माहेरची केवळ पाहुणी होऊन जाते. चार आठ दिवस मुलगी माहेरी राहली की समाजात कुजबुज सुरू होते.समाजाच्या नजरा ना मुलीला जगू देत ना आई वडिलांना जगू देत.त्याच नजरा चुकविण्यासाठी मग आई वडील तिला कितीही त्रास होत असेल सासरी तरी तिचीच समजून काढून परत त्या आगीत होरपडण्यासाठी पाठवून देतात. हे विदारक सत्य आहे.इथे लेखिकेले पाहुणी या शब्दावरून आई आणि मुलीचा छान संवाद लिहलाय.


या कादंबरी मधल्या स्त्रियांमध्ये सुरुवातीलाच आलेले पात्र ,शांती... या शांतीच्या मृत्यूने मनात चर्र होऊन जातं. अगदी काही वेळापूर्ते कथानकात आलेले हे पात्र लक्षात राहण्यासारखे आहे. दुसरे पात्र बानाई, श्यामलाची आई देखणी, हुशार, खमकी. श्यामलीला न्याय देण्यासाठी पतीच्या मृत्यूनंतरही ती लढते. त्यासाठी ती नातवाला घेऊन आपले गाव सोडून शहरात येते. शेती विकून येणारा पैसा मुलीला न्याय मिळवून देण्यास खर्ची करते. भावना ही श्यामलाची जिवलग बाल मैत्रीण श्यामलाच्या प्रेमाची साक्षीदार. तिचे एक वाक्य मनाला खूप भावले जेव्हा दोघी नदीकाठी बसल्या असतात तेव्हा ती एक वाक्य म्हणते "कोन्या लेकीबाईले सुटलं हे गिऱ्हान" आज ना उद्या लग्न करावंच लागल. प्रत्येक मुलीच्या मनातील ही भावना सहज ती बोलून जाते.हे वाचतांना हृदय पिळून निघते. सत्तरीच्या आधीच्या पिढीचे हे कथानक असावे.मुलगी वयात आली की, किंवा मुलगी केवळ वयाने मोठी दिसते, उंच दिसते म्हणून कोवळ्या वयातच तिचे लग्न लावून दिले जायचे त्या वेळी. श्यामला ची सासू सरस्वती बाई .खजाल सासू वगैरे नाही म्हणता येणार. कारण सुरुवातीला ती ही श्यामलाला जीव लावत होती. शेजार पाजारी जेव्हा शामलीच्या सौंदर्याचे पाढे वाचायचे तेव्हा तिलाही अभिमान वाटतच होता. पण मुलगा या लग्नात फसलो असा शब्द जेव्हा वापरतो तेव्हापासून ती तिचा राग राग करते. शामलीचे सासरे आणि वडील यांच्या स्वभाव शांत आणि संयमी आहे. अनिल आणि संगीता हे ही महत्त्वाचे पात्र आहेत .एक समजूतदार, खुल्या दिलाचा अनिल श्यामलाच्या नवऱ्याचा मित्र आहे, जो श्यामलाला सख्या बहिणी पेक्षा ही जास्त जीव लावतो. त्याची पत्नी संगीता प्रेमळ,मायाळू अतिशय समजूतदार आहे. संगीताला या नात्याबद्दल खूप आदर आहे.आणि सर्वात महत्वाचे पात्र श्यामलाचा नवरा किशोर जितका अबोल तितकाच रागीट. हे समीकरण फार धोक्याचे असते. माणसाने मनात काय आहे हे बोलून, संवाद साधून मोकळे व्हायचे असते. पण तो फार विचित्र वागायचा. त्याला राग आला की दारू प्यायचा, बायकोवर हात उचलायचा, आणि राग शांत होईपर्यंत घरापासून दूर राहायचा. या दोघांच्या संसाराला शंकेची वळवी लागते जी पूर्ण संसार पोखरूनच काढते.त्यांचा संसार उध्वस्त करते...... पण यात चूक कोणाची?..... लेखिका या समाज व्यवस्थेला, पुरुष प्रधान संस्कृतीला,न्याय व्यवस्थेला, प्रश्न विचारते की नेमकी चूक कुणाची? हा प्रश्न पुढे ठेवून एका धक्कादायक वळणावर लेखिका कादंबरीचा शेवट करते. चूक कुणाची हा प्रश्न सतत आपला पाठपुरावा करत राहतो. मेंदूला झिणझिण्या आणतो. की नेमकी यात चूक कोणाची ? या कादंबरीचे नुकतेच प्रकाशन झाले आहे. ग्रामीण भाषेचा ठसठशीत बाज असलेली ही कादंबरी लेखिकेला नक्कीच वेगळी ओळख देईल.



प्रासंगिक
डॉ. सौ. प्रतिभा शिरभाते
मो. 9405771808

# संत शिरोमणी रविदासजी महाराज

संत रविदास जी महाराज म्हणजे उच्च कोटीचे संत, सर्वोत्तम विचार सरणीचे लेखक, समस्त मानव जातीला दैनंदिन जीवनातील उदाहरण देऊन दोहे लिहिणारे कवी आणि तरी सुद्धा त्यांना सवर्ण त्यावेळी शूद्र समजत असत. त्यांचे दोहे मानवी जीवनाला आधार देणारे, समता आणि भक्तीचा संदेश देणारे त्यांचे विचार अत्यंत साधे पण तितकेच सखोल आहे.मन चंगा तो कठोती मे गंगा,तुमचं मन जर शुद्ध असेल तर, तुमच्या हृदयात कोणाबद्दल खोट नसेल तर, तुम्हाला तीर्थयात्रेला जाण्याची गरज नाही तुमच्या घरच्या साध्या पात्रातील कठोती मधील पाणी देखील गंगेप्रमाणे पवित्र आहे. म्हणजेच अंतर्मनाची शुद्धता हीच खरी भक्ती रविदास जी महाराज म्हणतात. १) समानता म्हणजे कोणताच माणूस जन्माने नाही तर तो कर्माने मोठा होतो २) श्रम हाताने श्रम करणे, श्रम हीच खरी पूजा आहे.३) प्रेम ईश्वराची प्राप्ती आणि शुद्ध भावनेतूनच होऊ शकते. सहाशे वर्षांपूर्वी संत रविदासांनी मांडलेले विचार हे संकल्पनेत बघायला मिळतात त्या काळात जेव्हा समाजात जातिभेद आणि विषमता सगळीकडे मातली होती तेव्हा संत रविदासांनी अशा वेळी लोकशाहीवादी आणि कल्याण-कारी राज्याची कल्पना मांडली. आजच्या काळातील भारतीय संविधान आणि मानवी हक्क यांची मुळे आपल्याला संत रविदासांच्या बेगमपुरा या संकल्पनेत पाहायला मिळतात १) समता त्यांनी अशा शहराची कल्पना केली जिथे कोणी छोटा व मोठा नसेल २) कल्याणकारी राज्य असे राज्य व जिथे सर्वांना अन्न मिळेल ३)भीती मुक्त जगण्याचे स्वातंत्र्य जिथे भीती नसेल ४) कर आणि आर्थिक न्याय जिथे गरिबांवर अन्याय कारक ओझे नसेल ५) बंधूता आणि सर्व बहुमत्व जिथे सर्व मित्र म्हणून राहतात .बेगमपुरा आणि संविधान तक्ता १)भेद व जातीभेदाचा अभाव अस्पृश्यता निवारण कलम १७ भारतीय संविधान २) अन्नसुरक्षा- सर्वांना अन्न मिळण्याची हमी अन्नसुरक्षा कायदा रेशन व्यवस्था ३) स्वातंत्र्य- कुठेही जाण्यासाठी आडकाठी नाही संचार स्वातंत्र्य कलम १९ भारतीय संविधान ४)मलमत्ता- मालमत्तेची जप्ती किंवा भीती नाही मालमत्तेचा हक्क आणि संरक्षण म्हणून संत शिरोमणी रविदास जी महाराज हे केवळ धार्मिक संत नसून ते एक क्रांतिकारक समाज सुधारक होते त्यांच्या लेखणीत भजन,पद लिहिले गेले शिखधर्माच्या गुरु ग्रंथ साहेब मध्ये संत रविदासांचे दोहे आहेत हे खूप कमी व्यक्तीला ज्ञात असतील. लहानपणी मनापासूनच आई सोबत ते सत्संग कीर्तनात जात असतात त्यामुळे त्यांना अनेक भजन पाठ झाले. संत रविदास यांचे चेहऱ्यावरचे दिव्य तेज मधुर वाणी लोकांना त्यांच्या विचारापर्यंत खेचून घेत असे लिहिण्या वाचण्यासोबतच धार्मिक पुस्तके वाचण्यामुळे त्यांचे ज्ञान वृद्धिंगत होऊन ते स्वतः भजन बनवायला लागले. सर्व जगातील मनुष्य प्राण्यांचे शरीर म्हणजे एकसमान पण वेदकाळात सवर्णाने तयार केलेली वर्णव्यवस्था म्हणजे ब्राह्मण,क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र सर्वांचे शरीर पंचतत्वातने बनलेले आहे तर मग जातीव्यवस्था भेदभाव का केला जावा हे अजूनही न करण्यासाठी प्रश्न आहे. शूद्र वर्ण व जातीव्यवस्था तर कोणत्याही ईश्वराने तयार केले नाही तर मग आपल्याला कोणी अधिकार दिला आहे हेच कळत नाही. सर्वांना काम मिळावे या अनुषंगाने तयार केलेली वर्णव्यवस्था काही काळातच ज्या जातीत जन्माला आलो आपली जात समजायला वेळ लागलो व जातीसोबतच पोटजाती निर्माण होऊन समाजाचे विघटन सुरू झाले.संत रविदासांच्या मते नेहमी सत्याच्या मार्गावर चाला पण या मार्गाने चालताना भरपूर विपत्ती येणार आहेत पण सत्याचा मार्ग सोडू नका .जसा संत मीराबाईने विषाचा कटोरा दूध समजून प्राशन केला, श्रीकृष्ण भक्तीत तल्लीन मिराबाईना त्यांच्या गुरुची साथ आणि त्यांचे गुरू कोण तर संत शिरोमणी रविदासजी महाराज आपण नेहमी दुसऱ्याच्या प्रति प्रेम ,आदर ,सदभावना ठेवली पाहिजे. संत रविदास महाराजांचा जन्म माघ पौर्णिमेला झाला आणि जगात माघ पौर्णिमेला उच्च श्रेणी प्राप्त झाली. एकवेळी महाराज गंगा घाटावर स्नान करण्यासाठी गेले असता सवर्णाच्या मनातील काळेपणा समोर आला आणि एक शूद्र जातीच्या चांभाराने हा घाट अपवित्र केलं म्हणून ओरडायला लागले, पणविचार करण्यासारखी गोष्ट आहे आपल्या सर्वांचे शरीर हाड, मास रक्ताने बनले आहे आपण **(पान ५ वर)**



कथा
प्रा. मोहन काळे
मो. ७०३८२७६५५८

# कानातला मय




"पाहा रे ब्वा, सुरशानं तुयाबद्दल असं म्हटलं. तू खूप त्याची बाजू घेतं. पन तो तुयी दुसऱ्याजोळ निंदा करते. तू त त्याले जिगरी दोस्त समजतं." नितीननं सचिनला म्हटलं. "काईबी सांगतं का बे! सुरेश मायाबद्दल वाईट कधीच बोलनार नाई. मले गॅरंटी हाये त्याची. मायी अन् त्याची लहानपनापासून दोस्ती हाये." सचिन म्हणाला खरा पण त्याच्या डोळ्यांत शंका दिसत होती. त्याचं एक मन म्हणे की सुरेश, त्याचा मित्र त्याच्याबद्दल वाईट बोलू शकत नाही. पण नितीन कशाला खोटं बोलीन असं त्याला वाटलं. तसा नितीन लावालाव्या करण्याच्या स्वभावामुळे बदनाम होता. पण का कोण जाणे आज सचिनला नितीनचं म्हणणं खरं वाटत होतं.

"मले काय कराव लागते? मी तुया दोस्त हाये म्हणून सांगून रायलो. तू पाय अन् तो सुरशा पाय. मले काय कराव लागते. विश्वास ठेव्याचा अशीन तर ठेव नाईतर मंग मले म्हन्याचं नाई की म्या तुले सावधान केलं नाई म्हणून. चाललो मी." असं म्हणून नितीन निघून गेला. आता सचिन विचारात पडला. त्याला विश्वास बसेना, की त्याचा जीवलग मित्र सुरेश त्याच्याबद्द७३ल काही वाईट बोलेल म्हणून. त्याला वाटलं, की सुरेशशी मोबाईल वर संपर्क साधून ०/प्रत्यक्ष सुरेशलाच विचारावं, की तो असा काही बोलला का म्हणून. पण दुसऱ्याच क्षणी त्याचे दुसरे मन म्हणाले, की नितीन खोटं कशाला बोलेल. झालं, त्या दिवसापासून सचिन सुरेशशी फटकून वागायला लागला. आधी सुरेश दिसल्याबरोबर आनंदी होणाऱ्या सचिनच्या कपाळावर आठ्या पडायल्या लागल्या. सुरेशला सचिनमधील बदल जाणवत होता. त्यानं एकदोनदा त्याबद्दल सचिनला विचारलंही होतं पण सचिनने ऐकून न ऐकल्यासारखं केलं. सुरेशनेही मग हळूहळू सचिनशी संपर्क कमी केला. जवळपास दररोज भेटणारे मित्र एकमेकांपासून मनाने खूपच दुरावले होते. "काय म्हणते आपलं रामपूर?" मोहन राजेशकडे पाहत म्हणाला. मोहन नोकरीनिमित्त पुण्याला राहत होता. तो गावातील सर्व मित्रांच्या संपर्कात असायचा. मात्र दोन तीन महिन्यांपासून कामाच्या व्यापात व्यस्त असल्याने त्याचे कुणाशी बोलणे झाले नव्हते.

"काय म्हनीन? जसं आंधी होतं तसंच हाये. फक्त एक बदल होयेल हाये. आंधी मोकळ्या मनाचे लोकं होते. आता शंकेखोर झाले. एकमेकायले जीव लावनारे आता एकमेकायचा द्वेष, मत्सर करू लागले. काई काई जन लोकाईत पिरेम, सलोखा वाढवण्यापेक्षा आपसांत भांडनं लावतात. चांगल्या लोकायचं आपसांत खटकलं, की याईले भलतं गमते. त्यायच्या पोटात आनंदाच्या उकया फुटतात. आसुरी आनंद घेणाऱ्यायची संख्या दिवसेंदिवस वाढूनच राह्यली. त्याच्याच्यानं कुटुंबातला, नात्या-गोत्यांतला, दोस्तायमधला, समाजातला प्रेमाचा, विश्वासाचा, आपुलकीचा, सहकार्याचा धागा कमजोर हून रायला. काई जिगरी दोस्त आता जानी दुश्मन हून रायले. आता आपल्या सचिनचं अन् सुरेशचंच पाहा ना. ते दोघं एकाच ताटात जेवत, संग संगच राहात. ते लंगोटी यार होते. आता त्यायचं पटत नाई. त्यायच्यातून आता इस्तोबी जात नाई. एकमेकायले पान्यात पायतात ते. सच्चे दोस्त पक्के वैरी झाले आता.

" राजेशनं मोहनला गावाची पूर्ण खबरबात दिली. हे ऐकून मोहन विचारांत पडला. त्याला सचिन आणि सुरेश दोघांचाही स्वभाव माहीत होते. दोघंही मनानं चांगले होते. नक्कीच कुठंतरी पाणी मुरत होतं. नेमक्या कोणत्या कारणामुळे त्या दोन जीवलग मित्रांमध्ये दुरावा निर्माण झाला याचं कारण त्याला समजेना. त्यानं राजेशला विचारलं,
"अरे, पण दोघायच्या भांडनाचं नेमकं कारन काय? कोणत्या गोष्टीवरून भांडन झालं?"
"नेमकं कारन तर मलेबी काई माईत नाई. पन मले असं समजलं, की नितीननं सुरेशबद्दल सचिनचे कान भरले. बाकी पोरायनं त्यात तेल टाकलं. लोकायले आग ईझोयपेक्षा आग अजून कशी भडकीन याचीच चिंता रायते. तवापासून त्या दोघायच्या मनातलं अंतर वाळ्ळं. म्या दोघायलेबी लय समजून सांगतलं, की दोघंहीझनं अमोरासमोर बसून दूध का दूध और पानी का पानी करा अन् एकमेकांबद्दलचे गैरसमज दूर करा. पन पुढाकार कोनं घ्याव? दोघाईचा अहंकार आडवा येते. तू काय करता येईल तर पाह्य ब्वा." राजेशनं सुस्कारा सोडत म्हटलं. त्यालाही वाटत होतं की सुरेश आणि सचिन मध्ये समेट झाला पाहिजे म्हणून.
" राजेश, तू असं कर. तू सचिन अन् सुरेश दोघायच्या घरी अल्लग अल्लग जाय अन् त्यायले सांग, की मोहन पुण्याहून आलेला हाये. त्याले तुम्हाले भेट्याची इच्छा हाये. ते दोघंबी माले चांगले दोस्त हायेत. त्यायच्यात काही ना काही मेळ बसवाच लागील. त्यायले सांग, की संध्याकाई सात वाजता मोहनच्या गच्चीवर त्यायले भेट्याले बलावलं म्हणून. पन एक गोष्ट लक्षात ठेव, की सचिनले हे नको सांगू, की सुरेशलेबी बलावेल हाये म्हणून. अन् सुरेशलेबी नको सांगू, की सचिनलेबी बलावेल हाये म्हणून. माहीत पळ्ळं तर ते दोघंबी येनार नाईत." मोहननं राजेशला सांगितलं. "बरं, ठीक हाये. " असं म्हणून राजेश निघून गेला. संध्याकाळी सात वाजता सुरेश मोहनच्या घरी पोहोचला. माडीवर गेला अन् त्याला धक्काच बसला. दोन खुर्च्यांवर मोहन आणि सचिन गप्पा मारत बसले होते. सचिन थोडा लवकरच आला होता. सचिनही सुरेशला पाहून चमकला. त्यानं प्रश्नार्थक नजरेनं मोहनकडे पाहिलं. मोहननं मान हलवली. सुरेशला तिसऱ्या खुर्चीवर बसायचा इशारा केला आणि खाली पाहून आईला तीन कप चहा ठेवायला सांगितला. चहा आला. तिघांनी चहा घेतला. तोपर्यंत तिघांपैकी कोणीच एक शब्दही बोलला नव्हता. तोपर्यंत सचिन व सुरेश दोघांनाही अंदाज आला होता की मोहननं त्यांना दोघांना एकाच वेळी का बोलावलं म्हणून. "आता सांग, सचिन, असं काय झालं, की तुम्ही दोघं एकमेकायशी बोलून नाई रायले." असं मोहननं म्हटलं अन् सचिन व सुरेशचे लाईट लागले. "त्याचं असं झालं,की हा सुरेश माला बदनामी करून रायला होता. ........" असं आणि असंच काहीतरी सचिन बोलला तसा सुरेश ताडकन उभा राहिला.

"असं कोनं सांगतलं तुले? सांगनाऱ्याचं नाव सांग मले. मी असं कधीच कोनाजोळच बोललो नाई. मायावर खोटा आरोप करू नको. " सुरेश रागारागानं म्हणाला. "मले कोनीबी सांगो पन हे खरं हाये, की नाई हाये तेवढं सांग." सचिनही उठून उभा राहत तावातावानं म्हणाला, "नाई. बिलकुलच खरं नाई. मी असं कधी बोललोच नाई. तुया मले ईचारलं कामुन नाई आंधी? तू गड्या, लयच हलक्या कानाचा हायेस रे! कोनी काईबी सांगते अन् तू कशावर बी ईश्वास ठेवतं." सुरेश म्हणाला.

आता मोहनच्या लक्षात आलं होतं, की नेमकी काय भानगड आहे. त्यानं दोघांनाही परत खुर्चीवर बसायला सांगितलं आणि तोही एका खुर्चीवर बसला. दोघांकडे पाहात तोच म्हणाला,
"हे पाहा, गडे हो, आता तुम्ही मोठे आहात लहान नाई रायले. साऱ्या गोष्टी एकतर तोंडानं वाया जातात अन् बऱ्याच गोष्टी शहानिशा न केल्यानं वाया जातात. आमच्या समाजात हीच सर्वात मोठी शरमेची व वाईट गोष्ट हाये, शोकांतिका हाये, की आम्ही सांगोवांगी गोष्टींवर पटकन ईश्वास ठेवतो. खरं काय खोटं काय हे कधी तपासूनच पाहात नाई. सखोल चौकशीच करत नाई. पटकन घोयखोशीवर येतो. पटकन गैरसमज करून घेतो. आपुन तिऱ्हाईतावर ईश्वास ठेवतो पण जोळच्या सख्ख्या मानसावर ईश्वास ठूत नाई.

आपल्याले हे समजत नाई, की सांगणाऱ्यावर ईश्वास ठुवा की नाई. एकमेकायले आपुन आगोदरच शंकेच्या नजरेनं पायतो. शंकेचं भूत लय भयंकर हाये. ते का एकदा मानगुटीवर बसलं, की सहजासहजी निंघत नाई. तुम्ही जर एकमेकायले समोरासमोर प्रत्यक्ष भेटून प्रकरनाची चौकशी केली असती तर हे घडलंच नसतं अन् लावालावी करनाऱ्यांचा उद्देश सफल झाला नसता. आपल्या कानात संशयाचा, द्वेषाचा, अहंकाराचा, मत्सराचा मय जमा होयेल हाये. कानातला मय साफ केला तर चांगलं अन् स्पष्ट ऐकू येते. कानानं ऐकलेलं सगळं खरंच असते हा भ्रम डोक्यातून काढून टाका. आपले कान शाबूत ठेवा. पाहा मंग तुमची दोस्ती, तुमचा घरोबा, तुमच्यातलं प्रेम कधीच कमी होणार नाई. ते वाढतच जाईल अन् अजून पक्कं होईल." सुरेश अन् सचिनच्या तोंडावर आता हसू आलं होतं. त्यांनी एकमेकांकडे पाहिलं आणि एकमेकांना मिठी मारली व एकमेकांची क्षमा मागितली.
"आजपासून मी कानाले हात लावून सांगतो, की यापुढे आम्ही कानात गैरसमजाचा मय होऊ देनार नाई. मनासारखे कानबी स्वच्छ ठेवू."
आता तिघांनीही एकमेकांना मिठी मारली. तिघांच्याही चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.

## संत शिरोमणी रविदासजी महाराज

**पान ०४ वरून...** सगळेच हाडामासाच्या मातीने बनलेले पुतळे आहोत म्हणजेच सर्वांचेच शरीर पंचतत्वापासून बनलेले आहे. मग त्या शरीराचा बाट कसला हो..? आपण सर्व देवाची लेकरे मग शूद्र वर्ण,उच्च, नीच कुणी हा भेदभाव निर्माण केला असे विचार संत रविदासांच्या च्या मनात आले त्यामुळे त्यांनी मनाचा एक निर्धार केला ,कुण्या चांगल्या संतांना गुरु मानून त्यांची सेवा करून परमज्ञान प्राप्त करून सत्य व धर्माचा प्रचार करावा ज्यामूळे समाजात तयार झालेली कुरीती दूर करून सर्वांसाठी सन्मानाने जगण्याचा मार्ग खुला करू आणि अशा प्रकारे संत रविदासांना रामानंद सारख्या गुरुची प्राप्ती झाली. संत शिरोमणी रविदासजी महाराज म्हणतात मानवाने नित्य चांगले कर्म करावे कुणाचे मन न दुखवता आपले जीवन सफल करावे कारण धर्माच्या मार्गाने मिळवलेल्या जेवणाचा स्वाद असतो तर या अधर्माच्या कमाईत अशांतता पसरली आहे. म्हणून पुरुषाने नेहमी सदाचारी बनाव आणि ओळखाव की कोणत्या कर्मामुळे तुम्हाला आनंद प्राप्त होतो आणि कोणत्या अपेक्षेने दुःख पदरात पडते असे स्वभाव असणाऱ्या व्यक्ती नक्कीच दुःखी होत नाही, पण दुसऱ्यांकडून अपेक्षा करणारामात्र दुःखी झाल्या शिवाय राहत नाही. शिल की रापी, ज्ञान का काटा चाम की पत्री प्रेम का टाका संत रविदास महाराज म्हणतात कोण अज्ञान वश आपल्याला विरोध करत असेल तर आपल्याला आपल्या शक्तीचा उपयोग न करता त्या अज्ञानाला शिलारुपी रापीने कापा म्हणजे शांत विचार धारेने त्याच्यातील अज्ञान विरोधाला बाहेर काढा आपल्या प्रति त्याच्या मनात शुद्ध प्रेमाची उत्पत्ती करा आणि प्रेमाच्या टाक्यांनी त्याला जोडून घ्या. निच ना कोई जाती,नीच ना कोई गाम ,नीच काही को जानी नीच करे सो काम ना कोणती जाती ना कोणतच गाव नीच आहे रविदास महाराज म्हणतात नीच त्यालाच माना जो नीच कर्म करतो. जातीच्या आधारावर उच्चनीचता ठरवू नका सर्वप्रथम मनाचा अनियंत्रित पणा म्हणजे संसारातील दुःखाचे कारण आहे. चंचलतेमुळे कुकर्म, दुराचार, अत्याचार होतात व समाजातील स्वतःचे व्यक्तित्व खराब होऊन लोकांच्या मनात तुमच्याप्रती विरोध तयार होतो. संतांची जयंती पुण्यतिथी साजरी करण्याच्या मागचा मुख्य हेतू हाच असतो की त्यांच्या चांगल्या विचार प्रवाहाची आपल्याला गरज आहे ती आपल्यापर्यंत पोहोचावी, आज आपला हेतू असतो पण होते काय की जयंती पुण्यतिथी आली की आपल्याला प्रतिमेवर हार अर्पण करून फोटो काढण्याची वेळ मारून नेण्याची सवय असते पण विचार करण्यासारखी गोष्ट आहे की आजही त्यांच्या उत्तम विचार सरणीच्या मार्गावर आपण चालू शकलो नाही तर नुसतं प्रतिमेला हार अर्पण करून त्यांच्या विचारांची प्रवाह धरा आपल्या मनात प्रवाहित होईल का ..? जात कोणती पुसू नका धर्म कोणता पुसू नका उद्यानातील फुल त्याचा रंग कोणता पुसू नका. आपण आजही जातीच्या नावाखाली एवढे भरडले जातो की बऱ्याच ठिकाणी आता सुद्धा लोकांच्या वागणुकीत अजूनही परकेपणा जाणवतोच, जातीभेद हवा तसा नष्ट झाला नाही याचे अनेक उदाहरण आजही आपल्याला समाजात बघायला मिळतात पण विचार करण्या सारखी गोष्ट आहे भारतातील प्रत्येक संतांचे विचार त्यांनी नेहमी प्रत्येक व्यक्तीचा मान सन्मान आदर जपायला सांगितलेला आहे. आपली वाणी मृदू असली पाहिजे ,प्राणी मात्रांवर दया करा ,चोरी करू नका,कुणाचे मन दुखवू नका, अंधश्रद्धा बागळू नका,कुणावरही अत्याचार करू नका. प्रत्येक संतांचे विचार हे प्रत्येक समाजातील प्रत्येक व्यक्तीसाठी होते त्यांनी कधीच जातीभेद मांडला नाही पण आपण मात्र त्यांना जाती-जातीत वाटून घेतलेले आहे.

## दिग्दर्शकाच्या अपडेटनंतर शाहिद-रश्मिका-क्रिती सेनॉनचा जल्लोष

बॉलिवूडमधील बहुचर्चित चित्रपट 'कॉकटेल' चा दुसरा भाग म्हणजेच 'कॉकटेल २' सध्या जोरदार चर्चेत आहे. या चित्रपटाबाबत दिग्दर्शकाने नुकतीच एक महत्त्वाची अपडेट दिली असून, त्यानंतर चित्रपटातील कलाकारांनी कक कापून आनंदोत्सव साजरा केला. शाहिद कपूर, क्रिती सेनॉन आणि रश्मिका मंदान्ना यांनी सेलेब्रेशन केलेले फोटो एक्स अकाऊंटवर व्हायरल होत आहेत.मिळालेल्या माहितीनुसार, 'कॉकटेल २' च्या शूटिंगचं काम पूर्ण झालं आहे. यानंतर शाहिद आणि रश्मिका, क्रिती यांनी सेटवर केक कापून सेलिब्रेट केले.होमी अदजानिया दिग्दर्शित कॉकटेल २ यावर्षी २०२६ मध्ये रिलीज केले जाणार असल्याची माहिती समोर आली आहे. शाहिद कपूर, रश्मिका मंदाना, क्रिती सेनॉन यांचा बहुप्रतीक्षित चित्रपटाची अधिकृत रिलीज डेटची अधिकृत घोषणा झालेली नाही. मीडिया रिपोर्ट्सनुसार, 'कॉकटेल २'मधील रश्मिका मंदान्ना आणि शाहिदची फ्रेश जोडी मोठ्या पडद्यावर पाहायला मिळणार आहे. होमी अदजानियाने इन्स्टाग्रामवर एक पोस्ट शेअर केलीय. त्यांनी कॅप्शनमध्ये लिहिलंय- कॉकटेल २ चे शूटिंग पूर्ण झाले आहे. कदाचित मी पक्षपाती आहे, पण हे थोडे खास वाटते.

## ओळख पक्ष्यांची : सनबर्ड



प्रतिमेतील पक्षी एक नर जांभळा सनबर्ड आहे (सिनायरिस एशियाटिकस). हा लहान, अमृत खाणारा पक्षी अरबी द्वीपकल्पापासून आग्नेय आशियापर्यंत उष्णकटिबंधीय दक्षिण आशियामध्ये मोठ्या प्रमाणात आढळतो.येथे दिसत असल्याप्रमाणे, प्रजनन पिसारामधील नर, तेजस्वी, इंद्रधनुषी जांभळे आणि निळे पंख प्रदर्शित करतात. त्यांची चोच बारीक, वक्र आणि जीभ नळीच्या आकाराची असते, जी फुलांचे रस खाण्यासाठी उत्तम प्रकारे अनुकूल असते. हा पक्षी बुटेआ मोनोस्पर्माच्याझाडाच्या आकर्षक नारिंगी फुलांवर बसलेला असतो, ज्याला सामान्यतः जंगलाची ज्योत म्हणून ओळखले जाते.

**(छायाचित्र:चंद्रकांत पाटील)**

## अजितदादा पवार



हाक अशी की कार्यकर्ता
क्षणात उभा राही,
आणि धाक असा की
विरोधक थबकून पाही।

निर्णयात होता वेग,
शब्दात होता ठामपणा,
रागावण्यातही त्यांच्या
होता वेगळाच आपलेपणा।
नजर अशी तीक्ष्ण,
जाणे राजकीय दिशा दाही,
हाक अशी होती की
कार्यकर्ता क्षणात उभा राही।

सत्तेच्या पटावर खेळी,
चाल कधीच न ठरलेली,
नेते-कार्यकर्त्यांची साथ,
किंतु-परंतु ना मनी धरलेली।
जनता दरबार दादांचा असा
की कोणाचा हात रिता नाही,
हाक अशी होती की
कार्यकर्ता क्षणात उभा राही।

गोंधळातही स्पष्टता,
दबावातही होता निर्धार,
सत्तेत असो वा विरोधात,
दादाच जनतेचा आधार।
झालेल्या विकासकामांची
जनताच देते ग्वाही,
हाक अशी होती की
कार्यकर्ता क्षणात उभा राही।

दादा नेहमी सांगत,
''मी कामाचा माणूस आहे'',
जनतेच्या आशीर्वादावरच
माझा खरा विश्वास आहे।
दादा निघून गेले,
आता वाटे रिते सर्व काही
हाक अशी होती की
कार्यकर्ता क्षणात उभा राही।

**शब्दरचना :**
**पराग उमाकांत पिंगळे,**
**यवतमाळ**

## राशी-भविष्य

**मेष:** अडकलेला निधी परत मिळणार नाही. प्रयत्न यशस्वी होतील. प्रवास करताना काळजी घ्या. तुम्हाला घरातून आणि बाहेरून पाठिंबा मिळेल. नफा वाढेल. तुम्हाला एखाद्या समारंभात सहभागी होण्याची

**वृषभ:** तुम्ही नवीन आर्थिक धोरण राबविण्याचे धाडस करू शकाल. कामात बदल होतील. विरोध होईल. तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवा. आदर वाढेल.

**मिथुन:** सरकारी हस्तक्षेप होईल. तुमची भेट एखाद्या प्रभावशाली व्यक्तीशी होईल. तुम्हाला कुटुंब आणि घराची चिंता असेल. इतरांच्या कामात हस्तक्षेप करणे टाळा. व्यवसाय चांगला चालेल. भागीदारांशी मतभेद कमी होतील.

**कर्क:** दुखापती आणि अपघातांमुळे नुकसान होऊ शकते. विशेषतः महिलांनी सावधगिरी बाळगावी. आरोग्य कमकुवत असेल. तुमच्या जवळचे कोणीतरी वाईट वागेल. मौल्यवान वस्तू सुरक्षित ठेवा.

**सिंह:** तुम्हाला सरकारी मदत मिळेल. शारीरिक अस्वस्थता संभवते. घाईघाईने काम करू नका. उत्साहावर नियंत्रण ठेवा. विवेक वापरा. तुम्हाला वेळेवर कुटुंबाचा पाठिंबा मिळेल.

**कन्या:** दुखापती आणि अपघातांमुळे मोठे नुकसान होऊ शकते. वाईट लोक नुकसान करू शकतात. जुना आजार अडथळे निर्माण करू शकतो. अनोळखी लोकांवर विश्वास ठेवू नका. व्यवसाय चांगला चालणार नाही. उत्पन्न स्थिर राहील.

**तूळ:** कायदेशीर मदत वेळेवर मिळेल. अडथळे दूर होतील आणि फायदेशीर परिस्थिती निर्माण होईल. तुम्हाला मित्र आणि नातेवाईकांकडून पाठिंबा मिळेल. जोखीम घेणे टाळा.

**वृश्चिक:** तुम्हाला दुःखद बातमी मिळू शकते. धीर धरा. तुमचे आरोग्य कमकुवत असेल. निष्काळजीपणा टाळा. खूप धावपळ होईल. प्रगतीत अडथळे येऊ शकतात. तुम्हाला खूप प्रयत्न करावे लागतील.

**धनु:** तुमच्या कठोर परिश्रमाचे फळ तुम्हाला मिळेल. सामाजिक लक्ष वाढेल. प्रलंबित कामे पूर्ण होतील. आनंद वाढेल. तुम्हाला कुटुंबाचा पाठिंबा मिळेल. आर्थिक लाभ सहज होतील.

**मकर:** तुम्हाला दीर्घकाळापासून हरवलेले मित्र आणि नातेवाईक भेटतील. तुम्हाला अनुकूल माहिती मिळेल. वादविवाद टाळा. कोणाचेही वर्तन अनुकूल नसेल. तुमच्या आरोग्याची काळजी घ्या. वरिष्ठांचा सल्ला घ्या.

**कुंभ:** नोकरी मिळविण्याचे प्रयत्न यशस्वी होतील. तुम्हाला भेटवस्तू आणि भेटवस्तू मिळतील. तुम्ही जोखीम घेण्याचे धाडस करू शकाल. एखाद्या मोठ्या समस्येवर तोडगा निघू शकेल. तुम्हाला आनंद वाटेल.

**मीन:** अनपेक्षित खर्च निर्माण होतील. तुम्हाला कर्ज घ्यावे लागू शकते. जुना आजार तुम्हाला त्रास देऊ शकतो. बोलण्यात संयम आवश्यक आहे. प्रगतीपथावर असलेले काम बिघडू शकते. अनोळखी लोकांच्या प्रभावाखाली येऊ नका.

**आचार्य पं. श्रीकांत पटैरिया: मो. ७८७९३७२९१३**

## विदर्भस्तरीय शिक्षक मेळाव्याच्या स्मरणिकेच्या निमित्ताने..!




**प्रासंगिक**
**जयदीप सोनखासकर**
**नागपूर, मो. 9890508017**

संत गजानन महाराजांच्या पदस्पर्शाने व सदैव वास्तव्यास असलेल्या संत नगरी श्रीक्षेत्र शेगाव जिल्हा बुलढाणा येथे महाराष्ट्रातील बलाढ्य शिक्षक संघटना म्हणून नावलौकिक असणाऱ्या विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचा विदर्भ स्तरीय शिक्षक मेळावा होत आहे. दिनांक ३१ जानेवारी व १ फेब्रुवारी रोजी आयोजित या शिक्षक मेळाव्याच्या निमित्ताने उपस्थित राहणाऱ्या सर्व शिक्षक बंधू-भगिनींचे मनापासून अभिनंदन व स्वागत करतो. स्वातंत्र्यापूर्वी म्हणजेच दिनांक १८ नोव्हेंबर १९४६ रोजी स्थापना झालेल्या विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचा प्रवास आता ८१ व्या वर्षात म्हणजेच सहस्त्र चंद्रदर्शन सोहळ्याकडे लौकिकार्थाने सुरू आहे. यावरून संघटनेच्या दीर्घ संघर्षांची गाथाच लिहिण्यासारखे आहे. ज्याप्रमाणे आमच्या वारकरी संतांनी समाजप्रबोधन व लोकशिक्षणाचा वसा घेऊन समाजजागृतीचे कार्य केले. त्याचप्रमाणे विमाशि संघाचे संस्थापक स्व. दि. ह. उपाख्य बाळासाहेब सहस्त्रबुद्धे, स्व. हरिभाऊ हटवार, स्व. पु. ब. उपाख्य बाबासाहेब सोमवंशी, स्व. म. न. अंजीकर, स्व. ना. बा. सपाटे, स्व. प्र. य. दातार आणि वयाची पंच्याहत्तरी ओलांडूनही कार्यरत असलेले माजी आमदार व्ही. यू. डायगव्हाणे, माजी आमदार वसंतराव खोटरे व सध्या या संघर्ष गाथेचे सुवर्णपान म्हणजेच विमाशि संघाचे सरकार्यवाह आमदार सुधाकर अडबाले यांचे शिक्षक प्रबोधन, समस्या निवारण, जागृती व शिक्षण हक्कांसाठी लढा देण्याची परंपरा अखंडीतच आहे. याशिवाय अनेक ज्ञात-अज्ञात पदाधिकारी, कार्यकर्ते, आजीव सभासद यांनी वेळोवेळी विमाशि संघाला बळकट करण्याचे कार्य केले आहे. विमाशि संघाच्या सोबतीने नुटाचे माजी आमदार प्रा. बी. टी. देशमुख यांनी सुद्धा शिक्षक, प्राध्यापकांच्या समस्या सभागृहात प्रभावीपणे मांडून सोडवून घेतल्या आहेत. त्या सर्वांना मी सर्वप्रथम मानाचा मुजरा करतो. शिक्षकांची, शिक्षकांसाठी, शिक्षकाभिमुख असणारी ही संघटना असून प्रदीर्घ व प्रचंड अशी शक्तिशाली शिक्षक चळवळ आहे. केवळ शिक्षकहित सर्वतोपरी न मानता विद्यार्थी, पालक, शासन आणि समाज यांच्यात सदैव समन्वय ठेवून उद्भवणाऱ्या समस्यांवर उपाययोजना करण्याचे कार्य ही संघटना करते आहे. संघर्ष हा संघटनेचा मौलिक आत्मा आहे. सद्यः स्थितीत भेडसावणाऱ्या समस्यांपेक्षा यापूर्वीचा शिक्षक हतबल होता. त्यावेळी संघटनेचा भेदक मारा सभागृहात करणाऱ्या शिक्षक आमदारांमुळे सत्तासन डोलत असे. मात्र अलीकडे विदर्भातील दोन्ही शिक्षक मतदारसंघात नागपूर व अमरावती मधून संघटना प्रतिनिधी सभागृहात न पोहोचल्यामुळे शिक्षकांच्या समस्या हनुमानाच्या शेपटीप्रमाणे लांबतच राहिल्यात. अपवाद आता नागपूर विभागात आमदार सुधाकर अडबाले आहेत, त्यांच्या सर्व शिक्षक संवर्गाला न्याय देण्याचा भूमिकेमुळे संघटनेचे कार्य तडीस जात आहे. दिवसेंदिवस शासन, शिक्षक व शिक्षणविरोधी भूमिका सातत्याने घेतांना दिसत आहे. मराठी शाळा बंद करणे, शिक्षकांना सेवेत असताना पात्रता परीक्षा लादणे (टीईटी) यांसह अन्यायकारक संचमान्यता, शिक्षक कर्मचारी पदभरती नसणे, जुनी पेन्शन नाकारणे, टप्पा अनुदानाच्या चक्रात शिक्षकांना नाहक अडवणूक करणे, अशैक्षणिक कामांचा वाढता डोंगर, यापुढे तर भविष्यात एआय तंत्रज्ञानाच्या नावाखाली शिक्षकच शाळांतून हद्दपार करणे असे छुपे अजेंडे राबविले जात आहेत. अशावेळी संघटनेच्यावतीने आयोजित विविध आंदोलनात शिक्षकांचा सक्रीय सहभाग असणे गरजेचे झाले आहे. ही सुलतानी प्रवृत्ती ठेचून काढण्यासाठी नवनवीन शिक्षक बंधू-भगिनींनी विमाशि संधात सामील होणे, काळाची गरजच बनली आहे. शिक्षणाचे झालेले बाजारीकरण थांबविणे गरजेचे झाले आहे. शिक्षकांना रस्त्यावर आणून कुत्रे मोजण्याचे काम देणाऱ्या या सरकारी धोरणांचा बंदोबस्त करणे आवश्यक आहे. त्यासाठी विमाशि संघ हाच एकमेव शिक्षकांसाठी आधारवड ठरणार आहे. या वैभवशाली शिक्षक संघटनेच्या शतकी वाटचालीसाठी आपण संकल्प करूया. शिक्षकांच्या वेदनांशी नाते जोडून समाज शिक्षकाभिमुख करण्याचा प्रवास आपल्याला पुन्हा सुरू करायचा आहे. त्यासाठी शेगाव येथे होणारे समस्या मार्गदर्शन, विचार मंथन व विदर्भ स्तरीय शिक्षक मेळावा मैलाचा दगड ठरणार आहे. या, आपण सर्व मिळून हा प्रवास लिलया पार पाडण्यासाठी संकल्प बद्द होऊया, संघर्षरत राहूया. अमरावती विभागात पुढील निवडणुकीत संघटनेचा विचार भक्कम करण्याची शपथ घेऊया. आज ही संघर्षगाथा स्मरणिकेच्या स्वरुपात आपल्या सर्वांच्या हाती सोपवितांना मुख्य संपादक या नात्याने मला अत्यंत आनंद होत आहे. संघटनेचा संघर्ष हा विचार तळागळात नेणारे प्रांतीय पदाधिकारी, जिल्हा पदाधिकारी, तालुका पदाधिकारी व आजीवन सभासद यांनाच हे श्रेय जाते. शिक्षकांच्या कल्याणासाठी संत गजानन चरणी हीच प्रार्थना करतो.

**शिक्षका तू जागा हो**
**संघर्षाचा आता धागा हो**
**शिक्षकवताशी जागता हो**
**समाजाचा पालनकर्ता हो**

## आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 295



**संकेत शब्द:–**

**दोन अक्षरी**
कट
कल
गौण
चाक
जड
ठसा
ताम्र
दबा
दर
दव
नट
नाट
नाथ
नाना
नारी
बल
भार
मका
मन
मास
यम
रजा
रव
राधा
लव
विद्या
सर
साग
सारा
साव
साक्ष
स्ट्रॉग
स्तव
हर
हवा
हारा
क्षीण

**तीन अक्षरी**
कसर
कासव
गगन
चरबी
जनम
जहर
धरण
धीराचा
नीरज
पकड
पसाय
पात्रता
बांधव
भासरा
मकर
मानस
यमन
रकाना
रतन
रताळे
ललाट
ललाम
लवण
लसावि
लांछन
वयस्क
वासना
विचार
विवेक
समीप
संचय
संचार

**चार अक्षरी**
अवसान
आलोचना
आंदोलन
गालबोट
गौरीहर
दरबार
दशरथ
नारकत
नीलकंठ
बदनामी
बोळवण
मौनीबाबा
विकलांग


**पाच अक्षरी**
अक्षयपात्र
गगनचुंबी
धरणीकंप
तपासनीस
लोहचुंबक
विधानसभा
समीकरण
सरसकट
हस्तांदोलन

**सहा अक्षरी**
नवेगाव बांध
नियतकालिक
नील आर्मस्ट्रॉग

**अन्य अक्षरी**
नीर क्षीर विवेक
विधी महाविद्यालय
समयसूचकता


(उत्तर पुढील अंकी)

**मागील महाशब्दकोडेचे उत्तर**



Uday Munde - 8446302691

## महाशब्दकोडे 676



**-: आडवी विधाने :-**

1) महाराष्ट्राची ही उपराजधानी संत्रानगरी म्हणून प्रसिद्ध आहे.
3) 'गीतांजली'च्या लेखनाकरिता नोबेल पारितोषिक मिळविणारे थोर तत्वचिंतक
7) नोकरांचाकरांस सणावारी देण्याचे इनाम
9) मला
10) नृपति
11) खर्च, नुकसान
12) फुटलेल्या मडक्याचा तुकडा
13) तळहात
16) मार्गस्थ, निघालेला
17) सारख्या पातळीचे, उंचसखल नसलेले
18) ताप येण्यापूर्वी वाटणारी अस्वस्थता
19) मराठीतील एक गाजलेले नाटक
21) विकलांग, अधू
23) स्वतःच्या स्वार्थासाठी उगाचच एखाद्याची स्तुती करणारा
24) पैशाची अतिशय हाव असणारा
25) कायद्याचा अभ्यासक्रम शिकविणारे महाविद्यालय
28) अखंड, जोडलेले
30) ज्वारीची थापून केलेली जाड पोळी
31) मोठा दगड, पाषाण 33) मोठी नदी
34) अति विश्वासाने दुसऱ्याजवळ ठेवलेले द्रव्य
35) एकमेकांच्या हिताची हळूहळू केलेली चर्चा
37) इतर, श्रेष्ठ
39) जनावर, सृष्टीतील सजीव जीवजंतू
40) श्रीमानचे संक्षिप्त रूप
41) मसाल्यातील एक पदार्थ
43) कल्याण
44) धरणीकंप
46) सौम्य उष्णता, आधार, सुख
47) हिंस्त्र पशु
48) जरब, धाक
49) मनाला वाटणारी शांती, निश्चलता, सुख
51) सोबत, सह, संगतीने
53) सूर्याचे एक नाव
56) पैसा, आशय
57) वर्षातील सहा ऋतुंपैकी एक
58) क्रमून आलेल्या मार्गाकडे सिंहाप्रमाणे अभिमानाने वळून बघणे
59) अखंड बेशुद्धावस्था
60) कर्णेंद्रिय
61) चिलखत, आवरण
63) विश्वास, खात्री
65) शिकार, श्वापद
67) मनाला बरे वाटणारे
70) पृष्ठभागावरचा तुकडा
72) शेत, मळा, वहिवाट
73) पृथ्वी
74) वर आच्छादन असलेली बैलगाडी

**-: उभी विधाने :-**

1) नवजात बालकाचे नाव ठेवण्याचा समारोह
2) घड्याळाचा अलार्म, घंटीचा आवाज
3) सुटी, परवानगी
4) पैसेवाला, धनवान
5) समूळ नष्ट करणे
6) तागाचे तयार केलेले जाड कापड
7) पोपटासारखो अर्थज्ञानावाचून केवळ दूसरा बोलतो तसे बोलणे
8) पडदा, थर
14) चांगले वाईट यामधील भेदाचे ज्ञान
15) जखमेतून स्त्रवणारा द्रव्यांश
17) अनेक राजे मांडलिक असलेला सार्वभौम राजा
20) देवालयापुढे कथा कीर्तनासाठी उभारलेला मंडप
21) हळूच, धक्का न लागता
22) कपाळ, मस्तक
24) संगोपन, पालनपोषण
26) बोलाविण्यासाठी दिलेला आवाज
27) पति किंवा प्रियकराच्या वियोगात भावनाविवश झालेली स्त्री
29) महाभारतात गांधारीचा भाऊ
32) कर्तुत्व, करामत, कौशल्य
36) गुलाबाच्या पाकळ्या आणि साखर यांचे मुरविलेले मिश्रण
38) रामायणात पाषाण झालेल्या या साध्वीचा श्रीरामाच्या पदस्पर्शाने उद्धार झाला
39) मरणाच्या निर्धाराने अन्न, जलाचा त्याग करणे
42) तिसरी अनोळखी व्यक्ती
45) पराग कणांचा बीजांडाशी संबंध येण्याची क्रिया
47) ऑस्कर अवॉर्डच्या नामांकनापर्यंत पोहोचलेला अरुण नलावडे यांचा मराठी चित्रपट
49) नाद, आवाज
50) वातावरणाची स्थिती
52) किल्ल्याभोवती खोदलेला चर
53) आमिष, फूस
54) गरिबांची ही पोळी आता महाग झाली आहे
55) कडोसरी, कंबर
56) धैर्य, हिंमत
60) रात्री चमकून आपले अस्तित्व दाखविणारा किडा
62) ओकारी, उलटी
64) दक्ष, सावधान, जागृत
66) तीर्थस्थानी केलेली हजामत
68) वजन, जडत्व, ओझे
69) अंगिकारलेले व्रत
71) कार्य, कृत्य, उद्योग

**मागील महाशब्दकोड्याचे उत्तर**



Uday Munde - 8446302691

## थोडक्यात

### महापरित्राण पाठ व धम्मदेशना उद्या

**नागपूर :** पवित्र दीक्षाभूमीवरील महापरित्राण पाठ धम्मदेशना कार्यक्रम १ फेब्रुवारीला सकाळी १० वाजताआयोजित करण्यात आला आहे. बुद्ध संस्कृतीमध्ये माघ पौर्णिमेला विशेष महत्त्व आहे. या दिवशी भगवान बुद्धाने वैशालीच्या चापाल चैत्यामध्ये आपल्या महापरिनिवार्णाची घोषणा केली होती. माघ पौर्णिमा ही बौद्ध राष्ट्रांत भगवान बुद्धांची करुणा, प्रज्ञा व मैत्रीचा पावन उत्सव म्हणून ओळखल्या जातो. या मंगल पर्वावर परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती दीक्षाभूमी नागपूर आणि भिक्खू - भिक्खुणी संघ व उपासक-उपासिका संघाच्यासंयुक्त विद्यमाने महापरित्राण पाठ व विशेष धम्मदेशनेचा कार्यक्रम आयोजित केला आहे. सर्व बौद्ध उपासक उपासिकांना उपस्थित राहण्याचे आवाहन विलास गजघाटे यांनी केले आहे.

### पवित्र दीक्षाभूमीवर संघदान

**नागपूर :** पवित्र दीक्षाभूमीवर दीक्षाभूमी स्मारक समिती भिक्षु भिक्ष्युणी संघ उपासक -उपासिका यांच्या संयुक्तविद्यमाने संघदान करण्यात आले. प्रारंभी बुद्ध वंदना सुत्रपठण करून उपासक उपासिकांना धम्मदेशना प्रदान करण्यात आली. ७५ भिक्षु - भिक्षुणीसह ३०० ते ४०० उपासकासह प्रथम भोजनदान तसेच भिक्षु -भिक्क्षुणी संघाला चिवरदान व अष्टपुरिष्कार दान प्रदान केले. तथागत भगवान बुद्धांच्या काळापासून संघदानाची एक महान परंपरा अविरत सुरू आहे. परंपरेनुसार पवित्र दीक्षाभूमीवर संघदानाचा कार्यक्रम संपन्न झाला. व बौद्ध धम्माच्या प्रसार प्रसाराच्या दृढ संकल्प करण्यात आला. विलास गजघाटे व भिक्खू संघानंद, भिक्खू प्रज्ञाज्योती, भिक्खू प्रियदर्शी, भिक्खू धम्मदेश, भिक्खू सम्यय, भिक्खू धम्मप्रकाश, भिक्खूणी विशाखा, भिक्खुणी आम्रपाली, भिख्खूणी संघप्रिया, भिक्खूणी चंद्रशीला, उपासिका माया जामगडे, कविता रामटेके, ज्योती वासनिक, उज्वला मेश्राम, शोभा खोब्रागडे, शीला मेंढे, मंगला खोब्रागडे, सुषमा शेंडे, प्रतिभा मदामे, लता डांगे, अलका जोडापे, अनिता भोरखडे, उपासक विठ्ठल धोंगळे, सुनील भोसले, देवाजी रंगारी, मिलिंद थुल, अशोक शेंडे, विशाल शुक्ला, रंजीत सूर्यवंशी, सुरेश वानखेडे, प्रदीप सोनवणे आदींची उपस्थिती होती कार्यक्रमाचे संचालन शरद मेश्राम यांनी केलेसुनील भोसले यांनी आभार मानले.

### स्वरमेघतर्फे 'मानपत्र' प्रदान सोहळा आज

**नागपूर:** स्वरमेघ आर्ट फाउंडेशनच्या वतीने रविवारी, १ फेब्रुवारी रोजी सकाळी ८:३० ते १०:३० या वेळेत विशेष सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. वर्धा रोडवरील हिंदुस्तान कॉलनी, साई मंदिर समोरील एम.के.एच. संचेती पब्लिक स्कूल, नारायणी हॉल येथे हा कार्यक्रम संपन्न होईल. या सोहळ्यात मान्यवरांना 'मानपत्र' आणि 'स्वरचैतन्य' पुरस्कार प्रदान करण्यात येतील. संस्थेचे अध्यक्ष मनीष उपाध्ये यांच्या नेतृत्वात हा कार्यक्रम होणार असून सर्व पदाधिकारी उपस्थित राहतील. याच निमित्ताने 'सप्तसूर' ही विदर्भ स्तरीय गायन स्पर्धाही आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेची मुख्य जबाबदारी विशाखा पाध्ये व शर्वरी पुराणिक सांभाळत आहेत. संस्थेचे कोषाध्यक्ष दिनेश टेकाडे आणि सचिव प्रबोध देशपांडे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे या कार्यक्रमाची माहिती दिली असून, जास्तीत जास्त रसिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे.

# महावितरणचा 'हायव्होल्टेज' दणका: वीजचोरांचे धाबे दणाणले!

## ११ हजार ९६२ ठिकाणी तपासणी, विद्युत कायद्यांतर्गत गुन्हे दाखल

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. ३१ :** महावितरणच्या नागपूर परिमंडलाने वीजचोरी करणाऱ्यांविरुद्ध मोहीम अधिक तीव्र केली असून, एप्रिल ते डिसेंबर २०२५ या नऊ महिन्याच्या कालावधीत महावितरणच्या स्थानिक तांत्रिक विभागाने केलेल्या धडक कारवाईत एकूण १ हजार ९६३ ठिकाणी वीजचोऱ्या उघडकीस आणल्या आहेत.

याशिवाय अन्य १६७ ग्राहकांवरही कार्यवाही करीत एकूण २ हजार १३० ग्राहकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. महावितरणच्या या मोहिमेमुळे वीजचोरांचे धाबे दणाणले आहे.उपरोक्त नऊ महिन्यांच्या कालावधीत नागपूर जिल्ह्यातील तब्बल




११ हजार ९६२ ग्राहकांच्या वीज यंत्रणेकडील तपासणी करण्यात आली. त्यापैकी १ हजार ९६३ ग्राहकांनी तब्बल ४ कोटी ९९ लाख ५८ हजार रुपयांच्या २३ लाख ८२ हजार ६३१ युनिट्सची वीज चोरल्याचे स्पष्ट झाले आहे. यापैकी या चोरीच्या बदल्यात महावितरणने नियमानुसार देयके आणि तडजोडीपोटी १ कोटी ३ लाखांचा दंड असा एकूण ६ कोटी २ लाखाचे देयक संबंधित ग्राहकांना आकारला आहे. यातील ३६ ग्राहकांनी तडजोड करण्यास नकार दिल्याने किंवा गंभीर स्वरूपाची चोरी केल्याने त्यांच्यावर विविध ठाण्यांत विद्युत कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

### वीज चोरीचे प्रकार पहा

**या मोहिमेत वीजचोरीचे अत्यंत प्रगत आणि धक्कादायक प्रकार उघडकीस आले आहेत. कारवाई करण्यात आलेल्या ग्राहकांपैकी १७४ जणांनी थेट मुख्य वीज वाहिनीवर 'आकडा' टाकून चोरी केली होती. मात्र, उर्वरित १८९ ग्राहकांनी तांत्रिक छेडछाडीचा मार्ग अवलंबला होता. यामध्ये मीटरमध्ये रिमोट कंट्रोल बसवून ते दुरूनच बंद करणे, मीटरच्या मागील बाजूस सूक्ष्म छिद्र पाडून रोध निर्माण करणे, मीटर संथ करण्यासाठी अंतर्गत सर्किटमध्ये बदल करणे किंवा मीटर पूर्णपणे बंद पाडणे अशा 'अफलातून' क्लुप्त्यांचा समावेश आहे.**

**प्रामाणिक ग्राहकांना फटका**

वीजचोरीचा सर्वाधिक फटका हा प्रामाणिकपणे आणि नियमित वीज बिल भरणाऱ्या ग्राहकांना बसतो, असे महावितरणने स्पष्ट केले आहे. अनधिकृत विद्युतभारामुळे रोहित्रांवर (ट्रान्सफॉर्मर) क्षमतेपेक्षा जास्त ताण पडतो. यामुळे ट्रान्सफॉर्मर जळणे, शॉर्ट सर्किट होणे आणि वारंवार वीजपुरवठा खंडित होणे असे प्रकार घडतात. यामुळे महावितरणला आर्थिक नुकसानीसोबतच ग्राहकांच्या रोषालाही सामोरे जावे लागते. ही परिस्थिती टाळण्यासाठीच वीजचोरी रोखणे अनिवार्य असल्याचे प्रशासनाने म्हटले आहे.



# खोंडे उद्यानात सामूहिक सूर्यनमस्कारांचे आयोजन

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. ३१ :** महाल बहुउद्देशीय सांस्कृतिक मंडळ, संजीवनी प्राणायाम आणि गार्डन फ्रेंड्स यांच्या संयुक्त विद्यमाने खोंडे उद्यान येथे रथसप्तमी निमित्त सामूहिक सूर्यनमस्कारांचे आयोजन करण्यात आले. स्वामी जनार्दन महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रमुख पाहुणे डॉ. जीवेश पंचभाई यांनी सूर्यनमस्कारामुळे शरीर सुदृढ व लवचिक होऊन निरोगी समाज घडतो, असे प्रतिपादन केले.

अनिलजी मानापुरे यांनी या उपक्रमाचे आयोजन केले होते. यात प्रबोधन कॉन्व्हेंट, जामदार हायस्कूलचे विद्यार्थी, शिक्षक आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. यावेळी नवनिर्वाचित नगरसेवक श्रीकांत आगलावे, बंडूजी राऊत, सचिन नाईक, वैशाली उदापूरकर व सारिका नांदुरकर यांचा सत्कार करण्यात आला. अंजनाताई चरडे यांनी मंत्रपठण तर रवींद्र वैद्य यांनी प्रात्यक्षिके सादर केली. प्रास्ताविक अनिल मानापुरे, संचालन सुरेंद्र त्रिवेदी आणि आभार काशिनाथ मटाले यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अनिल मानापुरे, काशिनाथ मटाले, अविनाश काईलकर, डॉ. गोपालदास मोहता, रवींद्र वैद्य, वर्षा दूरगकर, अंजनाताई चरडे, विजया मेनकुदळे, सुवर्णा देव, सविता मेढेकर, राजूभाऊ महल्ले, आनंद वानखेडे आणि शालिनी मानापुरे यांनी परिश्रम घेतले.

## भांडेवाडी आग...



**नागपूरः पूर्व नागपुरातील भांडेवाडी येथील कचरा ढिगाऱ्याला आज आग लागली. अग्निशमन विभागाने ही आग आटोक्यात आणली.**

# नागपूर रेल्वे गाड्यांना आता 'कवच'चे सुरक्षा वर्तुळ!

## दोन गाड्यांची धडक टळणार; फेज-१ मधील ९९ टक्के काम पूर्ण, इंजिन चाचण्याही यशस्वी

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. ३१ :** मध्य रेल्वेच्या नागपूर विभागात दोन रेल्वेगाड्याची धडक होऊ नये, यासाठी 'कवच'ही अत्याधुनिक प्रणाली बसवण्याचे काम जोमात सुरू आहे. ही आधुनिक सुरक्षा प्रणाली रेल्वे वाहतूक अधिक सुरक्षित करण्यास तसेच अपघात टाळण्यास उपयोगी ठरणार आहे.

नागपूर विभागांतर्गत नियोजित एकूण ९४ स्थानकांपैकी तीन स्थानकांवर स्टेशन टीसीएएस यशस्वीरीत्या कार्यान्वित करण्यात आले आहे, तर ९ स्थानकांवर काम प्रगतीपथावर आहे. याशिवाय रेल्वे क्रॉसिंगच्या फाटकांवरील सुरक्षितता अधिक बळकट करण्यासाठी चार




ठिकाणी लेव्हल क्रॉसिंग-टीसीएएस प्रणाली बसवण्यात आली आहे.

फेज-१ अंतर्गत 'रेडिओ फ्रिक्वेन्सी आयडेंटिफिकेशन ' बसवण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. आतापर्यंत ८,४६० पैकी ८,३९१ आरएफआयडी टॅग बसविण्यात आले आहे. म्हणजे सुमारे ९९.१८ टक्के काम झाले आहे. यामुळे ९४ पैकी ९२ ब्लॉक सेक्शनचा समावेश आहे. तसेच फेज-२ अंतर्गत तीन स्थानकांवर आरएफआयडी बसविणे व चाचणी घेण्याचे काम सुरू आहे. रेल्वे इंजीन चाचण्यांचे निष्कर्ष सकारात्मक ठरले आहेत. फेज-२ इंजीन चाचणी परासिया-इकलेहरा-पालाचौरी मार्गावर यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आले असून त्यामध्ये १०.७९ किलोमीटर मार्ग व दोन खंडांचा (सेक्शन) समाविष्ट आहेत. त्याचप्रमाणे फेज-१ इंजीन चाचणी एकूण नियोजित ९९१.४२ किलोमीटरपैकी ७१८.७४ किलोमीटर रेल्वे मार्गावर पूर्ण करण्यात आले आहेत. कवच यंत्रणेअंतर्गत प्रस्तावित १५५ टॉवर्सपैकी ८३ टॉवर्स उभारण्यात आले आहेत. स्थानक, आरएफआयडी पायाभूत सुविधा, लोको चाचण्या तसेच टॉवर्स उभारणाचे वेगाने सुरू आहे. नागपूर विभागाच्या आधुनिक, तंत्रज्ञानाधारित रेल्वे सुरक्षा प्रणाली स्वीकारण्याच्या दिशेने प्रगतीपथावर आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

# नियमित लसीकरणापासून माता व बालक वंचित राहू नये

## आरोग्य संघटनेचे अधिकारी डॉ. मोहम्मद साजीद यांनी घेतला लसीकरण मोहिमेचा आढावा

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. ३१ :** नागपूर महानगरपालिकेच्या माध्यमातून शहर टास्क फोर्स समितीची महत्त्वाची बैठक मनपा मुख्यालयातील अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत यांच्या सभा कक्षात पार पडली. शहरातील मनपा रुग्णालये, शासकीय आणि खासगी दवाखान्यांमध्ये होणाऱ्या नियमित लसीकरणापासून एकही माता व बालक वंचित राहू नये, या उद्देशाने या बैठकीत उपाययोजनांचा आढावा घेण्यात आला.

ज्या बालकांचे लसीकरण अपूर्ण आहे, त्यांच्यासाठी विशेष प्रयत्न करून ते वेळेत पूर्ण करावे, असे निर्देश जागतिक आरोग्य संघटनेचे वैद्यकीय अधिकारी डॉ. मोहम्मद साजीद यांनी झोनल वैद्यकीय अधिकाऱ्यांना दिले.



या बैठकीला अतिरिक्त वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. नरेंद्र बहिरवार, माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. सरला लाड, जागतिक आरोग्य संघटनेचे डॉ. मोहम्मद साजीद खान, साथरोग अधिकारी डॉ. गोवर्धन नवखरे, झोनल वैद्यकीय अधिकारी डॉ. शीतल वंदिले, डॉ. सुलभा शेंडे, डॉ. जयश्री चन्ने, डॉ. ख्वाजा मोईनुद्दीन, डॉ. सुनील कांबळे, डॉ. विजयकुमार तिवारी, डॉ. दीपांकर भिवगडे, डॉ. गजानन पवाने, डॉ. अतीक खान, एन.यु.एच.एम.च्या शहर कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. अश्विनी निकम, पी.एच.एन. अर्चना खाडे व इतर कर्मचारी उपस्थित होते. बैठकीत लसीकरण सेवा अधिक प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. लसीकरणाचे उद्दिष्ट पूर्ण करणे, क्षेत्रीय पातळीवरील अडचणी दूर करणे आणि विविध विभागांमधील समन्वय अधिक बळकट करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. डॉ. साजीद म्हणाले की, शहर साथरोग निर्मूलनाच्या उंबरठ्यावर असून सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे हे आजार समूळ नष्ट होतील. बैठकीच्या सुरुवातीला डॉ. सरला लाड यांनी महत्त्वाच्या मुद्द्यांची माहिती दिली. त्यानंतर डॉ. साजीद यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे प्रत्येक झोनमधील लसीकरणाची सद्यस्थिती मांडली. नवजात बालकांपासून ते गरोदर मातांपर्यंत सर्वांनाच आवश्यक लसी वेळेवर मिळाव्यात, यासाठी झोनस्तरावर सूक्ष्म नियोजन करण्याचे आदेश देण्यात आले. शहरातील १०० टक्के लसीकरणाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी आरोग्य विभागाने अधिक संवेदनशीलपणे काम करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान १३ फेब्रुवारीपर्यंत

## आरोग्य साक्षरतेचे विविध उपक्रम

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. ३१ :** स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान १३ फेब्रुवारीपर्यंत राबविण्यात येणार आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर कुष्ठरोग निवारण दिन साजरा करण्याबाबत केंद्र शासनाने निर्देश जारी केले आहेत. या अनुषंगाने स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान जिल्ह्यात राबविण्यात येणार आहे. या पंधरवड्यात विविध आरोग्य साक्षरतेचे विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

जनजागृती अभियानांतर्गत पंधरवड्यात शाळेमध्ये प्रार्थनेनंतर कुष्ठरोग प्रतिज्ञाचे वाचन, नाटक, प्रश्नमंजुषा स्पर्धा, निबंध स्पर्धा, कुष्ठरोगावरील गाणी, कविता वाचन, रांगोळी स्पर्धा, पथनाट्य, कुष्ठरोगावरील म्हणी, घोषवाक्य आदी स्पर्धांचे कार्यक्रम राबविण्यात येणार आहे शालेय विद्यार्थ्यांची प्रभात फेरी तसेच कुष्ठरोग दोड मॅरेथॉनचे आयोजन करण्यात येणार आहे. यासोबतच या अनुषंगाने अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती सहायक संचालक आरोग्य सेवा (कुष्ठरोग) डॉ. विजय डोईफोडे यांनी दिली. कुष्ठरोगाचे समूळ उच्चाटन करण्याकरीता कुष्ठरोग अधिसुचित आजार घोषीत झाला असुन कुष्ठरोग बाधीत व्यक्तींना शोधून काढून उपचाराखाली आणण्यासाठी आता खाजगी दवाखाने व वैद्यकीय महाविद्यालय यांचा सामावेश राहाणार आहे. तसेच सामाजिक बांधिलकी असलेल्या सर्व व्यक्तीने पुढाकार घेऊन सहकार्य करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी केले आहे.

**नॉर्थइस्ट कनेक्ट ...** संवाद, सहभाग आणि परस्पर विश्वास वाढवण्यावर भर

# पोलिसांनी ईशान्य भारतीय विद्यार्थ्यांशी साधला संवाद

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. ३१ : नागपूर शहरात शिक्षण आणि रोजगारासाठी राहणाऱ्या ईशान्य भारतीय राज्यांतील तरुण आणि विद्यार्थ्यांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यासाठी आणि त्यांना शहराच्या मुख्य प्रवाहात सामील करून घेण्यासाठी नागपूर शहर पोलीस आयुक्तालयामार्फत 'नॉर्थइस्ट कनेक्ट' या विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. संवाद, सहभाग आणि परस्पर विश्वास वाढवणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.**



ईशान्य भारतातील विद्यार्थ्यांना अमली पदार्थविरोधी जनजागृतीसाठी आयोजित 'टायगर रन रन फ्रॉम ड्रग्ज, रन फॉर लाईफ' या मॅरेथॉनमध्ये विशेष निमंत्रित करण्यात आले होते. व्यसनमुक्त जीवनशैली आणि सुदृढ आरोग्याचा संदेश देण्यासाठी आयोजित या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवला. पोलिसांनी राबवलेल्या या जनजागृती मोहिमेचे विद्यार्थ्यांनी भरभरून कौतुक केले. २६ जानेवारी रोजी, प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित शासकीय कार्यक्रमात या विद्यार्थ्यांना आमंत्रित करण्यात आले होते. पोलिस आयुक्त डॉ. रविंद्रकुमार सिंगल यांनी सह-पोलिस आयुक्त, अप्पर पोलिस आयुक्त आणि उपायुक्तांसह विद्यार्थ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधला. नागपुरातील त्यांच्या अनुभवांची विचारपूस करून नागपूर पोलिस सदैव त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याची ग्वाही आयुक्तांनी दिली. यावेळी विद्यार्थ्यांना नागपूर पोलिसांच्या विविध सुरक्षा यंत्रणांची माहिती देण्यात आली. डायल-११२ आपत्कालीन सेवा, शहरातील सीसीटीव्ही पाळत यंत्रणा, पोलिस नियंत्रण कक्षाचे कामकाज या माहितीमुळे अडचणीच्या काळात मदत कशी मिळवायची, याबाबत विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला. सांस्कृतिक वारसा आणि राष्ट्रनिर्मिती वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी ईशान्य भारताचा समृद्ध सांस्कृतिक वारसा, निसर्गसंपदा आणि देशाच्या विकासातील त्यांच्या योगदानाचा गौरव केला. विद्यार्थ्यांनी शिक्षण आणि सामाजिक कायार्तून राष्ट्र उभारणीत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहनही करण्यात आले. महाराष्ट्र पोलिस महासंचालकांच्या मार्गदर्शनाखाली राज्यभर हा उपक्रम राबवला जात आहे. नागपूर पोलिसांनी अशा प्रकारचे उपक्रम भविष्यातही सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे, ज्यामुळे सर्व समुदायांमध्ये सलोखा आणि परस्पर विश्वास कायम राहील.

# महाराष्ट्र कामगार कल्याण केंद्रात ध्वजारोहण



**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**कोराडी , दि. ३१ :** प्रजासत्ताक दिनानिमित्त महाराष्ट्र कामगार कल्याण केंद्र कोराडी येथे ध्वजारोहण कार्यक्रम साजरा करण्यात आला. सामाजिक कार्यकर्ते दिलीप येवले यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. प्रमुख पाहुणे माजी थर्मल पॉवर स्टेशन कोराडीचे आस्थापना अधिकारी सुभाष चिमुरकर उपस्थित होते.

ध्वजारोहणानंतर ध्वज सलामी, राष्ट्रगीत व संविधान प्रस्ताविकाचे वाचन करण्यात आले. अध्यक्षांनी आपल्या भाषणामध्ये उपस्थित सर्वांना प्रजासत्ताक दिवसाचा शुभेच्छा दिल्या. शिशु मंदिरातील बालकांना मान्यवरांच्या हस्ते गोड खाऊ वाटप करण्यात आला. प्रस्ताविक केंद्र संचालक सचिन वंजारी यांनी केले. महिला कल्याण सहायिका शालू टेकाडे यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता उर्मिला सातपुते, युवराज मते यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाकरिता केंद्र सभासद व परिसरातील नागरिक उपस्थित होते.

महत्त्वाचे

## अमेरिकेच्या संघात 'मुंबईकर' खेळाडूची एन्ट्री!

**नवी दिल्ली:** टी-२० वर्ल्ड कप २०२६ चा थरार सुरू व्हायला आता अवघे ८ दिवस उरले आहेत. भारत आणि श्रीलंकेत संयुक्तपणे आयोजित होणाऱ्या या क्रिकेटच्या महाकुंभासाठी युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका ने आपला १५ सदस्यीय संघ जाहीर केला आहे. या संघात मुंबईकडून घरगुती क्रिकेट खेळलेल्या शुभम रांजणेला संधी देऊन अमेरिकेने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे.यंदाच्या वर्ल्ड कपमध्ये अमेरिका संघ 'ग्रुप-ए' मध्ये आहे. या गटात अमेरिकेसमोर भारत, पाकिस्तान, नामिबिया आणि नेदरलँड्स या संघांचे तगडे आव्हान असणार आहे. श्रीलंकेतील परिस्थितीशी जुळवून घेण्यासाठी अमेरिकेने तिथे एक विशेष ट्रेनिंग कॅम्पही लावला आहे.अनुभवी मोनांक पटेलकडे संघाचे नेतृत्व सोपवण्यात आले आहे. विशेष म्हणजे, २०२४ च्या वर्ल्ड कपमध्ये खेळलेले १० खेळाडू या संघात कायम आहेत. मात्र, आयसीसीच्या बंदीमुळे स्टार खेळाडू आरोन जोन्सला संघात स्थान मिळालेले नाही.

## पाकिस्तानने घरच्या मैदानावर घालवली इज्जत

मुंबई: पाकिस्तान विरुद्ध ऑस्ट्रेलिया यांच्यामध्ये तीन सामन्यांची टी मालिका खेळवली जात आहे. या मालिकेच्या पहिल्या सामन्यामध्ये ऑस्ट्रेलियाच्या संघाला पराभवाचा सामना करावा लागला तर आज या मालिकेचा दुसरा सामना खेळवला जाणार आहे. या मालिकेमध्ये ऑस्ट्रेलियाच्या संघाने त्याचे मुख्य खेळाडू खेळवले नाहीत हे देखील एक पराभवाचे कारण होते. पाकिस्तानच्या संघाने बॅट आणि बॉल दोन्हीमध्ये चांगली कामगिरी केली आणि त्यांच्या संघाला विजय मिळवून दिला. तथापि, पाकिस्तानी चाहते अजूनही नाखूष आहेत. त्यांना वाटते की त्यांच्या घरच्या मैदानावर त्यांचा अपमान झाला आहे. २०२६ च्या २० विश्वचषकापूर्वी, त्यांना घरच्या मैदानावर अपमानित करण्यात आले आहे. जेव्हा ऑस्ट्रेलियन संघाने पाकिस्तानविरुद्धच्या मालिकेसाठी आपला संघ जाहीर केला तेव्हा त्यांनी विश्वचषकासाठी पात्र ठरलेल्या पाच खेळाडूंना वगळले.

# एलिस मेर्टेन्स-झांग शुआई यांचा डबल धमाका!

## डॅनिलिना-क्रुनिक यांना धूळ चारून जिंकले महिला दुहेरीचे विजेतेपद

**मेलबर्न : दि.३१ वृत्तसंस्था**



एलिस मेर्टेन्स आणि झांग शुआई यांनी ऑस्ट्रेलियन ओपन २०२६ टेनिस स्पर्धेमध्ये उत्कृष्ट कामगिरी बजावत महिला दुहेरीचे विजेतेपदावर नाव कोरले आहे. अनुभवी बेल्जियम आणि चिनी जोडीने अंतिम फेरीत अण्णा डॅनिलिना आणि अलेक्झांड्रा क्रुनिक यांचा ७-६(४), ६-४ असा दणदणीत पराभव करून जेतेपद जिंकले.अंतिम फेरीबद्दल सांगायचे झाले तर, चौथ्या मानांकित मर्टेन्स-झांग जोडीने पहिल्या सेटमध्ये ४-१ च्या पराभवानंतर लक्षणीय पुनरागमन करत टायब्रेकमध्ये सेट आपल्या नावे केला. दुसऱ्या सेटमध्ये त्यांनी ५-० अशी आघाडी मिळवली. तथापि, सातव्या मानांकित डॅनिलिना-क्रुनिक जोडीने पुनरागमन करण्याचा प्रयत्न करून ५-२ अशा फरकाने दोन चॅम्पियनशिप पॉइंट वाचवण्यात यश मिळवले. परंतु शेवटी, मर्टेन्स आणि झांगने सामना आपल्या नावे केला.मर्टेन्स आणि झांग यांनी २०२२ मध्ये विम्बल्डनमध्ये शेवटचा ग्रँड स्लॅम एकत्र खेळला होता. दीर्घ काळानंतर ऑस्ट्रेलियन ओपनमध्ये पुन्हा एकत्र आल्याने, या जोडीने उत्कृष्ट समन्वय दाखवत इतिहास रचला आणि जेतेपद जिंकले.या विजयासह, मर्टेन्सच्या ग्रँड स्लॅम दुहेरी जेतेपदांची संख्या आता सहा झाली आहे, त्यापैकी तीन ऑस्ट्रेलियामध्ये जिंकल्या गेल्या. झांग शुआईकडे आता तीन ग्रँड स्लॅम दुहेरी ट्रॉफी जमा आहेत. यापूर्वी, झांगने २०१९ ऑस्ट्रेलियन ओपन आणि २०२१ यूएस ओपनमध्ये समंथा स्टोसूरसह महिला दुहेरीचे जेतेपद आपल्या नावे केले होते. मर्टेन्सने गेल्या सलग तीन वर्षांत प्रत्येकी एक डबल्स ग्रँड स्लॅम जेतेपद आपल्या नावे केले आहे.होमटाउन वाइल्डकार्ड्स जेसन कुबलर आणि मार्क पोलमन्स पुरुष दुहेरीत अंतिम फेरीत पोहोचण्यासाठी सज्ज झाले आहेत. दरम्यान, मिश्र दुहेरीत, ऑस्ट्रेलियन जोडी ऑलिव्हिया गाडेकी आणि जॉन पीअर्स यांनी सलग दुसरे जेतेपद जिंकून इतिहास रचला आहे.
गाडेकी आणि पीअर्स यांनी ऑस्ट्रेलियन ओपन ग्रँड स्लॅम मिश्र दुहेरीचे जेतेपद राखणारी ३७ वर्षांत पहिली जोडी ठरली आहे. १९८८-८९ मध्ये जाना नोवोत्ना आणि जिम पग यांच्यानंतर गाडेकी आणि पीअर्स यांनी ही किमया साधली आहे.

## ऑस्ट्रेलियाच्या संघात दोन मोठे बदल; नवा संघ जाहीर



**मेलबर्न : दि.३१ वृत्तसंस्था**

येत्या ७ फेब्रुवारीपासून भारत आणि श्रीलंका यांच्या संयुक्त यजमानपदाखाली खेळवल्या जाणाऱ्या टी-२० विश्वचषक २०२६ साठी ऑस्ट्रेलियाने आपला अंतिम १५ सदस्यीय संघ जाहीर केला आहे. मात्र, स्पर्धेपूर्वीच कांगारूंना मोठा धक्का बसला असून, स्टार वेगवान गोलंदाज पॅट कमिन्स दुखापतीमुळे स्पर्धेतून बाहेर झाला आहे. दुसरीकडे, अनुभवी फलंदाज स्टीव्ह स्मिथला पुन्हा एकदा डावलण्यात आले आहे.ऑस्ट्रेलियन निवड समितीने जाहीर केलेल्या अंतिम संघात एकूण दोन महत्त्वाचे बदल केले आहेत. पाठीच्या दुखापतीमुळे त्रस्त असलेल्या पॅट कमिन्सच्या जागी डावखुरा वेगवान गोलंदाज बेन ड्वार्शियस याचा समावेश करण्यात आला आहे. तसेच, सलामीवीर फलंदाज मॅथ्यू शॉर्टला डच्चू देऊन त्याच्या जागी मॅथ्यू रेनशॉला संघात स्थान दिले आहे. बिग बॅशमध्ये चमकदार कामगिरी करूनही स्टीव्ह स्मिथला विश्वचषकाचे तिकीट मिळालेले नाही.ऑस्ट्रेलियासाठी दिलासादायक बाब म्हणजे जोश हेझलवूड, टिम डेव्हिड आणि नॅथन एलिस या तिघांनाही तंदुरुस्त घोषित करण्यात आले आहे. हेझलवूड हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीमुळे ॲशेस मालिकेपासून मैदानाबाहेर होता, तर टिम डेव्हिड आणि नॅथन एलिस यांनीही दुखापतीमुळे अलीकडच्या अनेक मालिका गमावल्या होत्या.

## गुजरातची मुंबईवर ११ धावांनी मात; प्लेऑफमध्ये धडक

**नवी दिल्ली: दि.३१ वृत्तसंस्था**



गुजरात जायंट्सने अखेर अनेक वर्षांची प्रतिक्षा संपवली आहे. गुजरातने वूमन्स प्रीमियर लीग स्पर्धेच्या चौथ्या मोसमातील ( २०२६) १९ व्या सामन्यात आज ३० जानेवारीला गतविजेत्या मुंबई इंडियन्सवर मात केली. गुजरातचा हा या स्पर्धेच्या इतिहासातील मुंबई इंडियन्स विरुद्धचा पहिलावहिला विजय ठरला आहे. गुजरातने मुंबई इंडियन्स विरुद्ध सलग आणि एकूण ८ पराभवानंतर पहिलावहिला विजय साकारला आहे. गुजरातने बडोद्यातील कोतांबीमधील बीसीए स्टेडियममध्ये मुंबईवर ११ धावांनी मात केली. गुजरातने या विजयासह प्लेऑफमध्ये धडक दिली आहे. तसेच गुजरातने मुंबई विरुद्ध या विजयासह गेल्या पराभवाचीही परतफेड केली.गुजरातने या सामन्यात टॉस जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला. मुंबईच्या गोलंदाजांसमोर गुजरातला फार मोठी धावसंख्या उभारता आली नाही. मात्र त्यानंतरही गुजरातने २० ओव्हरमध्ये ४ विकेट्स गमावून १६७ धावांपर्यंत मजल मारली. या विजयी धावांचा पाठलाग करताना कर्णधार हरमनप्रीत कौर हीने अर्धशतक झळकावलं. मात्र हरमनप्रीतला दुसऱ्या बाजूने अपेक्षित साथ मिळाली नाही. त्यामुळे भारताला अवघ्या काही धावांनी सामना गमवावा लागला. प्लेऑफच्या हिशोबाने दोन्ही संघांसाठी हा सामना करो या मरो असा होता. त्यामुळे दोन्ही संघांत चुरस पाहायला मिळणार, हे निश्चित होतं. मुंबई या सामन्यात विजयापासून अवघ्या ११ धावांनी दूर राहिली. गुजरातसमोर मुंबईला २० ओव्हरमध्ये ७ विकेट्स गमावून १५६ धावाच करता आल्या.कॅप्टन हरमनप्रीत कौर हीने मुंबईसाठी सर्वाधिक आणि नाबाद ८२ धावांची खेळी केली. हरमनप्रीतने ४८ चेंडूंच्या या खेळीत ८ चौकार आणि ४ षटकार लगावले.

## सॅम करणची कमाल!

### हॅटट्रिक घेऊन केला कहर

**नवी दिल्ली: दि.३१ वृत्तसंस्था**



सॅम करनच्या हॅटट्रिकच्या जोरावर, इंग्लंडने श्रीलंकेविरुद्ध पावसामुळे व्यत्यय आलेल्या पहिल्या टी सामन्यात ११ धावांनी (डीएलएस) विजय मिळवला. पल्लेकेले आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात, श्रीलंकेला प्रथम फलंदाजी करताना पूर्ण षटकेही खेळता आली नाहीत आणि त्यांना १३३ धावांवर सर्वबाद व्हावे लागले. पावसामुळे सामना प्रत्येकी १७ षटकांचा करण्यात आला. इंग्लंडने १५ षटकांत ४ गडी गमावून १२५ धावा केल्या होत्या, परंतु पुन्हा पाऊस पडला आणि सामना होऊ शकला नाही. डीएलएस समतुल्य स्कोअरमध्ये इंग्लंड पुढे असल्याने त्यांना विजयी घोषित करण्यात आले. तीन सामन्यांच्या मालिकेत इंग्लंडने १-० अशी आघाडी घेतली आहे.इंग्लंडचा अष्टपैलू खेळाडू सॅम करनने १६ व्या षटकातील शेवटच्या तीन चेंडूत तीन विकेट घेत हॅटट्रिक पूर्ण केली. टी मध्ये इंग्लंडसाठी हॅटट्रिक घेणारा तो क्रिस जॉर्डननंतरचा दुसरा गोलंदाज ठरला. त्याने षटकातील चौथ्या चेंडूवर कर्णधार दासुन शनाकाला बाद केले. त्यानंतर त्याने महेश थीकशन आणि मथिशा पाथिराना यांना गोल्डन डकमध्ये बाद करून आपली हॅटट्रिक पूर्ण केली. तथापि, करन या सामन्यात खूपच महागडा ठरला.

## पॉल स्टर्लिंगचा हिटमॅनला धोबी पछाड!

**नवी दिल्ली: दि.३१ वृत्तसंस्था**



रोहित शर्माने त्याच्या कारकिर्दीत अनेक विक्रमांना गवसणी घातली आहे. रोहितने टी-२० क्रिकेटमधून निवृत्ती घेतली असली तरी त्याच्या नावे अनेक विक्रम आहेत. रोहित शर्माच्या नावे टी-२० मध्ये सर्वाधिक षटकार, सर्वाधिक शतकं तर कर्णधार म्हणून सर्वोत्कृष्ट रेकॉर्ड आहे. पण आता रोहित शर्माचा एक मोठा वर्ल्ड रेकॉर्ड आयर्लंडच्या ३५ वर्षीय खेळाडूने हा विश्वविक्रम मोडला आहे. हा ३५ वर्षीय खेळाडू आयर्लंडचा कर्णधार आहे. आयर्लंडचा कर्णधार आणि सलामीवीर फलंदाज पॉल स्टर्लिंगने रोहितचा विक्रम मागे टाकला आहे.युएईविरुद्धच्या पहिल्या टी सामन्यात खेळताच त्याने हा ऐतिहासिक पराक्रम केला. रोहित शर्माने त्याच्या नेतृत्वाखाली टी-२० विश्वचषक २०२४ जिंकून दिल्यानंतर टी-२० क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली. विश्वचषक जिंकल्यानंतर पत्रकार परिषदेत रोहित शर्माने ही घोषणा केली होती.

## आजपासून सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री?

**नवी दिल्ली:** देशाच्या अर्थमंत्री निर्मला सितारामन १ फेब्रुवारी रोजी संसदेत सन २०२६-२७ चा अर्थसंकल्प (२०२६) सादर करणार आहेत. अर्थसंकल्पाची उलटगणती सुरू झाली असतानाच, महागाईच्या कचाट्यात सापडलेल्या आम आदमीची चिंता वाढवणारी माहिती समोर येत आहे. उद्या सकाळी अर्थसंकल्पीय भाषणापूर्वीच सर्वसामान्यांना 'डबल झटका' बसण्याची दाट शक्यता वर्तवण्यात येत आहे.
सूत्रांच्या आणि बाजार तज्ज्ञांच्या मते, सरकार यावेळेस 'सिन गुड्स' म्हणजेच सिगरेट आणि तंबाखूजन्य पदार्थांवरील करात मोठी वाढ करू शकते. सार्वजनिक आरोग्याला प्राधान्य देण्यासाठी आणि महसूल वाढवण्यासाठी सिगरेटवर ५ ते १० टक्क्यांपर्यंत उत्पादन शुल्क किंवा सेस लावला जाऊ शकतो. यामुळे सिगरेट कंपन्यांच्या किमती वाढणार असून धूम्रपान करणाऱ्यांच्या खिशाला मोठा फटका बसणार आहे. आरोग्य तज्ज्ञांनी या निर्णयाचे स्वागत केले असले तरी, यामुळे छुप्या पद्धतीने होणारी विक्री वाढण्याची भीती दुकानदारांनी व्यक्त केली आहे. दर महिन्याच्या १ तारखेला तेल कंपन्या एलपीजी गॅसच्या दरांचे पुनरावलोकन करतात. उद्या १ फब्रुवारी असल्याने व्यावसायिक आणि घरगुती गॅस सिलिंडरच्या किमतीत बदल होण्याची शक्यता आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील ऊर्जेच्या किमतीत होणारे चढ-उतार पाहता, गॅस महाग झाल्यास गृहिणींचे बजेट कोलमडणार आहे.महागाईसोबतच मध्यमवर्गीय गुंतवणूकदारांचे लक्ष प्राप्तिकर नियमांकडे लागले आहे.

# डॉलरची मक्तेदारी संपविण्यासाठी ११ देशांची मोठी तटबंदी

## ट्रम्प यांच्या धमकीला मोदींचे 'डिजिटल' उत्तर

**नवी दिल्ली: दि.३१ वृत्तसंस्था**







जागतिक अर्थव्यवस्थेत अनेक दशकांपासून असलेल्या अमेरिकन डॉलरच्या वर्चस्वाला आता भारताच्या नेतृत्वाखाली एक मोठे आव्हान दिले जाणार आहे. या वर्षाच्या अखेरीस भारतात होणाऱ्या 'ब्रिक्स २०२६' ( २०२६) शिखर परिषदेत भारत एक अशा क्रांतिकारी पेमेंट प्रणालीचा पाया रचणार आहे, जी थेट अमेरिकेच्या '' सिस्टीमला पर्याय ठरू शकते. भारतीय रिझर्व्ह बँकेने ब्रिक्स देशांच्या मध्यवर्ती बँकांच्या डिजिटल चलनांना एकमेकांशी जोडण्याचा प्रस्ताव मांडला असून, यामुळे जागतिक व्यापाराचा चेहरामोहरा बदलणार आहे.अनेकदा असा गैरसमज पसरवला जातो की, ब्रिक्स देश स्वतःचे एक नवीन चलन आणणार आहेत. मात्र, भारताने हा भ्रम दूर केला आहे. भारताची योजना नवीन चलन आणण्याची नाही, तर अस्तित्वात असलेल्या चलनांना डिजिटल स्वरूपात (उदा. भारताचा ई-रुपया, रशियाचा डिजिटल रुबल, चीनचा ई-युआन) एकाच 'इंटरऑपरेबल' प्लॅटफॉर्मवर आणण्याची आहे. यामुळे एखादा भारतीय व्यापारी ब्राझील किंवा रशियाला माल विकताना थेट डिजिटल रुपयात व्यवहार करू शकेल, ज्यामध्ये डॉलरचा मध्यस्थ म्हणून कोणताही वापर होणार नाही.अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अलिकडेच ब्रिक्स देशांना इशारा दिला होता की, जर त्यांनी डॉलरला पर्याय शोधला तर त्यांच्यावर १००% आयात शुल्क लादले जाईल. मात्र, भारताने अत्यंत मुत्सद्दीपणे आपली भूमिका स्पष्ट केली आहे. भारत 'डी-डॉलरायझेशन' (-) म्हणजेच डॉलर नष्ट करण्याच्या विरोधात नाही, तर डॉलरच्या 'शस्त्रीकरणा'च्या विरोधात आहे. रशियाची ३०० अब्ज डॉलरची मालमत्ता गोठवण्यासारख्या अमेरिकेच्या पावलांमुळे, भारताला स्वतःची स्वतंत्र समांतर व्यवस्था निर्माण करणे गरजेचे वाटत आहे.भारताने आधीच आपल्या '' प्रणालीचा जगभरात डंका वाजवला आहे. आता याच अनुभवाचा वापर ब्रिक्समध्ये केला जाईल. भारताने संयुक्त अरब अमिराती सोबत अशा प्रकारचा करार यशस्वीपणे केला आहे. भारताचे ध्येय हे आहे की, ब्रिक्स पेमेंट सिस्टीम ही चीन-केंद्रित किंवा रशिया-केंद्रित न राहता 'तटस्थ' असावी. यामुळे केवळ व्यवहार खर्च कमी होणार नाही, तर पाश्चात्य देशांनी लादलेल्या आर्थिक निर्बंधांचा धोकाही कायमचा दूर होईल.ब्रिक्स समूहात आता ब्राझील, रशिया, भारत, चीन, दक्षिण आफ्रिका यांच्यासह इजिप्त, इथिओपिया, इराण, सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती आणि इंडोनेशिया या देशांचा समावेश झाला आहे. हे ११ देश मिळून जागतिक जीडीपीमध्ये ३३% पेक्षा जास्त वाटा उचलतात.

## आरोग्य विमा स्वस्त होणार? अर्थसंकल्पात मोठ्या कर सवलतीची शक्यता

**नवी दिल्ली: दि.३१ वृत्तसंस्था**



देशातील वाढता वैद्यकीय खर्च आणि आरोग्य विम्याचा प्रीमियम (हप्ता) यामुळे त्रस्त असलेल्या मध्यमवर्गीय आणि ज्येष्ठ नागरिकांना आगामी अर्थसंकल्प २०२६-२७ मध्ये मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे.
विमा उद्योगाने केंद्र सरकारकडे आरोग्य विमा, ओपीडी खर्च आणि सेवानिवृत्तीनंतरच्या उत्पन्नावर विशेष कर सवलत देण्याची आग्रही मागणी केली आहे. १ फेब्रुवारीला अर्थमंत्री निर्मला सितारामन केंद्रीय अर्थसंकल्प सादर करणार आहेत.विमा क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मते, भारतात रुग्णालयात दाखल होण्यापेक्षा बाह्यरुग्ण विभाग , औषधे आणि डायग्नोस्टिक चाचण्यांवर कुटुंबांचा सर्वाधिक खर्च होतो. एकूण वैद्यकीय खर्चाच्या जवळपास ६० टक्के हिस्सा हा ओपीडीवर खर्च होतो, परंतु सध्या त्यावर कोणतीही थेट कर सवलत मिळत नाही. जर सरकारने ओपीडी आणि प्रतिबंधात्मक उपचारांसाठी वेगळी कर सवलत दिली, तर वर्षाला ४५ हजार रुपये खर्च करणाऱ्या कुटुंबाची ६ ते ९ हजार रुपयांपर्यंत बचत होऊ शकते.सध्या प्राप्तिकर कायद्याच्या कलम ८० अंतर्गत आरोग्य विम्याच्या प्रीमियमवर २५ हजार रुपयांपर्यंत कर सवलत मिळते. विमा उद्योगाने ही मर्यादा वाढवून ५० हजार रुपये करण्याची मागणी केली आहे. जर ही मागणी मान्य झाली, तर ३० टक्के टॅक्स स्लॅबमध्ये येणाऱ्या नागरिकांची कर बचत दुप्पट होईल. कारण सध्या वैद्यकीय महागाईचा दर ११.५ ते १४ टक्क्यांच्या दरम्यान असून, यामुळे सर्वसामान्यांचे बजेट कोलमडले आहे.निवृत्तीनंतर मिळणाऱ्या 'एन्युटी इन्कम'वर सध्या पूर्णपणे कर आकारला जातो.

## चांदी एका दिवसात १ लाखाने उतरली!

**नवी दिल्ली: दि.३१ वृत्तसंस्था**



गेल्या अनेक दिवसांपासून सोने अन् चांदी यांच्या किंमतीचा आलेख हा अत्यंत चढा होता. चांदी तर चार लाखाला टेकली होती. सोने देखील २ लाखाच्या जावळ जाते का अशी चर्चा सुरू असतानाच एका दिवसातच चांदीच्या दरात तब्बल १ लाख रूपयांची घसरण झाली आहे. तर सोने दरात देखील मोठी घसरण झाली आहे. प्रती १० तोळे सोन्याच्या दरात एका झटक्यात ३३ हजार रूपयांची घसरण झाली आहे.ही घसरण फक्त वायदे बाजारात नसून स्थानिक बाजारात देखील सोन्या चांदीच्या दरात मोठी घसरण झाली आहे. जाणकारांच्या मते रेकॉर्ड ब्रेक किंमतीला पोहचलेली सोन्या चांदीचे दरात मोठी घसरण होण्याची शक्यता होती. या शक्यतेनुसारच ही घसरण झाली आहे.जाणकारांच्या मते चांदीच्या दराचा हा फुगा फुटणार होता. त्यांचे मत खरे ठरले. फक्त एका दिवसात चांदी १ लाखानं स्वस्त झाली आहे. मल्टी कमोडिटी एक्सचेंजवर गुरूवारी चांदीच्या दरात तुफानी वाढ झाली होती. त्यानंतर चांदीचा दर ३ लाख ९९ हजार ८९३ रूपयांपर्यंत पोहचली होती.
शुक्रवारी वायदा बाजार बंद झाल्यावर ५ मार्चची एक्सपायरी असलेल्या चांदीचा दर क्रॅश झाला. वेगाने हा दर खाली येत प्रती किलो २ लाख ९१ हजार ९२२ रूपयांपर्यंत पोहचला. म्हणजे एका झटक्यात चांदीचे दर प्रती किलो १ लाख ०७ हजार ९७१ रूपयांनी कमी झाले.एक दिवस आधीच म्हणजे गुरूवारी चांदीच्या दराने सर्व ऐतिहासिक रेकॉर्ड मोडले होते. चांदी पहिल्यांदाच प्रती किलो ४ लाखाच्या पार पोहचली होती. हा दर ४ लाख २० हजार ४८ रूपयांपर्यंत वधारला होता. मात्र या उच्च किंमतीनंतर चांदीचे दर अचानक वेगाने खाली येऊ लागले. त्यामुळे गुंतवणूकदारांना मोठा झटका बसला. उच्च पातळीवरून चांदी जवळपास १ लाख २८ हजार १२६ रूपयांपर्यंत खाली आली. हे दर फक्त एक दिवसात खाली आले आहेत.फक्त चांदीच नाही तर सोन्याच्या किंमतीला मिळालेली झळाळी देखील झटक्यात कमी झाली. १० ग्रॅम २४ कॅरेट सोन्याचे दर फक्त एका दिवसात ३३ हजार ११३ रूपयांनी कमी झाले.



# संक्रांतीच्या वाणासोबतच मिळाला सन्मानाचा मान

## 'अजिंक्य मी'चा दिमाखदार सोहळा: हळदी-कुंकू सोहळ्याला अकोल्यातील शेकडो महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

अकोला, दि. ३१ : महिलांच्या सक्षमीकरणासाठी आणि त्यांच्या हक्कांच्या रक्षणार्थ सदैव कार्यरत असलेल्या 'अजिंक्य मी' व्यासपीठाच्या वतीने अकोल्यात मकर संक्रांतीचा उत्साह मोठ्या थाटात साजरा करण्यात आला. स्थानिक खंडेलवाल भवन येथे शनिवारी आयोजित या भव्य हळदी-कुंकू सोहळ्याने अकोलेकर महिलांना आनंदाची आणि मनोरंजनाची अनोखी मेजवानी दिली.

वर्षातील पहिला सण असलेल्या मकर संक्रांतीचे औचित्य साधत, ज्येष्ठ महिलांच्या मार्गदर्शनाखाली आणि 'अजिंक्य मी'च्या संयोजिका सौ. तनुजा सुगत वाघमारे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. व्यासपीठाच्या वतीने उपस्थित प्रत्येक महिलेला हळदी-कुंकू लावून सन्मानित करण्यात आले. संक्रांतीचे पारंपरिक वाण म्हणून आकर्षक भेटवस्तू देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. समाजातील सर्व स्तरांतील महिलांनी एकत्र यावे, त्यांनी पुढाकार घेऊन स्वत:ला व्यक्त करावे, याच उदात्त हेतूने सौ. तनुजाताई वाघमारे यांनी अजिंक्य मी हे व्यासपीठ उभे केले आहे.





### रिंग गेम (रिंग अंगातून पास करण्याची स्पर्धा)

दहा-दहा महिलांच्या गटात रंगलेल्या या स्पर्धेत अंगातून रिंग पास करण्याचे कसब महिलांनी दाखवले. ज्या गटाने सर्वात आधी पाच फेऱ्या (राऊंड्स) पूर्ण केल्या, त्यांना विजेता घोषित करण्यात आले. विजेत्या गटाला 'अजिंक्य मी' तर्फे आकर्षक भेटवस्तू देण्यात आल्या.



### संगीत खुर्ची (म्युझिकल चेअर)

या लोकप्रिय खेळात २० महिलांनी सहभाग घेतला. पहिल्या फेरीत नेहमीप्रमाणे स्पर्धा पार पडली, तर दुसऱ्या फेरीसाठी एक वेगळी आणि रंजक थीम देण्यात आली होती. यातील विजेत्या स्पर्धकाचा खास भेटवस्तू देऊन गौरव करण्यात आला.



### हवा-हवाई चिठ्ठी गेम

बॉलिवूडच्या गाण्यांवर आधारित या स्पर्धेने महिलांची चांगलीच करमणूक केली. 'बिजली गिराने मै हूँ आई, कहते है मुझको हवा-हवाई' या गाण्याच्या ओळी पूर्ण करण्यासाठी चिठ्ठ्यांचा वापर करण्यात आला. योग्य चिठ्ठी मिळवून गाणे पूर्ण करणाऱ्या ६ विजेत्या महिलांना आकर्षक गिफ्ट्स देण्यात आले.



### बलून गेम (फुगा वाचवा स्पर्धा)

सुमारे १०० पेक्षा जास्त महिलांनी दोन गटांत विभागून या स्पर्धेत भाग घेतला. स्वत:चा फुगा वाचवत दुसऱ्याचा फुगा फोडण्याची ही थीम महिलांना खूप आवडली. यातील १० यशस्वी महिलांना बक्षिसे देण्यात आली.



### चॉकलेट लूट

संक्रांतीला लहान मुलांसाठी होणारी लूट यावेळी महिलांसाठी आयोजित करण्यात आली होती. ''प्रत्येकात एक लहान मूल दडलेले असते'' हा विचार करून ठेवलेल्या या चॉकलेट लुटीला महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. चॉकलेट मिळवण्यासाठी झालेली महिलांची लगबग पाहून सोहळ्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.

### मकर संक्रांती विशेष वेशभूषा आणि उखाणे स्पर्धा

मकर संक्रांतीच्या पारंपरिक पेहरावात आलेल्या महिलांसाठी रॅम्प वॉकचे आयोजन करण्यात आले होते. यानंतर एका मिनिटात जास्तीत जास्त उखाणे घेणाऱ्या महिलांना विजेते घोषित करण्यात आले. विशेष म्हणजे, विवाहित महिलांसोबतच अविवाहित मुलींनीही यात मोठा सहभाग नोंदवला. एकूण ४ विवाहित आणि २ अविवाहित अशा ६ विजेत्यांना गौरवण्यात आले.



''अजिंक्य मी व्यासपीठाच्या माध्यमातून महिलांच्या सुप्त गुणांना वाव देण्याचा आमचा कायम प्रयत्न असतो. भविष्यातही महिलांच्या सक्षमीकरणासाठी आम्ही अशाच नवनवीन संकल्पना आणि उपक्रम राबवू.''

-सौ. तनुजा सुगत वाघमारे
(संयोजिका, अजिंक्य मी)











अजिंक्य भारत
# आपलं अकोला
अकोला, रविवार, दि. १ फेब्रुवारी २०२६ www.ajinkyabharat.com

## अकोला महानगरपालिकेत सोमवारी 'लोकशाही दिन'

**अकोला :** शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आणि मनपा आयुक्त डॉ. सुनील लहाने यांच्या आदेशान्वये, अकोला महानगरपालिकेत सोमवार, २ फेब्रुवारी २०२६ रोजी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. हा उपक्रम आयुक्त कार्यालयात दुपारी ४ ते ६ या वेळेत पार पडणार आहे. नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी आणि प्रशासकीय कामात पारदर्शकता आणण्यासाठी या दिनाचे विशेष महत्त्व आहे. या दिवशी आयुक्त डॉ. सुनील लहाने स्वतः उपस्थित राहून नागरिकांच्या समस्या जाणून घेणार आहेत. संबंधित विभागातील प्रलंबित प्रश्न निकाली काढण्यासाठी या व्यासपीठाचा उपयोग करण्याचे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे. मनपा क्षेत्रातील नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा.

### महत्त्वाचे

## सोमवारी महानिर्यात परिषद

**अकोला:** राज्याच्या आर्थिक विकासात लघु, सूक्ष्म उद्योग क्षेत्राचे योगदान वाढवण्यासाठी आणि निर्यातक्षम उद्योगांना चालना देण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्रातर्फे अकोल्यात महानिर्यात परिषद २०२६ जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या अध्यक्षतेत सोमवार, दि. २ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता हॉटेल आर.जी. एक्सक्लुझिव्ह येथे होणार आहे.या कार्यक्रमात व्यवसाय सुलभीकरणासाठी मैत्री विभाग , निर्यातीसाठी, भांडवलासाठी व इतर बाबींसाठी आयडीबीआय, सिडबी यासारख्या संस्थांचे तज्ज्ञ मार्गदर्शन करतील.विशेष उपस्थिती: कृषी व खाद्य उत्पादने निर्यातीसाठी अपेडा आणि उत्पादनांच्या विम्यासाठी एनआयए अशा विविध संस्थांचे प्रतिनिधी आणि यशस्वी उद्योजक यावेळी उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. विकास आयुक्त (उद्योग) यांच्या मार्गदर्शनात परिषद आयोजित करण्यात आली आहे. अकोला जिल्ह्यातील सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम घटक, निर्यातदार, नवउद्योजक, औद्योगिक संस्था, शेतकरी सहकारी संस्था आणि बँकांचे प्रतिनिधी यांनी या कार्यशाळेला उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक संतोष बनसोड यांनी केले आहे.

### १६ सदस्यांच्या समितीत भाजपचे राहणार वर्चस्व

# महापालिकेत आता स्थायीसाठी मोर्चेबांधणी

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ३१ : शहराचे प्रथम नागरिक आणि उपमहापौरांची निवड प्रक्रिया पार पडल्यानंतर आता सर्वांचे लक्ष महापालिकेची आर्थिक नाडी समजल्या जाणाऱ्या स्थायी समितीच्या निवडणुकीकडे लागले आहे. १६ सदस्यीय संख्याबळ असलेल्या या समितीत कोणत्या गटाला किती जागा मिळणार आणि सभापतीपद कोणाच्या पारड्यात पडणार, यासाठी राजकीय वर्तुळात जोरदार फिल्डिंग सुरू झाली आहे. महापालिकेतील पक्षीय बलाबल पाहता, भाजपचे सर्वाधिक ३८ नगरसेवक असून त्याखालोखाल काँग्रेस २१, उद्धव ठाकरे गट ६, वंचित बहुजन आघाडी ५, राष्ट्रवादी (शरद पवार) ३, एमआयएम ३, तर राष्ट्रवादी (अजित पवार) आणि शिवसेना शिंदे गटाचा प्रत्येकी एक नगरसेवक निवडून आला आहे.**



### सभापती निवडीसाठी जादूई आकडा

१६ सदस्यांच्या समितीत सभापती होण्यासाठी ०९ सदस्यांच्या पाठिंब्याची गरज असते. सध्याच्या स्थितीत शहर सुधार आघाडीकडे हे बहुमत असल्याचे दिसते. भाजपकडे स्वतःचे ८ सदस्य आहेत. यात शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी (अजित पवार गट) यांचा पाठिंबा मिळाल्यास हा आकडा ९ वर जातो. जर भाजपने एमआयएम (३ नगरसेवक) ला आपल्या गटात ओढले, तर तांत्रिकदृष्ट्या त्यांचे पारडे १० सदस्यांसह जड होईल.

पाच सदस्यांमागे स्थायी समितीचा एक सदस्य या रचनेनुसार, समितीत भाजपचे ८, काँग्रेसचे ४, ठाकरे गटाचा १ आणि वंचितचा १ असे प्रतिनिधित्व निश्चित मानले जात आहे. मात्र, महापौर निवडणुकीत झालेल्या युती आणि आघाड्यांच्या गणितानुसार चित्र काहीसे वेगळे दिसणार आहे.

भाजप प्रणित शहर सुधार आघाडीकडे सध्या ९ तर महाविकास आघाडीकडे ६ सदस्यांचे बळ असेल असे दिसते. आपली पकड अधिक मजबूत करण्यासाठी भाजप एमआयएमला सोबत घेऊन आपली सदस्य संख्या १० वर नेण्याची शक्यता वर्तवली जात आहे. उतरत्या क्रमांकानुसार एमआयएमचा एक सदस्य राहणार आहे. दुसरीकडे, महापौर निवडणुकीत भाजपला साथ देणारे पवित्रकार यांना अजूनही बंडखोर मानले जात असल्याने, स्थायी समितीच्या निवडणुकीत ते शहर सुधार आघाडीची पाठराखण करणार का, याबाबत राजकीय चर्चांना उधाण आले आहे.

## सिकलसेल विशेष अभियानाचा प्रचार

**अकोला :** जिल्ह्यात जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे यांच्या मार्गदर्शनाखाली अरुणोदय सिकलसेल विशेष अभियान प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत झिरो ते ४० वर्षे वयोगटातील नागरिकांची सिकलसेल तपासणी करण्यात येत असून १०० टक्के तपासणीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.या मोहिमेच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी विविध शाळा, महाविद्यालये, शासकीय कार्यालये, सामाजिक संघटना, लोकप्रतिनिधी, धर्मगुरू तसेच खेळाडू यांच्या माध्यमातून व्यापक जनजागृती करण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून दिनांक ३१ जानेवारी २०२६ रोजी मौजे कान्हेरी, तालुका बार्शी टाकळी, जिल्हा अकोला येथे लेट पांडुरंग पाटील नर्सिंग स्कूल अँड कॉलेज, कान्हेरी येथे विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमात नर्सिंग महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनी, शिक्षक व इतर कर्मचाऱ्यांना अरुणोदय सिकलसेल मोहिमेबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर करून सिकलसेल आजाराबाबत समाजामध्ये जनजागृती करण्याचा प्रयत्न केला. या पथनाट्यामधून लग्नापूर्वी सिकलसेल तपासणी करणे आवश्यक आहे हा महत्त्वाचा संदेश देण्यात आला.

## बजेट - २०२६

### शेती, आरोग्य आणि मध्यमवर्गीयांच्या अपेक्षांचा समतोल आवश्यक

२०२६ चा केंद्रीय अर्थसंकल्प सर्वसमावेशक विकासाचा पाया ठरावा, अशी माफक अपेक्षा आहे. हलाखीच्या स्थितीत असलेल्या शेतकऱ्यांसाठी किमान आधारभूत किमतीत वाढ, सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन आणि डिजिटल कृषी अभियानाला गती मिळणे आवश्यक आहे. ग्रामीण पायाभूत सुविधांत सुधारणा आणि पगारदार वर्गासाठी कर स्लॅब व मानक वजावटीत सवलत मिळाल्यास बचतीला वाव मिळेल. ज्येष्ठ नागरिकांसाठी व्याज उत्पन्नावरील कर सवलत मर्यादा वाढवणे गरजेचे आहे.



एमएसएमई क्षेत्राला बळ देण्यासाठी जीएसटी तरतुदींचे सुलभीकरण, सुलभ कर्ज उपलब्धता आणि निर्यातीला प्रोत्साहन अपेक्षित आहे. शिक्षण आणि सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातील जीडीपीचा वाटा वाढवून औषध निर्मिती व वैद्यकीय संशोधनाला चालना द्यावी. तसेच, सौर ऊर्जेसारख्या अक्षय ऊर्जा क्षेत्रातील आत्मनिर्भरता आणि घरांची खरेदी क्षमता वाढवण्यासाठी मुद्रांक शुल्कात कपात महत्त्वाची ठरेल. थोडक्यात, हा अर्थसंकल्प कल्याणकारी योजना आणि पर्यावरणपूरक विकास यांचा समतोल राखणारा असावा.

**प्रा. डॉ. संजय खडक्कार,**
माजी तज्ज्ञ सदस्य, विदर्भ वैधानिक विकास मंडळ

### एक समतोल आणि भविष्याभिमुख दृष्टीकोन

केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२७ हा समावेशक, विकासाभिमुख आणि भविष्याभिमुख असणे अत्यंत आवश्यक असून, त्यातून आर्थिक वाढीसोबत सामाजिक न्याय व रोजगारनिर्मितीचा समतोल साधला जावा. तरुणांसाठी कौशल्यविकास, स्टार्टअप्सना भांडवल आणि क्षेत्रासाठी सुलभ कर्जव्यवस्थेद्वारे रोजगारनिर्मितीला प्राधान्य देणे गरजेचे आहे. कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञान, सिंचन आणि थेट बाजारपेठ उपलब्ध करून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यावर भर असावा. तसेच शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रातील गुंतवणूक वाढवून डिजिटल शिक्षण व प्राथमिक आरोग्य सेवा बळकट करणे काळाची गरज आहे. हरित अर्थव्यवस्था, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि स्वच्छ ऊर्जा यांसाठी स्पष्ट धोरण आखल्यास शाश्वत विकास साध्य होईल. राजकोषीय शिस्त राखत करप्रणाली सुलभ करून मध्यमवर्गाला दिलासा देणारा हा अर्थसंकल्प भारताला विकसित राष्ट्र होण्याच्या दिशेने भक्कम पाऊल ठरेल.

**- डॉ. नितीन चौधरी,** अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय, अकोला.

### स्वयंपाकघरातील महागाई आणि सामान्यांचे जगणे

एका गृहिणीसाठी बजेट म्हणजे केवळ आकड्यांचा खेळ नसून तिच्या घराचं पूर्ण नियोजन असतं. सध्या खाद्यतेल, डाळी आणि मसाल्यांच्या किमती ज्या प्रकारे वाढल्या आहेत, त्याने आमचं किचन बजेट पूर्णपणे कोलमडलं आहे. सरकारने बजेटमध्ये जीवनावश्यक वस्तूंच्या किमतींवर नियंत्रण ठेवणारी यंत्रणा उभी करायला हवी. जर गॅस सिलिंडरचे दर कमी झाले, तर आम्हाला महिन्याच्या शेवटी थोडी बचत करता येईल. त्यामुळे हे बजेट आमच्या ताटातली चव आणि खिशातील बचत टिकवून ठेवणारे असावे, हीच अपेक्षा आहे.

**- धनश्री जाधव, गृहिणी**

### बचतीवरील व्याजदर आणि आर्थिक सुरक्षा

प्रत्येक खर्चातून थोडी-थोडी रक्कम वाचवून कपाटात किंवा बँकेत साठवतो. हा पैसा घराच्या आपत्कालीन परिस्थितीसाठी असतो. सध्या बँकांमधील बचत खात्यांवरील व्याजदर खूपच कमी आहेत, त्यामुळे आमच्या साठवलेल्या पैशांचे मूल्य वाढत नाही. सरकारने महिलांसाठी असलेल्या विशेष बचत योजनांवरील (उदा. सुकन्या समृद्धी किंवा महिला सन्मान बचत पत्र) व्याजदरात वाढ करावी. जर आमच्या लहान-लहान बचतीवर चांगला परतावा मिळाला पाहिजे. महिलांच्या बचतीला प्रोत्साहन देणारे हे बजेट असायला हवे.

**- अनिता चव्हाण, गृहिणी**

## अखेर २१ कोटींचा आमदार निधी प्राप्त

### २४ कोटींपेक्षा अधिक कामांना प्रशासकीय मंजुरी

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ३१ :** अकोला सन २०२५-२६ हे आर्थिक वर्ष संपण्यासाठी दोन महिन्यांचा कालावधी शिल्लक असतानाच, आमदारांना त्यांच्या मतदारसंघातील विकासकामांसाठी मिळणारा एकूण २१ कोटींचा आमदार निधी प्राप्त झाला आहे. सुमारे २४ कोटींपेक्षा जास्त कामांना प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे. निधी मंजूर झाल्याने आता मान्यता मिळालेली कामे तातडीने पूर्ण करण्याचे आव्हान सरकारी यंत्रणांपुढे उभे ठाकले आहे.

आतापर्यंत विकास निधीच नसल्याने विशेषतः विरोधी पक्षातील आमदारांच्या समर्थकांची कोंडी झाली होती. सत्ताधारी पक्षातील कार्यकर्त्यांना विशेष निधी मिळत असल्याने त्यांच्या भागात कामे होत आहेत, मात्र विरोधक निधीपासून वंचित होते. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसह अन्य उपक्रमांमुळे तिजोरीवर भार पडल्याने शासनाकडून निधी वितरण करताना हात आखडता घेण्यात येत असल्याचे मत अर्थतज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.

### ...त्यामुळे यंदा तातडीने खर्च करण्याचे आव्हान

- सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात ८ कोटी ४३ लाख रुपयांचा आमदार विकास निधी समर्पित करण्यात आला होता. संबंधित सरकारी यंत्रणांकडून अपेक्षित मागणीच न झाल्याने हा निधी समर्पित झाला होता. त्यावेळी एकूण २७ कोटी ८८ लाख ३५ हजार रुपये खर्च झाले होते. मात्र, आता कामांना प्रशासकीय मान्यता मिळाल्याने हा उर्वरित निधी चालू आर्थिक वर्षात मिळणार आहे.
- गतवर्षी जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गतही २९ कोटींचा निधी खर्च झाला नव्हता. त्यामुळे अनेक विकासकामे रखडली होती.

विधानसभा मतदारसंघातील छोटी-मोठी विकासकामे करता यावीत, यासाठी प्रत्येक आमदाराला शासनाकडून दरवर्षी ५ कोटींचा निधी उपलब्ध करून देण्यात येतो. संबंधित आमदारांनी केलेल्या शिफारशींनुसार कामांना नियोजन विभागाकडून मंजुरी प्रदान करण्यात येते. यामध्ये प्रामुख्याने पायवाटा, रस्ते, छोट्या गल्ल्या, व्यायामशाळा, व्यायामशाळेची उपकरणे, जलवाहिन्या आणि शाळा दुरुस्ती यांसारखी कामे करता येतात.

गतवर्षी आधी लोकसभा व नंतर विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे नवीन निर्णय घेण्यावर मर्यादा आल्या होत्या. त्यामुळे आमदार निधीही उशिरा मिळाला होता.

दरम्यान, चालू आर्थिक वर्ष संपण्यासाठी केवळ दोन महिने शिल्लक असताना आता २१ कोटींचा निधी प्राप्त झाला आहे. विधानसभा सदस्यांना प्रत्येकी ३ कोटी तर विधान परिषदेच्या दोन सदस्यांसाठी प्रत्येकी ३ कोटी, असा एकूण २१ कोटींचा निधी मिळाला आहे.

## शहरात कचरा संकलनाचा बोजवारा

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ३१ :** शहरातील कचरा व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यासाठी १ सप्टेंबरपासून कचरा संकलनाचे काम खासगी ठेकेदाराला सोपवण्यात आले खरे, मात्र महिना उलटूनही अद्याप कचरा संकलनाची घडी बसलेली नाही. महापालिकेने १०० घंटागाड्या सुपूर्द करूनही ठेकेदाराकडून दैनंदिन कचरा संकलनाला फाटा दिला जात असल्याने शहरात अस्वच्छतेचे साम्राज्य पसरले आहे.

नागपूर येथील अर्बन एनवायरो वेस्ट मॅनेजमेंट लिमिटेड या कंपनीला शहरातील डोअर टू डोअर कचरा संकलनाचे कंत्राट देण्यात आले आहे. नियमानुसार, ठेकेदाराने दररोज १८० ते २०० मॅट्रिक टन कचरा उचलून तो नायगाव येथील ट्रान्सफर स्टेशनवर पोहोचवणे बंधनकारक आहे. मात्र, प्रत्यक्षात शहराच्या अनेक भागांत तीन ते चार दिवसांनंतर घंटागाडी येत असल्याची स्थिती आहे. यामुळे नाईलाजाने नागरिकांना उघड्यावर कचरा टाकावा लागत असून आरोग्याचा प्रश्न गंभीर होत आहे.

## महावितरण : कंत्राटदाराच्या आडमुठेपणामुळे ग्राहक वेठीस

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ३१ :** महावितरणने वीज बिल वितरणाचे काम सुलभ व्हावे यासाठी कंत्राटदाराची नियुक्ती केली असली, तरी प्रत्यक्षात मात्र ग्राहकांच्या पदरी मनस्तापच पडत आहे. शहरात वीज बिलांचे वितरण वेळेवर आणि व्यवस्थित होत नसल्याने ग्राहकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. हे काम मोहन इचे नामक कंत्राटदाराला देण्यात आले असून, त्यावर देखरेख ठेवण्याची जबाबदारी महावितरणचे अधिकारी पिंगे यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. मात्र, कंत्राटदाराच्या दुर्लक्षामुळे वितरण व्यवस्था पूर्णपणे कोलमडली असल्याचे चित्र आहे.

अनेक ग्राहकांनी तक्रार केली आहे की, कंत्राटदाराकडून वीज बिले घरपोच पोहोचवली जात नाहीत. विशेष म्हणजे, काही ग्राहकांच्या घरी मीटर लावून बराच काळ लोटला असला, तरी त्यांना अद्याप एकही बिल मिळालेले नाही. याबाबत विचारणा करण्यासाठी ग्राहक जेव्हा कंत्राटदाराला फोन करतात, तेव्हा त्यांचे कॉलही उचलले जात नसल्याचा गंभीर आरोप केला जात आहे. यामुळे बिल वेळेत भरायचे कसे आणि थकबाकी वाढल्यास त्याला जबाबदार कोण, असा प्रश्न सामान्य नागरिकांना पडला आहे.

या संदर्भात महावितरणच्या अधिकाऱ्यांकडे विचारणा केली असता, त्यांनी कंत्राटदाराच्या कामाचा अहवाल कार्यकारी अभियंत्यांकडे सादर केला जात असल्याचे सांगितले. तसेच कामात कसूर केल्याबद्दल कंत्राटदाराच्या बिलातून कपात केली जात असल्याचा दावाही अधिकाऱ्यांनी केला आहे. मात्र, या कारवाईनंतरही प्रत्यक्ष परिस्थितीत कोणताही बदल झालेला नाही. अधिकारी ग्राहकांना केवळ ऑनलाईन बिल भरण्याचा सल्ला देऊन आपली जबाबदारी झटकत आहेत. कंत्राटदारावर ठोस कारवाई करण्याऐवजी त्याला पाठीशी घातले जात असल्याने ग्राहकांकडून संताप व्यक्त होत असून, ही यंत्रणा सुधारण्याची मागणी जोर धरत आहे.

# तिक्षणगत संस्थेत म. गांधींना अभिवादन आणि अजित पवार यांना श्रद्धांजली






अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ३१ :** स्थानिक तिक्षणगत मल्टिपर्पज वेल्फेअर सोसायटी व अजिंक्य भारत परिवार, अकोला यांच्या वतीने महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. तसेच, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दुःखद निधनाबद्दल त्यांना सामूहिक श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुगत वाघमारे यांच्या मार्गदर्शनात, दिनांक ३० जानेवारी २०२६ रोजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी विशेष शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला संस्थेचे सचिव विष्णुदास मोंडोकार यांनी अजित पवार यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उपस्थित सर्वांनी दोन मिनिटे मौन धारण करून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. याप्रसंगी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त (हुतात्मा दिन) त्यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. विष्णुदास मोंडोकार यांनी पुष्पहार अर्पण करून गांधीजींच्या कार्याचे स्मरण केले. या कार्यक्रमांचे नियोजन जिल्हा समन्वयक सचिन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

या कार्यक्रमाला अजिंक्य भारतचे नरेंद्र गारोडे, प्रतीक गोळे, यश मोटे, साक्षी, संस्कृती, गौरव कदम आणि ओम गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच तिक्षणगत संस्थेचे सदस्य उमेश शिरसाट, श्वेता शिरसाट, यश साळवे, करण पळसपगार, भीमराज शिरसाट, सपना म्हात्रे, भरत ठोबरे आणि इतर कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिक्षक पतसंस्थेची सभा स्थगित; डीडीआरचे आदेश

### अपात्रतेचे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचे दिले निर्देश

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ३१ :** जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेची १ फेब्रुवारी रोजी होणारी सर्वसाधारण सभा जिल्हा उपनिबंधकांच्या आदेशाने स्थगित करण्यात आली आहे. अध्यक्षांच्या अपात्रतेचे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे. याबाबतचे पत्रही व्यवस्थापकांकडून जारी करण्यात आले आहे. पतसंस्थेच्या तीन संचालकांच्या अपात्रतेवर सहकार मंत्र्यांसमोर झालेल्या सुनावणीअंती शिक्कामोर्तब झाले असून, त्यांचे तिन्ही अर्ज फेटाळण्यात आले आहेत. यामध्ये माजी अध्यक्षांचाही समावेश आहे.

तीन वर्षांपूर्वी झालेल्या शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या निवडणुकीत सत्तांतर झाले होते. शिक्षकांच्या दिग्गज संघटनांनी एकत्र येत सत्ता स्थापन केली. दरम्यान, तीन जणांच्या अपात्रतेबाबतचे प्रकरण जिल्हा उपनिबंधकांकडे पोहोचले होते. पतसंस्थेचे माजी अध्यक्ष शशिकांत गायकवाड (संचालक म्हणून) यांच्यासह संचालक मारोती वरोकार आणि ज्ञानेश्वर टोहरे यांना अपात्र करण्यात आले होते. अध्यक्षांनी अन्य एका संस्थेच्या संचालक पदाचा राजीनामा मुदतीत दिला नाही आणि अन्य दोन संचालक पतसंस्थेचे थकबाकीदार आहेत, असा दावा तक्रारकर्त्यांनी केला होता.

या आदेशाला विभागीय सहनिबंधकांकडे आव्हान देण्यात आले होते. सहनिबंधकांनी सुरुवातीला अंतरिम स्थगिती दिली होती; परंतु नंतर त्यांनी हा स्थगिती आदेश पुढे कायम ठेवला नाही, असे ३१ मे रोजीच्या आदेशात नमूद केले. त्यामुळे तत्कालीन अध्यक्ष व संचालकांनी उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात धाव घेतली होती. त्यानंतर स्थगिती आदेश रद्द झाला. मात्र, नोव्हेंबर २०२५ मध्ये पुन्हा न्यायालयाने जिल्हा उपनिबंधक, विभागीय सहनिबंधक व शासनाचा आदेश कायम ठेवला. दरम्यान, अध्यक्षांकडून सर्वोच्च न्यायालयात धाव घेण्यासाठी वेळ मागण्यात आला होता. न्यायालयाने हा वेळ दिला, मात्र सभा घेण्यासह अन्य महत्त्वाचे निर्णय घेता येणार नाहीत, असे निर्बंध लावले आहेत.

### अशी आहे स्थिती

सन २०२२ मध्ये झालेल्या निवडणुकीत साने गुरुजी प्राथमिक शिक्षक सेवा संघाचे ४, प्रतिनिधी सभा १, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचा १, कास्ट्राईब शिक्षक संघटना २, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद (धांडे गट) १, महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना १ आणि महाराष्ट्र राज्य शिक्षक समितीचे ३ उमेदवार विजयी झाले होते. सध्या साने गुरुजी सेवा संघाचे ५, शिक्षक संघ, प्रतिनिधी सभा व शिक्षक सेनेचा प्रत्येकी १ आणि समितीचे दोन संचालक आहेत.

# दोन संशयितांची अटकपूर्व जामिनासाठी कोर्टात धाव

## हिदायतउल्ला पटेल हत्या प्रकरण : ३ फेब्रुवारीला होणार सुनावणी

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**अकोट : दि. ३१:** मोहाळा येथील काँग्रेस नेते हिदायतउल्ला पटेल यांच्या खळबळजनक हत्या प्रकरणातील संशयित आरोपी अ‍ॅड. पटेल फाजील खाँ आसीफ खाँ आणि फारुख खाँ आसिफ खाँ पटेल यांनी अटकेच्या भीतीने अकोट जिल्हा व सत्र न्यायालयात अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केला आहे. या अर्जावर आता ३ फेब्रुवारी रोजी सुनावणी होणार असून, संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष या निकालाकडे लागले आहे.

मोहाळा येथील या हत्या प्रकरणामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. अकोट ग्रामीण पोलीस स्टेशनमध्ये दाखल असलेल्या अप. क्र. ०५/२०२६, कलम १०३(१), १०९, ३(५) भान्यासं नुसार पोलिसांनी तपास चक्र वेगाने फिरवली आहेत. या प्रकरणातील संशयित आरोपी १) पटेल फाजील खाँ आसीफ खाँ (वय ४०, व्यवसाय-वकील) आणि २) फारुख खाँ आसिफ खाँ पटेल (वय ३९, व्यवसाय-व्यापार) दोन्ही रा. मोहाळा, यांनी शनिवार, ३१ जानेवारी रोजी अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश बी. एम. पाटील यांच्या न्यायालयात जामिनासाठी अर्ज सादर केला.

या अर्जावर सुनावणी दरम्यान, तपास अधिकारी निखिल पाटील (आयपीएस, सहायक पोलीस अधीक्षक) यांनी सरकारी वकील अजित देशमुख यांच्यामार्फत न्यायालयात लेखी उत्तर दाखल केले. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेता संशयितांना जामीन देऊ नये, अशी भूमिका पोलीस प्रशासनाने घेतली आहे.

आरोपींच्या वतीने अ‍ॅड. जुबेर अहमद (अमरावती) आणि अ‍ॅड. व्ही. एस. लाखे (अकोट) यांनी बाजू मांडली. न्यायालयाने दोन्ही बाजूंचे प्राथमिक म्हणणे ऐकून घेतल्यानंतर, जामीन अर्जावरील अंतिम युक्तिवादासाठी ३ फेब्रुवारी २०२६ ही तारीख निश्चित केली आहे. घटना घडल्यापासून सर्व संशयित आरोपी फरार असल्याची माहिती असून, पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. या प्रकरणाचा तपास आयपीएस निखिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# डॉ. भूषण कोरडेचे यश अनेकांना प्रेरणा देईल - नगराध्यक्षा सुलभा दुतोंडे

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**हिवरखेड : दि. ३१:(वार्ताहर):** हिवरखेडच्या जिल्हा परिषद शाळेत प्राथमिक शिक्षण घेतलेल्या डॉ. भूषण भास्करराव कोरडे यांनी वैद्यकीय क्षेत्रातील डी.एम. निओनेटोलॉजी ही सर्वोच्च पदवी प्रथम श्रेणीत संपादन केली आहे. ही पदवी मिळवणारे ते विदर्भातील पहिले डॉक्टर ठरले असून, त्यांचे हे यश ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरेल, असे उद्गार हिवरखेडच्या नगराध्यक्षा सौ. सुलभाताई दुतोंडे यांनी काढले.

डॉ. भूषण कोरडे यांच्या नागरी सत्कार सोहळ्याच्या त्या अध्यक्षा म्हणून बोलत होत्या. स्थानिक श्री विठ्ठल मंदिर संस्थानच्या सभागृहात भारतीय जनता पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष अनिलदादा गावंडे यांच्या शुभहस्ते डॉ. कोरडे यांचा नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना अनिल गावंडे यांनी भूषण कोरडे यांच्या यशाचे कौतुक करत, त्यांनी व त्यांच्या वडिलांनी केलेल्या संघर्षाची प्रशंसा केली.

मान्यवरांची उपस्थिती: यावेळी हिवरखेडचे माजी उपसरपंच रमेश दुतोंडे, माजी जि. प. शिक्षण सभापती मुन्ना मिरसाहेब, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष जमीरउल्ला खान पठाण, हिवरखेडचे स्वीकृत नगरसेवक श्यामशील भोपळे, नगर परिषद विरोधी पक्षनेता रवी (राणा) घुंगड, तेल्हारा कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती सुनील इंगळे, तेल्हारा पंचायत समितीचे माजी उपसभापती मधुकर पोके यांची समयोचित भाषणे झाली. डॉ. भूषणचे वडील डॉ. भास्करराव कोरडे मुलाचा संघर्ष आणि नियतीने घेतलेली परीक्षा सांगताना भावूक झाले होते. याप्रसंगी डॉ. विलासराव भांबूरकर, डॉ. विनायकराव बाजारे, डॉ. श्रीकांत शिंगोकार, स्वीकृत नगरसेवक किरण सेदानी, पोलीस पाटील प्रकाश गावंडे यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महेंद्र कराळे यांनी केले, तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन विलास घुंगड यांनी केले.

महत्त्वाचे

## आरोळी संस्थेतर्फे स्व. अजित पवार यांना श्रद्धांजली



**मंगरूळपीर:** सामाजिक कार्यात नेहमी अग्रेसर राहणाऱ्या आरोळी सामाजिक संस्थेच्या चेहेल शाखा कार्यालयात श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री, कार्यतत्पर व शिस्तप्रिय नेते अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाले, ही अत्यंत दुःखद आणि कधीही भरून न निघणारी हानी आहे. या पार्श्वभूमीवर, आरोळी सामाजिक संस्था, चेहेलच्या वतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.अजित पवार यांनी वेळोवेळी सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रासाठी निधी उपलब्ध करून देण्यात मोठे सहकार्य केले होते. विशेषतः विनाअनुदानित संस्थांना अनुदान मिळवून देण्यासाठी त्यांनी मोलाची कामगिरी बजावली होती. या श्रद्धांजली कार्यक्रमाप्रसंगी संस्थेचे दिनेश चौधरी, माजी पंचायत समिती सदस्य व संजय गांधी निराधार योजना समिती सदस्य युनुस गफार खान, माजी उपसरपंच प्रदीप चौधरी, प्रगतिशील शेतकरी गोपाल चौधरी, त्र्यंबक चौधरी, भाऊराव चौधरी, गणेश चौधरी, बालाराम चौधरी यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ४२ वर्षांच्या निष्ठेचा सन्मान: प्रयोगशाळा सहाय्यक तिहिले यांच्या हस्ते ध्वजारोहण

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**हिरपुर: दि. ३१:** कोलखेड (जहागीर): स्थानिक चिंधाजी महाराज विद्यालयात यंदाचा प्रजासत्ताक दिन एका भावूक आणि प्रेरणादायी सोहळ्याने साजरा झाला. तब्बल ४२ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त होत असलेले प्रयोगशाळा सहाय्यक तिहिले यांना शाळेने ध्वजारोहणाचा बहुमान देऊन त्यांच्या निष्ठेला मानवंदना दिली.तिहिले सरांनी आपल्या सेवाकाळातील मोठा हिस्सा विनाअनुदानित तत्त्वावर व्यतीत केला.

आर्थिक अडचणी असूनही त्यांनी प्रयोगशाळेची जबाबदारी अत्यंत प्रामाणिकपणे पार पाडली. त्यांच्या याच त्यागाची आणि विद्यालयाप्रती असलेल्या कृतज्ञतेची जाणीव ठेवून, प्रशासनाने त्यांच्या निवृत्तीपूर्वीचा हा शेवटचा प्रजासत्ताक दिन ऐतिहासिक करण्याचे ठरवले होते. यावेळी मुख्याध्यापक तांबडे यांनी तिहिले यांच्या कार्याचा गौरव करताना म्हटले की:प्रयोग शाळा सह्यायक तिहिले म्हणजे शाळेचा चालता-बोलता इतिहास आहेत. ४२ वर्षे एकाच संस्थेत, विशेषतः विनाअनुदानित काळात संयमाने सेवा देणे ही एक मोठी तपश्चर्याच आहे. त्यांचा प्रामाणिकपणा नवीन पिढीसाठी नेहमीच दीपस्तंभ ठरेल. या विशेष सोहळ्याला विजय तिहिले, मुख्याध्यापक तांबडे, काकडे, भीमराव राठोड, विजय आघडते यांच्यासह शाळा समिती, ग्रामस्थ, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिक्षकवृंदाने सरांच्या आठवणींना उजाळा देताना त्यांच्या जडणघडणीतील वाटा अधोरेखित केला. सत्काराला उत्तर देताना तिहिले यांनी आपल्या प्रवासातील सहकाऱ्यांचे आभार मानले.

# तिरुपती कन्स्ट्रक्शनच्या व्यापारी संकुलाची चौकशी करा

## सम्राट युवाशक्ती संघटनेचे अकोट नगर परिषद मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोट : दि. ३१:** अकोट नगर परिषद हद्दीतील अकोला नाका (अकोला रोड) येथे सुरू असलेल्या तिरुपती कन्स्ट्रक्शनच्या बांधकाम प्रकल्पाबाबत सम्राट युवाशक्ती संघटनेने गंभीर आक्षेप घेतले आहेत. या प्रकल्पाची सखोल चौकशी करून कायदेशीर कारवाई करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा मुख्याधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

अकोट ते हरिसाल या राज्य मार्गाला लागूनच हे व्यापारी संकुल उभे राहत आहे. या ठिकाणी नियमानुसार मुबलक पार्किंग व्यवस्था उपलब्ध नाही. तसेच, बांधकामाच्या ठिकाणी रोड साईड सेफ्टीच्या कोणत्याही उपाययोजना केल्या नसल्याने भविष्यात वाहतूक कोंडी व अपघातांचा धोका निर्माण होऊ शकतो, असा दावा संघटनेने निवेदनातून केला आहे.

सदर जागा अकोट जिनींग प्रेसिंग कं. मर्यादितच्या मालकीची असून, त्याबाबत भागधारकांसोबत न्यायालयात वाद सुरू असल्याचे समजते. अशा परिस्थितीत या जागेची खरेदी-विक्री आणि बांधकाम परवानगीच्या वैधतेवर संघटनेने प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. प्रशासनाने या प्रकल्पाचे मूळ दस्तऐवजीकरण, बांधकाम नकाशा आणि पार्किंग आराखड्याची तातडीने पडताळणी करावी. कागदपत्रांमध्ये त्रुटी आढळल्यास संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

> तिरुपती कन्स्ट्रक्शनचे बांधकाम अकोट ते हरिसाल राज्य मार्गावर सुरू आहे. मात्र, सदर बांधकामासाठी आवश्यक असलेली पार्किंग व्यवस्था, बांधकाम परवानगी तसेच हायवे लगतच्या कन्स्ट्रक्शनमध्ये नागरिकांच्या सुरक्षेसाठी आवश्यक उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत.शासनाने तिरुपती कन्स्ट्रक्शनची योग्य चौकशी करून कायदेशीर कारवाई करावी; अन्यथा संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल.
>
> **- गौतम वाहूरवाघ**
> **अकोट तालुकाध्यक्ष, सम्राट युवाशक्ती संघटना**

> तिरुपती कन्स्ट्रक्शनच्या बांधकामासाठी आवश्यक असलेल्या सर्व परवानग्या शासनाच्या नियमांनुसार घेतलेल्या आहेत.कन्स्ट्रक्शन संदर्भात कुणाला कोणतीही तक्रार अथवा शंका असल्यास त्यांनी आमच्या कार्यालयाशी संपर्क साधावा. सर्व संबंधित दस्तऐवजांची तपासणी करून देण्यात येईल.
>
> **- कीर्तीकुमार वर्मा (मालक, तिरुपती कन्स्ट्रक्शन अकोला रोड, अकोट)**

प्रशासनाने यावर तातडीने पावले न उचलल्यास उद्भवणाऱ्या परिणामास प्रशासन जबाबदार राहील, असा इशारा संघटनेचे अकोट तालुका अध्यक्ष गौतम वाहूरवाघ, अशोक वाहूरवाघ, अमोल वानखडे, यश तेलगोटे, विनोद खंडारे व इतर पदाधिकाऱ्यांनी दिला आहे. सदर निवेदनाची प्रत जिल्हाधिकारी, अकोला यांनाही माहितीसाठी सादर करण्यात आली आहे.

## शिक्षणमंत्री भुसे यांची संदीप मुर्तडकर यांनी घेतली भेट

**आलेगांव :** विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढवणे, स्पर्धात्मक परीक्षांसाठी त्यांना सक्षम बनवणे तसेच ग्रामीण व शहरी शिक्षणातील दरी कमी करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणारा 'मेरीट मेकर प्रोजेक्ट' प्रभावी ठरत असल्याचे मत राज्याचे शालेय शिक्षण मंत्री मा. दादासाहेब भुसे यांनी व्यक्त केले.मेरीट मेकर प्रोजेक्टचे संस्थापक व शैक्षणिक कार्यकर्ते प्रा. संदीप मुर्तडकर यांनी शिक्षणमंत्र्यांची सदिच्छा भेट घेऊन या उपक्रमाबाबत सविस्तर माहिती दिली. यावेळी अमरावती व अकोला जिल्ह्यासह राज्यातील विविध भागांत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांवर चर्चा झाली. वर्ग पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रमाधारित मार्गदर्शन, संकल्पना स्पष्ट करणाऱ्या कार्यशाळा, गुणवत्ता चाचण्या, शिक्षकविद्यार्थी समन्वय तसेच पालक मार्गदर्शन अशा विविध उपक्रमांचा समावेश या प्रकल्पात करण्यात येत असल्याची माहिती प्रा. मुर्तडकर यांनी दिली.

# बोरगाव मंजू येथे स्व. अजित पवार यांना भावपूर्ण आदरांजली

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**बोरगाव मंजू : दि. ३१:** कुंभारी येथील जय बजरंग मंडळाच्या वतीने राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष स्व. अजितदादा पवार यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण करण्यात आली. कुंभारी येथे आयोजित एका विशेष कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या आठवणींना उजाळा दिला. कार्यक्रमाच्या प्रारंभी स्व. तुकाराम बिडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर प्रकाश बिरकड, शत्रुघ्न बिरकड आणि जिल्हाध्यक्ष गजानन म्हैसणे यांनी स्व.अजित पवार यांच्या राजकीय प्रवासाची आणि महाराष्ट्राच्या विकासातील त्यांच्या अतुलनीय कार्याची माहिती उपस्थितांना दिली.

याप्रसंगी जय बजरंग मंडळाचे अध्यक्ष नारायणराव गावंडे, डॉ. नारायणराव बिरकड, सदस्य श्रीकृष्ण बिडकर, मार्गदर्शक प्रकाश बिरकड, शत्रुघ्न बिरकड, विदर्भ संघटक गजाननराव इंगळे, जिल्हाध्यक्ष गजाननराव म्हैसणे, सचिव गजेंद्र काळे, महानगराध्यक्ष प्रा. श्रीराम पालकर, प्रसिद्धीप्रमुख प्रा. अशोक भराड यांची प्रमुख उपस्थिती होती.तसेच श्रीकृष्ण वानखडे, डॉ. किशन मेहेरे, विलास इंगळे, राजेश आमले, दिनकर धामणकर, विजय इंगळे, पंकज फाले, सुमेध तायडे, सुनील फोकमारे, रमेश अढाऊ, मुरलीधर थोरात, डॉ. सूर्यभान नागुलकर, धनंजय पुसेगावकर, बबलू तायडे, दिलीप अपतूरकर, प्रफुल देशमुख, अशोक रहाटे, संजय तायडे, जानराव आगळे, विजय शिंगाडे, सिताराम शिंगाडे, सचिन देशमुख, सुनील वानखेडे, रवींद्र कल्याणकर व जय बजरंग परिवारातील व्यायामपटू मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# मूर्तिजापुरात राम मंदिर नाल्याची 'ऑन द स्पॉट' स्वच्छता

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**मूर्तिजापूर : दि. ३१:** प्रभाग क्रमांक ९ मधील रहिवाशांसाठी गेल्या अनेक दिवसांपासून समस्या बनलेल्या राम मंदिर नाल्याची अखेर स्वच्छता करण्यात आली. नगरसेवक आणि स्थानिक नागरिकांच्या तक्रारींची दखल घेत नगराध्यक्ष हर्षल साबळे यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून ही विशेष मोहीम राबवून घेतली.

राम मंदिर परिसरातील या नाल्यामुळे दुर्गंधी आणि सांडपाणी साचण्याचे प्रमाण वाढले होते. यामुळे परिसरात आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला होता. स्थानिक नागरिक आणि नगरसेवक राम जोशी यांनी यासंदर्भात वारंवार प्रशासनाकडे पाठपुरावा केला होता. या तक्रारींची दखल घेत नगराध्यक्षांनी आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांसह प्रत्यक्ष घटनास्थळ गाठले. त्यांच्या उपस्थितीत नाल्यातील गाळ आणि कचरा उपसण्याचे काम युद्धपातळीवर पूर्ण करण्यात आले. मुख्याधिकारी आणि आरोग्य विभागाच्या देखरेखीखाली ही मोहीम राबवण्यात आल्याने परिसरातील साचलेल्या पाण्याचा निचरा झाला आहे. उपस्थिती यावेळी नगराध्यक्ष हर्षल साबळे यांच्यासह नगरसेवक राम जोशी, बबलू भेलोंडे, रवि माडकर, नेताजी राजे, शेखर येदवर, राहुल येदवर, राहुल अग्रवाल, गणेश शेवतकर आणि आरोग्य निरीक्षक नरसिंग चावरे उपस्थित होते. या मोहिमेमुळे स्थानिक नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

## गायीचा सांजी कार्यक्रम उत्साहात संपन्न



**पिंपळखुटा :** पातूर तालुक्यातील पिंपळखुटा येथे मां कालिंका माता आश्रमाच्या वतीने गायीचा सांजी हा आगळावेगळा धार्मिक कार्यक्रम मोठ्या भक्तिभावाने पार पडला. ह.भ.प. विठ्ठल महाराज कव्हर यांच्या पुढाकाराने शुक्रवार, दि. ३० जानेवारी रोजी सायंकाळी हा सोहळा आयोजित करण्यात आला होता.यावेळी गायीला आकर्षकरीत्या सजवून तिची विधिवत आरती करण्यात आली. गोमातेप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने आयोजित केलेल्या या कार्यक्रमाला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमास पिंपळखुटा येथील सामाजिक कार्यकर्ते संदीप कवळे, ह.भ.प. विठ्ठल महाराज कव्हर यांच्यासह ग्रामस्थ व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मूर्तिजापुरात शिवपुराण कथा व अखंड हरिनाम सप्ताह

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मूर्तिजापूर : दि. ३१:** येथील प्रतिक नगर, हातगाव परिसरातील श्री संत गजानन महाराज मंदिरात प्रगटदिन व प्राणप्रतिष्ठा वर्धापन दिनानिमित्त शिवपुराण कथा आणि अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. ३१ जानेवारी ते ८ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत हा सोहळा पार पडणार असून, परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले आहे.

या सप्ताहात बीड येथील सुप्रसिद्ध ह.भ.प. गुरुदासी परमेश्वरी दीदी परभणे यांच्या मुखारविंदातून शिवपुराण कथा सादर होणार आहे. १ फब्रुवारीपासून दररोज दुपारी १ ते ५ या वेळेत ही कथा होईल. तसेच, पुणे येथील ९ वर्षीय सुरभी सुनील ढगे हिचे विशेष व्यासपीठ वाचन भाविकांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरणार आहे.या धार्मिक सोहळ्याचे यजमानपद ज्ञानेश्वर तांबडे व चंद्रकला तांबडे भूषवत आहेत. मंदिर समिती व भाविकांनी या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

> ### दैनंदिन कार्यक्रम
> सकाळी ६ वाजता: काकडा भजन, अभिषेक व आरती.
> दुपारी १ ते ५: शिवपुराण कथा व ज्ञानयज्ञ.
> सायंकाळी: हरिपाठ.
> रात्री: नामवंत कीर्तनकारांचे हरिकीर्तन.
> या सप्ताहात ह.भ.प. वैष्णवीताई गावंडे, ह.भ.प. हरिओम महाराज वाकोडे, ह.भ.प. कृष्णा महाराज पाटील, ह.भ.प. सोहम महाराज काकडे, ह.भ.प. राजेश महाराज नन्नवरे आणि ह.भ.प. मेघपुष्प महाराज शेळके यांचे प्रबोधन होणार आहे.
>
> ### विशेष सोहळा व सांगता
> ७ फेब्रुवारी: भव्य दिंडी व नगर प्रदक्षिणा.
> ८ फेब्रुवारी: सकाळी महाअभिषेक, होम-हवन आणि १० वाजता ह.भ.प. गुरुदासी परमेश्वरी दीदींचे काल्याचे कीर्तन. त्यानंतर महाप्रसादाने सोहळ्याची सांगता होईल.

अभिवादन — राजकीय क्षेत्रासह सर्वच स्तरांतून भावना व्यक्त

# हिवरखेडमध्ये अजित पवार यांना सर्वपक्षीय श्रद्धांजली

अजिंक्य भारत । प्रतिनिधी




**हिवरखेड : दि. ३१:** येथील जुने बसस्थानक परिसरातील राष्ट्रवादी काँग्रेस कार्यालयात महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित पवार यांना शुक्रवारी, ३० जानेवारी रोजी सायंकाळी ६ वाजता सर्वपक्षीय श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या शोकसभेला हिवरखेड शहरातील सर्वच प्रमुख राजकीय पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित मान्यवरांच्या हस्ते स्वर्गीय अजित पवार यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी विविध राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांनी आणि पदाधिकाऱ्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. अजित पवार यांची कार्यपद्धती, त्यांचा जनसंपर्क आणि विकासकामांचा धडाका यावर अनेकांनी प्रकाश टाकला. राजकीय मतभेद विसरून, त्यांच्याशी आलेले वैयक्तिक अनुभव सांगताना अनेक कार्यकर्त्यांना गहिवरून आले होते.

या श्रद्धांजली सभेत केवळ राजकीयच नव्हे, तर सामाजिक संघटनांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आदरांजली वाहिली. हिवरखेड परिसरातील विकासकामांत त्यांचे असलेले योगदान सदैव स्मरणात राहील, अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या. या सर्वपक्षीय श्रद्धांजली कार्यक्रमास विविध पक्षांचे आजी-माजी पदाधिकारी, कार्यकर्ते, पत्रकार, पोलीस पाटील तसेच गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दोन मिनिटे स्तब्धता पाळून या लाडक्या नेत्याला श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

**महत्त्वाचे**

### 'लाडकी बहीण' योजनेतील त्रुटी बाबत मार्गदर्शन शिबिरे घ्या!

**वाशिम :** 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेचा लाभ मिळवण्यासाठी आवश्यक असलेल्या केवायसी प्रक्रियेत अनेक महिलांकडून चुका झाल्या आहेत. या तांत्रिक त्रुटींमुळे अनेक पात्र लाभार्थी लाभापासून वंचित राहत आहेत. या चुकांची दुरुस्ती करण्यासाठी महिला व बालविकास विभागाने गावनिहाय मार्गदर्शन शिबिरे आयोजित करावीत, अशी मागणी व्याड (ता. रिसोड) येथील सामाजिक कार्यकर्ते रुपेश बाजड यांनी जिल्हा प्रशासनाकडे केली आहे.

### कॉलनीतील रस्ते दुरुस्तीसाठी रहिवाशांचे साकडे

**वाशिम:** शहरातील नवीन आययूडीपी कॉलनीतील अंतर्गत रस्त्यांची खड्डयांमुळे दुरवस्था झाली असून वाहनचालकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. अनेक ठिकाणी भूमिगत गटार योजनेचे चेंबरही फुटले आहेत. नगरपरिषद प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन नवीन रस्त्यांसाठी निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी स्थायी समिती सदस्य अनिल ताजणे यांच्याकडे केली आहे.

### 'स्वाधार' योजनेचे प्रलंबित अनुदान तत्काळ देण्याची विद्यार्थ्यांची मागणी

वाशिम: जिल्ह्यातील अकरावी, बारावी आणि व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या अनेक विद्यार्थ्यांचे मागील एक वर्षाचे 'स्वाधार' योजनेचे अनुदान अद्याप मिळालेले नाही. अनुदान मिळण्यास विलंब होत असल्याने विद्यार्थ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी हे अनुदान महत्त्वाचे असल्याने, सामाजिक न्याय विभागाने प्रलंबित रक्कम तत्काळ जमा करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते गौतम भगत व हिरामण साबळे यांनी केली आहे.

**निधन वार्ता**

### गीताबाई मनवर



**साखरडोह :** येथील गीताबाई हिरामण मनवर यांचे अल्पशा आजाराने ३० जानेवारी रोजी वयाच्या ७२ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन विवाहित मुली एक मुलगा सून नातवंडे व बराच मोठा परिवार आहे.

# घरफोडीसह समृद्धीवरील डिझेल चोरीचे ६ गुन्हे उघड!

## एल.सी.बी. ची कारवाई; १० लाखांच्या मुद्देमालासह चोरटे गजाआड

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**वाशिम, दि. ३१ :** जिल्ह्यातील गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवण्यासाठी पोलीस अधीक्षक अनुज तारे यांनी दिलेल्या आदेशानुसार, स्थानिक गुन्हे शाखा आणि मालेगाव पोलिसांनी विविध ठिकाणी छापे टाकून घरफोडी, जबरी चोरी आणि डिझेल चोरीचे एकूण ६ गुन्हे उघडकीस आणले आहेत. या कारवाईत आरोपींकडून सोन्याचे दागिने, रोख रक्कम आणि वाहनांसह एकूण ९ लाख ५९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, करण एकनाथ वंजारे (रा. खेर्डा, ता. मालेगाव) हा सोन्याचे दागिने विक्री करण्यासाठी वाशिम येथे येणार होता. पोलिसांनी सापळा रचून त्याला ताब्यात घेतले असता, त्याच्याकडे ३८ ग्रॅम सोन्याचे दागिने आणि ५ हजार रुपये रोख सापडले. अधिक चौकशीत त्याने बुलढाणा जिल्ह्यातील साखरखेर्डा, मालेगाव आणि आसेगाव पोलीस स्टेशन अंतर्गत केलेल्या घरफोडीच्या गुन्ह्यांची कबुली दिली. पोलिसांनी त्याच्याकडून सोन्याचे दागिने, २ मोटारसायकल आणि २ मोबाईल असा एकूण ९ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. समृद्धी महामार्गावर सातत्याने होणाऱ्या डिझेल चोरीच्या घटनांचा तांत्रिक तपास करून कारंजा शहर पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली. प्रतीक प्रभाकर साळवे (१९ वर्ष) आणि सागर रमेश हिवराळे (२८ वर्ष, दोन्ही रा. ता. जाफराबाद, जि. जालना) अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत.

तसेच, मालेगाव पोलिसांनी समृद्धी महामार्गावरील चोरीच्या दोन गुन्ह्यांमध्ये अलीम खान मुस्ताक खान पठाण (२३ वर्ष, रा. टेंभुर्णी, जि. जालना) याला अटक केली आहे. मालेगाव येथील बस स्थानक परिसरात खिसा कापल्याप्रकरणी पोलिसांनी शेख सत्तार शेख दादामिया (रा. नालसाहबपुरा, वाशिम) या सराईत गुन्हेगाराला ताब्यात घेतले. त्याच्याकडून चोरीला गेलेली ९ हजार रुपयांची रोकड हस्तगत करण्यात आली आहे. सदर कामगिरी पोलीस अधीक्षक अनुज तारे, अपर पोलीस अधीक्षक लता फड, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रदीप पाडवी (कारंजा) व नवदीप अग्रवाल (वाशिम) यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रदीप परदेशी, मालेगाव पोलीस स्टेशनचे पथक आणि कर्मचाऱ्यांनी केली आहे.

## कर्जमाफीच्या हालचालींना वेग; ६७ हजार शेतकऱ्यांची माहिती संकलित

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**वाशिम, दि. ३१ :** शेतकरी कर्जमाफीच्या संभाव्य निर्णयाच्या पार्श्वभूमीवर बँकिंग क्षेत्रात प्रशासकीय हालचालींना वेग आला असून, विविध बँकांच्या वरिष्ठ कार्यालयांकडून जिल्हास्तरावरील थकीत पीक कर्जासंदर्भात सविस्तर माहिती मागविण्यात आली आहे. त्या अनुषंगाने संकलित करण्यात आलेल्या प्राथमिक आकडेवारीनुसार, वाशिम जिल्ह्यात ६७,०८४ शेतकऱ्यांकडे ३३९.५ कोटी रुपयांची पीक कर्जाची थकबाकी असल्याचे समोर आले आहे.

राज्यात शासनस्तरावर कर्जमाफीबाबत हालचाली सुरू असल्याची चर्चा असतानाच, बँकांच्या वरिष्ठ कार्यालयांनी आपापल्या शाखांना पीक कर्ज, मुदत कर्ज तसेच थकीत रकमेचा तपशील तातडीने सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. यामध्ये प्रामुख्याने पात्र व अपात्र कर्जदार, कर्जाचा कालावधी, थकबाकीची एकूण रक्कम आणि पुनर्गठित कर्जाची स्थिती याबाबींची जिल्हानिहाय व तालुकानिहाय माहिती मागविण्यात आली आहे. कर्जमाफीबाबत अद्याप कोणताही अधिकृत निर्णय जाहीर झाला नसला, तरी बँकांकडून सुरू असलेली ही प्रक्रिया संभाव्य धोरणात्मक निर्णयाची पूर्वतयारी असल्याचे मानले जात आहे. बँकिंग स्तरावर अचानक सुरू झालेल्या या हालचालींमुळे जिल्ह्यातील हजारो थकबाकीदार शेतकऱ्यांमध्ये कर्जमाफी मिळण्याबाबत मोठी आशा निर्माण झाली आहे.

## महिलांच्या मतावर ठरणार 'वाईन बार'चे भवितव्य

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. ३१ :** तालुक्यातील मौजे ब्रम्हा येथील 'ऋषी रेस्टॉरंट अँड वाईन बार'ची मद्यविक्रीची अनुज्ञप्ती (परवाना) कायमची बंद करायची की नाही, याचा फैसला आता थेट मतदानातून होणार आहे. जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या आदेशानुसार, येत्या ९ फेब्रुवारी २०२६ रोजी ही दारूबंदी निवडणूक पार पडणार आहे. या प्रक्रियेसाठी वाशिमचे तहसीलदार निलेश पळसकर यांना प्राधिकृत करण्यात आले असून, निवडणूक नायब तहसीलदार सी.एस. आडे यांच्याकडे मतदानाची प्रत्यक्ष जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

ही निवडणूक महिलांच्या सन्मानासाठी आणि कुटुंबांच्या रक्षणासाठी अत्यंत संवेदनशील मानली जात आहे. शासन निर्णयानुसार, २९ ऑक्टोबर २०२४ रोजीच्या मतदार यादीत नाव असलेल्या महिला मतदारांनाच या प्रक्रियेत मतदानाचा अधिकार देण्यात आला आहे. ज्या घरांची सुख-शांती दारूमुळे हिरावली गेली आहे, अशा शेकडो माता-भगिनींच्या हातात आता या दुकानाचे टाळे लावण्याची ताकद आली आहे. जर एकूण महिला मतदारांपैकी किमान ५० टक्क्यांहून अधिक महिलांनी दारूबंदीच्या बाजूने मतदान केले, तर प्रशासनाकडून या वाईन बारचा परवाना तात्काळ रद्द केला जाईल.

मतदान प्रक्रिया ९ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ५ या वेळेत जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा, ब्रम्हा (खोली क्र. १ व २) येथे पार पडणार आहे. मतदानानंतर त्याच दिवशी सायंकाळी ६ वाजल्यापासून मतमोजणीला सुरुवात होईल आणि निकाल तात्काळ जाहीर केला जाईल. एका बाजूला व्यावसायिक हित आणि दुसऱ्या बाजूला गावातील महिलांचा उद्वेग असा हा लढा आता निर्णायक वळणावर पोहोचला असून, संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष या निकालाकडे लागले आहे.

## जि. प. शाळेची इमारत झाली 'शिकस्त; विद्यार्थ्यांचा जीव टांगणीला

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**मानोरा, दि. ३१ :** तालुक्यातील विठोली ग्रामपंचायत अंतर्गत येत असलेल्या बेलोरा येथील जिल्हा परिषद शाळेची इमारत अत्यंत जीर्ण झाली असून, विद्यार्थी आपला जीव धोक्यात घालून येथे शिक्षण घेत आहेत. या गंभीर समस्येकडे प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी दुर्लक्ष केल्याचा आरोप करत, संतप्त ग्रामस्थांनी ३० जानेवारी रोजी गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन देऊन नवीन इमारत बांधण्याची मागणी केली आहे.

या शाळेच्या इमारतीचे बांधकाम सन १९८६ मध्ये करण्यात आले होते. सुमारे ४० वर्षांनंतर आता या इमारतीची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. इमारतीच्या भिंतींना चारी बाजूंनी मोठे तडे गेले असून, स्लॅबचा भागही कोसळण्याच्या स्थितीत आहे. पावसाळ्यात किंवा वाऱ्या-पावसात ही इमारत केव्हाही कोसळून मोठी दुर्घटना घडू शकते, अशी भीती व्यक्त होत आहे.

नवीन इमारतीसाठी ग्रामस्थांनी वारंवार मागणी करूनही शासन आणि प्रशासनाने अद्याप याची दखल घेतलेली नाही. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर असतानाही होत असलेल्या विलंबामुळे पालकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. गटविकास अधिकारी आणि मतदारसंघातील लोकप्रतिनिधींनी स्वतः या शाळेची पाहणी करावी आणि तातडीने नवीन इमारतीचे बांधकाम मंजूर करावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. निवेदनावर बेलोरा येथील नागरिक व पालकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## 'कर्कश' बुलेटवर कारवाई; अल्पवयीन चालकांसह पालकांनाही फटका

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**रिसोड, दि. ३१ :** शहरात कर्कश आवाज करणाऱ्या मॉडिफफाईड सायलेन्सर लावलेल्या बुलेट आणि इतर दुचाकीस्वारांविरुद्ध रिसोड पोलिसांनी विशेष मोहीम हाती घेतली आहे. २९ आणि ३० जानेवारी रोजी राबवलेल्या या मोहिमेत नियमबाह्य सायलेन्सर वापरणाऱ्या वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली.

अनेक वाहनचालक सायलेन्सरमध्ये बदल करून फटाक्यांसारखा आवाज काढतात, ज्याचा नागरिकांना मोठा त्रास होत होता. या तक्रारींची दखल घेत पोलिसांनी मोहिमेदरम्यान फटाके फोडणाऱ्या बुलेटचे सायलेन्सर जप्त केले आणि संबंधितांना ४,५०० रुपये दंड ठोठावला.

या कारवाईचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे, विनापरवाना वाहन चालवणाऱ्या १० अल्पवयीन मुलांवर आणि त्यांच्या पालकांवर पोलिसांनी कारवाई केली. याअंतर्गत एकूण ५० हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. नियमभंग करणाऱ्यांवर वाहन जप्तीची तरतूद असल्याचेही पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक, अपर पोलीस अधीक्षक आणि सहाय्यक पोलीस अधीक्षक (वाशिम) यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. पोलीस निरीक्षक रामेश्वर चव्हाण यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक सचिन गोखले, मनोहर वानखडे, सुधाकर सोन्नर, विलास गायकवाड, कपिल घुगे आणि दिलीप जाधव यांच्या पथकाने ही कामगिरी केली.

नागरिकांनी वाहतूक नियमांचे पालन करावे, अन्यथा कठोर कारवाई सुरूच राहील, असा इशारा पोलीस प्रशासनाने दिला आहे.

## 'संत योगी अवलिया महाराज' यात्रा महोत्सवास उत्साहात प्रारंभ

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**मालेगाव, दि. ३१ :** तालुक्यातील उमरदरी येथील प्रसिद्ध श्रीक्षेत्र काळामाथा येथे श्री संत योगी अवलिया महाराज संस्थानच्या वतीने आयोजित वार्षिक यात्रेला २६ जानेवारीपासून मोठ्या उत्साहात सुरुवात झाली आहे. या महोत्सवानिमित्त दररोज विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल असून, महाप्रसादाने यात्रेची सांगता होणार आहे.

यात्रेच्या कालावधीत संस्थानच्या वतीने दररोज विविध आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये दररोज पहाटे काकड आरती, भजन, कीर्तन आणि श्री संत योगी अवलिया महाराज चरित्र 'ज्ञानामृत' ग्रंथाचे पारायण संपन्न होत आहे. विशेषतः ह.भ.प. दिगंबर महाराज फोपळे यांच्या रसाळ वाणीतून सुरू असलेल्या श्रीमद्भागवत कथेला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, संपूर्ण परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

या यात्रा महोत्सवाची सांगता भव्य महाप्रसादाने होणार आहे. सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत महाप्रसाद वाटप सुरू राहील. या महाप्रसादाचे पूजन महंत शांतिपुरी महाराज आणि महंत अमरगिरी महाराज यांच्या शुभहस्ते संपन्न होणार आहे. यावेळी संस्थानचे अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सर्व विश्वस्त मंडळी उपस्थित राहणार आहेत.

भाविकांना उपस्थितीचे आवाहन

या धार्मिक सोहळ्याचा आणि महाप्रसादाचा जास्तीत जास्त भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थानचे अध्यक्ष रामेश्वर आप्पा गौंडाळ आणि उपाध्यक्ष उत्तमसिंग नाईक यांनी केले आहे. यात्रेनिमित्त परिसरातील भाविकांची मोठी गर्दी होत असून प्रशासकीय आणि संस्थान स्तरावर चोख व्यवस्था करण्यात आली आहे.

**माणुसकीचा ओलावा** | **अनोळखी शहरात रुग्णसेवेचा वसा**

# काजळे कुटुंबासाठी पार्वतीबाई ठरल्या देवदूत!

। संजय अलदर ।



**मानोरा, दि. ३१ :** माणुसकीचा ओलावा आटत चाललेल्या आणि स्वार्थाच्या या जगात आजही काही व्यक्ती आपल्या निस्वार्थ कार्याने समाजासमोर आदर्श उभा करत आहेत. नागपूरच्या शासकीय रुग्णालयात रुग्णसेवेचा वसा घेतलेल्या मानोरा तालुक्यातील समाजसेविका श्रीमती पार्वतीबाई राठोड यांनी कारखेडा येथील एका कुटुंबाला त्यांच्या आयुष्यातील सर्वात कठीण प्रसंगी मदतीचा हात दिला. घरावरील टीन दुरुस्त करताना झालेल्या भीषण अपघातात गंभीर जखमी झालेल्या वासुदेव काजळे यांच्यासाठी पार्वतीबाई अक्षरशः 'देवदूत' बनून धावून आल्या.

कारखेडा (ता. मानोरा) येथील रहिवासी वासुदेव काजळे हे आपल्या घराच्या छताची दुरुस्ती करत होते. पावसाळा किंवा वाऱ्यापासून संरक्षणासाठी लावलेले टीन नीट करताना, त्यावर वजन म्हणून ठेवलेले जड दगड अचानक निसटले आणि थेट वासुदेव यांच्या अंगावर कोसळले. या भीषण अपघातात ते रक्तबंबाळ होऊन जमिनीवर कोसळले. घरातील सदस्यांनी आरडाओरड केली, शेजारी धावून आले, मात्र त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना तातडीने पुढील उपचारासाठी नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात हलवण्याचा सल्ला देण्यात आला.

श्रीमती पार्वतीबाई राठोड या गेल्या एक तपापेक्षा (१२ वर्षे) अधिक काळापासून नागपूरमधील शासकीय आणि खासगी रुग्णालयांमध्ये रुग्णांची सेवा करत आहेत. विदर्भ असो वा राज्याचा कोणताही कोपरा, अगदी परराज्यातील रुग्ण असला तरी पार्वतीबाई कोणत्याही अपेक्षेविना मदतीसाठी तत्पर असतात. काजळे यांच्या प्रकृतीची माहिती मिळताच त्या क्षणाचाही विलंब न लावता रुग्णालयात पोहोचल्या. त्यांनी तातडीने डॉक्टरांशी संवाद साधला, आवश्यक असलेले रक्त उपलब्ध करून दिले आणि उपचारांमधील सर्व तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी स्वतः पुढाकार घेतला. त्यांच्या याच तत्परतेमुळे वासुदेव काजळे यांच्यावर वेळेत शस्त्रक्रिया आणि उपचार होऊ शकले.

आज वासुदेव काजळे यांच्या प्रकृतीत वेगाने सुधारणा होत आहे. त्यांचे

### कृतज्ञतेने पाणावले डोळे

'रुग्ण कोणत्याही जातीचा, धर्माचा किंवा गावचा असो, पीडित व्यक्तीमध्ये ईश्वराचे रूप पाहून त्याची सेवा करणे हाच माझा धर्म आहे,' अशा शब्दांत पार्वतीबाईंनी आपल्या भावना व्यक्त केल्या. विशेष म्हणजे, काही महिन्यांपूर्वी त्यांनी कारखेडा येथीलच एका पक्षाघातग्रस्त मुलालाही अशाच प्रकारे मोलाची मदत केली होती.

### अनोळखी शहर आणि काजळे कुटुंबाची हतबलता

काजळे कुटुंबासाठी नागपूर हे शहर पूर्णपणे अनोळखी होते. मोठ्या रुग्णालयातील गर्दी, कागदोपत्री प्रक्रिया आणि उपचारांचा प्रचंड ताण यामुळे जखमीचे चिरंजीव विजय काजळे आणि त्यांचे नातेवाईक पूर्णपणे हतबल झाले होते. आपल्या माणसाला वाचवण्यासाठी कोणाकडे मदत मागावी, हे त्यांना सुचत नव्हते. अशा परिस्थितीत त्यांच्या कानावर पार्वतीबाई राठोड यांचे नाव आले आणि त्यांनी तात्काळ त्यांच्याशी संपर्क साधला.

चिरंजीव विजय काजळे यांनी भावूक होऊन सांगितले की, 'जर पार्वतीबाई वेळेवर धावून आल्या नसत्या, तर आमच्यावर मोठे संकट ओढवले असते. त्या आमच्यासाठी देवाने पाठवलेली माऊलीच आहेत.' या घटनेची चर्चा सध्या संपूर्ण मानोरा तालुक्यात होत असून, पार्वतीबाईंच्या या निस्वार्थ कार्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. समाजसेवेचा हा वारसा अशाच प्रकारे अनेकांचे आयुष्य सावरण्याचे काम करत राहील, अशी भावना व्यक्त होत आहे.

## सचिन डेरे यांना आरसीएफचा 'मानवीयता' पुरस्कार प्रदान



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मानोरा, दि. ३१ :** भारत सरकारच्या 'राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टीलायझर लिमिटेड' या नवरत्न कंपनीत कार्यरत असलेले मानोरा गावचे सुपुत्र सचिन मधुकर डेरे यांना यावर्षीचा प्रतिष्ठित 'मानवीयता' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून हा सोहळा पार पडला.

कंपनीचे चेअरमन आणि मॅनेजिंग डायरेक्टर नजहत शेख यांच्या हस्ते सचिन डेरे यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. आरसीएफ कंपनीतर्फे दरवर्षी सामाजिक सेवा आणि समाजोपयोगी कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांना हा पुरस्कार दिला जातो. सन २०२५ मधील त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन हा सन्मान करण्यात आला आहे.

सचिन डेरे यांच्या या यशामुळे मानोरा शहरासह परिसरात त्यांचे कौतुक होत असून सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## महत्त्वाचे

### वर्षा सिरसाट यांची उपमुख्याध्यापक पदी नियुक्ती



**अकोट :** येथील श्री शिवाजी विद्यालयात उपमुख्याध्यापक पदावर वर्षा पंजाबराव सिरसाट यांची पदोन्नतीने नियुक्ती करण्यात आली आहे. शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या दीर्घ आणि निष्ठावान सेवेची दखल घेत ही निवड करण्यात आली. विशेष म्हणजे वर्षा सिरसाट यांचे माध्यमिक शिक्षण याच श्री शिवाजी विद्यालयात झाले असून, त्यांनी १७ जानेवारी २००० रोजी श्री शिवाजी शिक्षण संस्थेत सहाय्यक शिक्षिका म्हणून सेवेला प्रारंभ केला होता. गेल्या अनेक वर्षांत त्यांनी अध्यापनाबरोबरच शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजात सक्रिय सहभाग नोंदवून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी योगदान दिले आहे. आपल्या नियुक्तीबद्दल त्यांनी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, उपाध्यक्ष ॲड. गजानन पुंडकर व केशव मेतकर, कोषाध्यक्ष दिलीप इंगोले, कार्यकारिणी सदस्य सुरेश खोटरे व हेमंत काळमेघ तसेच संस्थेच्या सर्व कार्यकारिणी सदस्यांचे आभार व्यक्त केले. या नियुक्तीबद्दल शिक्षकवर्ग, विद्यार्थी, पालक व शिक्षणप्रेमी नागरिकांकडून वर्षा सिरसाट यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

### पुनर्वसित ग्रामस्थांना घरमूल्यांकनाचा मोबदला मिळणार

**अकोट :** मेळघाट व्याघ्र प्रकल्पांतर्गत २०१३-१४ मध्ये पुनर्वसन झालेल्या अकोट वन्यजीव विभागातील मौजे सोमठाणा खुर्द येथील ११२ घरमूल्यांकन धारकांना नवीन भूसंपादन कायद्यानुसार मोबदला अदा करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या लाभार्थ्यांना घरमूल्यांकनाची दोनपट रक्कम देय असून, त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध झाला असल्याची माहिती अकोट वन्यजीव विभागाचे उपवनसंरक्षक राहुल सिंह टोलिया यांनी दिली आहे.मोबदला मिळवण्यासाठी लाभार्थ्यांनी १०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर केलेला अर्ज. सुरू असलेल्या बँक खाते पुस्तकाची (पासबुक) छायाप्रत. आधार कार्डची छायाप्रत. नमुना ८ ची छायाप्रत. मूळ लाभार्थी मृत असल्यास वारस प्रमाणपत्र व सर्व वारसांच्या बँक खात्याची प्रत. आदी कागदपत्रे अकोट वन्यजीव विभाग कार्यालयात सादर करावीत लाभार्थ्यांची सविस्तर यादी. या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तरी सोमठाणा खुर्द येथील लाभार्थ्यांनी तातडीने कागदपत्रे सादर करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## निधन वार्ता

### नामदेवराव कवळकार



**अकोला** हिवरखेड येथील रहिवासी नामदेवराव संपत कवळकार यांचे दिनांक ३१ जानेवारी रोजी दुपारी २.३० वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ८७ वर्षे होते. त्यांचा अंत्यविधी दिनांक १ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता त्यांच्या निवासस्थानावरून अकोट रोड येथील संत गाडगेबाबा वैकुंठधाम स्मशानभूमीत पार पडणार आहे. त्यांच्या पश्चात सात मुले, सुना, नातवंडे, मुलगी, जावई असा मोठा आप्तपरिवार आहे.

# लाडक्या बहिणींच्या मदतीला आता अंगणवाडीताई; ई-केवायसी गोंधळ मिटणार!

## प्रशासकीय पडताळणीमुळे हजारो लाभार्थींना मिळणार आधार

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मंगरुळपीर, दि. ३१ : मंगरुळपीर तालुक्यातील शेकडो महिलांना ई-केवायसी त्रुटीचा फटका बसला आहे. अर्जामध्ये चुकीचे पर्याय निवडले गेल्यामुळे त्यांची नावे तात्पुरती रोखण्यात आली होती. यामुळे हप्ते थांबल्याने संतप्त महिलांनी तहसील व इतर सरकारी कार्यालयांमध्ये फेऱ्या मारायला सुरुवात केली होती; प्रशासनाकडे तक्रारींचा पाऊस पडला होता.**




लाडकी बहीण योजनेत केवायसी करताना झालेल्या चुका अनेक महिलांसाठी अडचणीच्या ठरल्या होत्या. हप्ते थांबल्याने संताप व्यक्त होत असतानाच, आता प्रशासनाने दिलासादायक पाऊल उचलले आहे. ज्या पात्र महिलांनी चुकीचा पर्याय निवडला आहे, त्यांची अंगणवाडी सेविकांमार्फत प्रत्यक्ष पडताळणी केली जाणार आहे. त्यामुळे अडकलेले हप्ते मिळण्याची आशा हजारो लाडक्या बहिणींना लागली आहे. केवायसी करताना तांत्रिक चूक झालेल्या महिलांना यामुळे मोठा आधार मिळाला आहे. अशा पात्र लाभार्थ्यांना थेट अपात्र न ठरवता प्रत्यक्ष पडताळणीची संधी देण्यात आली आहे. यामध्ये लाभार्थ्यांचे नाव, आधार-केवायसी तपशील, कुटुंबातील सरकारी नोकरी आणि उत्पन्नाचे निकष यांची प्रत्यक्ष खातरजमा केली जाईल. पडताळणीत चूक आढळल्यास दुरुस्तीची शिफारस केली जाणार आहे.

ई-केवायसीतील तांत्रिक अडचणी, उत्पन्नाच्या निकषांबाबतचा संभ्रम आणि कुटुंबातील लाभार्थी मोजणी यामुळे मोठा गोंधळ निर्माण झाला होता. मात्र, तांत्रिक चुकीमुळे कोणतीही पात्र महिला या योजनेपासून वंचित राहू नये, हा प्रशासनाचा मुख्य उद्देश आहे. अंगणवाडी सेविकांच्या प्रत्यक्ष पडताळणीनंतर पात्र महिलांना लाभ देण्यात येईल. तरी, सेविकांकडे असलेल्या यादीत आपले नाव आहे की नाही, याची खात्री महिलांनी करून घेणे आवश्यक आहे.

# विनापरवाना मुरूम वाहतूक करणारे दोन ट्रॅक्टर जप्त

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मूर्तिजापूर,दि. ३१ :** अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीविरोधात महसूल विभाग आणि पोलिसांनी संयुक्त कारवाई करत विनापरवाना मुरूम वाहतूक करणारे दोन ट्रॅक्टर जप्त केले. मूर्तिजापूर ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कंझरा येथे ही कारवाई करण्यात आली असून, दोन चालकांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

दि. २९ जानेवारी रोजी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास कंझरा येथील जागेश्वर मंदिराजवळ महसूल विभागाचे मंडळ अधिकारी रवींद्र पुरी यांनी नाकाबंदी केली होती. यावेळी दोन विना नंबरचे ट्रॅक्टर अवैधरीत्या मुरूम खाली करताना आढळून आले. विचारपूस केली असता चालकांकडे मुरूम वाहतुकीचा कोणताही अधिकृत परवाना अथवा रॉयल्टी पास नसल्याचे स्पष्ट झाले. या कारवाईत पोलिसांनी सुमारे ४ लाख ४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. यामध्ये दोन विना नंबरचे ट्रॅक्टर (इंजिन व ट्रॉलीसह, अंदाजे किंमत ४ लाख रुपये) आणि दोन ब्रास मुरूम (अंदाजे किंमत ४ हजार रुपये) यांचा समावेश आहे. या प्रकरणी योगेश अशोकराव देशमुख (वय ४०) व प्रशांत गजानन देशमुख (वय ३९, दोन्ही रा. कंझरा) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तहसील कार्यालयाचे मंडळ अधिकारी महादेव उत्तमराव भगत यांच्या तक्रारीवरून, मूर्तिजापूर ग्रामीण पोलीस ठाण्याचे ठाणेदार श्रीधर गुट्टे यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३०३ (२) तसेच खाण व खनिज अधिनियम १९५८ च्या कलम ३, ४ व २१ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास हेड कॉन्स्टेबल राजेश डोंगरे (ब. नं. २०६५) करीत असून, दाखल अधिकारी म्हणून शकुंतला सदार या काम पाहत आहेत.

# तेल्हाऱ्यात मूकनायक दिन उत्साहात साजरा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**तेल्हारा, दि. ३१ :** नायक पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य संलग्न, तेल्हारा तालुका पत्रकार संघाच्या वतीने मूकनायक दिन येथील विश्रामगृहात उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन पत्रकार नरेंद्र सुईवाल व सामाजिक कार्यकर्ते जीवन बोदडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपस्थित पत्रकार व पदाधिकाऱ्यांनी डॉ. बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पार्पण करून अभिवादन केले.

याप्रसंगी नायक पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष रक्षित बोदडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, ३१ जानेवारी १९२० रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मुंबईतून 'मूकनायक' पाक्षिकाची सुरुवात केली. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी या वृत्तपत्रासाठी २५०० रुपयांची आर्थिक मदत केली होती. समाजातील उपेक्षित, पीडित व अन्यायग्रस्तांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी 'मूकनायक' हे प्रभावी माध्यम ठरले. पुढे बाबासाहेबांनी 'बहिष्कृत भारत', 'जनता', 'समता' व 'प्रबुद्ध भारत' ही वृत्तपत्रे सुरू करून कोणतीही चळवळ यशस्वी होण्यासाठी मुखपत्र किती आवश्यक असते, हे अधोरेखित केले. आजच्या पत्रकारांनी बाबासाहेबांच्या पत्रकारितेचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून अभ्यास करणे आवश्यक असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमानंतर सर्व पत्रकारांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला संस्थापक अध्यक्ष रक्षित बोदडे, सचिव अनिल भाकरे, कोषाध्यक्ष गणेश उमाळे, जिल्हाध्यक्ष प्रभाकर बोरकर यांच्यासह बाळकृष्ण दामोदर, सुनील गवई, संदेश गवारगुरू, जीवन बोदडे, गोकुळ हिंगणकर, धम्मदीप बोदडे, राजेंद्र तिहले आदी पत्रकार व मान्यवर उपस्थित होते.

# अशोक वाटिका येथे मूकनायक दिन साजरा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी




**मंगरुळपीर, दि. ३१ :** वाशिम जिल्ह्यातील मंगरुळपीर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील अशोक वाटिका येथे १०६ वा मूकनायक दिन तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर पत्रकार दिन वैचारिक उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मंगरुळपीर नगरपरिषदेचे नगराध्यक्ष आणि उपस्थित सर्व पत्रकार बांधवांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी बाबासाहेबांच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला होता. मंगरुळपीर तालुक्यातील व शहरातील पत्रकारांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १०६ वर्षांपूर्वी केलेली पत्रकारिता आणि आजची पत्रकारिता यावर आपली मते व्यक्त केली. डॉ. बाबासाहेबांनी मूकनायक या पाक्षिकातून शोषितांचा आवाज बुलंद करून विषमतेविरुद्ध लढा दिला. आजच्या पत्रकारांनीही त्यांचे अनुकरण करून पत्रकारिता केल्यास समाजात खरे परिवर्तन होईल आणि वंचितांना न्याय मिळेल, असा सूर याप्रसंगी उमटला. पत्रकारिता ही स्वार्थासाठी नसून ती जनसामान्यांना न्याय देणारी असावी,अशा भावना उपस्थित पत्रकारांनी व्यक्त केल्या. कार्यक्रमाच्या शेवटी, २८ जानेवारी रोजी विमान अपघातात निधन झालेले महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री यांना सर्व पत्रकार आणि मान्यवरांच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

या कार्यक्रमाला मंगरुळपीरचे नगराध्यक्ष अशोकभाऊ परळीकर, पत्रकार रमेश मुंजे, नाना देवळे, नारायण आव्हाळे, संदीप कांबळे, राजकुमार ठाकूर, सुधाकर क्षीरसागर, सुधाकर चौधरी, अमोल ठाकूर, गोपाल खिराडे, सुनील भगत, वसंत इंगोले, फुलचंद भगत तसेच सामाजिक कार्यकर्ते फकीरा शृंगारे, सुदाम मनवर, प्रेमकुमार इंगोले, उत्तम भगत आणि मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप कांबळे यांनी केले, तर आभार सुधाकर चौधरी यांनी मानले.

# नगर परिषद शाळांना उत्तम सुविधा पुरवू -नगराध्यक्ष हर्षल साबळे


अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**मूर्तिजापूर, दि. ३१ :** स्थानिक इंदिरा गांधी नगर परिषद विद्यालयात आयोजित वार्षिक स्नेहसंमेलन तसेच नवनिर्वाचित नगराध्यक्ष आणि नगरसेवकांचा सत्कार समारोह आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नवनिर्वाचित नगराध्यक्ष हर्षलभाऊ साबळे होते . या प्रसंगी बोलताना त्यांनी नगर परिषद शाळांना उत्तम सुविधा पुरविण्यात येतील असे आश्वासन दिले. या कार्यक्रमासाठी उपस्थित नवनिर्वाचित अध्यक्ष, पदाधिकारी तसेच नगरसेवकांचा इंदिरा गांधी नगर परिषद विद्यालयाचे मुख्याध्यापक जयदीप सोनखासकर, राजीव गांधी न.प. प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक राजेश जोशी,सावित्रीबाई फुले न. प. कन्या शाळेच्या मुख्याध्यापिका सुषमा विधाते तसेच सर सैय्यद अहमद खान शाळेचे मुख्याध्यापक बशारत अली यांनी शाल, श्रीफळ तसेच पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. या कार्यक्रमासाठी नगरपालिकेचे नवनिर्वाचित उपाध्यक्ष रोहित अव्वलवार, शिक्षण सभापती सौ.सरिता राहुल पाटील, बांधकाम सभापती संदीप सरनाईक, महिला व बालकल्याण सभापती सौ. सोनल काळपांडे, पाणी पुरवठा सभापती राहुल गुल्हाने, आरोग्य सभापती सौ.पूनम मारकड तसेच नवनिर्वाचित नगरसेवक श्री. सचिन पावडे, सौ. शालिनीताई हजारे, श्री. गजानन नाकट, श्री. अब्दुल बाकी, सौ. ममता महाजन, श्री. भूपेंद्र पिंपळे, श्री. लखन मिलांदे, श्रीमती बिल्किसबानो, श्री. पंकज कांबे, श्री. निजामोद्दीन इस्लामोद्दीन, सौ. सुप्रिया खंडारे, सौ.प्रज्ञा वानखेडे, सौ.शुभांगी सरनाईक , श्री निलेश शर्मा, सौ पूजा अरोरा, श्रीमती शमीम बानो, श्री तसवर खान, श्रीमती फहेमिदाबी पटेल, सौ. सुनंदा सोळंके तसेच स्वीकृत नगरसेवक श्री. राम जोशी, श्री. संजय डागा,श्री. भारत जेठवानी उपस्थित होते. या कार्यक्रमात क्रीडा सप्ताह आणि विविध स्पर्धांमध्ये प्राविण्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार तसेच किचन शेड चे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन परिसरातील इंदिरा गांधी माध्यमिक विद्यालय सोबतच राजीव गांधी नगरपरिषद प्राथमिक मराठी शाळा तसेच सावित्रीबाई फुले नगर परिषद प्राथमिक मराठी कन्या शाळा यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना इंदिरा गांधी नगर परिषद विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. सोनखासकर यांनी नगरपरिषद शाळांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांचा उहापोह केला. कार्यक्रमासाठी पालक वर्ग तसेच प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे संचालन हेमंत शास्त्री यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी तिन्ही शाळेतील शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम केले.

# गुरू रविदास जयंती महोत्सवाचे आज जिल्हास्तरीय आयोजन

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**अकोला, दि. ३१ :** चर्मकार समाजातील विविध १२ संघटनांच्या संयुक्त पुढाकारातून गुरू रविदास जयंती महोत्सवाचे जिल्हास्तरीय आयोजन रविवार, दि. १ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी २ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कर्ष प्रतिष्ठान, खडकी (अकोला) येथील सभागृहात करण्यात आले आहे. अकोला जिल्ह्यात प्रथमच सामूहिक स्वरूपात गुरू रविदास जयंती उत्साहात साजरी करण्यात येणार आहे.

जयंती महोत्सवानिमित्त अकोला शहरात उभारण्यात येणाऱ्या संत रविदास प्रतिष्ठान इमारतीचे भूमिपूजन, गुरू रविदास जयंती महोत्सव, तसेच समाजातील शासकीय अधिकारी व कर्मचारी संघटनबांधणी आदी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास सेवानिवृत्त मुख्य सचिव जे. पी. डांगे, डॉ. विठ्ठल दांडगे (अध्यक्ष, रोसा सोसायटी, महाराष्ट्र), प्रा. मुकुंद भारसाकळे (अध्यक्ष, डॉ. बाबासाहेब आंबेडकर बहुउद्देशीय उत्कर्ष प्रतिष्ठान, अकोला), लक्ष्मणराव घुमरे (बुलढाणा), प्रकाश शेकोकार (नगराध्यक्ष, शेगाव नगरपरिषद), धनंजय ढबाले (नवनियुक्त नगरसेवक, अकोला मनपा) तसेच संदीप शेगोकार यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. कार्यक्रमाचे नियोजन डॉ. गणेश बोरकर (गुरू रविदास प्रतिष्ठान, अकोला), प्रा. गजानन पदमने (ज्येष्ठ नागरिक संघ, अकोला), गजानन भटकर (राष्ट्रीय चर्मकार महासंघ), मधुकर वानेडकर (गुरू रविदास चॅरिटेबल ट्रस्ट), डॉ. आप्पा डामरे आणि एड. शेषराव गव्हाळे (समन्वयक, रोसा संघटना) यांनी केले आहे. याशिवाय अरुण परोळकर (चर्मकार सेवा समिती, मोठी उमरी, अकोला), प्रकाश ठोंबरे (गुरू रविदास चर्मकार महासंघ, अकोला), पांडुरंग वाडेकर (ज्येष्ठ नागरिक महासंघ, अकोला), मधुसुधन गव्हाळे (संत सोनाजी महाराज संस्थान, कवठा बहादुरा), श्रीकृष्ण सावळे गुरुजी (दक्षिण विभाग, समस्त चर्मकार समाज, अकोला) आणि शिवलाल इंगळे (चर्मकार युवक संघटना, लहान उमरी, अकोला) यांचा आयोजनात सहभाग आहे. गुरू रविदास जयंती महोत्सवानिमित्त आयोजित विविध कार्यक्रमांना समस्त चर्मकार समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## प्रेक्षक दुरावले | मंगरुळपीर यात्रेत लोकनाट्यांना परवानगीची मागणी

# तमाशा लोककला नामशेष होण्याच्या मार्गावर

। फुलचंद भगत ।



> आमच्या पिढ्यांनी ही कला जपली, पण आता शेकडो कलाकारांचे कुटुंब पोसायचे कसे? जागा, सुरक्षा आणि प्रशासन अशा सर्वच पातळीवर आमची अडवणूक होत आहे.
> **-कलाकार,** आनंद लोकनाट्य तमाशा मंडळ

**मंगरुळपीर, दि. ३१ :** कधीकाळी ग्रामीण जनतेच्या हृदयात घर करून असलेली तमाशा ही जिवंत लोककला आज अस्तित्वाच्या कड्यावर येऊन ठेपली आहे. महाराष्ट्रातील एकेकाळी १७ असलेली लोकनाट्य-तमाशा मंडळे आता बोटावर मोजण्याइतकीच उरली असून, दर्दी प्रेक्षक दुरावल्याने तमाशा अंतिम घटका मोजू लागल्याचे चित्र आहे. टीव्ही व मोबाईलच्या युगात मनोरंजनाची साधने घराघरांत पोहोचल्याने ग्रामीण भागातून तमाशाचा प्रेक्षक वर्ग झपाट्याने कमी झाला. त्यातच सुरक्षेच्या कारणावरून पोलीस व स्थानिक प्रशासनाकडून परवानग्या नाकारल्या जात असल्याने तमाशा फडांपुढे मोठे संकट उभे राहिले आहे. पाऊस, वादळ यांसारख्या नैसर्गिक आपत्ती, आर्थिक पिळवणूक, फड उतरविण्यासाठी जागेचा प्रश्न यामुळे तमाशा कलावंतांचा संघर्ष अधिकच तीव्र झाला आहे. पिढ्यान्पिढ्या ही लोककला जपण्याचा आम्ही प्रामाणिक प्रयत्न केला. मात्र आज दुरावलेला प्रेक्षक, प्रशासनाच्या अडचणी आणि वाढती खर्चिक व्यवस्था यामुळे कलावंत व त्यांच्या कुटुंबांचा उदरनिर्वाह कसा करायचा, हा प्रश्न निर्माण झाला आहे,अशी खंत आनंद लोकनाट्य तमाशा मंडळाच्या कलाकारांनी व्यक्त केली. माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या काळात तमाशा संवर्धनासाठी दर तीन वर्षांनी एका फडाला आठ लाख रुपयांचे विशेष पॅकेज देण्यात येत होते. मात्र, गेल्या काही वर्षांपासून हे पॅकेज बंद झाल्याने तमाशा मंडळांची अवस्था अधिक बिकट झाली आहे. शासनाने वेळीच ठोस पावले उचलली नाहीत, तर उरलीसुरली तमाशा मंडळेही इतिहासजमा होतील, अशी भीती व्यक्त होत आहे. दरम्यान, विदर्भातील प्रसिद्ध संत बिरबलनाथ महाराज यात्रा मंगरुळपीर येथे दहा दिवस चालते. पूर्वी या यात्रेत तमाशा व लोकनाट्यांची रेलचेल असायची आणि दर्दी प्रेक्षकांची मोठी गर्दी जमायची. मात्र, अलिकडच्या काळात सुरक्षेचे कारण पुढे करून लोकनाट्य व तमाशा मंडळांना परवानग्या नाकारल्या जात आहेत. मंगरुळपीरसारख्या ग्रामीण भागात मनोरंजनाची साधने मर्यादित असल्याने नागरिक वर्षभर यात्रेची वाट पाहतात. अश्लीलता टाळून प्रबोधन करणाऱ्या लोकनाट्य-तमाशांना परवानगी द्यावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

# अकोटमध्ये संत गजानन महाराजांच्या जीवनावर आज भव्य महानाट्य

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**अकोट, दि. ३१ :** छत्रपती शिवबा बहुउद्देशीय सेवा शिक्षण संस्था, अकोट आणि युवा प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने १ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता स्थानिक दर्यापूर मार्गावरील शिवाजी महाविद्यालयाच्या प्रांगणात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. संत दासगणू महाराज लिखित 'श्री गजानन विजय' ग्रंथावर आधारित 'गणू : गण गण गणात बोते' हे भव्य महानाट्य यावेळी निःशुल्क सादर करण्यात येणार आहे. तब्बल २०० कलावंतांचा सहभाग असलेल्या या महानाट्यातून श्री संत गजानन महाराजांचा संपूर्ण जीवनप्रवास रंगमंचावर साकारला जाणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार संजय गावंडे राहणार असून, उद्घाटन आमदार प्रकाश भारसाकळे यांच्या हस्ते संपन्न होईल. या सोहळ्याचे स्वागताध्यक्ष म्हणून नवनीत लाखोटिया, आयोजक म्हणून संतोष गजानन खवले आणि कार्याध्यक्ष म्हणून वैभव जगताप हे जबाबदारी सांभाळत आहेत. महानाट्यासोबतच अकोट शहराच्या विकासासाठी मोलाचे योगदान देणाऱ्या मान्यवरांचा नागरी सत्कार व पुरस्कार वितरणही यावेळी करण्यात येणार आहे. विशेष आकर्षण म्हणून विविध 'रील्स स्टार्स'ची उपस्थिती या सोहळ्याला लाभणार आहे. तरी भाविक भक्तांनी व नागरिकांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहून या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक संतोष खवले यांनी केले आहे.

अजिंक्य भारत

# आपलं बुलडाणा

बुलडाणा, रविवार, दि.१ फेब्रुवारी २०२६



## महत्वाचे

### रहदारीस अडथळा; दोघांविरोधात गुन्हा

**खामगाव :** रस्त्याच्या मधात हातगाडी उभी करून व्यवसाय करणाऱ्या दोघांविरोधात शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. प्राप्त माहितीनुसार, बर्डे प्लॉट भागातील सैय्यद सादीक सैय्यद खलील आणि जुना पोस्ट ऑफिस जवळील शेख नसीर शेख निसार या दोघांनी रस्त्यावर हातगाडी उभी करून व्यवसाय करताना रहदारीस अडथळा निर्माण केल्याप्रकरणी दोघांविरोधात भारतीय न्याय संहिता कलम १२५ अन्वये गुन्हा दाखल केला. याप्रकरणी पोकाँ रमेश महादेव काकड यांनी तक्रार नोंदविली. तक्रारीत फळाची गाडी रस्त्याच्या मधोमध उभी करुन नागरिकांच्या जीवीत्वास धोका निर्माण केल्याचे नमूद केले. त्यावरुन शहर पोलिसांनी उपरोक्त दोघांविरुध्द गुन्हा दाखल केला.

### वाहनाच्या धडकेत इसमाचा मृत्यू

**नांदुरा :** जळगाव रोडवर हॉटेल शिवनेरी समोर अज्ञात वाहनाने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने या अपघातात एकाचा घटनास्थळी मृत्यू झाला तर दुसरा गंभीर जखमी झाला. जखमीला खामगाव येथे हलविण्यात आले. ही घटना ३० जानेवारी रोजी रात्री साडे सातच्या सुमारास घडली. मृतक आणि जखमी या दोघांचीही ओळख पटली नव्हती. परंतु हे दोघेही जण पिंपरी देशमुख येथील एका खदानवर कामाला असल्याची चर्चा सुरू होती. दोन्हीही तरुण एका दुचाकीने जळगांव जामोदकडून नांदुऱ्याकडे येत असताना त्यांच्या दुचाकीला अज्ञात वाहनाने धडक देऊन वाहन निघून गेले.

### तरुणाला डोक्यात मारुन जखमी केले

**खामगाव :** एका २० वर्षीय तरुणाला जिमच्या खाली बोलावून शिवीगाळ करुन त्याच्या डोक्यावर लोखंडी अवजाराने मारुन जखमी केल्याची घटना २८ जानेवारी रोजी रात्री ८ वाजता पंचायत समिती समोर घडली. याबाबत असे की वैष्णव राजेश काचकुरे (२०) रा. शनी पॅलेस आदर्श नगर खामगाव याने शहर पोस्टेला दिलेल्या तक्रारीत म्हटले की आर्यन राहुल तायडे (२५) रा. शंकर नगर याने मला फोन करुन जिमच्या खाली बोलावले व शिवीगाळ केली तसेच लोटपाट करुन आर्यन याने त्याच्या हातातील लोखंडी अवजाराने माझ्या डोक्यावर मारुन जखमी केले. मी त्यास विचारले की का मारतो असे विचारले असता आर्यन याने म्हटले की २६ जानेवारीला काय केले असे म्हटले. शहर पोलिसांनी आरोपी आर्यन राहुल तायडे याच्या विरुध्द कलम ११५ (२), ११८ (१), ३५२ बीएनएस नुसार गुन्हा दाखल केला. पुढील तपास खामगाव शहर पोलिस स्टेशनचे ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेकॉं सचिन गीते करीत आहे.

### तरुणी बेपत्ता



**मलकापूर :** मलकापूर येथील श्री संत गजानन नगर येथील २३ वर्षीय कु. प्राजक्ता उल्हास सेले ही वडिलांसोबत खामगावच्या वाडी येथे काकांच्या घरी आली होती. तिची वडिल मलकापूर येथे परत गेले. तर कु. प्राजक्ता ही वाडी येथून बेपत्ता झाल्याची तक्रार शहर पोलिसात देण्यात आली. प्राजक्ता ही मलकापूरच्या एका तरुणासोबत गेल्याचा संशयही तक्रारीत नमूद करण्यात आला आहे.

**कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव**

| वान | भाव |
|---|---|
| ज्वारी | १९५० - २०२५ |
| गहू | २२०० - २४०० |
| तुर | ५१०० - ७७०० |
| हरभरा | ३८०० - ५३०० |
| सोयाबीन | ४८०० - ६१५० |
| उडीद | ४००० - ६३५० |
| मुग | ५५०० - ५५०० |
| मका | १६०० - १६०० |

# किन्होळा, गणेशपुर आणि जानेफळ प्राथमिक आरोग्य केंद्राला 'राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानांकन' पुरस्कार

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी




**बुलडाणा दि.३१ :** सार्वजनिक आरोग्य सेवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी केंद्र सरकारने सुरू केलेल्या राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानांकनाची एक यादी नुकतीच प्रसिद्ध झाली आहे. या यादीमध्ये राज्यातील ५ प्राथमिक आरोग्य केंद्राचा समावेश आहे. त्यातील ३ प्राथमिक आरोग्य केंद्र हे बुलढाणा जिल्ह्यातील आहे. तर २ प्राथमिक आरोग्य केंद्र धाराशिव(उस्मानाबाद) जिल्ह्यातील आहेत. राष्ट्रीय गुणवत्ता मानांकन प्राप्त करणाऱ्या प्राथमिक आरोग्य केंद्रातील उत्तम आरोग्य सेवा देणाऱ्या सर्वच कर्मचाऱ्यांचे केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी अभिनंदन केले आहे.

आरोग्यसेवाची गुणत्तता सुधारण्याच्या दृष्टिकोनातून केंद्र सरकारच्यावतीने राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानांकन पुरस्कार देण्यात येतात. प्राथमिक आरोग्य सेवा केंद्रात दिले जाणारे तातडीचे उपचार, रुग्ण रेफरचे प्रमाण, प्रसूती, रुग्णांसाठी असलेली आरोग्य सेवा, परिसर स्वच्छता, उद्यान, अत्याधुनिक यंत्रांचा वापर वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती यासह इतर बाबींना केंद्रबिंदु ठेवून पुरस्कारासाठी तपासणी करण्यात येते. ७ जानेवारी ते १८ जानेवारी २०२६ दरम्यान केंद्रीय परीक्षकांनी मुद्देनिहाय तपासणी करुन या संदर्भाचा अहवाल केंद्रीय समितीस सादर केला होता. राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानकांचा एक अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे. या यादीमध्ये राज्यातील ५ प्राथमिक आरोग्य केंद्राचा समावेश आहे त्यातील ३ प्राथमिक आरोग्य केंद्र हे बुलढाणा जिल्ह्यातील आहे तर दोन धाराशिव( उस्मानाबाद) जिल्ह्यातील आहेत. राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानांकनामध्ये बुलढाणा जिल्ह्यातील चिखली तालुक्यामधील प्राथमिक आरोग्य केंद्र किन्होळा, खामगाव तालुक्यामधील प्राथमिक आरोग्य केंद्र गणेशपुर व मेहकर तालुक्यामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र जानेफळ, यांचा समावेश आहे. तर धाराशिव जिल्ह्यातील दहिपाल, अनाळा या प्राथमिक आरोग्य केंद्राचा समावेश आहे. राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासक मानांकन मध्ये पुरस्कार प्राप्त करणाऱ्या प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टर्स व कर्मचाऱ्यांचे केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी अभिनंदन केले आहे.

ना. प्रतापराव जाधव यांना आरोग्य अधिकाऱ्यांनी केले होते आश्वस्त


केंद्रीय आयुष आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी बुलढाणा येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनांमध्ये बैठक घेतली होती.या बैठकीदरम्यान राष्ट्रीय आरोग्य सेवेच्या मानांकनामध्ये जिल्ह्याच्या आरोग्य सेवेचा समावेश व्हावा अशी अपेक्षा केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी व्यक्त केली होती. त्यासंदर्भातील सूचना संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिल्या होत्या. यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अमोल गीते,नोडल अधिकारी तथा जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी डॉ. मिलिंद जाधव, जिल्हा सार्वजनिक आरोग्य परिचारिका शितल साखळीकर, कार्यक्रम सहाय्यक अमर राठोड जिल्हा हिवताप अधिकारी शिवराज चव्हाण यांनी जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांना मानांकन प्राप्त करुन देण्यासाठी त्यांना आश्वस्त केले होते.

# भरोसा परिसरातील झाडांवर सुगरण पक्ष्यांची घरटी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.३१ :** सुगरण पक्ष्यांनी भरोसा परिसरातील झाडांवर घरटी बनवली आहेत. एकेका झाडावर २५-३० घरटी लटकलेली दिसतात. सुगरणीचा खोपा विणकलेतील अदभुत नमुना अन निसर्गातील सुरक्षित निवारा मानला जातो. काही भागात सुगरणला देवचिमणी म्हणतात. एकीकडे चिमण्यांची संख्या कमी होत असतांना भरोश्यातील देवचिमण्यांची वसाहत पंचक्रोशीतील नागरिकांना भुरळ घालत आहे.

कोकीळेसारखे काही पक्षी वगळता सर्वच पक्षी विणीच्या काळात घरटी बांधण्यात व्यस्त दिसतात. काही पक्षी नदीच्या बट्टीत बिळे करून त्या आपली अंडी घालतात. काहींची झाडाच्या पोखरात तर काहींची डोंगराच्या कपारीत किंवा मोठ्या दगडांच्या आडोशाला. काहींची विद्युत खांबावर तर काहींची घरटी जुन्या दुर्लक्षित भिंतीच्या छिद्रात असतात. काहींची घरातील फोटोच्या मागे, काही पक्ष्यांची घरटी झाडावर काटक्यांच्या सहाय्याने बांधलेली असतात. काही घरटी जमिनीच्या दिशेने लोंबकळणारी असतात, तर काही पाण्यात तरंगणारी असतात. सर्वच घरटी सुंदर नसतात. पण पक्षी जगतामध्ये सुगरण पक्ष्याची घरटी नयनरम्य आकर्षक असते. या वसाहतीत घरटी बांधण्याचे काम नर सुगरणपक्षी करताना दिसतो. बारीक चोचीने पढार, भूईशिंदी, दातेरी गवत, ऊसाचे बारीक पाते घरटी तयार करण्याकरिता वापरतो. ही घरटी तयार करताना बाभूळ, बोर, शिंदी, हिवर, अंजन, येण इत्यादी झाडांची निवड करतो. गारूड्याच्या पुंगीसारखे घरटे सुगरण नराच्या कौशल्यातून साकार होते. आपले कौशल्य पणाला लावून पृथ्वीच्या पाठीवर एक अद्भूत शिल्प सुगरण तयार करते. खानदेशातील



कवयित्री बहिणाबाई चौधरी यांना सुगरणीच्या खोप्याबद्दल विलक्षण वेड जडले होते. घरट्याचे अप्रतीप सौंदर्य त्यांना भावले होते. सुगरणमध्ये नर मादी हा भेद सहज ओळखता येतो. नर पिवळाधमक असून मादी त्यामानाने धुसर असते. नराचे डोळे पिवळे, घशाचा भाग काळा, उर्वरीत छातीचा भाग भुरकट पिवळसर असतो. पाठीवरील भाग गाव चिमण्यासारखा दिसतो. मादी सुगरणीवर पुसटशी पिवळसर झलक आढळून येते. नर हा उत्तम कारागिर आहे. घरटी बांधण्याचे सारे त्रस्त त्याला विकसीत आहे. या घरट्याची लांबी तीन फुटापर्यंत असते. काही घरटी कमी जास्त लांबीची असतात. सुंदर घरटी बांधणे, आपल्या रुपरंगामुळे माद्यांना आकर्षीत करणे आणि प्रजोत्पादन करणे एवढेच नराचे काम असल्यामुळे बहिणाबाईंनी त्याला गण्यागंप्या नर असे म्हटले आहे. नर अनेक माद्यांचा संसार चालवत असल्यामुळे त्याला बायकांचा दादला असा अर्थ लेखक विनोद भोवते यांना अभिप्रेत आहे.

# एसआयआत जनजागृती कार्यक्रम



अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.३१ :** देशातील अनेक राज्यात एसआयआर कायदा लागू करण्यात आला आहे. प्रत्येकाला २००२ पूर्वीच्या मतदार यादीत नांव असल्याचं पुरावा द्यावं लागत आहे.हा कायदा महाराष्ट्रात देखील लागू होणार असून त्या पूर्वी सामान्य नागरिकांच्या मनातील भीती दूर करून या कायद्याबाबत जनतेत जागृती व्हावी या उद्देशाने आज शुक्रवारी दुपारी बुलडाणा येथील हुसैनिया मस्जिद समोर सलाहुद्दीन अय्युबी डेव्हलपमेंट ग्रुपच्या वतीने जनजागृती कार्यक्रम उत्साहात घेण्यात आला. यावेळी अनेक नागरिकांना या कायद्याची माहिती देण्यात आली. तसेच या कायद्या बद्दल मनात कोणतीही भीती बाळगू नये व कायदा लागू झाल्यावर देखील सलाहुद्दीन अय्युबी डेव्हलपमेंट ग्रुपच्या वतीने नागरिकांना योग्य ते मार्गदर्शन केले जाईल, अशी माहिती ग्रुपच्या पदाधिकाऱ्यांनी दिली आहे.

# डॉ.गजेंद्र निकम यांची पक्षी छायाचित्र प्रदर्शनी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.३१ :** पहिल्या विद्यार्थी पक्षी संमेलनातील पुरस्कार जाहीर झाले. रविवारी १ फेब्रुवारी रोजी बुलढाण्यातील पहिले विद्यार्थी पक्षी संमेलन बुलढाणा वनविभाग, अकोला वनविभाग, निसर्ग कट्टा अकोला आणि मृण्मयी मल्टीपर्पज सोसायटी बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले आहे.

या संमेलनात मृण्मयी मल्टीपर्पज सोसायटीच्या वतीने प्रदान करण्यात येणाऱ्या दोन पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. पक्षी मित्र कृतज्ञता पुरस्कार सुंदरखेड बुलढाणा येथील राहुल हरी चव्हाण यांना जाहीर करण्यात आला आहे. आज आपल्याला अवतीभोवती चिमणीचे दर्शन दुर्मिळ झालेले असताना ,राहुल चव्हाण यांनी आपल्या घराच्या सभोवताली अनेक चिमण्यांना निवारा उपलब्ध करून दिला आहे, त्यांच्या चारापाण्याची सोय केली आहे आणि त्यांच्या प्रयतांना यश म्हणून आजही आपल्याला त्यांच्या घराभोवती असंख्य चिमण्या पाहायला मिळतात. या त्यांच्या स्वतःच्या समाधानासाठी केलेल्या पर्यावरण पूरक आणि पोषक कृतीचा सन्मान म्हणून त्यांना कृतज्ञता पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. तसेच पुढील पिढीला प्रेरणा मिळावी म्हणून या संमेलनात बाल पक्षीमित्र मल्हार विनायक हिंगणे याला दीपस्तंभ पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. बालपक्षी मित्र असलेला मल्हार अगदी लहान वयापासून पक्षी निरीक्षण तर करतोच परंतू त्यांच्या नोंदी देखील तो ठेवतो, वैयक्तिक पातळीवर अनेक छोटे पर्यावरण पुरक उपक्रम तो राबवत असतो. आपल्या पक्ष्यांच्या कॉमिक्स मधून पक्ष्यांविषयी जनजागृती करण्याचा त्याचा प्रयत्न असतो. याच प्रयत्नांना प्रेरणा मिळावी,भावी पिढीलाही निसर्ग वाचनाची गोडी निर्माण व्हावी म्हणून दिल्या जाणारा दीपस्तंभ पुरस्कार मल्हार विनायक हिंगणे याला प्रदान करण्यात येणार आहे. कु.सईशा स्वप्नील काळवाघे हिची या पहिल्या संमेलनाची अध्यक्षा म्हणून निवड करण्यात आली. याबद्दल कु.सईशा हिचे व पुरस्कार विजेत्यांचे बुलढाणा वनविभाग उपवनसंरक्षक श्रीमती सरोज गवस, मृण्मयी मल्टीपर्पज सोसायटीच्या अध्यक्षा डॉ. वैशाली गजेंद्र निकम, निसर्ग कट्टा ,अकोला या संस्थेचे संस्थापक अमोल सावंत यांनी अभिनंदन केले आहे.

# प्रजासत्ताकदिनी सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात


अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**दुसरबीड दि.३१ :** येथील भगवान बाबा शिक्षण प्रसारक मंडळ रूम्हणा संचलित ज्ञानेश्वर विद्यालय व ज्ञानेश्वर मराठी प्राथमिक शाळेच्या वतीने ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त भव्य ध्वजारोहण व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

हा कार्यक्रम सोमवार, दि. २६ जानेवारी २०२६ रोजी अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रतिष्ठित नागरिक सुनील किसन मांटे तर अध्यक्ष म्हणून राजेश संपतराव ससाणे उपस्थित होते सोबतच भगवान बाबा शिक्षण प्रसारक मंडळ रूम्हणा,संस्थेचे सचिव शिवराज कायंदे व अभियंता विकासजी सांगळे हेही उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत, नृत्य, भाषणे व नाट्यछटा सादर करून उपस्थितांची मने जिंकली.कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या कला-गुणांना उपस्थित मान्यवर, पालक व ग्रामस्थांकडून भरभरून दाद मिळाली. देशप्रेम, एकता व संविधानाच्या मूल्यांवर आधारित सादरीकरणामुळे कार्यक्रमाची शोभा अधिकच वाढली.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तथा आभार प्रदर्शन प्रा. जगदिश यादव यांनी केले तर कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व शाळा व्यवस्थापन समितीने विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमासाठी जी के नागरे सर,ए बी आंधळे सर ,यु बी लांडगे सर,कुरेशी सर,डाखोरे सर, शर्मा मॅडम,प्रा.यादव सर, नदीम सर, यांनी परिश्रम घेतले.

# पिंपळगाव राजा-नांदुरा मार्गावर वाहन चालक ग्रामस्थांच्या मदतीने जेरबंद

**पिंपळगाव राजा दि.३१ :** पिंपळगाव राजा पोलीस स्टेशनच्या हद्दीत पिंपळगाव राजा ते नांदुरा या मुख्य मार्गावर सोमवारी सायंकाळच्या सुमारास थरारक पाठलागाची घटना घडली. एम.पी. १३ सी.ई. २५०४ क्रमांकाची स्विफ्ट डिझायर कार पोलिसांच्या नजरेस पडताच चालकाने अचानक वेग वाढवून पळ काढल्याने संशय बळावला. यावेळी पिंपळगाव राजा पोलीस स्टेशनचे ठाणेदार भागवत मुळीक हे स्वतः पोलिसांच्या गाडीत उपस्थित होते. परिस्थितीचे गांभीर्य ओळखत त्यांनी तात्काळ पाठलाग सुरू केला. काही अंतरावर




ज्ञानगंगा पूर्व गावाजवळ संशयित चालकाने कार रस्त्यावरच सोडून शेतातून घाणेगावच्या दिशेने पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र, सतर्क ग्रामस्थांनी पोलिस कर्मचाऱ्यांसोबत तत्काळ धाव घेत आरोपीला पकडण्यात यश मिळवले. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली होती. घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी (डीवायएसपी) प्रदीप पाटील यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देत पुढील चौकशीचे आदेश दिले आहेत. या कारवाईमुळे पोलिसांची तत्परता, ठाणेदार भागवत मुळीक यांचे प्रभावी नेतृत्व तसेच ग्रामस्थांचे सहकार्य यामुळे मोठा अनर्थ टळल्याची चर्चा परिसरात होत आहे. पुढील तपास पिंपळगाव राजा पोलीस करत आहेत.

# इसोलीतील चौकांना दिली महापुरुषांची नावे

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.३१ :** इसोली नगरीमध्ये इसोलीतील मुख्य चौकांचे व नगरांचे नामकरण करण्यात आले २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त काल झालेल्या ग्रामसभेमध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या तालुकाप्रमुख सौ. अनिता गोविंद येवले यांच्यासोबत समस्त शिवसैनिक यांनी शेकडो सह्या देऊन ईसुलीतील मुख्य रस्त्यांना व चौकांना कमानीला काही नगरांना महापुरुषांची नावे देण्याची मागणी केली होती. ती एकमताने गावकऱ्यांच्या मंजूर करण्यात आली. त्यामध्ये ग्रामपंचायत परिसरातील चौकाला छत्रपती शिवाजी महाराज



चौक डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ परिसराला भीम नगर ,मज्जित जवळ भागाला एपीजे अब्दुल कलाम चौक, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याजवळील भागाला लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नगर, वडर बांधव जिथे राहतात त्या भागाला जय बजरंग नगर, संत गजानन महाराज मंदिरा जवळ संत गजानन महाराज चौक, डॉक्टर वाडेकर यांच्या घराच्या जवळ संत रोहिदास महाराज तर जुने लोक झोपडपट्टी म्हणत त्या भागाला काळुंका माता नगर व लागे यांच्या शेतामध्ये इसा माता नगर, इसोली गावामध्ये आगमन प्रसंगी प्रथम असणाऱ्या ग्रामपंचायतीच्या कमानीवर धर्मवीर संभाजी महाराज प्रवेशद्वार हे नामकरण केले. त्याचबरोबर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या कमानीवर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर प्रवेशद्वार या नामकरणाला मंजुरात द्यावी व गावच्या सौंदर्यामध्ये भर पडावी आणि महापुरुषांची आठवण सदैव आपल्याला राहावी त्यासाठी सदर मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने करण्यात आली होती. त्यावेळेस शिवसेना तालुकाप्रमुख महिला आघाडी सौ.अनिता गोविंद येवले, उपतालुकाप्रमुख सुभाष आटोळे, माजी सरपंच दामोधर अण्णा येवले, समाधान धनलोभे, सुनील शुक्ला, विठ्ठल जाधव, शहीद भाई, शिवसेना शाखाप्रमुख दादाराव पवार, भगवानराव शिंदे, दीपक सावंत डॉ. मारुती वाडेकर, संदीप वाडेकर, श्रीकृष्ण पानसंबळ, प्रकाश येवले, माधवराव घनगाव, दिलीप जी शेळके, विष्णू झरेकर, दत्तात्रय लाघे, अमोल झरेकर, इतर गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

**निवड** — अध्यक्षपदी तेजराव तेजनकर तर सचिवपदी गजानन धोटे बिनविरोध

# सेवा शक्ती संघर्ष संघटनेची मेहकर आगाराची कार्यकारिणी घोषित

अंजिक्य भारत / प्रतिनिधी

**मेहकर दि.३१ :** भारतीय जनता पार्टीची अंगीकृत असणारी सेवाशक्ती संघर्ष एस.टी.कर्मचारी संघ,महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष मा.आ.गोपीचंद पडळकर तसेच मुख्य कार्याध्यक्ष आ.सदाभाऊ खोत तर सरचिटणीस सतीश मेटकरी यांच्या आदेशाने संपूर्ण महाराष्ट्रातील प्रत्येक आगारामध्ये व विभागांमध्ये नवनिर्वाचित कार्यकारिणीच्या निवडी मोठ्या जल्लोषात होत असल्याने दि.२७ जानेवारी २०२६ रोजी बुलढाणा विभागातील मेहकर आगाराची कार्यकारणी वरिष्ठ पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली खेळीमेळीच्या वातावरणात बिनविरोध निवडण्यात आली.

यामध्ये निवडण्यात आलेले नवनिर्वाचित मेहकर आगाराचे आगार अध्यक्ष तेजराव तेजनकर,



कार्याध्यक्ष सुवर्णसिंग जाट,सचिव गजानन धोटे, सहसचिव गणेश मोसंबे, कोषाध्यक्ष नारायण साबळे, प्रसिद्धीप्रमुख गजानन उबाळे, उपाध्यक्ष भगवान कांबळे व प्रतापराव राजगुरू, महिला प्रतिनिधी शिल्पा धोटे, कर्मचारी प्रतिनिधी अंगतराव चव्हाण यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. मेहकर आगार कार्यकारिणीच्या निवडीसाठी वरिष्ठ पदाधिकारी म्हणून राज्य सरचिटणीस ुनील पाटील, बुलढाणा विभागाचे ज्येष्ठ नेते शिवाजी आनंदे, सतीश पाटील तेजनकर, सचिन लोखंडे, दत्ताभाऊ ढवळे, छगनराव मुळे, गणेश जाधव, रामेश्वर ठाकरे, रवी खेडकर, पुरुषोत्तम टिकार, अंकुश पाटील शिंदे, संतोष सोनूने, जि.एम.वाघमारे, राजू तळेकर,शंकर राठोड, व इत्यादी विभागीय सर्व पदाधिकारी, बुलढाणा विभागातील सर्व आगारातील पदाधिकारी आणि मेहकर आगारातील बरेच कर्मचारी हजर होते. उपस्थित सर्व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करताना राज्य सरचिटणीस सुनील पाटील आणि जेष्ठ नेते शिवाजी आनंदे यांनी कर्मचाऱ्यांना कुठलीही अडीअडचण येऊ देणार नाही आणि आलीस तर त्यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहू अशी ग्वाही दिली तर सतीश पाटील तेजनकर व छगनराव मुळे यांनी सूद्धा खांद्याला खांदा लावून सोबत काम करण्याची ग्वाही दिली.तर नवनिर्वाचित सर्व पदाधिकाऱ्यांनी मेहकर आगारात सभासद वाढविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

बिनविरोध निवड झालेली नवनिर्वाचित कार्यकारणी सर्वांनमिळून मेहकर आगाराचे आगार व्यवस्थापक हर्षल साबळे यांना देऊन नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना सहकार्य करण्याची अपेक्षा केली तर आगार व्यवस्थापक यांनी सुद्धा कोणत्याही कर्मचाऱ्यांवर अन्याय होऊ देणार नाही असे सांगितले.

# धामणगांव ते शेगांव पायी दिंडी रवाना

## दिंडीत ३०० ते ४०० महिला पुरूषांचा समावेश

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**धामणगाव दि.३१:** बुलढाणा तालुक्यातील धामणगांव येथुन दिं २९ रोजी गुरुवारी सकाळी अवघ्या महाराष्ट्राचे दैवत असलेले संत श्री गजानन महाराज यांचे प्रगटस्थान असलेल्या संतनगरी शेगाव येथे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी पायी दिंडीचे हे ७ वर्षे असून पायी दिंडी सोहळाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी धामणगांव येथील श्री गजानन महाराज साई बाबा संस्थान मंदिरापासून मोठ्या उत्साहात व भक्तीमय वातावरणात गावातून निघाली यावेळी केळीच्या पानांनी व फुलांनी सजवलेल्या गाडीत गजानन महाराज यांची मुर्ती ठेवुन टाळ मुदृग ढोल - ताशाच्या गजरात मोठ्या उत्साहात ११० कि मी अंतर असलेल्या पायी दिंडी शेंगावकडे रवाना झाली. यावेळी



गावातील महिलांनी आपआपल्या घरासमोर मोठ-मोठ्या सुशोभित अशा रांगोळ्या काढुन गावात असे भक्तीमय वातावरण निर्माण झाल्याचे दिसून आले. गण गण गणात बोते अशा जयघोषात दिंडी निघाली तर दिंडीत अनेक महिलांनी एकसारख्या पिवळ्या साड्या परिधान केल्या होत्या. यावेळी महिलांनी डोक्यावर तुळशीवृंदावन व कळस घागरी व हातात भगवे झेंडे घेवून तसेच पुरूषांनी एकसारखे पांढरेशुभ्र कपडे परिधान करून जय गजाननाच्या गजरात जयघोषात भव्य दिंडी मिरवणूक काढली. मिरवणूकीत जवळपास ३०० ते ४०० महिला पुरूष सहभागी झाले होते. दिंडी चार दिवसाच्या मुक्कामासाठी जात असल्याने दिंडीत फुगडी, मनोरंजन, किर्तन, भारूड, भजन, पावलीनृत्य आदी सादर होत असून पहिला मुक्काम कोलवड, दुसरा वरवंड तिसरा रोहणा फाटा चौथा अन्नकुटी श्री गजानन महाराज मंदिर, आदी ठिकाणी मुक्कामी राहणार असल्याचे यातील काही दिंडीत सहभागी असलेल्यानी सांगितले या दिंडीत भाविकांसाठी जेवण चहा, नाश्ता , फराळ ,फळे वाटप आदी नियोजन करण्यात आले आहे.

## महत्त्वाचे

### तरूणाची आत्महत्या

**खामगाव :** घाटपुरी येथील गुरूदत्त नगर (चोपडे यांच्या मळ्याजवळ) मधील रहिवासी गौरव संतोष धाणखेडे (१९) या तरूणाने घराच्या छताच्या कडीला दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना आज ३१ जानेवारी २६ रोजी सकाळी ७ वा.च्या सुमारास उघडकीस आली. याप्रकरणी रमेश ज्ञानदेव घाणखेडे यांनी शिवाजी नगर पोस्टेला फिर्याद दिली. फिर्यादीवरून पोस्टेमध्ये कलम १९४ भान्यासुसंनुसार मर्ग दाखल केला आहे. पुढील तपास पोकॉ. शैलेंद्रसिंग राजपुत करीत आहे.

### आनंद अनूभुती शिबीराचे आयोजन

**खामगाव :** श्री रविशंकरजी यांच्या प्रेरणेने आर्ट ऑफ लिव्हींग खामगावच्या वतीने आनंद अनूभुती शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. सदर शिबीर श्री देवजी खिमजी मंगल कार्यालय येथे ३ ते ८ फेब्रुवारी पर्यंत सकाळी ६ ते ८.३०, दुपारी ३ ते ५.३० व संध्याकाळी ६ ते ८.३० यावेळेत होणार आहे. शिबीरात योग, प्राणायाम, ध्यान, जीवनाला सहज सरळ बनविण्याचे सुत्र व सुदर्शन क्रिया शिकविली जाणार आहे. शिबीरात १८ वर्षावरील पुरुष-महिला सहभाग घेऊ शकतात. यासाठी नाव नोंदणी आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी दिप्ती नेमा मो. ९३७३३१७७८१, दिपा पुरोहित मो. ८६००२१४६३४, महादेव धांडे मो. ७९७२१२५४०२, रविंद्र निर्मळ मो. ९८२२५५२५७५, कोमल बजाज मो.८५८००८४०६३ व श्याम पाटील मो. ९८९०६८६२७७ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन आयोजकांच्या वतीने प्रशांत जवरे मो. ९४०४६९३९५२ यांनी केले आहे

### संत रविदास महाराज जयंतीनिमित्त कार्यक्रम

**खामगाव :**श्री संत रविदास महाराज जयंती उत्सव समिती चांदमारी खामगाव यांच्या वतीने संत रविदास महाराज जयंती.१ फेब्रुवार रोजी चांदमारी भागातील रविदास महाराज यांच्या मंदिरामध्ये सकाळी ९ वाजता मान्यवरांच्या हस्ते आरती करण्यात येणार असून त्यानंतर सकाळी ९.३० वा. शोभायात्रा चांदमारी मंदिर इथून निघणार आहे शोभायात्रेमध्ये रथ, दिंडी, महिला भजनी मंडळ, समाज बांधव मोठ्या प्रमाणात सहभागी होणार आहे दिंडी व शोभा यात्रेमध्ये खामगाव परिसरातील समाज बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आव्हान श्री संत रविदास महाराज जयंती उत्सव समिती चांदमारी खामगाव च्या वतीने करण्यात आले आहे.

### विद्यार्थिनीच्या मृत्यूच्या चौकशीची मागणी

**खामगाव:** लातूर येथील जवाहर नवोदय विद्यालयातील इयत्ता ६वीतील विद्यार्थिनी कु. अनुष्का पाटोळे हिच्या संशयास्पद मृत्यूची एसआयटी चौकशी करण्यात यावी. असे निवेदन लहुजी शक्ती सेना तालुका खामगाव यांच्या वतिने तहसीलदार यांना २३ जानेवारी रोजी देण्यात आले आहे. यावेळी विविध मागण्या सदर निवेदनामध्ये नमूद करण्यात आल्या आहेत. या निवेदनावर तालुकाध्यक्ष अनंता सकळकळे यांच्यासह करण सकळकळे, योगेश नाटेकर, गोपाल भालेराव, शैलेश इंगळे व इतरांच्या सह्या आहेत.

### गळफास घेऊन इसमाची आत्महत्या

**खामगाव:** राहत्या घरात गळफास घेऊन इसमाने आत्महत्या केल्याची घटना तालुक्यातील अकोली येथे ३० जानेवारी रोजी घडली. याबाबत सौ. अश्विनी एकनाथ आवारे (३६) रा. अकोली ता. खामगाव यांनी हिवरखेड पोलीस स्टेशनला फिर्याद दिली. त्यामध्ये नमूद आहे की, त्यांचे हे एकनाथ बाबुराव आवारे (४०) यांनी शुक्रवारी राहत्या घरामध्ये टिनपत्र्याच्या लोखंडी पाईपला रुमालाच्या सहाय्याने गळफास घेवून मृत अवस्थेत दिसून आले. याप्रकरणी पोलिसांनी १९४ बीएनएस अन्वये मर्ग दाखल केला.

# नकली नोटांचे आमिष; दिल्लीच्या तरुणाची फसवणूक

अजिंक्य भारत / प्रतिनिधी



**मलकापूर दि.३१ :** स्वस्त दरात दुप्पटतिप्पट पैसे मिळवून देण्याचे आमिष दाखवून नागरिकांची फसवणूक करणाऱ्या नकली नोटा व तथाकथित चिल्ड्रन्स बँक ऑफ इंडियाच्या बनावट नोटांचे रॅकेट मलकापूर शहरात उघडकीस आले आहे. या प्रकरणात मलकापूर शहर पोलिसांनी मोठ्या शिताफीने कारवाई करत दोन आरोपींना अटक केली असून दिल्ली येथील एका अल्पवयीन तरुणाची फसवणूक होण्यापासून वाचवले आहे.

प्राप्त माहितीनुसार, दिल्लीच्या नंदनगरी (उत्तर-पूर्व दिल्ली) परिसरातील रहिवासी यश मदनलाल गडरोया (वय १५ वर्षे) याला २० हजार रुपयांच्या बदल्यात २ लाख रुपये मिळतील, असे आमिष दाखवण्यात आले होते. संबंधित रक्कम चिल्ड्रन्स बँक ऑफ इंडियाच्या बनावट नोटांच्या स्वरूपात देण्याचा डाव या टोळीने आखला होता. या व्यवहारासाठी मलकापूर शहरातील बसस्थानकाच्या बाजूच्या गल्लीत भेट निश्चित करण्यात आली होती. या प्रकरणात मलकापूर शहरातील भीमनगर परिसरात राहणारे आनंद संतोष इंगळे (वय २३ वर्षे) आणि रोहित रतन महाले (वय २२ वर्षे) यांनी अल्पवयीन मुलाला आमिष दाखवून फसवणूक करण्याचा प्रयत केला. मात्र, मिळालेल्या गुप्त माहितीनुसार मलकापूर शहर पोलिसांनी सापळा रचत योग्य वेळी कारवाई केली आणि दोन्ही आरोपींना ताब्यात घेतले. पोलिसांनी आरोपींकडून चौकशी सुरू केली असून या मागे आणखी मोठे रॅकेट सक्रिय असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. प्राथमिक तपासात खामगाव, शेगाव आणि मलकापूर शहर परिसरात नकली नोटांचे रॅकेट चालविणारे काही गट सक्रिय असल्याची माहिती पुढे आली आहे. विशेष म्हणजे, चिल्ड्रन्स बँक ऑफ इंडियाच्या नावाने छापलेल्या बनावट नोटांसह काही प्रमाणात नकली चलनी नोटांचाही वापर या टोळीमार्फत करण्यात येत असल्याचे पोलिस तपासात उघड झाले आहे. स्थानिक नागरिकांमध्ये या प्रकारामुळे मोठी खळबळ उडाली असून, यापूर्वीही अशा प्रकारच्या तक्रारी असूनही ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. पोलिस प्रशासनाला या रॅकेटबाबत माहिती असावी, मात्र वेळेवर कारवाई न झाल्याने गुन्हेगारांचे धाडस वाढत असल्याचे मत नागरिक व्यक्त करीत आहेत. या प्रकरणी मलकापूर शहर पोलिसांनी संबंधित आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे. या रॅकेटशी संबंधित आणखी आरोपी, तसेच बनावट नोटांचा साठा आणि त्यांचा स्रोत शोधण्याचे काम पोलिसांकडून सुरू आहे. नागरिकांनी अशा आमिषांना बळी न पडता कोणतीही संशयास्पद आर्थिक देवाणघेवाण आढळल्यास तात्काळ पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन पोलिस प्रशासनाने केले आहे.

# कुणबी समाज वर-वधू परिचय संमेलनाला प्रतिसाद

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी




**शेगाव दि.३१ :** श्री विठ्ठल कुणबी समाज बहुउद्देशीय संस्था अकोला च्या वतीने संत नगरी शेगांव येथे उपवरवधु परीचय संम्मेलन घेण्यात आले या मेळाव्याला भरगोस प्रतीसाद मिळाला. या प्रथम राज्यस्तरीय उपवरवधू परीचय मेळाव्यात सोयरीक पुस्तिका प्रकाशन करण्यात आले. तसेच नाविन्यपूर्ण उपक्रम म्हणजे म्हणजे या ठिकाणी नाविन्यपूर्ण पद्धतीने मेळाव्यामध्ये उपवर मुले, मुलीच्या मुलाखती पार पडल्या व त्या कॅमेरा द्वारे रेकॉर्ड करून स्क्रीनवर सर्व लोकांना दिसतील अशा पद्धतीने पाहावयास मिळाल्या.

उपस्थित लोकांना ५०, ५० गाव फिरून जे उपवर वधू वर पाहता येतात ते एकाच दिवशी पहावयास मिळाले, या राज्यस्तरीय मेळाव्याचे अध्यक्षस्थानी कुणबी समाज विकास मंडळाचे अध्यक्ष दयाराम वानखडे हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून अकोला जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार आकाश फुंडकर, माजी आमदार ज्ञानदेव ठाकरे माजी आमदार नारायण गव्हाणकर त्याचप्रमाणे कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून शिवदास महाराज गाडेकर, बुलढाणा जिल्हा कुणबी समाज मंडळाचे अध्यक्ष गुलाबराव महाले, नांदुरा कुणबी समाज मंडळाचे अध्यक्ष केदार ढोरे, खामगाव कुणबी समाज मंडळाचे अध्यक्ष गजानन ढोरे, स्वागताध्यक्ष पुणे येथील प्रमोद ठोंबे त्याचप्रमाणे अकोला व बुलढाणा जिल्ह्यातील बहुतांश कुणबी समाजातील कार्यरत विविध समाज मंडळाचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते, त्याचप्रमाणे समाज बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. विठ्ठल कुणबी समाज मंडळ शाखा पुणे चे अध्यक्ष संदीप वडतकर यांनी समाज मंडळासाठी उपवर युवक, युवती वधूवरांची डिजिटल पद्धतीने माहिती समाजास मिळावी याकरिता एक वैबसाईड ॲप लॉन्च केले, मेळाव्याचे सोयरीक पुस्तिकेचे प्रकाशन बुलढाणा जिल्याचे अध्यक्ष गुलाबराव महाले, अर्बन बँकचे रामेश्वर फुंडकर, सोनाजी महाराज मंदिराचे विसश्वत विश्वनाथ तिडके सोनाळा यांच्या उपस्थित सागर फुंडकर यांचे शुभहस्ते संपन्न झाला, कार्यक्रमाचे प्रास्ताविक रविकिरण हेलगे संचलन डॉ. हरिदास आखरे यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन मंडळाचे सचिव सुरेश फाळके यांनी केले.

# हर्ष औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत विश्वकर्मा जयंती



अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**खामगाव दि.३१:** हर्ष औद्योगिक प्रशिक्षण संस्था तर्फे विश्वकर्मा यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. सर्व प्रथम अध्यक्ष माननीय जनार्दन हेंड पाटील यांनी प्रतीमेला पुष्पहार अर्पण करून पूजन केले.

अशा प्रकारे जयंती साजरी करण्यात आली यावेळी हर्ष औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे अध्यक्ष जनार्दन हेंड पाटील संस्थेचे सचिव हर्षद हेंड पाटील हर्ष औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य अंकित जयस्वाल सर वीजतंत्री ट्रेडचे निर्देशक गणेश वानखडे, वेल्डर ट्रेड निर्देशक अनिल तेलगोटे, फिटर ट्रेडचे निर्देशक प्रकाश माकोडे, व राजेश ओईम्बे, कोपा ट्रेडचे निदेशक सुधाकर निंबाळकर, व लिपिक निखिल जयस्वाल, व सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

# पारिजात विद्यालयात अजित पवारांना भावपूर्ण श्रद्धांजली

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**शेगाव दि.३१:** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात दुर्दैवी निधन झाल्याची बातमी येताच संपूर्ण परिसरात शोककळा पसरली. या पार्श्वभूमीवर मनसगाव येथील पारिजात विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, मातोश्री अध्यापक महाविद्यालय, नर्सिंग कॉलेज तसेच मातोश्री वरिष्ठ महाविद्यालय यांच्या वतीने सामूहिक श्रद्धांजली सभा आयोजित करण्यात आली.

या श्रद्धांजली सभेत प्राचार्य, मुख्याध्यापक, सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, पालक तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी दोन मिनिटांचे मौन पाळून दिवंगत नेत्यास भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी प्राचार्यांनी आपल्या मनोगतात अजित पवार यांच्या सामाजिक, राजकीय व प्रशासकीय कार्याचा उल्लेख करत त्यांच्या कार्याला सलाम केला. ''राज्यासाठी त्यांनी दिलेले योगदान सदैव स्मरणात राहील,'' असे उद्गार यावेळी काढण्यात आले.या श्रद्धांजली कार्यक्रमामुळे संपूर्ण शैक्षणिक संकुलात शोकाकुल वातावरण निर्माण झाले होते. उपस्थितांच्या डोळ्यांत अश्रू तर मनात श्रद्धा आणि कृतज्ञतेची भावना स्पष्ट दिसून येत होती.

# वाहनाच्या धडकेत एक ठार; एक गंभीर

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**नांदुरा दि.३१:** जळगाव जामोद - नांदुरा रोडवर तांदळे यांच्या नवीन बांधकाम सुरू असलेल्या पेट्रोल पंपा जवळ दुचाकीला अज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेत एक जन ठार तर एक जन गंभीर जखमी झाल्याची घटना दिनांक ३० जानेवारीला सायंकाळी ७.३० वाजता घडली. याबाबत लखन प्रताप सस्त्याा राहणार वडगाव गड तालुका जळगाव जामोद यांनी पोलीस स्टेशनला तक्रार दिली.त्याानुसार फिर्यादीचा भाऊ गोपाल प्रताप सस्त्याा वय ३० वर्ष राहणार वडगाव गड व त्याा‍चा मित्र गणेश थोरात राहणार पिंपरी देशमुख हे दोघे युनिकॉन कंपनीची मोटरसायकल क्रमांक एम एच २८ बीजी ६८५३ ने पिंपरी देशमुखला जात होते. यावेळी निमगाव ते नांदुरा रोडवर तांदळे यांच्या नवीन बांधकामा समोर असलेल्या पेट्रोल पंपाजवळ अज्ञात वाहनाच्या चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून दुचाकीला धडक दिली. यामध्ये फिर्यादीचा भाऊ गोपाल प्रताप सत्याा वय ३० वर्ष याचा जागेवरच मृत्यू झाला तर त्याा‍चा मित्र गणेश थोरात गंभीर जखमी असून त्याा‍च्यावर अकोला येथील दवाखान्यात उपचार सुरू आहेत. फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात वाहन चालकाविरुद्ध भारतीय न्याय संहिता १०६(१),२८१,१२५(ए),३२४(४), मोटर वाहन कायदा १३४ कलमाखाली गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सहाय्यक फौजदार गजानन इंगळे करीत आहे.

# समता सैनिक दलाच्या शिबिरात सहभागी होण्याचे आवाहन

**नांदुरा दि.३१:** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय बौद्ध सभा या मातृसंस्थेची १९५४ साली स्थापना केली. बौद्ध धर्माचा प्रचार व प्रसार करणे तसेच धम्म प्रशिक्षण देणे या उद्देशाने २४ प्रकारची शिबिरे संस्थेच्या वतीने राबवली जातात. त्यानुसार भारतीय बौद्ध महासभा बुलढाणा जिल्हा (उत्तर) च्या वतीने एकूण तीन श्रामनेर शिबिर व समता सैनिक दलाचे तिन शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.

धम्मा चळवळ अधिक गतिमान करण्यासाठी ह्या शिबिरात सहभागी व्हा, असे आवाहन भारतीय बौद्ध महासभेचे बुलढाणा जिल्हाध्यक्ष(उत्तर)के.के. शेगोकार यांनी केले. या दहा दिवशीय श्रामनेर शिबिरात-खोलखेड तालुका खामगाव येथे दिनांक १ फेब्रुवारी ते १० फेब्रुवारी, माळेगाव गोंड तालुका नांदुरा येथे ९ फेब्रुवारी ते १८ फेब्रुवारी व घुसर तालुका मोताळा येथे दिनांक १९ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी पर्यंत आयोजन करण्यात आले आहे. समता सैनिक दलाचे एक दिवसीय प्रशिक्षण शिबीर खोलखेड तालुका खामगाव दिनांक फेब्रुवारी, गाडेगाव बुद्रुक तालुका जळगाव जामोद १५ फेब्रुवारी, घुसर तालुका मोताळा दिनांक २३ फेब्रुवारीला आयोजित करण्यात आले आहे. तरी बौद्ध उपासक- उपसिका यांनी या शिबिरामध्ये मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा उपाध्यक्ष दिलीप मेढे , सचिव (संस्कार)मिलिंद वानखडे यांनी एका संयुक्त प्रसिद्धी पद्धकाद्वारे केले आहे.

# कुरेशी कॉन्फरन्सच्या जिल्हा कार्याध्यक्षपदी आबिद कुरेशी यांची निवड

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.३१:** कुरेशी समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक, राजकीय तसेच संघटनात्मक कार्याला अधिक बळकटी देण्याच्या दृष्टीने आबिद कुरेशी यांची कुरेशी कॉन्फरन्सच्या जिल्हा कार्याध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीमुळे जिल्ह्यातील कुरेशी समाजात उत्साहाचे व समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, समाजबांधवांकडून त्यांच्या कार्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

या नियुक्तीबद्दल आबिद कुरेशी यांनी समाजातील सर्व ज्येष्ठ, मान्यवर, पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत. दिल्ली येथील राष्ट्रीय अध्यक्ष सनोवर कुरेशी, महाराष्ट्र कार्याध्यक्ष जाकीर हुसेन कुरेशी, महाराष्ट्र राज्याचे प्रवक्ते ॲड. वसीम बिस्मिल्ला कुरेशी तसेच राज्य व जिल्हा पातळीवरील सर्व नेतृत्वाने दाखविलेल्या विश्वासाबद्दल त्यांनी विशेष कृतज्ञता व्यक्त केली. ''आपण माझ्यावर सोपवलेली जबाबदारी ही माझ्यासाठी केवळ सन्मान नसून मोठी जबाबदारी आहे. या विश्वासाला पात्र ठरण्यासाठी आणि समाजाच्या सर्वांगीण हितासाठी अधिक जोमाने, प्रामाणिकपणे व



निष्ठेने काम करण्याची ग्वाही देतो,'' असे आबिद कुरेशी यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले. जिल्हा स्तरावर कुरेशी समाजातील युवकांचे संघटन मजबूत करणे, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी मार्गदर्शन व सहाय्य उपलब्ध करून देणे, सामाजिक न्यायासाठी प्रयत्न करणे तसेच समाजाचा राजकीय सहभाग वाढविण्यासाठी ठोस व परिणामकारक उपक्रम राबविण्यावर विशेष भर दिला जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यासोबतच समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन पारदर्शक, समन्वयात्मक व लोकाभिमुख कामकाज करण्याचा संकल्पही त्यांनी व्यक्त केला. या नियुक्तीमुळे कुरेशी समाजात आनंदाचे वातावरण असून, जिल्ह्यातील विविध स्तरांतून आबिद कुरेशी यांचे अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

**शैक्षणिक** — किरण अकॅडमी पुणे मार्फत इंर्टनशिप आणि प्लेसमेंट

# गो. से. महाविद्यालय, खामगावच्या दहा विद्यार्थ्यांची इंटिग्रेटेड इंर्टनशिपसाठी निवड




**खामगाव दि. ३१:** गो. से. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय, खामगाव येथे प्रथमच किरण अकॅडमी पुणे मार्फत इंटिग्रेटेड इंट्रनशिप आणि प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्रामध्ये नामांकित असलेल्या आणि इंटिग्रेटेड इंट्रनशिप आणि प्लेसमेंट ड्राईव्ह क्षेत्रात कार्यरत असलेली किरण अकॅडमी, पुणे व टिचिंग आणि प्लेसमेंट सेल तसेच संगणकशास्त्र विभाग यांचे मार्फत विद्यार्थ्यांसाठी प्लेसमेंट ड्रायव्हरच्या आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. एस. तळवणकर, किरण अकॅडमी पुणेच्या मॅनेजर कांचन जंगम, संगणकशास्त्र विभागप्रमुख डॉ. ए. ए. तायडे आणि प्लेसमेंट सेलचे समन्वयक डॉ. एच. एस. चांडक व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ. ए. ए. तायडे यांनी केले तर प्राचार्य डॉ. डी. एस. तळवणकर यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या आणि किरण अकॅडमी च्या मॅनेजर कांचन जंगम यांनी प्रथम सत्रामध्ये विद्यार्थ्यांना प्लेसमेंट सेल काय असते, एंट्रन्सशिप कशी असते, आपल्याकडे कोण कोणते कौशल्य असायला हवे आदी विषयावर विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले, तसेच द्वितीय सत्रामध्ये विद्यार्थ्यांची लेखी चाचणी परीक्षा घेण्यात आली. आणि तृतीय सत्रामध्ये विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेऊन विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. अशा पद्धतीने तीन सत्रांमध्ये हा कार्यक्रम संपन्न झाला. या ड्राइव्ह मध्ये १४८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली. त्यापैकी १०२ विद्यार्थी ड्राईव्हसाठी उपस्थित झाले. आणि त्यामधून १० विद्यार्थ्यांची इंटिग्रेटेड इंट्रनशिप आणि प्लेसमेंट ड्राईव्ह साठी निवड झाली. या विद्यार्थ्यांना सहा महिन्यासाठी किरण अकॅडमी पुणे येथे मोफत प्रशिक्षण मिळणार आहे. तसेच उर्वरित निवड झालेल्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण फी मध्ये ६०% सूट देण्यात आलेली आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत व अभिनंदन विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळ, खामगाव चे अध्यक्ष डॉ. सुभाष बोबडे, सचिव डॉ. प्रशांत बोबडे, प्राचार्य डॉ. डी. एस. तळवणकर आणि प्लेसमेंट सेल समन्वयक डॉ. एच. एस. चांडक, संगणकशास्त्र विभागप्रमुख डॉ. ए. ए. तायडे यांनी केले.यापूर्वीही महाविद्यालयाने अशा अनेक कॅम्पस ड्राईव्ह चे आयोजन केले होते त्यामध्येही अनेक विद्यार्थ्यांची निवड झालेली आहे. तसेच पुढील काळातही अशाच नामांकित कंपन्यांचे कॅम्पस ड्राइव्ह आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती देत, खामगाव व परिसरातील विद्यार्थ्यांनी या संधींचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्लेसमेंट सेल समन्वयक डॉ. चांडक यांनी केले. प्रा. मनोज बाभळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.या कॅम्पस ड्राइव्हच्या यशस्वी आयोजनासाठी प्लेसमेंट सेलचे समन्वयक डॉ. एच. एस. चांडक, डॉ.जयेश एस. तातेड, कॉम्प्युटर सायन्स विभाग प्रमुख डॉ. ए.ए.तायडे,डॉ.ए.ए. पटोकार, प्रा.एन. पी.तांबट, प्रा. मनोज बाभळे आदींनी परिश्रम घेतले.

# सहकार विद्या मंदिरच्या विद्यार्थ्यांची राष्ट्रीय स्तरावर ऐतिहासिक कामगिरी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**मोताळा दि. ३१:** क्रीडा क्षेत्रात बुलढाणा जिल्ह्याचा मानाचा तुरा रोवत, सहकार विद्या मंदिर, मोताळा येथील १७ वर्षांखालील मुलांच्या संघाने पालघर (मुंबई) येथे आयोजित राष्ट्रीय स्तरावरील टग ऑफ वॉर (रस्सीखेच) स्पर्धेत अभूतपूर्व यश संपादन केले. ३० व ३१ जानेवारी २०२६ रोजी पार पडलेल्या या स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करताना या खेळाडूंनी आपल्या ताकदीच्या जोरावर मैदान गाजवले.

विजयाचा थरार आणि अंतिम झुंज या स्पर्धेत सहकार विद्या मंदिरच्या संघाने अत्यंत चुरशीच्या लढतीत केरळ, कर्नाटक, गुजरात आणि हिमाचल प्रदेश यांसारख्या बलाढ्य राज्यांच्या संघांना धूळ चारली. अंतिम सामन्यात या संघाचा सामना कुवेत संघाशी झाला. या अटीतटीच्या सामन्यात मोताळाच्या लेकरांनी आपल्या जिद्दीच्या जोरावर प्रतिस्पर्ध्यांना नमवून राष्ट्रीय स्तरावर आपले वर्चस्व सिद्ध केले व सुवर्णपदकाचे मानकरी ठरले. मैदान गाजवणारे वीर खेळाडू या ऐतिहासिक विजयात खालील खेळाडूंचा मोलाचा वाटा राहिला: ओम गणेशराव घडेकर, मोहित मारुती खिरोडकर, वीरेन लक्ष्मण गालवंशी, शिवम निना कोलते, भावेश विष्णू क्षीरसागर, ओम सोपान चौधरी, सुमित अविराज शिंबरे, शिवराज श्रीराम निळे, निलेश दिनकर राठोड, हरीश गणेश जवरे मार्गदर्शक व प्रशिक्षक या यशामागे क्रीडा शिक्षक उमेश माळी सर, दिलीप सातव सर आणि प्रशिक्षक श्रीराम निळे सर यांचे कठोर परिश्रम व योग्य मार्गदर्शन लाभले. विद्यालयाचे मुख्याध्यापक अभिजीत देशमुख यांनी सातत्याने खेळाडूंना प्रोत्साहन दिले. दिग्गजांकडून कौतुकाचा वर्षाव या दैदिप्यमान यशानंतर बुलढाणा अर्बन परिवारातील मान्यवरांनी खेळाडूंचे वैयक्तिक शब्दांत कौतुक केले आहे. ''सहकार विद्या मंदिरच्या या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावर जे यश मिळवले आहे, ते केवळ शाळेचेच नव्हे तर संपूर्ण जिल्ह्याचे नाव उज्वल करणारे आहे. या मुलांमध्ये जिद्द आणि ताकद दोन्ही आहे.'' राधेश्याम चांडक, 'राष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्राचा झेंडा फडकवणाऱ्या या सुवर्णमयी खेळाडूंचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. तुमची ही मेहनत भविष्यात तुम्हाला अजून मोठ्या शिखरावर नेईल.'' डॉ. सुके झंवर (नवनियुक्त अध्यक्ष, बुलढाणा अर्बन) 'मुलांनी दाखवलेले सांघिक कौशल्य थक्क करणारे आहे.' सर्व खेळाडूंचे मनःपूर्वक अभिनंदन! कोमल झंवर(अध्यक्षा,बुलढाणा अर्बन चॅरिटेबल) या यशामुळे मोताळा तालुक्यासह संपूर्ण बुलढाणा जिल्ह्यात आनंदाचे वातावरण असून, सर्व स्तरांतून खेळाडूंवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

अजिंक्य भारत
# आपलं जालना

जालना, रविवार, दि. १ फेब्रुवारी २०२६ www.ajinkyabharat.com


## महत्त्वाचे

### जालन्याच्या महापौरांची निवड आता सोमवारी

**जालना :** जालन्याच्या महापौरांची ९ फेब्रुवारी रोजी निवड केली जाणार आहे. विभागीय आयुक्तांनी त्यासाठी कार्यक्रम जाहीर केला असून अतिरिक्त जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांची पीठासीन अधिकारी म्हणून निवड करण्यात आली आहे. नुकत्याच झालेल्या महानगरपालिका निवडणुकीत ४१ जागांसह भाजपने बहुमतात सत्ता मिळविली आहे. शिंदेसेनेला १२, काँग्रेसचे नऊ, एमआयएमचे दोन आणि एक अपक्ष उमेदवार विजयी झाला आहे. महापौरपद हे अनुसूचित जाती महिला प्रवर्गासाठी आरक्षित झाले आहे. त्यासाठी भाजपकडे वंदना मगरे, रूपा कुरील, ॲड. रिमा खरात, श्रद्धा साळवे या चार महिला नगरसेविकांपैकी एका महिलेची वर्णी लागणार आहे.

### शिवसेनेच्या गटनेतेपदी दीपक राठोड

**जालना :** जालना शहर महानगरपालिकेतील शिवसेनेच्या गटनेतेपदी दीपक राठोड यांची तर प्रतोदपदी दुर्गेश काठोटीवाले यांची निवड करण्यात आली आहे. छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय आयुक्तांसमोर ही निवड प्रक्रिया पार पडली. शिवसेना उपनेते अर्जुन खोतकर, संपर्कप्रमुख भास्कर अंबेकर यांच्या सूचनेनुसार जिल्हाप्रमुख आसाराम बोराडे, भाऊसाहेब घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रक्रिया राबविण्यात आली. यावेळी नगरसेविका दर्शना झोल, दीपक राठोड, दुर्गेश काठोटीवाले, अमोल ठाकूर, कमलेश खरे, सगीर पहेलवान, उषा पांगारकर, सत्यभामा जाधव, पूजा दिनेश भगत, पूजा योगेश भगत यांच्यासह शिवसेना शहर संघटक दिनेश भगत, किशोर पांगरकर, योगेश भोरे, सिद्धार्थ अंभोरे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व शिवसैनिकांची उपस्थिती होती.

### आरोग्य कर्मचाऱ्यांचा गौरव

**मंठा :** ढोकसाळ येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत वर्ष २०२५ मध्ये राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रमामध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या आरोग्य कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात आला. संजय बुधवंत, धोंडीबा फुपाटे, अशोक जावळे, भारत पांडे, करण पोले, गटप्रर्वतक शिला गणकवार, उज्वला राठोड तसेच आशा स्वयंसेविका बेबी मोरे, कविता वंजारी, निर्मला राक्षे, कविता चव्हाण, सरिता देशमुख, वंदना खामकर, लता अंभुरे यांचा गौरव करण्यात आला. वैद्यकीय अधिकारी डॉ. कांचन कांगणे यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. यावेळी आरोग्य सहायक सुजित वाघमारे, अशोक आढे, विलास देशमुख, अमर झोल, बबिता केसकर यांची उपस्थिती होती.

# जालन्यात नव्या दमाच्या शाहिरांनी गाजवले व्यासपीठ

## जेईएस महाविद्यालयात शाहिरी प्रशिक्षण शिबिराचा दिमाखदार समारोप

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी




**जालना, दि. ३१ :** ज्या शाहिरीने महाराष्ट्राचा इतिहास घडवला आणि समाजमनावर अधिराज्य गाजवले, त्याच शाहिरी परंपरेचा नवा हुंकार नुकताच जालन्यात अनुभवायला मिळाला. निमित्त होते, सांस्कृतिक कार्य संचालनालय (महाराष्ट्र राज्य) आणि जेईएस महाविद्यालयाचा लोककला विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शाहिरी प्रशिक्षण शिबिराच्या सांगता समारंभाचे. यावेळी प्रशिक्षणार्थींच्या पहाडी आवाजातील पोवाड्यांनी संपूर्ण सभागृह अक्षरशः दुमदुमून गेले.

**नव्या दमाचे शाहीर अन् ओजस्वी सादरीकरण**

कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक 'गण' सादर करून विद्येच्या देवतेला वंदन करून झाली. शिबिरार्थी नेहा खंडागळे हिने जेव्हा शिवजन्माचा पोवाडा सादर केला, तेव्हा छत्रपतींच्या जन्माचा इतिहास डोळ्यांसमोर जिवंत झाला. तसेच बालशाहीर स्वानंद धुमाळ आणि अजय काटे यांच्या सादरीकरणाने सभागृहात शौर्य आणि स्फूर्तीचे चैतन्य निर्माण केले. या शिबिरातून



महाराष्ट्राच्या संस्कृतीचा वारसा नव्या पिढीच्या खांद्यावर यशस्वीपणे सोपवला गेल्याची प्रचिती उपस्थितांना आली.

**मान्यवरांची उपस्थिती**

या सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून ढोलकी सम्राट पांडुरंग घोटकर आणि शाहीर रत्न रमेश गिरी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जालना एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष पुरुषोत्तम बगडिया होते. यावेळी लोकशाहीर आप्पासाहेब उगले, प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, मराठी विभाग प्रमुख डॉ. यशवंत सोनूने, शाहीर रामानंद उगले आणि शिबिर समन्वयक प्रा. कल्याण उगले यांची प्रमुख उपस्थिती होती.

**शाहिरी टिकवणे काळाची गरज**

प्रसिद्ध शाहीर रत्न रमेश गिरी यांनी आपल्या भाषणात



अत्यंत मार्मिक टिप्पणी केली. ते म्हणाले, शाहिरी हा महाराष्ट्राच्या मातीचा खरा सुगंध आहे. आजच्या पाश्चिमात्य प्रभावाच्या काळात आपली लोककला टिकवण्यासाठी असे उपक्रम म्हणजे अमृताची संजीवनी देण्यासारखे आहेत. ढोलकी सम्राट पांडुरंग घोटकर यांनीही शिबिरार्थींच्या लय आणि तालाचे विशेष कौतुक केले.

**प्रमाणपत्र देऊन गौरव**

अध्यक्षीय भाषणात पुरुषोत्तम बगडिया यांनी लोककलेच्या जतनासाठी संस्था नेहमीच पाठीशी राहील, अशी ग्वाही दिली. यावेळी सर्व यशस्वी शिबिरार्थींना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रे देऊन गौरवण्यात आले. शाहीर महर्षी आत्माराम पाटील यांच्या 'प्रिय आई हिंदभूमी' या भैरवीने या भारदस्त सोहळ्याची सांगता झाली.

**नियोजन आणि यश**

कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन शाहीर माधवी माळी यांनी केले तर समन्वयक प्रा. कल्याण उगले यांनी शिबिराचा सविस्तर आढावा मांडला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री आणि लोककला विभागाच्या अथक परिश्रमामुळे हे शिबिर यशस्वी झाले. या सोहळ्याला जालना परिसरातील ज्येष्ठ कलावंत आणि रसिक प्रेक्षकांनी मोठी गर्दी केली होती.

# अजितदादांना सर्वपक्षीय श्रध्दांजली



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**भोकरदन, दि. ३१ :** भोकरदन येथील माजी आ.चंद्रकांत दानवे यांच्या संपर्क कार्यालयात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या कार्यक्रमास महाविकास आघाडी व विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी पुष्पहार अर्पण करून दोन मिनिटांचे मौन पाळत तीव्र शोक व्यक्त केला. तसेच स्व.अजितदादा पवार यांच्या सामाजिक, राजकीय व सार्वजनिक जीवनातील कार्याचा शांत व भावनिक वातावरणात गौरव करण्यात आला.

यावेळी चंद्रकांत दानवे, रमेश शेठ सपकाळ, सुधाकर दानवे, त्र्यंबक पाबळे, सुरेश सपाटे, शफिक शेठ पठाण, मदनराव तुपे, शमीम मिर्झा, बोरसे गुरुजी, कैलास पुंगळे, पंढरिनाथ पवार, श्रावणकुमार आक्से, संग्रामराजे देशमुख, गंगाधर कांबळे, नसिम पठाण, रिजवान शेख, शब्बीर कुरेशी, जहीर कुरेशी आदींनी श्रद्धांजली अर्पित केली.

## कृषी यांत्रिकीकरण योजनेंतर्गत विविध साहित्याचे वितरण

**जालना :** शासनाच्या कृषी विभागांतर्गत राबविण्यात येत असलेल्या राज्य कृषी यांत्रिकीकरण योजनेअंतर्गत कम्बाइन हार्वेस्टर, ट्रॅक्टर व ट्रॅक्टरची विविध अवजारे यांचे वितरण प्रजासत्ताक दिनी करण्यात आले.
या वितरण सोहळ्यास पालकमंत्री पंकजा मुंडे, आ. अर्जुन खोतकर, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी गहिनीनाथ कापसे, तालुका कृषी अधिकारी विष्णू राठोड आदी उपस्थित होते.

# सूर्यनमस्कार स्पर्धेत २१० विद्यार्थ्यांचा सहभाग

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अंबड, दि. ३१ :** शहरातील छत्रपती योग व क्रीडा प्रशिक्षण केंद्र येथे सामूहिक सूर्यनमस्कार प्रशिक्षण स्पर्धा आणि योगसाधना शिबिराचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते.



या सामूहिक सूर्यनमस्कार प्रशिक्षण शिबिरात शहरातील पवन करिअर अकॅडमी, जैन इंग्लिश स्कूल, ओम शांती विद्यालय, समर्थ विद्यालय, मत्स्योदरी विद्यालय, कै. दत्ताजी भाले विद्यालय, सावित्रीबाई फुले विद्यालय, आदर्श इंग्लिश स्कूल, कर्जत येथील राजुरेश्वर माध्यमिक विद्यालय, घनसावंगी तालुक्यातील राजेगाव रोडवरील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय टाईप ४ वसतिगृहातील मध्ये

राहणाऱ्या संत रामदास महाविद्यालय, घनसावंगी येथील मुलींचा सहभाग होता. एकूण २१० विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला होता. खुल्या गटात २४ पुरुष आणि २८ महिलांचा सहभाग होता.

पुरुषोत्तम सोमाणी यांनी सूर्यनमस्कार आणि रथसप्तमीच्या सहसंबंधाबाबत आध्यात्मिक स्तरावर विवेचन केले. देवानंद चित्राल यांनी योग शिक्षकांच्या मदतीने शास्त्रोक्त पद्धतीने प्रशिक्षण देऊन स्पर्धा पूर्ण करून घेण्यात आली. यामध्ये सूक्ष्म हालचाली पूर्वतयारी आणि एक योगनिद्रा देऊन ओंकार ध्यान साधना घेण्यात आले.

काकासाहेब कटारे यांच्याकडून फळ आहाराचे वाटप प्रशिक्षणार्थीला करण्यात आले. उत्कृष्ट आणि कलात्मकरीत्या एकूण ३६ नमस्कार सादरीकरण करणाऱ्या सर्व विद्यार्थी तसेच प्रशिक्षण व सूर्य उपासनामध्ये पूर्ण वेळ आनंद घेणाऱ्या महिला आणि पुरुषांना गोल्ड मेडलने गौरविण्यात आले. यासाठी अखिल भारतीय मारवाडी युवा मंच, अंबड, रोटरी क्लब ऑफ जालना व शहरातील दानशूर स्नेहीचे सहकार्य मिळाल्याने हे शिबिर यशस्वीपणे पार पडले.

# आस्थापनांना भेटी देऊन बाल कामगार शोधा - मित्तल

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**जालना, दि. ३१ :** जिल्ह्यात ठिकठिकाणी असलेल्या वीटभट्टी, हॉटेल, ढाबा, गॅरेज आदीसह बाल कामगार असलेल्या आस्थापनांना वेळोवेळी भेटी देऊन बाल कामगार आढळून आल्यास कठोर कारवाई करा, अशा सूचना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात बेठबिगार समिती, बालकामगार समिती आणि असंघटित कामगार समितीची बैठक घेण्यात आली. या बैठकीस जिल्हा कामगार अधिकारी अमोल जाधव यांच्यासह समितीचे सदस्य व संबंधित यंत्रणेचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी कामगार विभागाच्या कारभारावर नाराजी व्यक्त करत कारभार सुधारण्याच्या सूचना दिल्या.

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या की, जिल्ह्यात बाल मजुरी थांबवून देशाचे भविष्य वाचवणे अत्यंत गरजेचे आहे, असे सांगून कामगारांच्या कल्याणासाठी



कामगार कार्यालय काम करत आहे, त्यामुळे जिल्ह्यातील कोणताही कामगार शासनाच्या सर्व कल्याणकारी योजनेपासून वंचित राहता कामा नये. जिल्ह्यातील कामगारांच्या जनजागृतीसाठी सोशल मीडियाच्या माध्यमातून दृकश्राव्य चित्रफीत शेअर करून मोठ्या प्रमाणात जनजागृती करावी. तालुकास्तरावर असलेल्या सुविधा केंद्रावर नियंत्रण ठेवा, तिथे काम कसे चालत आहे याची माहिती वेळोवेळी भेट देऊन घ्यावी.

कामगारांसाठी असणाऱ्या योजनेतून भांडे वाटप करताना पैसे घेतले जात असल्याच्या तक्रारी या कार्यालयास प्राप्त होत आहेत. त्याचे निराकरण वेळेत करा, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. कामगार विभागाच्या कामाबाबत असमाधानी असल्याचेही सांगून त्यांनी नाराजी व्यक्त केली.

# दोदडगाव येथे सत्यपाल महाराज यांच्या कार्यक्रमाचे आयोजन

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**जालना, दि. ३१ :** देशातील पहिला मंडल स्तंभ (ओबीसी स्मारक) छत्रपती संभाजीनगर - सोलापूर राष्ट्रीय महामार्ग दोदडगाव ता.अंबड येथे मंडल स्तंभ स्थापना दिन निमित्त महाराष्टातील प्रसिद्ध राष्ट्रीय समाजप्रबोधनकार , सप्त खंजेरी वादक सत्यपाल महाराज चिंचोलीकर अकोट यांचा सत्यपाल ची सत्यवाणी या कार्यक्रमाचे आयोजन सोमवार दि. २ फेब्रुवारी रोजी सायंकाळी पाच वाजता करण्यात आले आहे.

**सत्यपालची सत्यवाणी करणार समाजप्रबोधन**

या कार्यक्रमाला मंडल स्तंभ निर्माते माजी आ. नारायणराव मुंडे, माजी मंत्री महादेव जानकर, मंडल स्तंभ स्मारक समीतीचे अध्यक्ष प्रा.सत्संग मुंडे व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहे.

या ठिकाणी दोदडगाव व भागातील समाज कार्य करणारे माजी जिल्हा परिषद अध्यक्ष ज्ञानदेव बांगर नालेवाडी, माजी जि.प.सदस्य देविदास खटके वडिगोद्री, भास्करराव दखणे अंतरवाली सराटी, रामचंद्र खोमणे वडिगोद्री, ह.भ.प.बळीराम म.शिंदे शहापूर, बेवारस मनोरुग्णाची सेवा करणारे शहापूर येथील सारीका पवार, माधवराव पवार यांना सामाजिक न्याय पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार आहे. भागातील नागरीकांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहावे असे आवाहन मंडल स्तंभ स्मारक समीतीचे अध्यक्ष प्रा. सत्संग मुंडे, सयोजन समीतीचे सदस्य दिलीप दखणे, सुरेश गवळी,ह.भ.प.राधाकृष्ण म.जायकर, ह.भ.प.शिवाजी म.भागवत,सरपंच बंडु मुंढे,प्रा.लहुराव दरगुडे,प्रा.अविनाश पवार व सर्व सदस्य यांनी केले आहे.

## सूचना

## जालना महानगरपालिकेच्या आरोग्य, कर व स्वच्छता विभागाची आढावा बैठक

# थकीत करदात्यांच्या मालमत्तेवर जप्तीची कारवाई केली जाणार

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**जालना, दि. ३१ :** जालना शहर महानगरपालिकेतील आरोग्य, कर व स्वच्छता विभागाचा आढावा जिल्हाधिकारी तथा जालना शहर महानगरपालिका आयुक्त

आशिमा मित्तल यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत घेतला. यावेळी त्यांनी हे अर्थसंकल्पीय वर्ष संपण्यासाठी केवळ दोन महिन्यांचा कालावधी शिल्लक असल्याने कर वसुलीबाबत गतीने काम करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

कर विभागाने शंभर टक्के कर वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण करावे, असे निर्देश देताना जिल्हाधिकारी तथा आयुक्त मित्तल यांनी थकीत कर वसुलीला सर्वोच्च प्राधान्य देण्यावर भर दिला. नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की त्यांच्याकडे थकीत असलेले पाणीपट्टी व घरपट्टी कर तातडीने भरावेत.

नागरिकांच्या सोयीसाठी फेब्रुवारी २०२६ महिनाअखेरपर्यंत करातील शास्ती



(व्याज) रकमेवर ५० टक्के सवलत देण्यात येत असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. या सवलतीचा लाभ घेऊन नागरिकांनी आपले थकीत कर वेळेत भरावेत, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. तसेच व्यापारी व व्यावसायिकांनी थकीत कर तात्काळ भरावा, अन्यथा पुढील आठवड्यापासून थकीत करदारांच्या मालमत्तेवर जप्तीची कारवाई करण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

आरोग्य विभागाच्या बैठकीत जालना जिल्ह्यातील कुपोषण, माता मृत्यू व बाल मृत्यूचे प्रमाण कमी करणे,गरोदर,स्तनदा माता व ० ते ५ वयोगटातील मुलांना पौष्टिक आहार देण्यासोबतच त्यांचा शारीरिक, मानसिक व बौद्धिक विकास साधण्यासाठी जिल्हा प्रशासन व हेल्थ स्पोकन ट्युटोरियल आणि विल्स ग्लोबल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेल्या जालना मिशन न्युट्रीशन कार्यक्रमाअंतर्गत जालना शहर महानगरपालिका क्षेत्रात काम करावे असे निर्देश दिले. हेल्थ स्पोकन ट्युटोरियल आणि विल्स ग्लोबल फाउंडेशनच्या वतीने कुपोषण, माता मृत्यू व बाल मृत्यूचे प्रमाण कमी करणे,गरोदर,स्तनदा माता व ० ते ५ वयोगटातील मुलांना पौष्टिक आहार या विषयावर १०४ विषयांवर त्या त्या क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या तज्ज्ञ मार्गदर्शकांचे ॲनिमेटेड व्हिडिओंचा समावेश आहे. सदरील व्हिडिओ मध्ये गर्भवती मातांनी गर्भधारणा कालावधीत आहार विषयक कशी काळजी घ्यावी, शास्त्रोक्त पद्धतीने बाळालाा स्तनपान कसे करावे, ० ते ५ वयोगटातील मुलांना कुठलाा पुरक व पौष्टिक आहार द्यावा यासह अन्य विषयांचा समावेश आहे. सर्वप्रथम जालना शहर महानगरपालिका क्षेत्रातील आरोग्य विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी या व्हिडिओंचा परिपूर्ण अभ्यास करावयाचा आहे. व यानंतर याविषयावर परीक्षा घेऊन त्यातून तज्ज्ञ मार्गदर्शकांची निवड केली जाणार आहे.

जिल्हाधिकारी तथा आयुक्त आशिमा मित्तल यांनी जालना शहर महानगरपालिकेतील स्वच्छता विभागाची आढावा बैठकीत शहरातील स्वच्छता व्यवस्था अधिक सक्षम, प्रभावी व नागरिकाभिमुख करण्याच्या दृष्टीने सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीदरम्यान जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दैनंदिन कचरा संकलन, ओला-सुका कचरा वर्गीकरण, कचऱ्याची शास्त्रीय विल्हेवाट, स्वच्छतागृहांची नियमित स्वच्छता तसेच मुख्य रस्ते व अंतर्गत भागातील स्वच्छतेची सद्यस्थिती यांचा आढावा घेतला. स्वच्छता कामकाजात शिस्त, वेळेचे पालन आणि कामाच्या गुणवत्तेला प्राधान्य देण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

शहर स्वच्छ व आरोग्यदायी ठेवण्यासाठी स्वच्छता कर्मचाऱ्यांची उपस्थिती, आवश्यक साधनसामग्री, यंत्रसामग्रीचा प्रभावी वापर तसेच तक्रार निवारण यंत्रणा अधिक सक्षम करण्याचे निर्देश त्यांनी दिले. नागरिकांनी ओला व सुका कचरा वेगळा देण्यासाठी जनजागृती वाढविण्यावर भर देण्यासही त्यांनी सांगितले.

या बैठकीस अतिरिक्त आयुक्त अर्जुन गिराम, उपायुक्त कानपुडे, कर वसुली अधिकारी राहूल देशमुख, स्वच्छता विभागाचे कैलास चांदणे, आरोग्य विभागातील सर्व डॉक्टर व त्यांचे कर्मचारी, स्वच्छता निरीक्षक, कर विभागातील कर्मचारी यांची उपस्थिती होती.

**श्रीमती सुचिता हरकचंद राठी, २रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)यांचे न्यायालय, ता.अंबड, जि.जालना**
किरकोळ दिवाणी अर्ज २२४/२०२५
भगवान वि.निरंक
नि.क्रं.-
पुढील तारीख ०५/०३/२०२६

### जाहीर प्रगटन

**अर्जदार :-**
१.भगवान रेवनाथ खंडागळे, वय ३९ वर्षे, रा.भालगाव,ता.अंबड,जि.जालना
विरुद्ध
**गैरअर्जदार :-** निरंक

**कलम :-** बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट कलम २ व ७ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

**ॲड.व्ही.के.अवचार** यांच्या मार्फत या न्यायालयात अर्जदाराने अर्ज केला आहे की, अर्जदार ची आत्या नामे **नंदा भिमराव सुनमारे** यांचा मृत्यू दिनांक ३०/०६/२०२५ रोजी झाला. मयताचे अर्जदार हेच कायदेशीर वारस असल्याबाबत अर्जामध्ये नमूद केलेले आहे. अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामकाजाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

करीता या जाहीर प्रगटनाद्वारे सर्वत्र कळविण्यात येते की, याबाबत जर कोणास काही एक आक्षेप असेल तर त्यांनी सदरचे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत या न्यायालयात आपला आक्षेप सादर करावा. जर नमूद केलेल्या काळात कोणाचाही आक्षेप आला नाही तर संबंधित प्रकरणात कायद्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि.३१/०१/२०२६ रोजी यांची माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

**पी.एम.कुलकर्णी**
क.लिपिक, दिवाणी विभाग, २रे सह दिवाणी न्यायालय (क.स्तर), अंबड, जि.जालना

**आदेशान्वये**
**के.ई.टेपले**
अधिक्षक, दिवाणी न्यायालय (व.स्तर) अंबड, जि.जालना

**प्रतः-दिवाणी न्यायालय (व.स्तर)अंबड येथील नोटीस बोर्डावर डकविणे बाबत.**

**विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), अंबड यांचे न्यायालय**
दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. ११०/२०२५
पु. ता. १०/०३/२०२६

### जाहीर प्रगटन

**अर्जदार :-**
१.अशोक कचरू खरात, वय ५१ वर्षे, रा.होळकर नगर,अंबड,ता.अंबड,जि.जालना
विरुद्ध
**गैरअर्जदार :-** निरंक

**कलम :-** कलम २ व ७ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

**ॲड.श्री.एल.ए.गायके** यांच्या मार्फत या न्यायालयात अर्जदाराने अर्ज केला आहे की, **कचरू साळुजी खरात** हे दिनांक ०५/११/२०१७ रोजी मयत झाले आहे. मयत **कचरू साळुजी खरात** यांचे अर्जदार व गैरअर्जदार हे कायदेशीर वारस आहेत. म्हणून अर्जदाराने शासकीय व निमशासकीय कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे सदरील अर्ज वारसप्रमाणपत्र मिळण्याकरीता दाखल केलेला आहे.

करीता या जाहीर प्रगटनाद्वारे सर्वत्र कळविण्यात येते की, याबाबत जर कोणास काही एक आक्षेप असेल तर त्यांनी सदरचे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत या न्यायालयात आपला आक्षेप सादर करावा. जर नमूद केलेल्या काळात कोणाचाही आक्षेप आला नाही तर संबंधित प्रकरणात कायद्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि.२९/०१/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**संतोष टी.पवार**
क.लिपिक

**आदेशान्वये**
**के.ई.टेपले**
अधिक्षक, दिवाणी न्यायालय व.स्तर,अंबड

**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व.स्तर, अंबड

**प्रतः-सह दि. न्या. क.स्तर, अंबड यांच्या नोटीस बोर्डावर डकविणे.**

## थोडक्यात

### सासऱ्याला जावयासह तिघांची मारहाण

मोर्शी : क्षुल्लक कारणावरून जावायासह तिघांनी सासऱ्याला मारहाण करीत जखमी केले. ही घटना पिंपरी येथे घडली. यात सासरा संपत रामलाल गिरहारे (६३) हा जखमी झाला. त्याच्या तक्रारी वरून पोलिसांनी जावई अनिल पृथ्विलाला चौधरी (३५), लक्ष्मण बुवाडे (६०) व जगनलाल उर्फ जंली चौधरी (६०) तिघेही रा. पिंपरी, ता. मोर्शी यांच्यावर गुन्हा नोंदवला. या घटनेचा पुढील तपास मोर्शी पोलीस ठाण्याचे ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली मोर्शी पोलीस करीत आहे.

### अल्पवयीन युवतीचा विनयभंग

अमरावती : जिल्ह्यात एका अल्पवयीन मुलीचा परिचिताने विनयभंग केला, तर दुसरीला युवकाने फूस लावून पळवून नेले. या प्रकरणी अनुक्रमे नांदगाव खंडेश्वर व चांदूर बाजार पोलिसात एका १९ वर्षीय मुलासह अन्य एकावर गुन्हा नोंदवण्यात आला. नांदगाव खंडेश्वर पोलिसात दाखल तक्रारीनुसार, अल्पवयीन मुलगी व गुन्हा दाखल झालेला १९ वर्षीय युवक हे एकमेकांचे परिचित आहेत. मुलगी महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी ग्रामीण भागातून नांदगाव खंडेश्वर येथे येते. मात्र, गेल्या काही दिवसांपासून तो सतत दुचाकीने तिचा पाठलाग करतो. मी तुझ्याबर प्रेम करतो. आपण पळून जावून लग्न करू असे म्हणत तिला वाईट उद्देशाने तू माझ्यासोबत फिरायला चल, असे म्हणून बोलण्याचा प्रयत्न करून तिच्यासोबत जवळीक साधून तिचा विनयभंग केला. मुलीच्या तक्रारीवरून नांदगाव खंडेश्वर पोलिसांनी आदित्य दामोदर पारधी (१९) याच्याविरुद्ध विनयभंगाचा गुन्हा नोंदवला. चांदूर बाजार पोलिसात दाखल तक्रारीनुसार, १७ वर्षीय मुलगी महाविद्यालयात जाते असे सांगून घरातून बाहेर पडली. ती परत आली नाही. तिला परिचित युवकाने फूस लावून पळवून नेल्याची तक्रार नातेवाईकांनी दिली. त्या आधारे पोलिसांनी युवकाविरुद्ध पळवून नेल्याचा गुन्हा नोंदवला.

### वाळू चोरी करणारे तिघे अटकेत

अमरावती : जिल्ह्यात शिरखेड व शिरजगाव पोलीस ठाण्यांतर्गत अवैध वाळू चोरीचा प्रत्येकी ऐकक गुन्हा दाखल करण्यात आला. शिरखेड पोलिसांनी ट्रॅक्टर ट्रॉलीसह एक ब्रास वाळू असा एकूण 5 लाख ७ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी आकाश सहदेव रंगारी (२८) व विकी नेकनाम सिंग (२२) दोघेही रा. शिरखेड यांना अटक करण्यात आली. शिरजगाव कसबा पोलीस ठाण्यात दाखल तक्रारीनुसार, महसूलच्या पथकाने शिरजगाव ते करजगाव मार्गावरील बालाजी धरम काट्यावर कारवाई करीत ९ ब्रास वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्या डंपर हायवावर कारवाई केली. या वेळी ३५ लाखांच्या डंपरसह ६३ हजारांची वाळू जप्त केली. सचिन रमेशराव दारोकर (३५, रा. मंगरूळी पेठ, ता. वरुड) याला अटक केली, तर शंतनु राजेंद्र कोहळे (२५, रा. खंबीत, ता. आर्वी, जि. वर्धा) हा फरार झाला. या घटनेचा पुढील तपास पोलीस करीत आहे.

### पैशासाठी विवाहितेचा शारीरिक छळ

चांदूर रेल्वे : माहेरहून पैसे आणण्याचा तगादा लावत पतीसह सासूसासरे, नणंद व नंदोई विवाहितेचा छळ करतात. या प्रकरणी चांदूर रेल्वे पोलीस ठाण्यात विवाहितेने तक्रार नोंदवली. पतीसह सासू व सासऱ्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेचा पुढील तपास चांदूर रेल्वे पोलीस ठाण्याचे ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली चांदूर रेल्वे पोलीस करीत आहे.

# शैक्षणिक कागदपत्रांना अतिरिक्त शुल्क आकारणे बेकायदेशीर

## शिक्षण विभागाचे निर्देश | तक्रार आल्यास नियमानुसार कारवाई

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि.३१ :** शिक्षण संचालनालयाच्या ५ जून २०२५ रोजीच्या जीआरनुसार विद्यार्थ्यांना शाळा सोडल्याचा दाखला, गुणपत्रिका किंवा कोणतीही मूळ शैक्षणिक कागदपत्रे परत देताना अतिरिक्त शुल्क आकारणे बेकायदेशीर आहे. अशा शाळा व महाविद्यालयांविरोधात कठोर कारवाईचे स्पष्ट आदेश पुणे विभागीय शिक्षण उपसंचालकांनी दिले आहेत.

**तक्रार करण्याचे आवाहन**

शिक्षण विभागाच्या ५ जून २०२५ च्या शासन निर्णयानुसार विद्यार्थ्यांची कोणतीही मूळ कागदपत्रे शुल्काअभावी रोखून ठेवता येत नाहीत. टी. सी. किंवा मार्कशिटसाठी अतिरिक्त पैशांची मागणी करणे बेकायदेशीर आहे. जिल्ह्यात अशाप्रकारे विद्यार्थ्यांची अडवणूक करणाऱ्या शाळांवर कारवाई केली जाते. पालकांनी अशा प्रकारच्या तक्रारी पुराव्यासह कार्यालयाकडे कराव्यात, असे आवाहन शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी केले आहे.

**विद्यार्थ्यांची कागदपत्रे रोखता येत नाहीत**

उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि शालेय शिक्षण विभागाच्या नियमांनुसार




शैक्षणिक शुल्काचा वाद हा पालक आणि संस्था यांच्यातील विषय आहे. यासाठी विद्यार्थ्यांची टी. सी. किंवा मार्कशीट वेठीस धरता येत नाही. प्रवेश रद्द करताना किंवा पूर्ण झाल्यावर कागदपत्रे त्वरित देणे बंधनकारक आहे.

काही शाळा थेट पैसे न मागता विकास निधी ग्रंथालय शुल्क या नावाखाली विद्यार्थ्यांकडून अवैध वसुली करतात. शाळेची टी. सी. देण्याच्या बदल्यात अशा प्रकारच्या शुल्काची सक्ती करणे हा देखील कायद्याने गुन्हा ठरविण्यात येणार आहे.महाराष्ट्र शैक्षणिक संस्था १ शुल्क नियमन अधिनियमानुसार अतिरिक्त शुल्क आकारल्यास आकारलेल्या शुल्काच्या पाचपट दंड होऊ शकतो. वारंवार नियमांचे उल्लघंन केल्यास संस्थेची एनओसी रद्द होऊ शकते.

संबंधित मुख्याध्यापक किंवा प्राचार्यावर प्रशासकीय कारवाईची तरतूद आहे.शासकीय निर्णयानुसार, कोणत्याही विद्यार्थ्याने शाळा सोडली असेल किंवा त्याला पुढील प्रवेशासाठी कागदपत्रांची गरज असेल तर शैक्षणिक संस्था ती रोखून धरू शकत नाहीत. थकीत शुल्काचे कारण सांगून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान करण्याचा अधिकार कोणत्याही संस्थेला नाही. कागदपत्रे हा विद्यार्थ्यांचा कायदेशीर हक्क आहे. ज्या शाळा किंवा महाविद्यालये विद्यार्थ्यांची कागदपत्रे अडवतील, अशा संस्थांची मान्यता रद्द करण्यापर्यंतची शिफारस शिक्षण विभाग करू शकते. शिक्षण उपसंचालकांनी जिल्हास्तरावरील शिक्षणाधिकाऱ्यांना अशा तक्रारीची दखल घेऊन त्वरित अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे संबंधित शाळेवर कडक कारवाई होऊ शकते.

### टीसी, गुणपत्रिकेसाठी अडवणूक केल्यास तक्रार करा !

जर एखादी शाळा किंवा महाविद्यालयात कागदपत्रांसाठी पैशांची मागणी करत असेल. किंवा अडवणूक करत असेल, तर पालकांनी घाबरून न जाता खालील ठिकाणी तक्रार करावी. प्राथमिक, माध्यमिक शिक्षणाधिकारी कार्यालय, शिक्षण उपसंचालक कार्यालय, शिक्षण विभागाच्या ई-तक्रार पोर्टलवर ऑनलाइन तक्रार करावी, या तक्रारीची दखल शिक्षण विभागामार्फत तत्काळ घेतली जाते. संबंधित शाळेला नोटीस दिली जाते. त्यामध्ये दोषी आढळल्यास कारवाई केली जाते. यासाठी संबंधित व्यक्तीची तक्रार असणे आवश्यक आहे.

# कत्तलीसाठी जाणाऱ्या गोवंशांना जीवनदान

## परतवाडा पोलिसांची कारवाई



अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**परतवाडा, दि.३१ :** परिसरातील ब्राम्हणवाडा थडी पोलीस स्टेशन हद्दीत पोलिसांनी अवैध गोवंश वाहतूक करणाऱ्या तस्करांवर धडक कारवाई केली. २९ जानेवारी रोजी मिळालेल्या गुप्त माहितीनुसार सापळा रचून, चार गायी आणि तीन वासरांसह सात गोवंशांना मृत्यूच्या दाढेतून वाचवले.

गुप्त माहितीनुसार, ट्रकमध्ये

गोवंश अत्यंत क्रूर आणि अमानवीय पद्धतीने वाहतूक केले जात होते. पोलिसांनी करजगाव येथील गजानन महाराज मंदिराजवळील कॅनॉलवर सापळा रचून ट्रक थांबवला. झडतीत तस्करांचा हा धंदा उघडकीस आला. सातही गोवंशांना ताब्यात घेऊन पोलिसांनी सुरक्षित स्थानी गोरक्षणासाठी पाठवले, तर ट्रक चालवणाऱ्यांवर कठोर कारवाईची नोटीस दिली आहे. या मोहिमेत

ठाणेदार प्रशांत जाधव, जमादार राजू मरसकोल्हे, शिपाई अनुप मानकर आणि चालक विशाल सिंघल यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. पोलिसांच्या वेळेवर तपास आणि तत्पर कारवाईमुळे तस्करांचा डाव उळघून लावला गेला.गोवंश हत्या आणि अवैध वाहतुकीसाठी १ ते ७ वर्षांचा कारावास आणि मोठा दंड लागू आहे. प्रशासनाने पशु क्रूरता प्रतिबंधक कायदा व राज्य गोवंश संरक्षण कायदा अंतर्गत कडक पावले उचलली आहेत.या कारवाईमुळे परिसरात पोलीस प्रशासनाचे कौतुक होत असून, अवैध गोवंश तस्करांना धाबे दणाणले गेले आहेत. स्थानिक नागरिकांनीही या कृतीचे स्वागत केले आहे आणि अशा कारवाईंमुळे परिसरात सुरक्षा व शिस्तीचे वातावरण दृढ होत असल्याचे दिसून येते.

# थकित मानधनामुळे होमगार्डवर उपासमारीची पाळी

## मानधन तातडीने द्या; जिल्हा प्रशासनाकडे मागणी



अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. ३१ :** जिल्ह्यातील होमगार्ड सैनिकांच्या आर्थिक परिस्थितीकडे लक्ष देत जिल्हा प्रशासनाने मुख्यमंत्री व जिल्हा समादेशकांकडे तातडीने थकित मानधन भरण्याबाबत अर्ज सादर केला आहे. या अर्जात स्पष्ट करण्यात आले आहे की, होमगार्ड सैनिक, विशेषत: ग्रामीण भागातील, अत्यंत कठीण परिस्थितीत सेवा देत आहेत.

त्यांना दररोज विविध सार्वजनिक कार्यक्रम, निवडणूक सुरक्षा, आणि नागरिकांचे रक्षण करण्यासाठी काम करावे लागते, परंतु त्यांचे मानधन अनेक महिन्यांपासून थकित आहे, ज्यामुळे त्यांचे कुटुंब आर्थिक अडचणीत आहे. अर्जामध्ये नमूद केले आहे की, अमरावती जिल्ह्यात ४५९ होमगार्ड सैनिकांची मागणी निवडणूक बंदोबस्तासाठी लातूर जिल्ह्यातून करण्यात आली आहे. या सैनिकांना वेळेत मानधन न मिळाल्यास गरीब व मेहनती सैनिकांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ येऊ शकते, आणि निवडणूक सारख्या अति महत्त्वाच्या कार्यात अडथळा निर्माण होऊ शकतो. त्यामुळे अग्रिम रकमेची व्यवस्था करून सैनिकांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे, असे अर्जात नमूद केले गेले आहे.

निवेदन अर्ज सादर करताना अमरावती जिल्हा होमगार्डस सैनिकांचे प्रतिनिधी राजेंद्र सिंह बघेल, धनश्याम पुरिया, देवेंद्र सागर, मनीष जोगी, मंगेश उज्जेनकर, नईम खान, प्रदीप बद्रे, राजेश डोंगरे, विजय चौके, ओम ठाकुर, सुरज ठाकुर, नरेश चंदेले, अजय भोसले, सागर श्रीवास, समीर खान, ज्ञानेश्वर काकडे, मो. शाहरूख, मो. मुजमामिल, अन्सार खान, रितेश मेश्राम, मनिष रामटेके, जगदीश बरडे, आशिष वानखडे, आर. आर. सुंडे, राहुल इंगळे, संदीप गावंडे विजय बोरकर, विनोद घोडेस्वार, गणेश मंडले, अमोल वानखडे, दीपक चिल्लोरकर, जणू प्रकाश तायडे, दीपाली नेमाडे, लता ब्राम्हणे, शिल्पा अंबुलकर, दीपाली बावणे, मधुसूदन राऊत, प्रियंका नागदिवे, अमृता सरोदे, पूजा जांभुळकर, सुधीर गडलिंग, अंजू चावरे उपस्थित होते.

होमगार्ड सैनिकांच्या कामगिरीला योग्य मानधन मिळाले पाहिजे, कारण ते शासनाच्या आदेशानुसार सर्व अति-महत्त्वाच्या बंदोबस्तात सतत कार्यरत असतात. त्यांचा सततचा योगदान, विशेषत-निवडणूक सारख्या अति-महत्त्वाच्या काळात, प्रशासनाला निश्चितपणे गौरवायला हवा, असेही अर्जात नमूद आहे.

# रेतीची ओव्हरलोड वाहतूक, पाच आरोपी अटकेत

## ट्रकसह ४२.७० लाखांचा मुद्देमाल जप्त

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि.३१ :** ग्रामीण हद्दीत वाढत्या रेती चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेने मोठी व प्रभावी कारवाई करत अवैध रेती वाहतुकीचा पर्दाफाश केला आहे. वरूड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गणेशपूर गावाजवळ

विनापरवाना व विना रॉयल्टी ओव्हरलोड रेती वाहतूक करणाऱ्या हायवा वाहनासह पाच आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून ४२ लाखा ७० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी रेती चोरीविरोधात कठोर कारवाईचे आदेश दिले होते. त्यानुसार पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या मोर्शी उपविभागातील पोलीस उपनिरीक्षक सागर हटवार



यांच्या पथकाने ३० जानेवारी २०२६ रोजी पेट्रोलिंगदरम्यान मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे ही धडक कारवाई के ली. गणेशपूर परिसरात टाय कंपनीचा सिग्ना हायवा ट्रक अवैधरित्या रेती वाहतूक करत असल्याचे आढळून आले. विशेष म्हणजे, सदर हायवा ट्रकच्या पुढे स्विफ्ट डिझायर कारद्वारे पायलटींग सुरू असल्याचे निदर्शनास येता पोलिसांनी तत्काळ कारवाई करत दोन्ही वाहने व पाच इसमांना जागीच ताब्यात घेतले. अटक येताच करण्यात आलेल्या आरोपींमध्ये इरशाद ईशाक शेख (३०), आहे.

जप्त करण्यात आलेला जसमा काली ठाण्याच्या ताब्यात देण्यात मुकोद माजीद सिद्दीकी (३०), अश्पाक मुस्तफा अन्सारी (४८), एहेफाज आहत सिद्दीकी (२५) सर्व रा. मोहाड, ता. नरखेड, जि. नागपूर तसेच हायवा चालक दुर्गेश श्यामसुंदर सूर्यवंशी (२५) यांचा समावेश आहे. प्राथमिक तपासात आरोपी विनापखाना व विना रॉयल्टी चोरीची रेती वाहतूक करून शासनाचा महसूल बुडवत असल्याचे निष्पन्न झाले. कारवाईदरम्यान पोलिसांनी टाटय सिग्ना हायवा डंपर ४० लाख, २० ब्रास रेती ७० हजार, स्विफ्ट डिझायर कार १.५० लाख,५ अँड्रॉइड मोबाईल ५० हजार, असा एकूण ४२.७० लाखांचा मुद्देमाल जप्त केला आला असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, पोलीस निरीक्षक किरण वानखडेयांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सागर हटवार, पोलीस अंमलदार बळवंत दाभणे, रविंद्र बावणे, भूषण पेटे, पंकज फाटे व यशस्वीरीत्या केली.

### गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

वरुड : मिल्लत सोशल वेल्फेअर असोसिएशन शेंदुरजना घाट द्वारा संचालित एच. के. एम. उर्दू हायस्कूल येथे भारतीय प्रजासत्ताक दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.या वेळी मुख्याध्यापक अब्दुल शकील यांच्या अध्यक्षतेखाली शेख आसिफ, नितीन नोरस्कर, नत्थुजी माटे, अय्यूब, भीमराव कुकडे, आबीद हुसेन आदी मान्यवर उपस्थित होते.

# जुन्या वैमनस्यातून कुटुंबावर सशस्त्र हल्ला!

## देवरी निपानी येथील घटना | पती-पत्नी व मुलगा गंभीर जखमी

**अमरावती, दि.३१ :** वलगांव पोलीस स्टेशन हद्दीतील देवरी निपानी गावात कायद्याला हरताळ फासणारी टोळीगुंडगिरी उघडकीस आली असून, जुन्या वादातून कोसमकार कुटुंबावर कुऱ्हाड- तलवार-पाईपने जीवघेणा हल्ला करण्यात आला आहे. दारूच्या नशेत धुंद आठ जणांच्या टोळक्याने घरात घुसून केलेल्या या हल्ल्यात पती-पत्नी आणि त्यांचा मुलगा गंभीर जखमी झाले असून, संपूर्ण गावात भीतीचे वातावरण पसरले आहे. २८ जानेवारी रोजी रात्री ८.३० च्या सुमारास फिर्यादी रेखा रंगराव कोसमकार (६०) या पतीसोबत अंगणात पाणी भरत होत्या. त्याचवेळी विश्वजीत उर्फ प्रताप प्रकाश वासनिक (२८) हा रिक्षामधून इतर सात साथीदारांसह घटनास्थळी पोहोचला.

सर्व आरोपी दारूच्या नशेत असल्याची माहिती आहे. जुन्या वादाची कुरापत काढत विश्वजीतने हातात तलवार घेत शिवीगाळ सुरू केली. आवाज ऐकून मुलगा राहुल कोसमकार बाहेर येताच टोळीने त्याच्यावर कुऱ्हाड व लोखंडी पाईपने सपासप हल्ला चढवला. रेखा कोसमकार यांनाही निर्दयपणे मारहाण करण्यात आली. हल्ला थांबवण्यासाठी रंगराव कोसमकार (६४) धावून आले असता, प्रकाश वासनिक याने त्यांच्यावर लाठीने बेदम मारहाण केली.

या मारहाणीत रंगराव कोसमकार (६४), रेखा रंगराव कोसमकार (६०) व राहुल कोसमकार हे जखमी झाले.गर्भवती महिलेलाही धमक्या; दहशत वाढली हल्लेखोर इतक्यावरच थांबले नाहीत. घरात असलेल्या गर्भवती महिलेला तसेच संकल्प नावाच्या युवकाला मारहाण करत जीवे मारण्याच्या धमक्या देण्यात आल्या.

## सक्षमीकरण | महिलांना आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी बनविण्याचा प्रयत्न

# उमेदची भरारी; लाखो महिला लखपती दीदी

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि.३१ :** महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार विविध योजना राबवत आहेत. या योजनांमुळे महिलांना स्वत:चे आर्थिक भविष्य सुरक्षित करण्याची संधी मिळत आहे. आतापर्यंत लखपती दीदी योजनेचा जिल्ह्यातील १.८७ लाख महिलांना फायदा झाला आहे.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अर्थात उमेद अंतर्गत जिल्ह्यात महिला बचत गटांची चळवळ वेगाने वाढत असून, बँकांच्या माध्यमातून कर्जपुरवठाही करण्यात येत आहे. यामुळे महिला स्वावलंबी होत असून विविध उत्पादने घेऊन त्यांची विक्रीही करीत आहेत. तसेच जिल्ह्यात २०२४-२५ मध्ये ८३ हजार महिला लखपती दीदी झाल्या होत्या. तर आता चालू आर्थिक वर्षात यामध्ये मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे जिल्ह्यात एकूण १ लाख ८७ हजार २०९




इतक्या लखपती दीदी आहेत.

आर्थिकदृष्ट्या वंचित महिलांना बिनव्याजी ५ लाख रुपयांच कर्ज उपलब्ध करून देणे हे लखपती दीदी या योजनेचे मुख्य उद्दिष्ट आहे. या योजनेमुळे महिला आर्थिक अडचणींपासून मुक्त होऊन स्वत:चा व्यवसाय सुरू करण्यास आणि वाढविण्यास सक्षम होणार आहेत. गेल्या काही वर्षांपासून महिला सशक्तिकरणावर सरकारचा विशेष भर आहे. महिलांची आर्थिक, सामाजिक प्रगती व्हावी यासाठी सरकारकडून प्रयत्न केले जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून सरकारकडून लखपती दीदी ही योजना राबवली जात आहे.

# 'अजुबा' जवळ आढळला आठ किलो गांजा

## गुन्हे शाखेची मोठी कारवाई

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.३१ :** शहरात अमली पदार्थांच्या विक्रीविरुद्ध पोलिसांनी कंबर कसली असून, शहर गुन्हे शाखेने एका धडक कारवाईत ८ किलो १०५ ग्रॅम गांजा जप्त केला आहे. या प्रकरणी एका २४ वर्षीय तरुणाला बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. रविवार २५ जानेवारी रोजी नागपूर-अमरावती एक्सप्रेस हायवेवरील वडाळी सर्व्हिस रोडजवळ ही कारवाई करण्यात आली.

योगेश उर्फ अजुबा धनराज रायकवार (वय २४, रा. रतनगंज,



अमरावती) असे अटक आरोपीचे नाव आहे. एफआयआरनुसार, गुन्हे शाखेचे पथक आयुक्तालय हद्दीत पेट्रोलिंग करत असताना, नागपूर-अमरावती एक्सप्रेस हायवेवरील वडाळी सर्व्हिस रोडजवळ एक तरुण मोठया प्रमाणात गांजा विक्रीसाठी येणार असल्याची गुप्त माहिती मिळाली. या माहितीच्याया माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून योगेश ऊर्फ अजुबा रायकवार याला ताब्यात घेतले.

त्याच्याकडून १,६२,१०० रुपये किमतीचा ८ किलो १०५ ग्रॅम गांजा, १० हजारांचा मोबाईल असा एकुण १ लाख ७२ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीविरुद्ध फ्रेजरपुरा पोलीस स्टेशनमध्ये एनडीपीएस ॲक्टनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## थोडक्यात

### कत्तलीसाठी जाणारी जनावरे पकडली

अमरावती : कत्तलीच्या उद्देशाने टाटा ईटारा (एमएच ३०-बीडी ३१३८) वाहनातून पाच जनावरांची वाहतूक करणाऱ्या दोघांवर नागपुरी गेट पोलिसांनी कारवाई केली. रतनगंज येथे केलेल्या कारवाईदरम्यान रियाज खान गौस खान (३३) व मोहम्मद आतीक मोहम्मद तमजीद (३६) यांच्यावर गुन्हे नोंदवण्यात आले असून त्यांच्या ताब्यातून वाहन व जनावरांसह एकूण २ लाख १६ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या घटनेचा पुढील तपास नागपुरी गेट पोलीस ठाण्याचे ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस करीत आहे.

### वीज चोरी करणाऱ्यावर कारवाई

अमरावती : वीज चोरी करणाऱ्यावर महावितरणच्या भरारी पथकाने कारवाई केली. ही घटना गुप्ता ले-आऊट येथे करण्यात आली. महावितरणच्या भरारी पथकाचे विभागीय उपकार्यकारी अभियंता सुरेंद्र बाळकृष्ण बागडे (५०) यांच्या तक्रारीवरून राजापेठ पोलिसांनी देवेश शशिकांत राजा (४४) याच्यावर गुन्हा नोंदवला.

### वृध्द सासु-सासऱ्यांना घराबाहेर काढले

अमरावती : आईवडिलांचा सांभाळ करेन या अटीवर मुलाच्या नावने वडिलांनी घराचे बक्षिसपत्र केले. परंतु मुलगा व सून आता तोंड फिरवत असून वृद्ध सासूसासऱ्यांना घरातून बाहेर काढले. ही घटना घनश्यामनगर येथे घडली. वृद्ध सासरे अवतारसिंग फुमनसिंग मान (७१) यांच्या तक्रारीवरून राजापेठ पोलिसांनी मुलगा व सुनेविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### पोलिसांची दारू विक्रेत्यावर कारवाई

अमरावती : बडनेरा पोलिसांनी जुनी वस्ती केली. त्याच्या ताब्यातून अंदाजे १ हजार रुपयांच्या २५ नग पावट्या जप्त केल्यात. पुढील तपास पोलिस करीत आहे.

### वसतीगृहातून ४०पंखे लंपास

अमरावती : व्हीएमव्ही महाविद्यालय परिसरातील अल्प संख्याक मुलींच्या वसतीगृहातून अज्ञाताने ४० नग सिलींग फॅन चोरून नेले. तसेच अन्य साहित्य चोरून नेले. चोरीला गेलेल्या साहित्याची अंदाजे किंमत १२ हजार रुपये आहे. या संदर्भात महाविद्यालयाचे कर्मचारी अमितकुमार रामदास नकाशे (३८, रा. छत्रसाल नगर) यांनी गाडगे नगर पोलिसात तक्रार नोंदवली. अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### चारचाकी वाहनावर कारवाई

अमरावती : रहदारीच्या मुख्य मार्गावर खाद्य पदार्थ, फळे व भाजीपाल्याच्या गाड्या, ताब्यातील ऑटो व इतर वाहने, तसेच पानठेले, चहा टपरी लावत विक्रेत्यांनी अतिक्रमण केले. त्यामुळे सर्वसामान्यांना तेथून ये-जा करताना अपघाताची शक्यता निर्माण होवून जीवित हानीचा धोका निर्माण झाला होता. ही बाब लक्षात घेत गाडगे नगर, पोलिसांनी आपापल्या कार्यक्षेत्रात कारवाई करीत एकूण १८ जणांवर गुन्हे नोंदवले.

सलग दुसऱ्या दिवशी इतक्या मोठ्या प्रमाणात झालेल्या कारवाईमुळे विक्रेते व व्यावसायिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. गाडगे नगर पोलिसांनी शेगाव नाका, व्हीएमव्ही रोड, कठोरा रोड, शेगाव रोड, नागपुरी गेट पोलिसांनी टांगा पाडाव चौक, चांदणी चौक, राजापेठ पोलिसांनी बडनेरा मार्गावरील नवाथे चौपाटी, धन्वंतरी मार्केटसमोर, कोतवाली पोलिसांनी जुनी तहसील, चित्रा चौक, इर्विन रोड, मालवीय चौक, इर्विन मर्क्युरी टी पॉईंट, तर खोलापुरी गेट पोलिसांनी पार्वतीनगर रेल्वे क्रॉसिंगजवळ, पार्वतीनगर नं. २ येथे कारवाई केल्यात.

# कर्तव्यावर हजर असताना ओळखपत्र घालणे बंधनकारक

## अन्यथा शिस्तभंगाची कारवाई | एमआयडीसीचे परिपत्रक जाहीर

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.३१ :** ओळखपत्र घाला अन्यथा शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, असा इशारा देणारे परिपत्रक औद्योगिक विकास महाराष्ट्र महामंडळाने (एमआयडीसी) काढला आहे. या परिपत्रकामुळे येथून पुढे अधिकारी-कर्मचारी यांना विभागाद्वारे देण्यात आलेले ओळखपत्र परिधान करणे अनिवार्य राहणार आहे. तसेच ज्या कर्मचाऱ्यांना गणवेश निश्चित करण्यात आला

त्यांना गणवेश परिधान करणे बंधनकारक राहणार आहे. एमआयडीसीमधील अनेक अधिकारी - कर्मचारी यांना कार्यालयात असताना आपले कार्यालयीन ओळखपत्र व गणवेश परिधान करण्याकरिता शासनाकडून सूचना देण्यात आल्या. औद्योगिक विकास महाराष्ट्र महामंडळाने




(एमआयडीसी) काढला आहे.

या परिपत्रक मात्र, त्यानंतर कार्यालयात अधिकारी कर्मचारी असताना कार्यालयात ओळखपत्र परिधान करीत नसल्याचे निदर्शनास आले. या पार्श्वभूमीवर कार्यालयात प्रवेश करताना आणि कार्यालयात असताना कार्यालयीन ओळखपत्र व गणवेश परिधान करावा. ओळखपत्र न लावणाऱ्या अधिकारी कर्मचारी यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल. असे परिपत्रक काढण्यात आले आहे. या परिपत्रकानुसार,

महामंडळातील वर्ग ३ व ४ च्या (खानसामा, मदतीस, पहारेकरी, नाईक, शिपाई, दप्तरी) पुरुष महिला गणवेशधारी कर्मचारी, नियमित आस्थापना, रुपांतरित अस्थायी आस्थापना, अंशतः रुपांतरित अस्थायी आस्थापना व बारवी धरण प्रकल्पग्रस्त इत्यादी आस्थापनेवरील गणवेशधारी कर्मचाऱ्यांना गणवेश महामंडळाचे ओळखपत्र परिधान करावे लागणार आहे. सदर आदेशाचे उल्लंघन केल्यास कारवाई होणार आहे.

अनेक कर्मचाऱ्यांना ओळखपत्राचा विसर महामंडळातील वर्ग १,२,३ चे अधिकारी-कर्मचारी आणि ओळखपत्र लावत नसल्याचे निदर्शनास आल्यास तसेच गणवेशधारी कर्मचारी गणवेश व महामंडळाचे ओळखपत्र परिधान करत नसल्याचे निदर्शनास आल्यास त्यांचा धुलाई भत्ता बंद करण्यात येईल. तसेच त्या दिवसाची उपस्थिती कार्यालयात गैरहजर धरून येऊन त्यांच्याविरुद्ध शिस्तभंगाचा एक दिवसाचा पगार कपात करण्याची कारवाई होणार असल्याचे या परिपत्रकात नमूद केले आहे.

### दर महिन्याला अहवाल

सर्व विभागप्रमुख व कार्यालयीन प्रमुख यांना प्रत्येक अधिकारी-कर्मचारी व गणवेशधारी कर्मचारी गणवेश परिधान करून व ओळखपत्र लावून कामावर हजर राहतील याकडे लक्ष द्यायचे आहे. याबाबतचा अहवाल दर महिन्याला देणे आवश्यक केले आहे. तसेच सुरक्षारक्षकांनी कार्यालयात प्रवेशद्वारामधून प्रवेश देताना याबाबत तपासणी करणे अनिवार्य केले आहे.

# जिल्हा परिषद मुलांच्या शाळेत बाल आनंद मेळावा



अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अंजनगाव बारी, दि.३१ :** येथील जि. प. प्राथमिक मुलांची केंद्रशाळा अंजनगाव बारी येथे दि. २८ रोजी बाल आनंद मेळाव्याचे उपक्रमांचे आयोजन मोठया उत्सवामध्ये करण्यात आले. विद्यार्थ्यांना व्यवहारी ज्ञान अवगत होऊन आत्मनिर्भर व्हावे म्हणून वेगवेगळया विविध पदार्थाचे स्ट्रॉल लावून पदार्थांची विक्री करण्यात आली. यामध्ये इडली, ढोकळा ,पाणीपुरी, उकडलेले बोरं ,आलू पोगे ,भेल बेड-पकोडे, समोसे, डोसे अशा विविध पदार्थाचा समावेश होता. बाल आनंद मेळाव्याचे उद्घाटन शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गजानन पाटील यांचे हस्ते करण्यात आले.

तसेच प्रमुख पाहूणे म्हणूण शा.व्य.स.च्या उपाध्यक्षा दानेश्वरी पुनिया ह्या होत्या तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका संध्या राठोड तसेच शाळेचे सहाय्यक शिक्षक कल्पना इंगोले, श्याम खुंटे, रिता ठकनाईक, निलेश चौधरी यांनी कार्यक्रमाचे आयोजन करण्यास सहकार्य केले.

बाळ आनंद मेळाव्या पाहण्याकरिता नागरिक गर्दी केली होती मान्यवरांनी व विद्यार्थांना विविध पदार्थाचा आस्वाद घेऊन विद्यार्थ्यांना या उपक्रमाविषयी प्रोत्साहीत केले.

# किड्स वर्ल्ड स्कूल येथे सांस्कृतिक कार्यक्रम



**अंजनगांव बारी, दि.३१ :** कै.विश्वासराव देशमुख (कदम) ट्रस्ट द्वारा संचालित किड्स वर्ल्ड ॲड लर्न स्कूल, अंजनगाव बारी येथे वार्षिकोत्सवा निमित्त प्रजासत्ताक दिनी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संजय देशमुख (अध्यक्ष - कै. विश्वासराव देशमुख ट्रस्ट ) प्रमुख पाहुणे संदीप शेबे, माजी सरपंच लक्ष्मणराव कदम, रोशन पुनियानिखिल दुरतकर, प्रकाश देशमुख ( उपाध्यक्ष - कै. विश्वासराव देशमुख ट्रस्ट), पोलीस पाटील निशा तेटू, ॲड विलास गावंडे, रविंद्र देशमुख ( सदस्य, कै. विश्वासराव देशमुख ट्रस्ट ) उपस्थित होते.

# हनुमान व्यायाम शाळेत क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

## तीन हजार अधिकारी व शिक्षकांचा सहभाग



**अमरावती, दि.३१ :** अमरावती जिल्हास्तरीय अधिकारी,कर्मचारी क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाला आज शनिवारपासून (दि.३१) श्री. हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या प्रांगणात अत्यंत साधेपणात मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्रा यांच्या हस्ते कबड्डीच्या क्रिडांगणाचे पूजन करून व खेळाडूंचे हस्तआंदोलन करून उद्घाटनीय सामना प्रारंभ करून महोत्सवाला सुरुवात करण्यात आली आहे. यावेळी अति मु.का.अ. श्रीराम कुळकर्णी, बीडीओ विनोद खेडकर,गुणवंत वरघट, प्राथमिक शिक्षणाधिकारी सतिश मुगल,नितिन उंडे सह सर्व समित्यांचे प्रमुख उपस्थित होते. दिनांक ३१ जानेवारी ते २ फेब्रुवारीदरम्यान हा महोत्सव होणार आहे. या महोत्सवात सुमारे तीन हजार अधिकारी, कर्मचारी खेळाडू सहभागी झाले आहे.

जिल्हा परिषद मधिल अधिकारी, कर्मचारी यांना दैनदीन कामातुन थोडी मुक्तता मिळावी म्हणुन दरवर्षी प्रमाणे यंदाही अमरावती जिल्हा परिषदने अधिकारी, कर्मचारी यांचा जिल्हास्तरीय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव ३१ जानेवारी व १,२ फेब्रुवारीला जगप्रसिध्द श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ अमरावती येथे आयोजित करण्यात आला आहे.

या महोत्सवात १५ संघाचे ३ हजार अधिकारी, कर्मचारी सहभागी झाले आहे.

या जिल्हास्तरीय अधिकारी, कर्मचारी क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाला दिनांक ३१ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता, श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती येथे अत्यंत साधेपणाने सुरुवात झाली आहे. तर बक्षीस वितरण दिनांक २ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी ४.०० वाजता जिल्हा परिषद कन्या शाळा कॅम्प अमरावती ( गर्ल्स हायस्कुल ) येथे होईल.

सर्व सांघिक (पुरुष क्रिकेट वगळता) स्पर्धांचे आयोजन श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती येथे करण्यात आलेले आहे. ( दि. ३१ जानेवारी २०२६ ला सकाळी ९.०० वाजता पासून भाग्यपत्रकानुसार सुरु झाली. तर कबड्डीचे सर्व सामने हे पारंपारिक पध्दतीने मातीच्या मैदानावर खेळविले जात आहे.

वैयक्तिक स्पर्धांचे आयोजन दिनांक ३१ जानेवारी २०२६ ला सकाळी ९ वाजता पासून सुरु करण्यात आल्या.सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन दि.३१ जानेवारी व 1 फेब्रुवारी 2026 ला संगीतसुर्य केशवराव भोसले सभागृह, , परतवाडा रोड, अमरावती येथे सायं. ५.०० ते रात्री १०.०० या कालावधीत आयोजित करण्यात आले आहेत.

# अंजनगाव बारी वासियांकडून उपमुख्यमंत्री अजित पवारांना श्रध्दांजली

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अंजनगाव बारी, दि.३१ :** परिसरात सर्व पक्षीय कार्यकर्ते व वासियांना उपमुख्यमंत्री अजित पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. अंजनगाव बारी ग्रामपंचायत सरपंच शोभा खडसे ,उपससंच अरविंद निंबर्ते ग्रामविकास अधिकारी विनोद इसळ , ग्रा.पं.सदस्य बंडू डकरे, जगदीश अंबाडकर, पत्रकार साहेबराव राऊत, रोजगार सेवक राहूल कारकोन, प्रविण अगाशे , पार्डी ग्रामविकास अधिकारी ओम पिहुलकर व सर्व अंजनगाव बारी ग्रा.पं. कर्मचारी यांनी अजितदादा पवार यांना श्रद्धांजली वाहुन त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला व दोन मिनिटाचे मौन पाळून मृतात्म्यास शांती लाभो



अशी प्रार्थना करण्यात आली.

यामध्ये जि.प. उर्दू शाळा, कन्या शाळा, प्रायमरी शाळा, जनता विद्यालय अशा विवीध संघटनेकडून शोक व्यक्त करित श्रध्दांजली वाहिली. परिसरातील, पार्डी (देवी), उदखेड, वडगाव जिरे, अऱ्हाड- कुऱ्हाड, भानखेड, मोगरा, गोविंदपूर इ. ठिकाणी गावकरी व शासकीय संस्थानी पवार यांना श्रद्धांजली वाहिली आहे.राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनाबद्दल जिल्हा गामिण पत्रकार संघटने तर्फे श्रध्दांजली देण्यात आली असुन जिल्हाध्यक्ष साहेबराव राऊत यांनी अजित पवार सारखा खंबीर नेतृत्व असलेला नेता गमाविला असल्याचे प्रतिपादन केले आहे. याबाबत जिल्हातील समस्त पत्रकार बंधूनी शोक भावना व्यक्त केल्या आहे.

# दर्यापूर येथे अजितदादांना सर्वपक्षीय श्रध्दांजली

अजिंक्य भारत| प्रतिनिधी



**दर्यापूर, दि.३१ :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा यांचे अकस्मात दु:खद निधन झाले आहे.या अपूरणीय क्षतीमुळे दर्यापूर राष्ट्रवादी काँग्रेस परिवार शोकमग्न असून,दिवंगत लोकनेते अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी

शुक्रवार, दिनांक ३० जानेवारी २०२६ रोजी कृषी भवन, अकोट रोड, दर्यापूर येथे सर्वपक्षीय शोकसभा आयोजित करण्यात आली असता या सर्वच पक्षी श्रद्धांजली सभेमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस सोबत राष्ट्रीय काँग्रेस, भारतीय जनता पार्टी, भारिप बहुजन महासंघ, व इतर पक्षाचे नेते त्याचा कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते.

त्याप्रसंगी खासदार बळवंत वानखडे ,आमदार गजानन लवटे, सुधाकर पाटील भारसाकडे, सुनील पाटील गावंडे, बाळासाहेब हिंगणीकर, डॉ. दिनकरराव गायगोले, सागर देशमुख, डॉ. अभय गावंडे, कांचनमाला पाटील गावंडे, इंजि. नितेश वानखडे, विजयराव विल्हेकर, बाळासाहेब टोळे, कुलदीप काळे, सागर काळे, राजेंद्र गाय गोले, अनिल जळमकर, भैय्यासाहेब टेकाळे, बाळासाहेब राऊत, किशोर भाऊ गणोरकर, बाबुभाई, राजेंद्र तराळ, पंकज कदम, ॲड. जगदीश विल्हेकर अतिश शिरभाते, संजू भाऊ चोरपगार डॉ. व्ही एस साबळे, मेगा भारती, साहेबराव भदे विजयराव मेंढे, अनिल कुंडालवाल,भारत आठवले, श्रीकृष्ण डोंगरे, नवेद भाई, सुशील कुमार गावंडे, चंद्रशेखर पाटील वडनेर गंगाई, अंकुश कावडकर, सुनील पाटील डिके, गजानन जाधव, प्रमोद धनोकार, विश्वंभर मारके, राजेश राठी, गणेशराव लाजूरकर, गुणवंत पाटील गावंडे, दीपक बडे, अमोल गहरवाल, मुन्ना भाऊ बैताडे, गुड्डू पटेल, अजय देशमुख, सर्व पक्षांचे सन्माननीय नेते,सहकार क्षेत्रातील मान्यवर, पदाधिकारी, कार्यकर्ते, पत्रकार बांधव तसेच अजितदादांवर प्रेम करणारे सर्व नागरिक यांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नितीन पाटील गावंडे यांनी केले.

**समस्या** आ. प्रताप अडसड यांनी साधला सर्वसामान्य माणसांशी संवाद

# जनता दरबारात दोनशे तक्रारी दाखल

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**धामणगाव रेल्वे, दि.३१ :** शेतात विहीर आहे पण वीज पंप नाही, घरकुलचा प्रश्न कायम आहे घरकुलच्या यादीत ग्रामपंचायतीने बदल केला रेशन कार्ड मध्ये नाव नाही शेतात पादन रस्ता नाही अशा अनेक २०० तक्रारी प्राप्त झाल्या.

धामणगाव तालुक्यातील जनतेशी आज शुक्रवारी दत्तप्रसाद निवासस्थानी आमदार प्रताप अडसड यांनी थेट संवाद साधत सर्वसामान्य ग्रामस्थांच्या समस्या ऐकल्या प्रत्येकाचे प्रश्न समजावून घेतले सिमेंट रस्ता, नाल्या, पोलीस ठाण्यातील तक्रारी, शेती समस्या



,राहण्यासाठी जागा नाही, पाण्याची समस्या अतिवृष्टीचा निधी प्राप्त नाही लाडकी बहिणीचा हप्ता मिळाला नाहीं,गावातील समस्या ग्रामसेवक, तलाठ्याबाबत अनेक तक्रारी प्राप्त झाल्या या तक्रारीची दखल आ. प्रताप अडसड यांनी घेतली संबंधित अधिकाऱ्यांशी बातचीत करत समस्या सोडविण्यात आल्या आज प्राप्त तक्रारी आठ दिवसात निकालात निघणार असल्याचे आश्वासन आमदार प्रताप अडसड यांनी दिले यावेळी न.प. उपाध्यक्ष गिरीश मुंदडा, भाजपा तालुकाध्यक्ष प्रवीण खैरकार , प्रणय राजनकर,दर्शन राठी, पंकज गायकवाड, दुर्योधन रघुते , आदिनाथ हजारे ,पवन पडोळे,मालू रंगारी ,प्रभाकर काळे, साहेबराव पाटील, महेंद्र इंगळे, रवी जिचकार, प्रफुल्ल निस्ताने, रवी ठाकूर यांची उपस्थिती होती.

# जिल्हा परिषद उर्दू शाळेत प्रजासत्ताक दिन साजरा

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अंजनगाव बारी, दि.३१ :** येथिल जि.प. प्राथमिक उर्दू शाळेत २६ जानेवारीला प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी सरपंचा शोभा खडसे यांचे हस्ते ध्वजारोहणाचा कार्यक्रम पार पडला. प्रजासत्ताक दिनानिमित्त विविध कार्यक्रम राबविण्यात आले यात मान्यवरांचे उपस्थितीत विद्यार्थ्यांची भाषणे दिली तसेच सांस्कृतीक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आणि या राष्ट्रीय सणा प्रित्यर्थ विद्यार्थ्यांना स्कूल बॅगचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाची जबाबदारी अभिया परविन अब्दुल रहमान व नगमा फिरदौस नवेद खान यांनी पार पाडली. या कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन



समितीचे अध्यक्ष मो.आरीफ मो.रुस्तम, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष मो. मुदासीर मो. सालीक, उपसरपंच अरविंद निंबर्ते, ग्रामविकास आधिकारी विनोद इसळ, ग्रामपंचायत सदस्य सदस्य बंडु डकरे, जगदीश अंबडकार, ॲड. विलास गावंडे, वसंतराव सोनार शाळेचे मुख्याधापक मो.युसुफ अजहर यांच्यासह मोलाना सौसिफ साहब अनवर भाई शे. हारुण साहब सलीम खान साहेब खान अजीज भाई मो.उमेर मो. सईद अ.अजीज शेख जाबिर मो.राजिक न्याजउल्ला खाँ भाई मो सारीक शे. राजिक इमरान खान ,अबरार खान अजीज खान सलमान खान लौसिफ खान अनवर खान समीज खान एनउल्ला खान मो फाजिल मोअकील सैय्यद युसूफ मोहम्मद खालीद भाई सैय्यद इमरान जुबेर अहमद रेहान बैग बुरहान बैग मो शोएब भो अकील सैय्यद युनूस मोअमीन भाई व गावाचे जेष्ठ नागरीक व पालक उपस्थित होते.

## घटना - घडामोडी



## नेर येथे भूगोल दिन उत्साहात

**नेर (परसोपंत) :** पृथ्वीवर घडणाऱ्या नैसर्गिक घडामोडींचा अभ्यास व्हावा आणि विद्यार्थ्यांमध्ये विषयाची गोडी निर्माण व्हावी, या उद्देशाने नेर येथील दि इंग्लिश हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात 'इको क्लब फॉर मिशन'च्या वतीने भूगोल दिन उत्साहात साजरा करण्यात आला. गजानन उईके यांच्या अध्यक्षतेखाली आणि सुरेश कनाके, सुनील ताजणे यांच्या मार्गदर्शनात पार पडलेल्या या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध भौगोलिक खडकांच्या प्रदर्शनाचा लाभ घेतला. या कार्यक्रमाला निरज भगत, शीतल पाडेकर, कल्याणी भांगे व अजय कारभारी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी सुरेश कनाके यांनी भूगोल दिनाचे शास्त्रीय व ऐतिहासिक महत्त्व पटवून दिले, तर सुनील ताजणे यांनी या विषयातील करिअरच्या संधी आणि त्याचे व्यावहारिक महत्त्व विशद केले. भूगोल अभ्यासक्रम सजगता आणि निरीक्षण शक्ती विकसित करण्यासाठी महत्त्वाचा असल्याचे प्रतिपादन गजानन उईके यांनी केले. या उपक्रमाचे प्रास्ताविक रश्मी बोभाटे यांनी केले. सूत्रसंचालन पूर्वी वडदकर हिने केले, तर आभार वेदांती सुने हिने मानले. कार्यक्रमानंतर आयोजित प्रदर्शनीत विद्यार्थ्यांनी कोळसा, लिमोनाइट, सायट्रिन क्रिस्टल, शेल, मिकासिस्ट अशा विविध दुर्मिळ व भौगोलिक खडकांची माहिती कुतूहलाने जाणून घेतली. या प्रदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये विषयाबद्दल नवचैतन्य निर्माण झाले आहे.



## अध्यक्षपदी ॲड. निता राठोड यांची बिनविरोध निवड

**घाटंजी :** येथील वकील संघाच्या (बार असोसिएशन) २०२६ च्या नवीन कार्यकारिणीची निवड प्रक्रिया नुकतीच उत्साहात पार पडली. यात ॲड. निता मनोज राठोड यांची अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली असून त्या संघाच्या पहिल्या महिला अध्यक्ष ठरल्या आहेत, तर सचिवपदी ॲड. वैभव महाजन यांची नियुक्ती करण्यात आली आहे. न्यायाधीश पी. आर. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि ज्येष्ठ वकिलांच्या साक्षीने ही निवड प्रक्रिया पार पडली. या निवडीनंतर निता राठोड यांनी महिला वकिलांचे प्रश्न सोडवण्यासह बार आणि बेंचमध्ये सुसंवाद राखण्याचा मनोदय व्यक्त केला, तर वैभव महाजन यांनी वकिलांच्या सोयीसुविधांसाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले. महाजन यांच्या कामाचा ठसा पाहून त्यांना ही जबाबदारी देण्यात आली आहे. या निवड प्रक्रियेवेळी ज्येष्ठ अधिवक्ता विजय भुरे, अनंतकुमार पांडे, विनय चव्हाण, गणेश धात्रक, निलेश चवरडोल, नेताजी राऊत, मनोज राठोड, चंद्रशेखर मरागडे, निलेश शुक्ला, प्रेम राऊत, सादिक खान, यश पोटपल्लीवर, शंतनू धाबे तसेच महिला प्रतिनिधी नीता पवार आणि रागिणी राऊत उपस्थित होते. या ऐतिहासिक निवडीबद्दल राजकीय व सामाजिक क्षेत्रांतून दोघांचेही अभिनंदन होत आहे.



## प्रजासत्ताक दिन उत्साहात

**दिग्रस :** येथील हाजी मूसा खान इंग्लिश स्कूलमध्ये ७७ वा प्रजासत्ताक दिन अत्यंत उत्साहपूर्ण आणि देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. ध्वजारोहणानंतर विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत, नृत्य आणि नाट्यप्रयोगातून उपस्थितांची मने जिंकली. हाजी एजाज, अध्यक्ष मुदस्सर खान आणि हाजी अजीम खान यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या सोहळ्यात विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम आणि संविधानाचे महत्त्व रुजविण्याचा प्रयत्न करण्यात आला. प्रजासत्ताक दिनानिमित्त शाळा परिसर तिरंग्याच्या रंगात न्हाऊन निघाला होता. ध्वजारोहण आणि राष्ट्रगीतानंतर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या शिस्तबद्ध आणि कलात्मक कार्यक्रमांना उपस्थितांनी भरभरून दाद दिली. प्रजासत्ताक दिन हा हक्कांबरोबरच कर्तव्यांची जाणीव करून देणारा दिवस असून, विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम व सामाजिक बांधिलकी रुजविण्यासाठी असे कार्यक्रम महत्त्वाचे असल्याचे विचार मान्यवरांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी हाजी एजाज, शाळेचे अध्यक्ष मुदस्सर खान, हाजी अजीम खान, हाजी अतीक खान, फिरोज खान, मुजम्मिल खान, सलीम, आमिन नवरंगाबादे, शारिक ठेकेदार तसेच मुख्याध्यापक अतीक, महिला शिक्षिका व पालकांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांना मिष्ठान्न वाटप करण्यात आले.

## उमरखेड बीएसएनएल कार्यालयात ध्वजारोहण नाही; पोलिसात तक्रार

**उमरखेड :** प्रजासत्ताक दिनी उमरखेड येथील भारत संचार निगम लिमिटेडच्या (बीएसएनएल) कार्यालयात ध्वजारोहण न झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी माजी नगरसेवक संदीप गणपत ठाकरे यांनी ३० जानेवारी रोजी उमरखेड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करत संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी केली आहे. या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली असून प्रशासकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. देशभरात २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा केला जातो. सर्व शासकीय आणि निमशासकीय कार्यालयांमध्ये ध्वजारोहण करून राष्ट्रध्वजाला मानवंदना देणे अनिवार्य असते. मात्र, उमरखेड येथील बीएसएनएल कार्यालयात यंदा हा राष्ट्रीय सोहळा पार पडला नसल्याचे निदर्शनास आले आहे. ही बाब अत्यंत गंभीर असून हा राष्ट्रध्वजाचा अवमान असल्याचे संदीप ठाकरे यांनी आपल्या तक्रारीत नमूद केले आहे. एकीकडे सर्वत्र राष्ट्रप्रेमाचे वातावरण असताना, एका जबाबदार शासकीय विभागाने ध्वजारोहणाकडे पाठ फिरवल्याने नागरिकांमधून आश्चर्य आणि संताप व्यक्त केला जात आहे. ठाकरे यांनी दिलेल्या तक्रारीनंतर पोलीस प्रशासन या प्रकरणाची सखोल चौकशी करून काय कारवाई करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# नंददीपला आंतरराष्ट्रीय भेट

## ब्राझील आणि बेल्जियमच्या अभ्यासकांनी अनुभवले सेवाकार्य

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**यवतमाळ, दि. ३१ :** यवतमाळच्या नंददीप फाऊंडेशनला शनिवारी (दि. ३१) ब्राझील आणि बेल्जियमच्या आंतरराष्ट्रीय अभ्यासकांनी सदिच्छा भेट दिली. डायटचे माजी प्राचार्य डॉ. प्रशांत गावंडे यांच्या पुढाकाराने बेघर मनोरुग्णांच्या पुनर्वसनाचे काम आणि संस्थेची कार्यपद्धती जवळून जाणून घेण्यासाठी ही पाहणी करण्यात आली. संस्थेचे निस्वार्थ सेवाकार्य आणि त्याग पाहून हे विदेशी पाहुणे भारावून गेले असून, त्यांनी या कार्याचा जागतिक स्तरावर गौरव केला.

मानवतेच्या सेवेला भाषेचे किंवा देशांच्या सीमांचे बंधन नसते, याचा प्रत्यय यवतमाळमध्ये आला. बेघर आणि मनोरुग्णांसाठी मायेचे छत्र बनलेल्या नंददीप फाऊंडेशनच्या कार्याची कीर्ती आता सातासमुद्रापार पोहोचली आहे. शनिवारी ब्राझील आणि बेल्जियम येथील दोन आंतरराष्ट्रीय दर्जाच्या अभ्यासकांनी संस्थेला भेट देऊन येथील सेवाकार्याचा साक्षात अनुभव घेतला. यामध्ये बेल्जियमचे समाजशास्त्र विषयाचे अभ्यासक प्रा. डॉ. फ्रेडरिक आणि ब्राझीलच्या अर्थशास्त्र विषयाच्या प्राध्यापिका डॉ. सिंथींया यांचा समावेश होता. डायट कॉलेजचे माजी प्राचार्य तथा सामाजिक कार्यकर्ते डॉ. प्रशांत गावंडे यांच्या संकल्पनेतून हा आंतरराष्ट्रीय संवादाचा पूल बांधला गेला. पाहुण्यांनी निवारा केंद्रातील सोयीसुविधा, मनोरुग्णांवर सुरू असलेली उपचार पद्धती आणि त्यांच्या पुनर्वसनाची क्लिष्ट प्रक्रिया अत्यंत बारकाईने समजून घेतली. मनोरुग्णांना केवळ आश्रय न देता, त्यांना पुन्हा मुख्य प्रवाहात आणण्यासाठी संदीप शिंदे आणि त्यांची टीम करत असलेली धडपड पाहून दोन्ही अभ्यासक थक्क झाले. डॉ. प्रशांत गावंडे यांनी दुभाषकाची भूमिका बजावत, संस्थेचे कार्य इंग्रजीतून प्रभावीपणे मांडले. या भेटीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे दूरदर्शनचे जिल्हा प्रतिनिधी आनंद कसंबे यांनी तयार केलेला नंददीपवरील माहितीपट. हा माहितीपट पाहताना उपस्थितांचे डोळे पाणावले. शब्दांच्या पलीकडचे दुःख आणि त्यावर फुंकर घालणारे सेवाव्रती पाहून विदेशी पाहुणे भारावून गेले. संस्थेला नुकत्याच मिळालेल्या आंतरराष्ट्रीय पुरस्काराबद्दल त्यांनी विशेष अभिनंदन केले. "जगभरात अनेक संस्था काम करतात, पण नंददीपमधील आपुलकी आणि समर्पण भाव अद्वितीय आहे," अशा शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. या प्रसंगी डॉ. सुशील बत्तलवार, फाऊंडेशनचे अध्यक्ष संदीप शिंदे, नंदिनी शिंदे, संजय बोरगावकर, बबन घोडेस्वार, गौरी बोटरे, निकिता, सविता मडावी आणि प्रिया बागडे आदी उपस्थित होते. या भेटीने कार्यकर्त्यांना नवनिर्माणाची ऊर्जा मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे.

# यवतमाळात 'विशाल हिंदू संमेलना'ला उत्स्फूर्त प्रतिसाद

## महामंडलेश्वर सुनील शास्त्री महाराजांचे ओजस्वी विचार

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**




**यवतमाळ, दि. ३१ :** येथील संत गाडगेबाबा वाचनालय व मुंगसाजी महाराज मंदिर परिसरातील अनुश्री पार्कवर सकल हिंदू समाजातर्फे आयोजित 'विशाल हिंदू संमेलना'ला नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद लाभला. २४ जानेवारी रोजी पार पडलेल्या या सोहळ्यात महामंडलेश्वर श्री सुनील शास्त्री महाराज यांनी उपस्थितांना ओजस्वी मार्गदर्शन केले.

आपल्या भाषणातून त्यांनी हिंदू संस्कृती, परंपरा आणि नैतिक मूल्यांचे महत्त्व विशद करत समाजात एकोपा व धार्मिक जागृतीची गरज असल्याचे प्रतिपादन केले. तसेच तरुणांनी व्यसनांपासून दूर राहून शिक्षण, चारित्र्य आणि राष्ट्रभक्तीच्या मार्गावर चालण्याचे आवाहन केले. संपूर्ण परिसर भगव्या पताकांनी सजला असून 'जय श्रीराम'च्या घोषणांनी वातावरण दुमदुमून गेले होते. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी संयोजक अविनाश रोकडे यांच्या मार्गदर्शनाखाली विठ्ठल मिसाळ, विठ्ठल राठोड, विलास गायधने, किशोर जीवतोडे, मुकुंद वाघमारे, मंगेश बाविस्कर, मनोहर दीक्षित, संजय गाडे, इंगोले काका, पियुष दुधनकर, यश वरघने, राजेंद्र बोपचे तसेच सुषमा राऊत, लता देवतळे आणि गरड काकू यांनी विशेष परिश्रम घेतले. महिला व तरुणांच्या लक्षणीय उपस्थितीत हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

# ४ फेब्रुवारीला वृद्ध साहित्यिक व कलाकारांच्या मुलाखती

## २१७ उमेदवारांची होणार चाचणी

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**दारव्हा, दि. ३१ :** दारव्हा पंचायत समिती येथे 'राजर्षी शाहू महाराज वृद्ध साहित्यिक व कलाकार मानधन योजने'अंतर्गत ४ फेब्रुवारी रोजी निवड चाचणी प्रक्रिया पार पडणार आहे. तालुक्यातील ५० वर्षांवरील २१७ कलावंतांची निवड करण्यासाठी चितंगराव कदम, गजानन फोफसे आणि राजेश धुळे यांच्या उपस्थितीत ही प्रक्रिया होईल. मानधनासाठी पात्र ठरण्यासाठी आयोजित या मुलाखतीस कलाकारांनी उपस्थित राहावे, असे आवाहन गटविकास अधिकारी राजीव शिंदे यांनी केले आहे.

दारव्हा तालुक्यातील २१७ वृद्ध साहित्यिक व कलावंतांनी सन २०२२ ते २०२६ या कालावधीत मानधन योजनेसाठी अर्ज सादर केले होते. या सर्व पात्र उमेदवारांची निवड चाचणी घेण्यासाठी विशेष समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीत सदस्य म्हणून नागपूर येथील चितंगराव गणपतराव कदम, पांगरवाडी येथील गजानन किसन फोफसे आणि दारव्हा पंचायत समितीचे सहायक गटविकास अधिकारी राजेश सुदाम धुळे हे कामकाज पाहणार आहेत. सदर निवड चाचणीसाठी येताना संबंधित कलावंतांनी आपल्या कलेनुसार आवश्यक ती वेशभूषा परिधान करून तसेच सादरीकरणासाठी लागणारे वाद्य किंवा साहित्य सोबत आणावे. दिलेल्या तारखेला सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत पंचायत समितीच्या सभागृहात उपस्थित राहून या प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन गटविकास अधिकारी राजीव शिंदे यांनी केले आहे.

# ढाणकीत पोलिसांचे 'दंगा काबू' प्रात्यक्षिक

## सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर बिटरगाव पोलिसांची सज्जता

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**ढाणकी, दि. ३१ :** आगामी सण-उत्सवांच्या काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आणि कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी बिटरगाव पोलीस ठाण्याच्या वतीने 'दंगा काबू' योजनेचे थरारक प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. अचानक उद्भवणाऱ्या हिंसक परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी आणि जमावाला शांत करण्यासाठी पोलिसांची सज्जता तपासण्याच्या उद्देशाने हे मॉक ड्रिल घेण्यात आले. यात अश्रूधुराच्या नळकांड्यांपासून ते लाठीचार्जपर्यंतच्या सर्व प्रक्रियांचे शिस्तबद्ध सादरीकरण करत पोलिसांनी आपल्या सतर्कतेचे दर्शन घडविले.

ठाणेदार पांडुरंग शिंदे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस ठाण्याच्या परिसरात पार पडलेल्या या मॉक ड्रिलमध्ये एका काल्पनिक दंगलीचे हुबेहूब दृश्य उभे करण्यात आले होते. आगामी काळात येणारे उत्सव शांततेत पार पडावेत, यासाठी ही पूर्वतयारी करण्यात आली. जमाव हिंसक झाल्यास परिस्थिती कशी हाताळायची, याचे धडे यावेळी कर्मचाऱ्यांना गिरवता आले. सुरुवातीला जमावाला कायद्याची समज देणे, त्यानंतरही गोंधळ सुरू राहिल्यास सौम्य लाठीचार्ज करणे आणि परिस्थिती हाताबाहेर गेल्यास अश्रूधुराचा वापर करणे, या सर्व प्रक्रियांचे अत्यंत शिस्तबद्ध सादरीकरण करण्यात आले. यावेळी केवळ मानवी सज्जताच नव्हे, तर दंगल नियंत्रण पथकाकडे असलेल्या तांत्रिक साधनांचीही चाचणी घेण्यात आली. ढाली, हेल्मेट, फायबर लाठ्या आणि अश्रूधुराच्या गन सुस्थितीत आहेत की नाही, हे तपासण्यात आले. एखादी अनुचित घटना घडल्यास पोलीस पथक किती कमी वेळात घटनास्थळी पोहोचून 'पोझिशन' घेते, यावर विशेष भर देण्यात आला. जमावाला पांगवताना कमीत कमी बळाचा वापर करून परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्याचे कसब पोलिसांनी यावेळी दाखवून दिले. नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता शांतता राखावी, पोलीस सुरक्षेसाठी सज्ज आहेत, असा विश्वास पांडुरंग शिंदे यांनी व्यक्त केला. या थरारक प्रात्यक्षिकाने बिटरगाव पोलिसांची सज्जता अधोरेखित केली असून, स्थानिक नागरिकांनीही या तत्परतेचे स्वागत केले आहे.

# दिग्रसच्या बीएनबी महाविद्यालयात राष्ट्रीय युवा सप्ताह उत्साहात



**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**दिग्रस, दि. ३१ :** येथील बीएनबी महाविद्यालयात स्वामी विवेकानंद जयंतीचे औचित्य साधून आयोजित 'राष्ट्रीय युवा सप्ताह' विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. तरुणांमध्ये स्वामी विवेकानंदांचे विचार रुजविणे आणि आरोग्याचे महत्त्व बिंबविणे या उद्देशाने प्राचार्य अरविंद लाडोळे यांच्या मार्गदर्शनाखाली व्याख्यान, निबंध स्पर्धा आणि योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

सप्ताहाचा शुभारंभ स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त आयोजित अभिवादन सोहळ्याने झाला. या सत्रात प्रमुख वक्ते म्हणून ए. डी. जाधव यांनी स्वामीजींच्या जीवन व कार्यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धाही घेण्यात आली. सप्ताहाच्या पुढील टप्प्यात आयोजित योग व ध्यान शिबिराच्या अध्यक्षस्थानी भौतिकशास्त्र विभागप्रमुख व्ही. के. जाधव होते. यावेळी शहरातील योग प्रशिक्षक मुरलीधर राठी यांनी विद्यार्थ्यांना योगा व ध्यानाचे महत्त्व प्रात्यक्षिकांसह पटवून दिले. याप्रसंगी प्रवीण चांडक यांची विशेष उपस्थिती होती. या सप्ताहातील उपक्रमांना विद्यार्थी, कर्मचारी आणि पालकांनी मोठी गर्दी केली होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी व्ही. डी. जाधव, महिला कार्यक्रम अधिकारी एम. एम. जगताप यांच्यासह एनएसएसच्या स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

# नेर शहरात 'एक शाम शहीदों के नाम' कार्यक्रमात अंध कलाकारांची सुरेल मैफिल

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**




**नेर (परसोपंत), दि. ३१ :** येथील चिंतामणी चौकात प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून बजरंग एकता गणेश मंडळाच्या वतीने 'एक शाम शहीदों के नाम' या विशेष संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यात वाशीम येथील 'इंडियन आयडॉल' फेम आणि वर्ल्ड रेकॉर्ड सहभागी चेतन उचितकर प्रस्तुत चेतन सेवांकुर ऑर्केस्ट्राच्या अंध कलाकारांनी आपल्या सुरेल आवाजात देशभक्तीपर गीते सादर करून रसिक श्रोत्यांची मने जिंकली.

या मैफलीत कलाकारांनी 'नफरत की लाठी तोडो', 'संदेसे आते है', 'ए मेरे वतन के लोगो' ही गीते सादर करताच वातावरण राष्ट्रभक्तीने भारावून गेले. तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावरील 'एकच राजा इथे जन्मला' आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा गौरव करणारे 'दोनच राजे इथे गाजले', 'घटनेच्या पहिल्या पानावर' यांसारखी दमदार गीते सादर करण्यात आली. गाण्यांच्या सुरांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले असतानाच, मिमिक्री कलाकार सुधीर इंगळे यांनी आपल्या विनोदी सादरीकरणाने हास्याची कारंजी फुलवली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील आडे यांनी केले. या उपक्रमातून अंध कलाकारांच्या कलेला व्यासपीठ देण्याचा मंडळाचा प्रयत्न कौतुकास्पद ठरला.

# जिल्ह्यात 'कुसुम' मोहिम प्रभावीपणे राबवा

## जिल्हाधिकारी विकास मीना : ३० जानेवारी ते १२ फेब्रुवारी दरम्यान विशेष मोहीम

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**यवतमाळ, दि. ३१ :** कुष्ठरोग निवारण दिनाचे औचित्य साधून जिल्ह्यात ३० जानेवारी ते १२ फेब्रुवारी या कालावधीत 'स्पर्श' कुष्ठरोग जनजागृती अभियान आणि 'कुष्ठरोग सुरक्षित महाराष्ट्र' (कुसुम) मोहीम प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. या माध्यमातून समाजात कुष्ठरोगाबाबत असलेला भेदभाव व गैरसमज दूर करून वंचित घटकांपर्यंत आरोग्य सेवा पोहोचविण्याचे निर्देश जिल्हाधिकारी विकास मीना यांनी दिले आहेत.

या अभियानाच्या पूर्वतयारीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष समन्वय समितीची बैठक पार पडली. यावेळी जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुभाष केले, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुखदेव राठोड आणि सहायक संचालक (कुष्ठरोग) डॉ. गोपाळ पाटील यांच्यासह वैद्यकीय अधीक्षक उपस्थित होते. या पंधरवड्यात शाळा व महाविद्यालयांमध्ये प्रार्थनेच्या वेळी प्रतिज्ञा वाचन, विद्यार्थ्यांची प्रभात फेरी, प्रश्नमंजुषा, निबंध व चित्रकला स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच नुक्कड नाटके, पोस्टर्स आणि बॅनर्सद्वारे जनजागृती करण्यात येईल. महिला बचत गट आणि धार्मिक स्थळांच्या माध्यमातूनही संदेश दिला जाईल. विशेष म्हणजे, 'कुसुम' मोहिमेअंतर्गत नियमित सर्वेक्षणातून सुटणाऱ्या वीटभट्टी कामगार, खाण कामगार, बांधकाम मजूर, स्थलांतरित व्यक्ती, निवासी आश्रमशाळा आणि कारखान्यातील कामगारांवर विशेष लक्ष केंद्रित केले जाणार आहे. हे मजूर कामासाठी लवकर बाहेर पडत असल्याने त्यांची आशा स्वयंसेविका व आरोग्य कर्मचाऱ्यांच्या मदतीने प्रत्यक्ष तपासणी करून उपचार दिले जातील. जिल्ह्याला २०२७ पर्यंत कुष्ठरोगमुक्त करण्याचे उद्दिष्ट प्रशासनाने ठेवले आहे. कुष्ठरोग हा जंतुजन्य आजार असून तो बहुविध औषधोपचाराने १०० टक्के बरा होतो. हा आजार पापामुळे किंवा शापामुळे होत नसून तो अनुवंशिकही नाही. त्यामुळे नागरिकांनी याबद्दलचे गैरसमज दूर करून शासकीय रुग्णालयात उपलब्ध असलेल्या मोफत निदान व उपचारांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# भीषण अपघातात आरोग्य सेवक जागीच ठार

## हिवरा संगम जवळ ट्रक-दुचाकीचा अपघात

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि. ३१ :** महागाव तालुक्यातील हिवरा संगम नजीक असलेल्या एकविरा देवी मंदिराजवळ राष्ट्रीय महामार्गावर ट्रक आणि दुचाकीचा भीषण अपघात होऊन एक तरुण जागीच ठार झाला. ही दुर्दैवी घटना सायंकाळी ४:३० वाजताच्या सुमारास घडली. करण कुमार पुंजाजी भागवत (वय ३०, रा. बेलथर, ता. कळमनुरी, जि. हिंगोली) असे मृत तरुणाचे नाव आहे.

नांदेडवरून नागपूरकडे जाणाऱ्या मालवाहू ट्रकवर (क्रमांक एमएच ०९ ईएल ४३९२) समोरून भरधाव वेगात येणारी दुचाकी (क्रमांक एमएच ३८ एच ३७४८) जाऊन आदळली. करण हा हिंगणघाट येथे आरोग्य सेवक म्हणून नोकरीला होता आणि तो आपल्या गावी परतत असताना हा अपघात झाला. घटनेची माहिती मिळताच महागाव पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून पंचनामा केला असून, ठाणेदार धनराज निळे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे. दरम्यान, या घटनास्थळी महामार्गावर धोक्याची सूचना देणारे किंवा वळणाचे फलक नसल्याने येथे वारंवार अपघात होत आहेत. आतापर्यंत अनेकांना येथे जीव गमवावा लागला असून काहींना कायमचे अपंगत्व आले आहे. त्यामुळे संबंधित विभागाने त्वरित फलक लावून उपाययोजना करावी, अशी मागणी होत आहे.

अजिंक्य भारत
आपलं यवतमाळ



## महत्वाचे

### कुऱ्हाडीने घराचा दरवाजा तोडला

**यवतमाळ :** जुन्या वादातून एकाने महिलेच्या घराचा दरवाजा कुऱ्हाडीने तोडून घरातील साहित्याची नासधूस केल्याची घटना यवतमाळ शहरातील शिवाजी चौक, माळीपुरा येथे घडली. ही घटना २९ जानेवारी रोजी रात्री ८ वाजताच्या सुमारास घडली. फिर्यादी श्रीमती संगीता अनिल कामठे (४३, रा. शिवाजी चौक, माळीपुरा) यांच्या तक्रारीनुसार, आरोपी मेहेर बेलसरे (३३, रा. चमेडिया नगर) याने जुन्या भांडणाचा राग मनात धरून त्यांच्या घरी आला. त्याने हातातील कुऱ्हाडीने घराचा दरवाजा तोडून आत प्रवेश केला. घरातील साहित्याची तोडफोड करून सुमारे ५० हजार रुपयांचे नुकसान केले. तसेच संगीता यांना शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी ३० जानेवारी रोजी यवतमाळ शहर पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

### २५ हजारांचे बैल चोरीला

**पारवा :** घरासमोर बांधलेले दोन बैल अज्ञात चोरट्याने चोरी केल्याची घटना घाटंजी तालुक्यातील दत्तापूर येथे उघडकीस आली. ही घटना २८ जानेवारी सायंकाळी ६ ते २९ जानेवारी सकाळी ६.३० या वेळेत घडली. फिर्यादी अविनाश भीमराव कोवे (४२, रा. दत्तापूर) यांनी आपले दोन पांढऱ्या रंगाचे बैल (वय ६ वर्षे) नेहमीप्रमाणे बांधून ठेवले होते. रात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्याने हे दोन्ही बैल चोरून नेले. चोरीला गेलेल्या बैलांची किंमत २५ हजार रुपये आहे. ३० जानेवारी रोजी पारवा पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

### वृद्धेचे दागिने लंपास


**वणी :** बस प्रवासादरम्यान चोरट्याने वृद्ध महिलेच्या ८ लाख ४० हजार रुपयांच्या ऐवजावर डल्ला मारल्याची घटना घडली. ही घटना २० जानेवारी रोजी सकाळी ११.३० वाजता जनता कॉलेज, चंद्रपूर बसस्थानक परिसरात घडली. याप्रकरणी ३० जानेवारी रोजी वणी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला. फिर्यादी सौ. शोभा बाबाराव डॉगे (६५, रा. विठ्ठलवाडी, वणी) या प्रवासाला गेल्या होत्या. दरम्यान, अज्ञात चोरट्याने त्यांची नजर चुकवून त्यांच्याकडील सोन्याचे ८२ ग्रॅम वजनाचे दागिने आणि रोख रक्कम असा एकूण ८ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. दहा दिवसांनंतर दाखल झालेल्या तक्रारीवरून वणी पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# उमरखेडमध्ये आज कृषी समृद्धीचा जागर

## सहकारमहर्षी भाऊसाहेब माने राज्यस्तरीय कृषी गौरव पुरस्काराचे वितरण; विविध क्षेत्रातील दिग्गजांचा होणार सन्मान

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**उमरखेड, दि.३१ :** कृषी क्षेत्रात आपल्या नावीन्यपूर्ण प्रयोगांनी वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या शेतकरी, संशोधक आणि उद्योजकांच्या पाठीवर कौतुकाची थाप पडणार आहे. औदुंबरनगरी म्हणून प्रसिद्ध असलेल्या उमरखेड येथील कृषी महाविद्यालयाच्या प्रांगणात रविवार, दि. १ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी १२ वाजता 'सहकारमहर्षी भाऊसाहेब माने राज्यस्तरीय कृषी गौरव पुरस्कार'सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न होत आहे. भाऊसाहेब माने यांच्या ३३ व्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून आयोजित या सोहळ्यात कृषी क्षेत्रातील दिग्गजांचा गौरव करण्यात येणार आहे.



या भव्य सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी सहयोगी अधिष्ठाता डॉ. विजयराव माने (अन्न व तंत्रज्ञान महाविद्यालय, यवतमाळ) हे असतील. तर प्रमुख पाहुणे म्हणून खासदार नागेश पाटील आष्टीकर, आमदार किसनराव वानखेडे, अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख, रोजगार हमी योजनेचे आयुक्त भारत बास्टेवार (नागपूर), कृषी विद्यापीठाचे कुलसचिव सतीश ठाकरे, माजी रेशीम संचालक कॅप्टन कलंत्री (नागपूर), प्रसिद्ध उद्योजक व डिक्कीचे राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ. सुगत वाघमारे, भाजपचे पूर्व विदर्भ समन्वयक नितीन भुतडा, शिवाजी शिक्षण संस्था पुसदचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील चोंढीकर आणि प्रतिष्ठानचे अध्यक्ष अशोक वानखेडे यांची उपस्थिती राहणार आहे. कृषी क्षेत्रातील 'रत्नां'चा सन्मान भाऊसाहेब माने कृषी प्रतिष्ठान आणि अकोल्याचे डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने हा 'ज्ञानयज्ञ' पार पडणार आहे. यामध्ये रेशीम उद्योगातील योगदानाबद्दल नागपूरचे डॉ. महेंद्र ढवळे यांना मानाचा 'सत्यशोधक भाऊसाहेब माने कृषी जीवन गौरव पुरस्कार'देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. यासोबतच कृषी पर्यटन, दुग्ध प्रक्रिया, संशोधन आणि पत्रकारिता अशा विविध क्षेत्रांत उत्तुंग कामगिरी करणाऱ्या मान्यवरांचाही गौरव होणार आहे. महिला शेतकऱ्यांची 'हायटेक'भरारी या सोहळ्याचे विशेष आकर्षण असणार आहे. यामध्ये अकोल्याच्या सौ. दिशा उदगीरकर (टेरेसवरील गोपालन), जालन्याच्या सौ. अंकिता मोरे (हायटेक कुक्कुटपालन) आणि घाटंजीच्या सौ. पूजा जिनेवाड (ड्रोन फवारणी) यांचा समावेश आहे. या रणरागिनींनी शेतीत केलेल्या प्रयोगांचा गौरव उपस्थित शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल.

> 'कृषी क्षेत्रात नवनवीन प्रयोग करणाऱ्यांना प्रोत्साहन मिळावे आणि त्यांचे ज्ञान उमरखेड परिसरातील तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचावे, या उद्देशाने हा गौरव सोहळा आयोजित केला आहे. उमरखेड आणि परिसरातील सर्व नागरिक, शेतकरी आणि युवकांनी या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे आणि ज्ञानाच्या या प्रवाहात सहभागी व्हावे.'
>
> -डॉ. विजय माने,
> चेअरमन, कृषी महाविद्यालय, उमरखेड.

### या कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वांचा होणार गौरव

◆डॉ. महेंद्र ढवळे (नागपूर) : जीवन गौरव पुरस्कार ◆ पांडुरंग तावरे (बारामती) : शेतीपूरक उद्योग सन्मान ◆पांडुरंग आवाड (धाराशीव) : कृषी उद्योग गौरव सन्मान ◆कृष्णकुमार राठी (अकोला) : कृषी माल प्रक्रिया उद्योग सन्मान ◆ दिशा उदगीरकर (अकोला) : नावीन्यपूर्ण महिला कृषी उद्योजिका सन्मान ◆अंकिता मोरे पाटील (जालना) : हायटेक कुक्कुटपालन सन्मान ◆ रवींद्र मेटकर (अमरावती) : शेतीपूरक उद्योजक गौरव सन्मान ◆बाबाजी बांगर (पुणे) : नैसर्गिक शेती सन्मान ◆ अजिंक्य कांबळे (पुणे) : शेतीपूरक उद्योग ◆गोविंद पवार (नांदेड) : युवा प्रगतशील दुग्ध उत्पादक सन्मान ◆श्रीपत राठोड (नागपूर) : सेंद्रिय भाजीपाला उत्पादन सन्मान ◆कृष्णराव देशट्टीवार (यवतमाळ) : एकात्मिक शेती व कृषी तंत्रज्ञान सन्मान ◆पूजा जिनेवाड-संगणवार (घाटंजी) : ड्रोन फवारणी कृषी उद्योग गौरव सन्मान ◆संतोष देशमुख (अकोला) : शेतीपूरक उद्योग सन्मान ◆ सुरेंद्र नारखेडे (अकोला) : वृक्ष संवर्धन व व्यावसायिक वनीकरण गौरव सन्मान ◆तिक्ष्णगत वाघमारे (मुंबई) : कृषी प्रसार व पत्रकारिता गौरव सन्मान ◆संतोष मुंढे (छत्रपती संभाजीनगर) : कृषी प्रसार व पत्रकारिता गौरव सन्मान ◆मिलिंद देशमुख (राहुरी) : कृषी शास्त्रज्ञ सन्मान ◆ डॉ. मनोज माळी (सांगली) : पीक संशोधन शास्त्रज्ञ सन्मान ◆डॉ. एन.एम.कोंढे (अकोला) : मृद व जलसंधारण शास्त्रज्ञ सन्मान ◆डॉ. आम्रपाली आखरे (अकोला) : बियाणे संशोधन सन्मान ◆डॉ. किशोर बिडवे (अकोला) : कृषी विस्तार व संशोधन शास्त्रज्ञ सन्मान

### आदर्श शेतकरी प्रोत्साहन पुरस्कार

◆ वंदना पांडे (खरबी) ◆दत्ता वानखेडे (सुकळी जहाँगीर) ◆ सतीश जामकर (पोफाळी) ◆समाधान वानखेडे (खरूस बु.)

### CAPTION शंकरपट...



**नेर : तालुक्यातील मांगलादेवी येथे आयोजित शंकरपटाच्या आखाड्यात बैलांच्या खुरांनी उडालेला प्रचंड धुराळा आणि शर्यतीचा शिगेला पोहोचलेला उत्साह... पुरुषांची मक्तेदारी मोडीत काढत, या पारंपरिक क्रीडा प्रकारात आत्मविश्वासाने सहभाग नोंदवून, कासरा हातात धरत बैलजोडी हाकण्याचा रोमांचकारी अनुभव घेताना डॉ. प्रियंका बिडकर. शर्यतीच्या मैदानात सुसाट वेगाने धावणारी बैलजोडी आणि या थरारक क्षणाचे साक्षीदार ठरलेले ग्रामस्थ.**

# जन्मदाखला घोटाळ्याचा 'डीआयजीं'कडून आढावा

## शेंदुरसनी येथील बोगस जन्मनोंदीचे प्रकरण : आत्तापर्यंत १३ जणांना ठोकल्या बेड्या

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि. ३१ :** यवतमाळ जिल्ह्यातील शेंदूरसनी व भवानी ग्रामपंचायतींच्या सरकारी संकेतस्थळावर 'हॅकिंग'द्वारे हजारो बोगस जन्मनोंदी करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीचा पर्दाफाश करत पोलिसांनी १३ आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. या गंभीर गुन्ह्याचा आढावा घेण्यासाठी सायबर सेलचे उपमहासंचालक (डीआयजी) यशस्वी यादव यांनी गुरुवारी स्वतः यवतमाळात धाव घेत चार तास कसून चौकशी केली. बिहारपासून मुंबईपर्यंत पसरलेले हे रॅकेट उद्ध्वस्त करण्यात पोलिसांना मोठे यश आले आहे.



सविस्तर वृत्त असे की, आर्णी तालुक्यातील शेंदूरसनी ग्रामपंचायतीच्या दप्तरी अचानक २७ हजार ऑनलाइन जन्मनोंदी झाल्याचे निदर्शनास आले. जेमतेम काही हजार लोकसंख्या असलेल्या गावात इतक्या मोठ्या प्रमाणात नोंदी झाल्याने आणि उमरखेडमधील भवानी गावातही असाच प्रकार घडल्याने प्रशासनाचे धाबे दणाणले होते. या प्रकरणाच्या तपासासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी सहायक निरीक्षक श्रीकांत जिंदमवार आणि उपनिरीक्षक सागर भास्कर यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथक नेमले. या सायबर टीमने 'आयपी ॲड्रेस'चा तांत्रिक माग काढत थेट उत्तर भारतापर्यंत धडक मारली. पोलिसांनी बिहार, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, पुणे आणि मुंबई अशा विविध ठिकाणांवरून आतापर्यंत एकूण १३ आरोपींना जेरबंद केले आहे. गुरुवारी (दि. २९) मुंबईतून राज अन्सारी, वाहिद अन्सारी आणि वजीद अन्सारी या तिघांना अटक करण्यात आली असून, न्यायालयाने त्यांची रवानगी कारागृहात केली आहे. आरोपींनी सरकारी वेबसाइट हॅक करून युजर आयडी आणि पासवर्ड मिळवल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. या गुन्ह्याची व्याप्ती पाहता, उपमहासंचालक यशस्वी यादव यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयातील 'मंथन हॉल'मध्ये महत्त्वपूर्ण बैठक घेतली. सुमारे चार तास चाललेल्या या बैठकीत त्यांनी तपासाची पडताळणी केली आणि प्रतिकूल परिस्थितीत परराज्यात जाऊन केलेल्या कामगिरीबद्दल तपास पथकाची पाठ थोपटली. या बनावट दाखल्यांचा वापर नागरिकत्वासाठी होणार होता की अन्य फसवणुकीसाठी, याचा सखोल तपास पोलीस करत आहेत.

# विदर्भ राज्य आंदोलन समितीचा २२ फेब्रुवारीला नागपुरात लॉंगमार्च'

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि. ३१ :** स्वतंत्र विदर्भ राज्याच्या मागणीसाठी विदर्भ राज्य आंदोलन समितीच्या वतीने रविवारी, २२ फेब्रुवारी २०२६ रोजी नागपुरात 'विदर्भ निर्माण जनसंकल्प लॉंगमार्च' आणि मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्राची आर्थिक स्थिती बिकट असल्याने विदर्भाचा विकास अशक्य असल्याचे सांगत, हा मोर्चा दुपारी १२ वाजता विदर्भ चंडिका मंदिर ते चिटणीस पार्क असा काढण्यात येणार असल्याची माहिती वामनराव चटप यांनी आयोजित पत्रपरिषदेत दिली.

राज्य सरकारवरील कर्जाचा बोजा आणि थकलेली देणी पाहता विदर्भाचे प्रश्न सोडवण्यासाठी स्वतंत्र राज्यच पर्याय असल्याचे समितीचे म्हणणे आहे. हा मोर्चा शहीद चौक, इतवारी, टांगा स्टँड, नंगा पुतळा, डागा चौक, अग्रसेन चौक मार्गे दुपारी २ वाजता चिटणीस पार्क येथे पोहोचून मेळाव्यात रूपांतरित होईल. यात ११ जिल्ह्यांतील १२० तालुक्यांचे प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. या आंदोलनाच्या यशस्वीतेसाठी वामनराव चटप, रंजना मामर्डे, पी. आर. राजपूत, सुरेश वानखेडे, पुरुषोत्तम पाटील, कृष्णराव भोंगडे, सुरेंद्र कोडगीरवार, विजय निवल, गोविंद चव्हाण, राहुल खारकर, सुनील गुल्हाने, अजय चमेडिया, अयुब शेख, युवराज साळवे, नामदेवराव जेनेकर, रफीक रंगरेज, मंजुषा तिरपुडे आणि राजू पिंपळकर यांनी पुढाकार घेतला असून नागरिकांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# आर्णी मार्गावरील उड्डाणपूल 'डेथ ट्रॅप'

## अवैध धंद्यांवरून बाळासाहेब मांगुळकरांचा प्रशासनाला इशारा

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि. ३१ :** यवतमाळमधील आर्णी मार्गावरील उड्डाणपुलाच्या नियोजनाशून्य कामामुळे नऊ जणांचे बळी गेल्याचा गंभीर आरोप करत आमदार बाळासाहेब मांगुळकर यांनी शनिवारी प्रशासनावर हल्लाबोल केला. शहरातील वाढते अपघात आणि फोफावलेले अवैध धंदे याविरोधात ठोस कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा त्यांनी आयोजित पत्रकार परिषदेत दिला. यावेळी त्यांनी नॅशनल हायवे ऑथॉरिटी आणि पोलिस प्रशासनाच्या कारभारावर ताशेरे ओढले.



शनिवारी (दि. ३१) झालेल्या पत्रकार परिषदेत मांगुळकर यांनी आर्णी मार्गावरील कामाला 'डेथ ट्रॅप' संबोधले. रस्त्यांची झालेली दुरवस्था, अपुरे बॅरिकेड्स आणि दिशादर्शक फलकांअभावी अपघात वाढत असून, नॅशनल हायवे ऑथॉरिटी व जिल्हा नियोजन समिती याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचे त्यांनी सांगितले. यासोबतच शहरात अवैध धंद्यांचा सुळसुळाट वाढला असून, पांढरकवडा परिसरातील अवैध व्यावसायिकांनी यवतमाळमध्ये आपले जाळे पसरवल्याचा दावा त्यांनी केला. वरली मटका आणि भिंगरीसारखे जुगार खुलेआम सुरू असल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. आठवडी बाजार परिसरात महिला प्रसाधनगृहाजवळ सुरू असलेल्या मटका काउंटरचा व्हिडिओच त्यांनी पुराव्यादाखल सादर करत पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. या प्रकारांना प्रशासनाची मूकसंमती असल्याचा संशय व्यक्त करत, तातडीने कठोर कारवाई न झाल्यास जनतेसोबत रस्त्यावर उतरून संघर्ष करण्याचा इशारा बाळासाहेब मांगुळकर यांनी दिला आहे.

# रुंझा येथे तलवारीचा धाक दाखविणारा जेरबंद

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**पांढरकवडा, दि. ३१ :** पांढरकवडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रुंझा येथे हातात नंगी तलवार घेऊन दहशत माजविणाऱ्या शेख कलीमोद्दीन शेख कबीरोद्दीन याला पोलिसांनी ३१ जानेवारी रोजी शिताफीने अटक केली. पोलीस निरीक्षक एल. डी. तावरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक नितीन सुषिर यांच्या पथकाने ही धडक कारवाई करत आरोपीकडून धारदार तलवार जप्त केली आहे.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, रुंझा गावातील बेघर वस्तीत राहणारा शेख कलीमोद्दीन हा इसम हातात धारदार लोखंडी तलवार घेऊन फिरत असल्याची आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण करत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीची तत्काळ दखल घेत पोलीस निरीक्षक एल. डी. तावरे यांनी एक विशेष पथक घटनास्थळी रवाना केले. गावातील वॉर्ड क्रमांक दोनमध्ये आरोपी शेख कलीमोद्दीन हा हातात उघडी तलवार घेऊन दहशत पसरवताना पोलिसांना आढळून आला. यावेळी पोलीस पथकाने वेगाने हालचाली करत अत्यंत शिताफीने त्याला जागीच पकडले आणि त्याच्या ताब्यातील लोखंडी तलवार जप्त केली. सार्वजनिक ठिकाणी शस्त्र बाळगून शांतता भंग केल्याप्रकरणी त्याच्यावर कारवाई करण्यात आली आहे. ही मोहीम उपविभागीय पोलीस अधिकारी रॉबिन बन्सल आणि एल. डी. तावरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक नितीन सुषिर व त्यांच्या सहकाऱ्यांनी यशस्वीरित्या पार पाडली.

# पार्डीच्या महिला शेतकऱ्याने दुष्काळातही घेतले एकरी दहा क्विंटल सोयाबीनचे पीक

## निसर्गाच्या लहरीपणावर मात; प्राचार्या ते प्रगतशील शेतकरी सुवर्णा ठाकरे यांची 'सोनेरी' भरारी!, महिलांसाठी प्रेरणास्त्रोत

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**✦ संजीव भीतकर**

रिर्पोर्ताज

**यवतमाळ, दि.३१ :** यवतमाळ जिल्ह्याच्या कळंब-बाभूळगाव रोडवरून जाताना कळंबच्या पुढे ५ किलोमीटरवर 'पार्डी' (सावळापूर) गाव लागते. या गावालगतच्या शिवारात सध्या नजर जाईल तिथवर डोलणारी पिके आणि सुसज्ज व्यवस्थापन लक्ष वेधून घेते. हे शिवार आहे, एकेकाळी महाविद्यालयाच्या प्राचार्या असलेल्या आणि आता पूर्णवेळ 'प्रगतशील शेतकरी' बनलेल्या प्रा. सुवर्णा चंद्रशेखर ठाकरे यांचे. यंदाच्या अतिवृष्टीने विदर्भातील सोयाबीन उत्पादकांचे कंबरडे मोडले असताना, सुवर्णाताईंनी मात्र योग्य नियोजनातून एकरी १० क्विंटल सोयाबीनचे विक्रमी उत्पादन घेऊन कृषी क्षेत्रासमोर एक नवा आदर्श ठेवला आहे.

आम्ही त्यांच्या शेतावर पोहोचलो असता, तिथे कामाची लगबग सुरू होती. २०१७ पर्यंत यवतमाळच्या डॉ. वि. भि. कोलते अध्यापक विद्यालयात प्राचार्या म्हणून जबाबदारी सांभाळणाऱ्या सुवर्णाताईंनी महाविद्यालय बंद पडल्यानंतर नोकरीच्या मागे न धावता शेतीची वाट धरली. आज त्या पती आणि मुलाच्या मदतीने कुटुंबाची २५ एकर शेती समर्थपणे सांभाळत आहेत. यंदाच्या खरिपात पावसाने सोयाबीनची दाणादाण उडवली. अनेकांचे पीक हातचे गेले. मात्र, सुवर्णाताईंच्या १३ एकर शेतातील चित्र वेगळे होते. त्यांनी 'बाफना १११' या वाणाची निवड केली होती. त्या सांगतात, 'निसर्गाचा भरवसा नसला तरी आपले व्यवस्थापन पक्के हवे. मी रासायनिक खतांसोबतच सेंद्रिय खतावर प्रचंड भर देते. मागील वर्षी तब्बल ३२ ट्रॉली शेणखत शेतात टाकले. जमिनीचा पोत सुधारल्याने आणि योग्य फवारणीमुळे मला एकरी १० क्विंटलचा उतारा मिळाला.' सध्या बाजारात सोयाबीनला अपेक्षित भाव नाही, म्हणून त्यांनी घाई न करता शेतातील गोडाऊनमध्ये १२५ क्विंटल सोयाबीन साठवून ठेवले आहे. 'दाम करी काम' या उक्तीप्रमाणे भाव वाढताच त्या विक्री करणार आहेत, किंवा हेच उच्च दर्जाचे सोयाबीन बियाणे म्हणून विकण्याचे त्यांचे नियोजन आहे. शेतीला विज्ञानाची जोड केवळ पारंपरिक पिके न घेता त्या नवनवीन प्रयोग करत आहेत. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या कृषी विज्ञान केंद्राचे डॉ. संदीप कदम यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी यंदा रब्बी हंगामात वेगळा प्रयोग केला आहे. एका शेतात हरभरा (चना), तर दुसऱ्या शेतात जवस आणि मोहरीची लागवड केली आहे. पिवळ्याधमक मोहरीच्या फुलांनी शेत बहरले आहे. 'जवस आणि मोहरीला उत्पादन खर्च अत्यल्प आहे. एकदा पेरणी केली आणि पाणी दिले की दुसरे काम नाही, त्यामुळे यातूनही भरघोस नफ्याची अपेक्षा आहे,' असे त्या आत्मविश्वासाने सांगतात. पाण्याचे काटेकोर नियोजन करावे लागते. शेती करायची तर पाणी हवेच. त्यांच्या १० एकर शेतात ठिबक सिंचन आहे. यामुळे कमी पाण्यात जास्त क्षेत्र ओलिताखाली येते. गहू, उन्हाळी तूर अशी विविध पिके त्या घेतात. बँकेचे कर्ज वेळेवर फेडून आर्थिक शिस्त पाळल्याने शेतीचा गाडा सुरळीत सुरू असल्याचे त्या सांगतात. 'इच्छा तिथे मार्ग' या म्हणीचा प्रत्यय सुवर्णाताईंच्या जिद्दीकडे पाहून येतो.



### सेंद्रिय आणि आधुनिकतेचा सुवर्णमध्य

**सुवर्णाताईंच्या यशाचे गुपित त्यांच्या 'बॅलन्स' फार्मिंगमध्ये आहे. त्या पूर्णपणे रासायनिक किंवा पूर्णपणे नैसर्गिक शेती न करता, दोन्हीचा सुवर्णमध्य साधतात. त्यांच्याकडे म्हशी आणि दोन गाई आहेत, ज्यांचे शेणखत जमिनीला सकस बनवते. त्याच वेळी पिकांच्या गरजेनुसार कृषी तज्ज्ञांच्या सल्ल्याने त्या कीटकनाशके आणि आधुनिक खतांचा वापर करतात. 'सॉईल हेल्थ' चांगली असल्यानेच प्रतिकूल हवामानातही त्यांची पिके तग धरून राहतात.**

> 'निसर्ग लहरी आहे म्हणून महिला शेतकऱ्यांनी खचून जाऊ नये. एका पिकाने दगा दिला तर दुसरे पीक आधार देते, हे सूत्र मी अवलंबले आहे. मजुरांवर अवलंबून न राहता स्वतः राबले तर शेती नक्कीच फायद्याची ठरते. महिलांमध्ये उपजतच व्यवस्थापन कौशल्य असते, त्यांनी शेतीत उतरून प्रयोग केल्यास पुरुषांपेक्षाही त्या अधिक यशस्वी होऊ शकतात.'
>
> -प्रा. सुवर्णा ठाकरे,
> महिला शेतकरी, पार्डी (सावळापूर), ता. कळंब.